म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय
दा. क.

IRBK-0108197
IRBK-0108197

# ओळख

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय शाखा.
क्र. क्र...८१९८ नों द ............
वि. ..का..वा.. ... क्र. ..................

लेखिका :

सौ. इंद्रायणी सावकार

किंमत ४ रुपये

IRBK-0108197

IRBK-0108197

मनोहर ग्रंथमाला, प्रकाशन १०९ वें

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला,
१६०९, सदाशिव पेठ, पुणें २.

सर्व हक्क लेखिकेच्या स्वाधीन

प्रसिद्धी दिनांक १ जानेवारी १९६०

मुद्रक :
न. वा. लिमये
महाराष्ट्र मुद्रणालय,
४६११ सदाशिव पेठ, पुणें २.

# पहिला डाव देवाला

# परिचय

हा परिचय ‘ ओळख ’ कादंबरीच्या लेखिका सौ. इंद्रायणी सावकार यांचा नाहीं. अनेक तऱ्हेचें ललित लेखन यशस्वीपणें करणाऱ्या लेखिका म्हणून वाङ्मय–शोभेच्या आणि इतरहि अनेक नियतकालिकांच्या वाचकांना त्या सुपरिचित आहेत. म्हणूनच, ‘ पॅरिसमधें घडलेली एक प्रदीर्घ प्रणयकथा मी लिहिली आहे ’ असें त्यांनीं मला सांगितलें तेव्हां मोठ्या अपेक्षेनें मी ती वाचली. ती मला आवडली तशीच दिवाळी अंकाच्या वाचकांनाहि ती आवडल्याची पावती, ‘ वाचायला घेतल्यानंतर संपेपर्यंत कादंबरी खालीं ठेववत नाहीं ’ या शब्दांत मिळाली.

या कादंबरीचें नांव ‘ ओळख ’, ‘ निरास ’ कीं ‘ आमूर ’ ठेवावें यावर थोडी चर्चा झाली. ‘ निरास ’ व ‘ आमूर ’ दोन्ही नांवें चांगलीं होतीं. पण पहिलें जुन्या पठडींतलें वाटलें व ‘ आमूर ’ एकदम वेगळें म्हणून ‘ ओळख ’ हेंच कायम केलें. ‘ आमूर ’ या फ्रेंच शब्दाचा अर्थ प्रीति. एक भारतीय तरुण एका फ्रेंच तरुणीच्या सहवासांत येतो, समान परिस्थितीच्या आवर्तांत तीं दोघे एकत्र राहतात पण तरी आपल्या प्रेमाची ओळख प्रत्यक्षपणें देत नाहींत. पण अखेरीस नायकाला दोघांचेहि एकमेकांवर प्रेम आहे याची ओळख पटते आणि तें प्रगट केलेंच पाहिजे हें कळतें. खोट्या अहंकाराचा निरास होतो.

पॅरीस व लंडन येथील पार्श्वभूमि त्यांनीं निवडली, तिथलीं कांहीं प्रमुख पात्रेंहि निर्माण केलीं आणि तिथल्या वातावरणाचें यथातथ्य चित्रण केलें, हा या कादंबरीचा विशेष आहे. ओघवती भाषेच्या जोडीला लेखिकेचें तेथील वास्तव्य, सूक्ष्म अवलोकन आणि मनुष्य-स्वभावाचा अभ्यास यांची जोड लाभल्यामुळें कादंबरी अतिशय हृदयंगम झाली आहे. अपरिचित वातावरणाचें बारकाव्यांसहित मनोरम वर्णन पण पाल्हाळाचा अभाव आणि आँद्रे व आद्रियान्-सारखीं जिवंत व्यक्तिचित्रें यामुळें कादंबरी वाचतांना वाचक तद्रूप होतो आणि पुस्तक संपल्यानंतर एक चांगलें पुस्तक वाचल्याचा आनंद त्याच्या मनांत शिल्लक उरतो.

—मनोहर महादेव केळकर

# १

नवीन वर्षाचा दुसरा दिवस. नवीन वर्षाच्या स्वागतासाठीं केलेल्या आतषबाजीनं श्रमून पॅरीसची विलासी दुनिया झोंपाळल्यासारखी दिसत होती. रात्रींचा एक वाजला होता. पण जमिनीखालून धांवणाऱ्या मेत्रोमधील गर्दी अकरापासूनच मावळली होती. आळसावलेली ती मेत्रो, एत्वाल् स्टेशनपाशीं येऊन थडकली तेव्हां उपेन्द्र नाइलाजानं बाहेर पडला. मेत्रोमधल्या अरुंद बांकड्यावर तासन् तास बसून त्याचं अंग अवघडलं असलं तरी आंतली ऊब त्याला सुखावह वाटत होती. मिराकुटीनं त्यानं स्वतःचं शरीर जिन्यावरून वर ओढलं आणि ' शाँझेलिझे ' रस्त्याच्या टोंकाला तो बाहेर पडला.

एत्वाल्च्या विस्तीर्ण वर्तुळाच्या मध्यभागीं विजयोन्मादांत उभी असलेली आर्क द त्रियोम्फ् ही कमान अंगावरील दिव्यांच्या पेहरावानं मुशींत घातलेल्या सोन्यासारखी तळपत होती. उपेन्द्र पॅरीसमध्यें आला त्या दिवशीं हेंच दृश्य पहात आसुसल्यासारखा तो अर्धा तास स्तब्ध उभा होता. ' आर्क द त्रियोम्फ्'पासून शाँझेलिझे रस्ता उताराला लागला होता तो प्लास् द ला कोंकोर्दशीं एकरूप होईपर्यंत. त्यावर मागेंपुढें करणाऱ्या असंख्य मोटारींचे हिरवे, तांबडे व पिवळे दिवे इतक्या संथपणें लुकलुक करीत होते कीं जणूं एत्वाल्पासून कोंकोर्दच्या ईजिप्शियन स्तंभापर्यंत जरीबुट्ट्यांचं कापडच कोणीतरी अल्लद उलगडून टाकलं होतं.

आज ती धांवपळ आणि तो कृत्रिम प्रकाश यांच्यामुळें उपेन्द्राला भोंवळ येऊं लागली. दिवसभर वाटचाल केलेली, पोटांत अन्नाचा



कण नाहीं, अशा स्थितींत सौन्दर्याची जाणीव तरी माणसाला कशी व्हावी. भण्भण् वारं सुटलं होतं. दुतर्फा चेस्टनटचीं उघडीं बोडकीं झाडं थंडीनं गोठून उभीं होतीं. हमरस्त्यावरची वर्दळ कमी झाली होती. डाव्या उजव्या अंगाला फुटणाऱ्या गल्ल्यांत भिकाऱ्यांची वर्दळ वाढूं लागली होती. उपेन्द्राला वाटलं,

" आपणहि एखाद्या गल्लींत शिरावं आणि आडोशाला अंगाचं मुटकुळं करून पडावं. नाहीं तरी या भिकाऱ्यांत आणि आपल्यांत काय अंतर आहे ? "

पण मनाची संवय आडवी आली; आपण भिकारी, निराधार असल्याची कबुली द्यायला तें तयार होईना.

एके ठिकाणीं उभं राहून पाय गारठले म्हणून उपेन्द्र चालत सुटला. शाँझेलिझेच्या अंगाला वेंघ घालून बसलेलीं कारंजीं मागें पडलीं, चेस्टनटच्या झाडांखालीं लोळणारी धुळवाटहि त्यानं कशी-बशी काढली, इच्छाशक्ति पणाला लावून तो सेन नदीच्या कांठापर्यंत पोंचला.

सेनच्या पात्रांत कांठावरचा प्रकाश तुडुंब भरला होता. पुला-खालच्या अंधारांत मात्र धुक्याचा लोट सांठल्याचं दिसत होतं. कसल्या तरी अनाकलनीय तिरीमिरींत उपेन्द्र ताड्ताड् पायऱ्या उतरत सेनच्या नजीक गेला. पुलाशेजारच्या अंधाऱ्या कोपऱ्यांत त्यानं आपलं आंग झोंकून दिलं. निमिषार्धांत त्या गारठलेल्या फरशीवरहि त्याला ऊबदार गादीवर पहुडल्यासारखी झोंप आली.

तो जागा झाला तेव्हां त्याच्या अंगाचं थंडीनं लांकूड झालं होतं. हनुवटींतून आणि कानांतून रक्ताच्या चिळकांड्या बाहेर उडणार असं वाटत होतं. अंधार दाटला होता तसाच होता. रस्त्यावरील आवाज मात्र बंद झाले होते. जेमतेम तास दोन तास तो झोंपला असावा. जाग कां आली याचा तो शोध घेऊं लागला. मन्द पावलांनीं त्याच्या चित्तवृत्ति जागृत झाल्या तेव्हां त्याला जाणवलं कीं जवळपास कुठें तरी हालचाल ऐकूं येत आहे. झोपेनं तारवटलेले डोळे त्यानें शक्य तितके ताणले. सेनच्या कांठा-वरून कोणीतरी त्याच्या दिशेनं कोलमडत चालत येत होतं. एखादा दारुडा असेल या शंकेनं उपेंद्रानं आपलं अंग अधिकच चोरून घेतलं. यावेळीं दारुड्या माणसाशीं भांडणं किंवा बोलणं त्याच्या शक्तीबाहेरचं होतं. पण त्या व्यक्तीचा एकदम झोंक गेला. उपेन्द्रानं धांवत जाऊन तिला कवळलं नसतं तर ती सेनमध्येंच पडायची. हात कांकडलेले, पायांत उभं रहाण्याचीहि शक्ति नाहीं, अशा अवस्थेंत एका माणसाला खेंचून मागें ओढणं कठीण काम होतं; त्यांत त्या व्यक्तीनं उपेन्द्राच्या हाताला चावा घेतला, बरीच

लाथाळीहि केली. कसंबसं उपेन्द्रानं तें मुटकुळं कोंपऱ्यांत आणून टाकलं, पुन्हां त्या व्यक्तीनं पळून जाऊन उडी मारूं नये म्हणून आपले दोन्ही पाय तिच्यावर ठेवले आणि भिंतीला डोकं टेकून तो निपचित पडला.

एवढी धडपड करण्याचं बळ आपल्यांत आलं कसं याचंच त्याला आश्चर्य वाटत होतं. लहानपणापासून मनाला मिळालेली शिकवण तें चटकन विसरत नाहीं हेंच खरं. दुसऱ्याचा जीव वांचवायचा म्हणजे वांचवायचा, मग आपला त्याचा कांहीं संबंध असो नसो किंवा आपल्यांत तेवढं त्राण असो वा नसो. एवढ्या हालचालीनं उपेन्द्राच्या अंगांत थोडी ऊब आली होती. मान वांकडी करून त्यानं पायांखालच्या मुटकुळ्याकडे पाहिलं. मुटकुळ्याची हालचाल थांबली होती, डोक्यावर बांधलेल्या लोकरी रुमालांतून तपकिरी केंसांच्या दोन चार बटा फरशीवर लोळत होत्या.

कोण असेल ही ? एखादी फसलेली चवदा–पंधरा वर्षांची बालिका ? प्रेमभंगाच्या क्षणिक दुःखानं आत्महत्त्येचा आततायीपणा करणारी नवयौवना ? जगाचे टक्केटोणपे खाऊन त्रासलेली प्रौढा ? उपेन्द्राचे विचार ये जा करीत होते पण त्यांचं त्याला नीटसं आकलनहि होत नव्हतं.

व्याध मागें लागलेल्या पक्षिणीसारखं आँद्रेचं हृदय धड्धड् धड्-धड् करीत होतं. झोंपेच्या व भुकेच्या ग्लानींत ती सेनच्या कांठाशीं कधीं व कशी आली तें तिचं तिलाहि कळलं नव्हतं. कोणीतरी तिच्यावर हल्ला केला तेव्हां ती खडबडून जागी झाली होती, जीव एकवटून तिनं त्याचा प्रतिकार केला होता. पण त्याच्या प्रचंड शक्ती-पुढें तिचं कांहीं चाललं नव्हतं. भीतीनं ती इतकी घायाळ झाली होती कीं किंकाळी फोडण्याचं त्राणदेखील तिच्यांत राहिलं नव्हतं. निमूटपणानं आपल्यावर काय काय प्रसंग ओढवतात तें पहाण्यास ती सज्ज झाली होती.

पण मिनिटांमागून मिनिटं जाऊं लागली. पूर्वेकडचं काळंमेचकुट आकाश भुरकट होऊं लागलं, दिवे मंदावूं लागले तरी तिच्यावर

हल्ला करणारा माणूस हालचाल करण्याचीं लक्षणं दिसेनात. ऑंद्रेचं भय कमी झालं. त्याच्या पायांखालून आपले खांदे व डोकं अलगद काढून घेण्याचा ती प्रयत्न करूं लागली.

खांदे तिनं हलके हलके काढून घेतले. आतां डोकं काढणार एवढ्यांत उपेन्द्राला एक धक्का बसला.

"पुन्हां मरायला जायचंय् ?" तो ओरडला.

तो जागा झाला एवढंच ऑंद्रेला कळलं. जीव घेऊन ती धांवत सुटली. पण दहा फुटांतच उपेन्द्रानं तिला गांठलं.

"मी इथं असेपर्यंत तरी तुम्हांला पाण्यांत उडी टाकूं देणार नाहीं. जास्त गडबड करूं नका."

हिंदी उच्चारानं म्हटलेलं हें फ्रेंच वाक्य ऑंद्रेच्या ध्यानांत यायला थोडा वेळ लागला. पण एकंदर अर्थ लक्षांत येतांच ती खो खो हंसत सुटली ती इतकी कीं 'ही वेडी तर नाहीं' ना ? अशी उपेन्द्राला शंका येऊं लागली. हंसण्याच्या आवेगानं आणि आपल्यावरचं काल्पनिक संकट दूर झालं या कल्पनेनं ऑंद्रेच्या डोळ्यांत अश्रू गोळा होऊं लागले होते.

"मी—मी जीव देणार नव्हते. जीवनावर भलती वाञ्छा आहे माझी !"

"मग मध्यरात्रीं अशा थंडींत सेनमध्यें पोहायचा विचार होता ?"

"नाहीं." ऑंद्रे बोलून गेली.

"नाहीं तर काय ?" उपेन्द्र गुरकावला. आपली निष्कारण झोंपमोड केल्याबद्दल तो या मुलीवर संतापला होता.

"आणि मी मागें खेचत होतों तर मला चावलात, लाथा झाडल्यात—"

"मला वाटलं कोणी तरी लफंग्या माझ्यावर हात टाकतोय् !" ऑंद्रे लाजत उत्तरली.

"असं होय ?" उपेंद्राचा राग एकदम मावळला. त्यालाहि थोडंसं हंसूं फुटलं.



नकळत दोघंहि पुन्हां त्या कोपऱ्याशीं येऊन विसावली. दोघां-नाहि निवाऱ्याचं स्थान नव्हतं कीं मायेचं माणूस नव्हतं. त्यामुळं तिऱ्हाइताशीं निष्कारण बोलूं नये हा नियम पाळणारीं तीं दोघं आज एकमेकांचा तडकाफडकी निरोप घेऊं शकत नव्हतीं.

" बरीच थंडी आहे नाहीं ? " आँद्रे कांहीं तरी बोलायचं म्हणून बोलली.

" इतकी हाडांना जाऊन भिडणारी थंडी जगांत कुठें असेल असं मला वाटलं नव्हतं. झोंपहि येत नाहीं आणि भूकहि भयकर लागते. "

" अगदीं माझ्या मनांतलं बोललांत !"

"म्हणजे तुमचीहि माझ्यासारखीच अवस्था दिसतेय्?" ऑन्द्रेनं मानेनंच होकार दिला.

"अरेरे, देवानं तुम्हांला हुलकावणी दिलीय्. माझ्या इतका कफल्लक माणूस उभ्या पॅरीसमध्यें सांपडणार नाहीं. एरवीं मी तुम्हांला थोडी तरी मदत केली असती."

"मी मदतीसाठीं तुम्हांला सांगितलं नाहीं हें. उपऱ्या माणसां-कडून मदत घेणाऱ्यांतली मी असते तर वरती रस्त्यावर हिंडले असते, सेनच्या कांठीं एकटी फिरले नसते!" फणकाऱ्यानं ऑंद्रे बोलूं लागली. पण तेवढ्या श्रमानंहि तिला दम लागला.

"पार्दों! तुम्हाला दुखविण्याचा उद्देश नव्हता माझा. मी मनापासून म्हणालों होतों. आतां असं करा, डोळे मिटून पडून रहा स्वस्थ. टकटकीत उजाडलं कीं पोटाची व्यवस्था करूं. तुम्ही भल-त्याच दमला आहांत."

पण ऑंद्रेला हें सांगण्याची जरूर नव्हती. तिला केव्हांच ग्लानि आली होती.

●●●

## २

सूर्याचा पहिला किरण धुक्याच्या थरांतून चोरट्यासारखा जमिनीवर आला. गारठलेल्या चिमण्यांनीं किलबिलाट करण्याचा एक क्षीण प्रयत्न केला. चेस्टनटच्या बुडख्यांवरून वितळलेलं बर्फ ठिपकूं लागलं.

उपेन्द्रानं डोळे उघडून आधीं ऑंद्रेकडे पाहिलं. रात्रींच्या अंधा-रांत ती त्याला नीटशी दिसली नव्हती, शिवाय बरी झोंप लागल्या-मुळें झालेला प्रकार सत्य होता कीं आभास होता याबद्दल तो साशंक होता. हातांवर डोकं टेकून शरीराचं कडबोळं करून ऑंद्रे

गाढ निजली होती. तिचे दाट तपकिरी केस चेहऱ्यावर ओघळले होते. हलक्या हातानं उपेन्द्रानं तिचे केस मागें केले. ती कशी दिसतें हें पहाण्याचं कुतूहल त्याच्या मनांत निर्माण झालं होतं.

तिचं कपाळ रुंद होतं, पण नाक डोळे लहान होते. गालांची हाडं बरींच वर आलीं होतीं. ओठ आणि कानांचीं पाळीं थंडीनं निळी पडलीं होतीं. हनुवटीचं वर्तुळ मात्र फारच मोहक दिसत होतं. चारपांच क्षण उपेन्द्रानं टक लावून हें सर्व नजरेनं टिपून घेतलं आणि तो जागेवर येऊन बसला. त्याच्या पहाण्यांत कसला हेतु नव्हता कीं भलती धिटाई नव्हती. एक साधीभोळी जिज्ञासा होती.

सूर्य थोडा वर आला आणि सेनच्या डाव्या अंगाचीं कळकट घरं धूर सोडूं लागलीं तेव्हां उपेन्द्रानं हालवून हालवून आँद्रेला जागं केलं. पोट भरण्यासाठीं कांहीं तरी चोरी करायची असा निश्चय त्यानं केला होता. त्यासाठीं वर्दळ सुरू होण्याच्या आंतच हातपाय हलवणं इष्ट होतं.

आँद्रे जागी झाली पण तिच्याच्यानें डोळे उघडून, सांवरून बसवेना.

" तुम्ही इथेंच थांबा. मी खायला कांहीं तरी घेऊन येतो." दोनचारदां उपेन्द्रानं सांगितलं तेव्हां कुठें 'समजलं' अशा अर्थी तिनं मान डोलावली.

पायऱ्या चढून तो प्लास दला कोंकोर्दपाशीं वर आला. डावीकडे शाँझेलिझेकडे जाण्यासाठीं वळणार एवढ्यांत समोर त्याला माद्लेंन चर्चचे प्रचंड काळे तुकतुकीत खांब दिसले. त्याच्या आसपास बरींच कॉफीगृहं असल्याचं त्याला आठवलं. म्हणून त्याच दिशेनं त्यानं पावलं वळवलीं.

माद्लेनच्या पायऱ्यावर उभं राहून उपेन्द्रानं आसपास नजर फिरवली. पावाच्या काळ्या सायकलला लटकावून एक पोरगं प्रत्येक कॅफेंत पाव देत हिंडत होतं. उपेन्द्रानं त्याचा मागोवा काढला. तें एका कॅफेंत शिरलं अशी संधि साधून त्यानें दोनतीन पाव ओव्हर

कोटांत लपवले आणि कांहींच झालं नाहीं अशा आविर्भावांत तो रस्ता ओलांडून सेनकडे परतला.

आँद्रे पावावर तुटून पडली. उपेन्द्राची भूक मात्र मेली होती. इतका वेळ आँद्रेसाठीं कांहीं तरी खायला मिळवायचं या एकाच विचारानं तो भारावला होता. आतां मात्र चोरी केल्याबद्दल त्याला स्वतःची शिसारी आली.

पाव संपतांच आँद्रेनं आळस दिला. इतस्ततः उडणारे केस सांवरून गळायला आलेल्या दोन पिना व्यवस्थित लावल्या. उभं राहून तिनं कोटावरची व स्कर्टवरची धूळ झटकली.

" चला ! " आँद्रे.

" कुठं ? " उपेन्द्र.

" ट्विय्यरीच्या बागेंत—पाणी पिऊं या. तहान लागली. " उपेन्द्र निमूटपणानं उठला—करण्याजोगं दुसरं कांहीं सुचत होतं कुठें ? स्वतःची परिस्थिति त्याला बेचैन करीत होती. काकांवर संतापून झालं होतं, मित्रांकडे याचना करून पाहिली होती. हताशतेच्या शेवटच्या टोंकाला पोंचला होता तो. सभोंवतालीं दिवसाची गडबड सुरू झाल्यामुळें स्वतःची असहायता उपेंद्राला अधिक तीव्रतेनं भासत होती.

पाँक्, कँऽऽक्——प्लास दला कोंकोर्दचा विस्तीर्ण चौक ओलांडतांना उपेंद्र भान न राहून एका मोटरच्या पुढ्यांत आला होता. मोटर चालवणाऱ्या माणसानं अर्धं अंग बाहेर काढलं, उपेंद्राला उद्देशून बऱ्याचशा शिव्या मोजल्या आणि मगच मोटर पुन्हां सुरू केली. उपेंद्र भानावर आला. आँद्रे जवळजवळ चौकाच्या पलीकडच्या बाजूला पोंचली होती. तिची रूपरेषा त्याच्या मनांत पक्की ठसली नसती तर ती आँद्रे आहे हें ओळखणं त्याला जड गेलं असतं. तिचा उंच बांधा ताठच्या ताठ होता. पावलं एकापुढें एक ऐटबाजपणानं पडत होती, खांद्याच्या ठेवणींत एकप्रकारचा रुबाब होता, शान होती. ट्विय्यरीच्या राजवाड्यांत एखाद्या राणीनं संचार करावा तशी ती दिसत होती.

उपेन्द्रानं घाईघाईनं आँद्रेला गांठलं; तिला पाहून मनांत काय आलं तें सांगितलं.

" या राजवाड्यांतल्या राणीचं काय झालं माहीत आहे ना? प्लास् द ला कोंकोर्दमध्येंच गिलोतीन् मांडलं होतं. तिथंच अंत झाला तिचा." आँद्रे उत्तरली.

" काय पण उत्तर दिलंत. उपमा अशी संपूर्णार्थानं घ्यायची नसते."

" चुकले. मी विनोद करायचा प्रयत्न केला होता."

आँद्रे पाणी प्यायला निघून गेली. उपेन्द्र बागेच्या मध्यभागीं असलेल्या विस्तीर्ण वर्तुळाकार हौदापाशीं बसला. आँद्रे त्याला आवडली होती. त्याच्या ओळखीच्या स्त्रियांपेक्षां ती विशेष वेगळी होती. तिचा रुबाब और होता. सर्वसाधारण स्त्री दुसऱ्याला आनंद देण्याचा, संतुष्ट करण्याचा प्रयत्न करीत असते; तिची वेषभूषा संभाषण आणि अनेकदां स्वभावपरिपोष या एकाच कारणांतून उगम पावलेला असतो. आँद्रेमध्यें ही वृत्ति दिसून येत नव्हती— ज़णुं काहीं इतरांचं अस्तित्वच तिच्या लेखीं नव्हतं; जणुं ती फक्त स्वतःसाठींच जगत होती आणि नेमकी यामुळेंच उपेन्द्राला ती आवडूं लागली होती.

" रात्रीच्या वेळीं सेनच्या कांठीं काय करीत होतां तुम्ही?" आँद्रे परत येतांच उपेन्द्रानं तिला विचारलं.

" हा प्रश्न मी देखील विचारूं शकेन नाहीं कां?"

" होय, पण पुरुष कुठेंहि भटकूं शकतात. एखाद्या स्त्रीनं अवलियासारखं भटकावं म्हणजे—"

" पुरुष भटकूं शकतात. पण कडक थंडींत सेनच्या कांठीं कोण झोंपतं माहीत आहे ना? वेडे, दारुडे आणि कवी; आणि तुम्ही कवि नसाल अशी मी आशा करते."

" तुमची यादी अपूर्ण आहे. कुठेंच आसरा नसलेल्या दरिद्री माणसांची काय वाट?"

अनुक्रम
आ. वा
2056
दि. 3-7-61



“ पॅरीसला येणारे इतरदेशीय कधींच दरिद्री नसतात. दरिद्री माणसाला इथं येणं शक्य होणार नाहीं. ”

“ नशीब उलटलं म्हणजे जगांत सगळं कांहीं शक्य होतं !”

“ असें आपण वर्तुळांतल्या वर्तुळांत किती वेळ बोलत रहाणार ? अजून तुमचं नांव देखील माहीत नाहीं मला. ” ऑंद्रे बोलून गेली खरी पण मग तिचं मन तिला खाऊं लागलं. योगायोगानं भेटलेला माणूस हा; त्यांतून परदेशी; त्याचे आचारविचार, संस्कृति, संबंधी कशाचीच माहिती नाहीं आपल्याला. त्याची इच्छा नसतांना आपण त्याला चिकटून बसलों आहोंत, त्याच्या खाजगीपणांत शिरूं पहात आहोंत, असं तर नाहीं ना होत ? ”

“ म्हणजे तुम्हांला सांगायचं असलं तरच सांगा. मी आपलं सहज विचारलं. ” तिनं स्वत:ला सांवरलं.

नेमके याच तऱ्हेचे विचार उपेन्द्राच्या मनांत चालले होते. पण त्याचा स्वभाव अधिक दिलखुलास होता. स्त्रिया जात्याच भिडस्त असतात; त्यांतून ऑंद्रे जरा जास्तच घाबरट आणि अबोल होती.

“ मी आपणहूनच सांगणार होतों. पण मला वाटलं, तुम्हांला कदाचित् आपली ओळख इथेंच संपवायची असेल. ”

आपल्या मनांतलेच विचार याच्याहि मनांत घोळावेत याची ऑंद्रेला मौज वाटली.

“ माझं नांव उपेन्द्र कीर्तने—उपेन् असं लक्ष्यांत ठेवा. म्हणायला सोपं आहे. ”

“ मी ऑंद्रे—ऑंद्रे दूमों. ”

“ ऑंद्रे—छान आहे नांव. आतां मी एक सूचना मांडतो; तुम्हांला पटली तर ठीक आहे. नाहीं तर खुशाल नाहीं म्हणून सांगा. आपण दोघांनींहि एकमेकांना आपण सेनच्या कांठीं कां आलों तें सांगायचं. पुढें कधीं आपण भेटूं न भेटूं, कदाचित् एक गमतीदार प्रसंग एवढीच कालची आठवण राहील. पण एवढ्या-वरच निरोप घेतला तर रुखरुख लागून राहील. आपण एकमेकांशीं इतके अपरिचित आहोंत कीं जवळच्या लोकांना ज्या गोष्टी पटकन्

सांगायला लाज वाटेल त्या तिऱ्हाईत या नात्यानं एकमेकांशीं सहज बोलून जाऊं."

" अरे वा ! तुमचे उच्चार पूर्ण फ्रेंच नसले तरी विचार मांडण्याची धाटणी मात्र फ्रेंच आहे बरं का !"

" एवढी प्रस्तावना अशासाठीं कीं तुमचा माझ्याविषयीं गैरसमज होऊं नये. नाहीं तर काल तुमचा जीव वांचवायला गेलें तर तुम्हांला भलतीच शंका आली तसं आज आणखी कांहीं तरी वाटायचं."

ॲंद्रे हंसूं लागली. उभ्या आयुष्यांत तिला हलुवारपणें हंसवणारा हा एकच माणूस तिला भेटला होता. भविष्यकाळाची चिन्ता करण्यांतच तिचा इतका वेळ जाई कीं हंसायचे प्रसंग तिच्यावर क्वचितच येत.

" बरं. बरं. तुमची सूचना मान्य. " ॲंद्रेच्या अंगांत लहान मुलाचा उत्साह संचारला होता. तिच्या चेहऱ्यावरचा अवघडलेला भाव नाहींसा झाला होता. " इतकंच नव्हे तर मला आणखी एक गंमत सुचली आहे. आधीं तुम्ही कोण आहांतसं मला वाटतं तें मी सांगायचं आणि मी कोण आहे याचा तुम्ही तर्क करायचा."

" छे ! असला कल्पनेचा खेळ आपल्याला नाहीं बुवा जमत."

" यावरून तुमचं आयुष्य अगदीं सुखासमाधानांत गेलंय् हें स्पष्ट दिसतं."

" तें कसं काय ? "

"सभोंवतालची परिस्थिति असह्य झाली म्हणजे माणूस स्वतःच्या मनांत एक आगळीच दुनिया निर्माण करतो; त्याची कल्पनाशक्ति भलतचि उद्दीपित होते."

"मग यापुढें मला हा खेळ शिकावाच लागेल. तुम्ही सांगा बरं, मी कोण वाटतो तें. मग मी माझी तुटपुंजी प्रतिभा चालवायचा प्रयत्न करीन."

"तुम्ही ना ?" ॲंद्रेनं दोन्ही हात गुढघ्यांभोंवती आवळून धरले, डोळे मिटून एक मिनिट ध्यान केलं. हातांवर डोकं टेकून

अंतराळांत पहात ती बोलूं लागली—"तुम्ही महाराज्जा आहांत. हिंदुस्थानांत तुमच्याकडे हत्ती आहेत, टोंकदार जोडे आहेत, सोन्याचे मुकुट आहेत. तुम्ही पॅरीसला आलांत कारण—कारण—हं—गुप्तपणें प्रवास करण्यासाठीं. पण काल जुगारांत तुमचे सगळे पैसे संपले. अंहं हें फारसं चांगलं नाहीं—तुमचा प्रधान तुमचे सगळे पैसे लुबाडून पळून गेला. तुमचा पासपोर्ट, कपडे सगळं कांहीं त्यानं नेलं."

एरवीं कोणी अशीं कल्पनाचित्रं रंगवलीं असतीं तर उपेन्द्र तिला बनेल समजला असता. पण ऑँद्रे आपल्या गोष्टींत खरोखर रंगली होती, त्याचं अस्तित्वहि विसरून एक नवीन जग निर्माण करूं पहात होती. तिचे डोळे कुठं तरी लागले होते, चेहऱ्यावर उत्कटतेचा भाव दाटला होता. स्वतःला, जगाला, सभोंवतालच्या उद्वेगकारक परिस्थितीला विसरून ऑँद्रे आपल्या कल्पनाचित्राशीं एकतान झाली होती.

"छेः छेः असा मी कोणी नाहीं. एक सामान्य हिंदी नागरीक आहे. शिक्षणासाठीं इथें आलों आहे."

"किती घायकुतेपणा तुमचा. मला पुरं बोलूं तरी द्यायचं !"

"बरं बोला आतां."

"आतां नाहीं जमणार."

पत्त्याचं घर ढांसळल्यावर लहान मूल रडवेलं होतं तशीच ऑँद्रे रडवेली झाली होती. तिला खुषींत आणण्यासाठीं उपेन्द्र सांगूं लागला—

"राहिलं. आतां माझा तर्क ऐक. तुझं वय असेल पंधरा सोळा. मानासिक वय नऊदहा. आईनं केकचा तुकडा दिला नाहीं म्हणून तूं रुसून घराबाहेर पळालीस आणि भटकतां भटकतां सेनच्या कांठीं आलीस—" बोलण्याच्या नादांत उपेन्द्र तिचा एकेरी उल्लेख करून गेला.

पण ऑँद्रे अधिकच खिन्न मात्र झाली. "पुरे, पुरे, असे साधे सुंदर कौटुंबिक प्रसंग माझ्या वांट्याला कधींच आलेले नाहींत !" म्लान चेहऱ्यानं ती म्हणाली. आपण केलेल्या विनोदाचा भलताच

परिणाम झाल्याचं पाहून उपेन्द्राला वाईट वाटलं. तो निमूटपणें सांगूं लागला—

"तसं गोष्टींतल्यासारखं सांगायला नाहीं जमणार बरं कां. साधारण कांहीं तरी सांगतों. पाहिजे तेव्हां मध्यें अडवून प्रश्न विचार.

नांव सांगितलंच. देश माहीत आहेच. गांव पुणं. तूं कदाचित् ऐकलं नसशील नांव ! तें मुंबईच्या जवळ आहे. मुंबईपेक्षां लाखपटीनं सुन्दर, खेडेगांवासारखं साधसुधं, टापटिपीचं आणि मोठ्या शहरासारखं सुशिक्षित. घरोघरीं शाळा-कॉलेजांत जाणारीं मुलं सांपडायचींच. पण शहरवस्तीचा माणूसघाणेपणा सांपडायचा नाहीं तिथं. वर्तमानपत्रं नांवाला छापायचीं,हव्यास म्हणून. पेन्शनर पहांटे टेकड्यांच्या पायथ्याशीं बसून बातम्यांची देवघेव करतात. बायका दुपारीं नाहींतर संध्याकाळीं देवळांत जातात तेव्हां त्यांना सगळं कळतंच. पोरं तर संध्याकाळचीं उन्हं पडतात न पडतात तोंच दोनचार ठराविक रेस्टॉरंटसमोर हजर. बातम्या तयार करायच्या, ऐकायच्या, पसरवायच्या; अशी मौज यायची ! सगळे सगळ्यांना ओळखतात—निदान चेहरे तरी !

आम्ही पुणेकर नादिष्ट, चक्रम्. डोक्यांत एक वेड घेतलं तर जन्मभर तेंच संभाळीत बसूं. पांच सात पदव्या गोळा करूनहि हट्टानं शाळामास्तर रहाणारे लोक पुण्यांतच सांपडायचे. कर्तृत्व दाखवायला म्हणून सरकारी परीक्षा पास व्हायचं आणि मग दारीं आलेल्या लक्ष्मीला लाथ मारून वडार कॉलनी झाडीत बसायचं हें व्रत पुणेकराखेरीज कोणाला जमणार नाहीं.

पण हाडाचे आम्ही पक्के भामटे. कधीं कोणाला रस्ता बरोबर सांगणार नाहीं. भाजीवाल्याच्या टोपलींतून एखादा बटाटा किंवा कांदा शिताफीनं पळवला तर इंग्लंडचा खजिना लुटल्याचा गर्व होईल आम्हांला. दुसऱ्याला-विशेषतः एखाद्या ऐटबाज मुंबईकराला-गंडा घालून सिंगल चहा जर उकळतां आला तर त्याची चव आम्हांला अमृतापेक्षां जास्त.

इतरांच्या दृष्टीनं ही लबाडी. पण पुणेकर पुणेकराला ओळखून असतो. लोकांच्या भामटेगिरीला तो बळी पडणार नाहीं. तूं म्हणशील कां हें पुराण चालवलंय् ? अग जो पुण्यांत जन्मला तो जन्मभर पुण्याचे पोवाडेच गाणार. आम्हीं रोज ऐकमेकांच्या उरावर बसूं, आईबापांवरून शिव्या घालूं, एकमेकांची कुलंगडी बाहेर काढूं; पण तिऱ्हाईत पुढ्यांत येऊं दे, आमची वर्षांनुवर्षांची दिलजमाई प्रगट होईल. पुणेकर एकवेळ भारताला विटेल पण पुण्याला विटणार नाहीं.

लोक जसे तऱ्हेवाईक तसाच पुण्याचा निसर्गहि विचित्र. वर्षांतून आठ महिने नद्यांचं कुरण होतं. गांवची ढोरं त्यांच्या पात्रांत चरतात. पावसाळा आला कीं त्या अशा फैंसाळतात कीं कांठाला राहणाऱ्या माणसांना सामानसुमानाची आशा सोडून धर्मशाळेचा आसरा घ्यावा लागतो. सह्याद्रि पर्वताच्या शाखांनीं पुण्याभोंवती फेर धरला आहे. उन्हाळ्यांत या टेकड्या तापून तापून तांबड्या ठिक्कर पडतात. हिवाळ्यांत निळसर वाटतात. मग एक दिवस उठून पहावं तर त्यांच्यावर हिरवी मखमल उगवलेली असते.

अशा या आडदांड पण प्रेमळ गांवीं मी जन्मलों आणि लहानाचा मोठा झालों. आईवडील मला आठवत नाहींत. मी बराच लहान असतांना एका अपघातांत ते वारले. काकांकडेच मी वाढलों. वाड्यांत बरींच मुलं होतीं, झाडावर चढ, गाईच्या शेपट्या पिरगळ, विटीदांडू खेळ, पतंग उडव असा आमचा वेळ जायचा. आईवडिलांची उणीव भासली नाहीं. काकांनीं छळ केला असला तर आठवत नाहीं.

अभ्यास कधीं जमला नाहीं. कसाबसा मॅट्रिक पास झालों आणि 'ऑर्ट्स'कडे गेलों. शाळेंत असतांना ड्रॉइंगच्या परीक्षा दिल्या होत्या. कॉलेजांत अधून मधून एखाद दुसरं चित्र काढून प्रदर्शनांत ठेवत होतों. काकांना माझ्या चित्रकलेचं फार कौतुक. त्यांना मुलगा नाहीं; सात मुली. ते नेहमीं म्हणायचे, "उपेन्, बाबा, पॅरीसला जाऊन तुझ्या अंगची कला वाढव. ही दैवी देणगी आहे. तुला बापानं पैसाहि

बराच ठेवलाय्." हो;तें सांगायचं विसरलों! वडिलांचे पन्नास हजार रुपये माझ्या नांवें होते. बी. ए. झालों, पुढें काय करायचं तें ठरलंच होतं. पॅरीसला जायचं वेड काकांनीं माझ्या मनांत पक्कं भरवलं होतं.

इथे आलों. वर्गांतल्या विद्यार्थ्यांशीं थोडीशी ओळख होतांच मला कळून चुकलं कीं कागदावर चार रंग लावतां आले म्हणजे माणूस चित्रकार होत नाहीं. कला म्हणजे निर्मिति. स्वतःच्या कल्पना हव्यात. स्वतंत्र शैली हवी. पण आलोंच आहे तसं फ्रेंच शिकावं म्हणून त्याचा अभ्यास वाढवला. काकांना अर्थात् तें कळवलं नाहीं. काका वेळचेवेळीं पैसे पाठवीत होते. दोन महिन्यापूर्वीं पैशांचा हप्ता चुकला, पत्रहि आलं नाहीं. मी लागोपाठ दोन तीन पत्रं लिहिलीं, पैसे मागितले, पण उत्तर नाहीं. शेवटीं तार केली. परवां काकांचं पत्र आलं—' पैसे पाठवूं शकत नाहीं. ' एवढाच मजकूर होता. एकाएकीं डोक्यांत प्रकाश पडला. माझी इस्टेट गिळंकृत करायचा काकांनीं उत्तम मार्ग शोधून काढला होता. त्यांचं कारस्थान पूर्वींच लक्ष्यांत यायला पाहिजे होतं. पण माझ्यासारखा गाढव मीच !

इतके दिवस इथें रुबाबांत राहिलों. मित्रांना नेहमीं चहा पाजला, सिनेमाला नेलं.आतां त्यांच्यापुढें तोंड वेंगाडायची लाज वाटूं लागली. नाइलाजानं हात पसरला तरी कोणी मदत करीना. त्यांचंही बरोबर आहे; जेमतेम महिन्याच्या खर्चापुरते पैसे प्रत्येकाला मिळणार, इतरांना तो काय देणार ? तीस तारीख उलटली तेव्हां मित्राच्या खोलीवर सामान टाकलं. तिथें झोंपूं लागलों. पण वसतिगृहाच्या व्यवस्थापकानं पकडायची भीति ! म्हणून काल मित्रानं स्पष्ट सांगितलं, ' उद्यांपासून दुसरी व्यवस्था कर. '

असं हें सगळं अगदीं सामान्य आहे. त्यांत भव्य, दिलखेंचक, दर्दभरं असं कांहीं नाहीं- " ट्विय्यरी बागेच्या भकास विस्ताराकडे पहात एका दमांत उपेन्द्रानं सांगून टाकलं. ऑंद्रे रंगून ऐकत होती.

तिची खिन्नता नाहींशी होऊं लागली. उपेन्द्र थांबला तेंव्हां अँद्रे गालांतल्या गालांत हंसते आहे असं त्याला दिसलं.

"काय झालं हंसायला ?" त्यानं विचारलं.

"माझ्या फ्रेंचच्या चुकांना हंसतेस ना ?"

"अंहं. तुझ्या सांगण्याच्या पद्धतीला. तुझ्या गांवाचं तूं मोठं वर्णन केलंस पण तुझ्या आठवणी लाडक्या गांवाच्या—सांघिक. खास जिव्हाळयाच्या, कुटुंबांतल्या वैयक्तिक आठवणी नाहींतच तुला. निदान तूं मला सांगितल्या तरी नाहींस!"

"मला आईवडील नव्हतेच म्हणा. पण ज्यांना होते त्यांनाहि तूं म्हणतेस असल्या आठवणी नसतील. वाड्यांत रहाणारीं आम्ही सगळीं मुलं अशींच वाढतों—मुलामुलांतच. झोंपायला फक्त आपापल्या घरीं जायचं. म्हणून मोठ्या माणसांना 'बेबीसीटर' शोधा, मुलांशीं मूल बनून खेळा असले उपद्व्याप कधीं करावे लागत नाहींत."

"तेंच म्हणाले मी. तूं तुमच्या गांवाचा एक घटक म्हणून वाढला आहेस. मला माझ्या आईवडिलांची मुलगी म्हणून, एक व्यक्ति म्हणून वाढवण्यांत आलं आहे. माझ्या आठवणी वेगळ्या आहेत, स्वार्थी—संकुचित आहेत. पण त्या उत्कट आहेत. दररोज रात्रीं माझं उभं आयुष्य माझ्या डोळ्यांसमोरून फडाफडा पंख हालवीत निघून जातं. त्यांतल्या बोंचक प्रसंगांनीं मी अजून विव्हळ होते, आनंदाचे क्षण मला फारसे आठवत नाहींत. पण आठवतात तेवढ्यानं मला अजूनहि बरं वाटतं. पण हा सगळा खेळ जगाआड. माणसांत वावरतांना मी सुखदुःखं पचवलेली, भावनारहित, आधुनिक स्त्री असते.

दरवर्षी ख्रिसमस आला म्हणजे मला माझ्या लहानपणाच्या ख्रिसमसची आठवण येते. पपा दरवर्षी आम्हांला सगळ्यांना डोंगरमाथ्यावर बर्फावरचे खेळ खेळायला न्यायचे. मी सात वर्षांची होते तेंव्हां आम्ही झेर्‌माथ्‌ला गेलों होतों—स्वित्झर्लंडमध्यें एका लहानद्या

लांकडी घरांत पंधरा दिवस मजेंत घालवले आम्ही. घरांतून बाहेर पडायचं तें ढगांतच शिरायचं. पांढऱ्या शुभ्र बर्फावर बसलेले ते ऐटबाज सावळट ढग मला खूप खूप आवडायचे. " ख्रिसमसला मी सगळ्यांना ढगांची लोकर भेट देणार " असं मी माझ्या वडिलांना सांगायची.

माझा भाऊ माझ्यापेक्षां नऊ वर्षांनीं मोठा होता. तो मला म्हणायचा "टेडी बेअर, तूं उत्तर ध्रुवांत का नाहीं जन्माला आलीस? दिवसभर बर्फांत खेळतेस ! जेवतसुद्धां नाहींस धड."

आणि तें खरंच होतं. बर्फांत लोळणं, बर्फाचे गोळे करून लोकांना मारणं, बर्फ खाणं असले खेळ मला अतोनात आवडायचे. कोलेत् नांवाची बाई मला लहानपणापासून संभाळायला आणि शिकवायला ठेवली होती, ती हैराण व्हायची माझ्यापायीं.

दरवर्षी नाताळांत उंच डोंगरामध्यें जायचं असा माझ्या वडिलांचा नेम होता. पण युद्ध सुरू झालं, ते सैन्यांत भरती होऊन दूर कुठें तरी निघून गेले आणि आमच्या या सफरी बन्द पडल्या. मला वडिलांची खूप आठवण यायची. युद्ध म्हणजे काय ? हें नीटसं न कळल्यामुळें मी कोलेत्ला एकसारखे प्रश्न विचारून भंडावून सोडीत असे.

वडील तर दूरच गेले होते.पण भाऊ घरांत असूनहि दुरावल्यासारखा झाला होता. मी लाडानं केस उपटायला लागले कीं झॉं म्हणायचा,

"ऑंद्रे, आतां नको बरं मस्ती करूं. मला विचार करूं दे. नाहीं तर "ऑंद्रे, मला वाचायचं आहे."

मी कोलेत्च्या खांद्यावर मान टाकून रडत बसायची. वडील युद्धावर गेलेले आणि झॉं एकाएकीं गंभीर पोक्त झालेला. त्यामुळें माझे दोन लाडके सवंगडी मला दुरावले होते.

मी आणि कोलेत् एका छोट्याशा गुलाबी रंगाच्या खोलींत निजत असूं. शेजारीं आईची खोली होती. फिकट पिवळा रंग होता तिचा. कधीं कधीं रात्रीं मी खडबडून जागी व्हायची.

झॉं व आई भांडताहेत असं मला वाटायचं. एकदां तर मला झॉंचं ओरडणं स्पष्ट ऐकूं आलं. तो म्हणत होता,

" पपा युद्धाच्या खाईंत जाऊन पडले आहेत आणि तूं पार्ट्यांना जा, नाच कर ! "

पण कोलेत् मला थोपटीत म्हणाली—

" नीज बरं ऑंद्रे. कोणी भांडत नाहीं न् बोलत नाहीं. तुला उगीच भास होतोय्. "

एकदां तर भर दुपारीं आईचं आणि झॉंचं माझ्यासमोरच भांडण झालं. आई झॉंला म्हणाली—

" सैनिकांना मजा करायला मिळते अशी कोणाला मिळत नाहीं. माझ्यावर पाळत ठेवूं नकोस तूं उगीच. तुझ्या वडिलांना वेळेवर पत्र पाठवतेय् ना मी ? आणखी काय करायचं त्यांच्यासाठीं ? "

वडील होते तोंपर्यंत मला चांगली करमणूक होती. कधीं ते एखाद्या मित्राकडे न्यायचे, कधीं बागेंत. एकदोनदां तर त्यांनीं मला घोड्यावर बसवून रपेट करवली होती. ते गेल्यावर मला कोलेत् रोज बागेंत न्यायची, तेवढंच माझं फिरणं. त्या तोचतोच-पणाचा मला उबग यायचा. कोलेत्ला मीं खूप चिमटे काढायची. एकदां मी तिला लाथाहि मारल्या. ती मला शिस्त लावायचा प्रयत्न करीत होती. मी जोरजोरांत रडत होतें. आई एकाएकी आली. " ऑंद्रे, डोळे पूस बरं. मी तुला गंमत दाखवणार आहे!" ती मला म्हणाली.

मात्र आईची गंमत पाहिल्यावर माझा राग आणखी वाढला. पस्तिशीच्या आसपासचा, पिवळ्या डोळ्यांचा, टोंकेरी नाकाचा एक गृहस्थ दिवाणखान्यांत बसला होता. ही म्हणे गंमत !

" हे मास्सिअ न्वारे. 'बों झूर' म्हण बरं बाळ. " आईनं मला फर्मावलं.

" मी नाहीं म्हणणार ! " मी फुरंगटलें.

" म्हण ना. शहाणी ना तूं ? "

" नाहीं. "

" म्हणतेस कां मारूं थप्पड ? "

" मार. मार. तुम्ही सगळे मला छळतां. पपांना मी सांगणार आहे ! " मी भोकाड पसरलं. आईनं कदाचित् मला खरोखरीच मारलं असतं. पण मस्सिअ न्वारेनं माझे पंजे हातांत धरले आणि मला आपल्याकडे ओढलं.

" मला वाटतं तिला वडील किंवा मोठा भाऊ यांची गरज आहे. हो ना आँद्रे ? "

त्याचं बोलणं मला विशेष समजलं नाहीं. पण वडिलांचा उल्लेख ऐकून मी मान डोलावली.

" मग रडूं नकोस. कदाचित् तुला नवीन वडील मिळतील हं !" मस्सिअ न्वारेंनीं आपले पिवळे डोळे मिचकावले. तें मला मुळींच आवडलं नाहीं.

त्यानंतर मस्सिअ न्वारेंचं पाऊल घरांत पडलं कीं मी कोलेत्च्या पाठीस लागून बागेंत निघून जायची. माझी आणि कोलेत्ची चांगली दोस्ती जमली. पण हळुंहळुं मस्सिअ न्वारे आमच्याकडे इतक्यांदा येऊं लागले कीं त्यांना चुकवणं अशक्य होऊं लागलं.

दीड एक वर्ष गेलं. झाँचा अठरा वर्षांचा वाढदिवस आला. मस्सिअ न्वारेनं त्याच्यासाठीं रंगीत कागदांत गुंडाळून एक भली मोठी भेट आणली होती. आईनं एक मोठी केक विकत आणली होती. संध्याकाळीं पांच वाजल्यापासून आम्ही त्याची वाट पहात होतों. पण तो रात्रीं नऊ वाजतां घरीं आला—आला म्हणण्यापेक्षां त्याच्या सोबत्यांनीं त्याला आणून पोंचवलं म्हणणंच योग्य होईल. तो चिकार दारू प्यायला होता. आल्या आल्या न्वारेंना उद्देशून कांहीं तरी अर्वाच्य बोलला असावा. कारण त्यानं तोंड उघडतांच कोलेत्नं माझ्या कानांत बोटं खुपसलीं.

" झाँ, तुला दारू चढली आहे ! " आई ओरडली. " त्यांनीं तुला किती सुन्दर भेट आणली आहे. त्याची तरी जाणीव ठेव. "

" ती भेट तुला विकत घेण्याकरितां आणलीय् त्यांनीं !" असं म्हणून झाँ जें कांहीं अचकट विचकट बोलला त्याचा अर्थ त्यावेळीं

मला कळला नाहीं. पण मी मोठी होत गेले तसतसे त्या अर्थाचे पापुद्रे मला उलगडत गेले. शब्द मला अजूनहि आठवतात. पण सभ्यतेच्या मर्यादा संभाळून ऐकावेत अगर सांगावेत असे शब्द नाहींत ते.

कोलेत् मला घाईघाईनं बाहेर नेऊं लागली. पण झाँनं तिला अडवलं. मला उचलून घेऊन तो एकाएकीं रडूं लागला.

" उद्यां मी सैन्यांत जाणार आहे आँद्रे. पूर्ण विचार करूनच ठरवलंय्. पण तुझ्यासाठीं जीव तुटतोय् ! "

त्यानं मला एक क्रॉस दिला.

" आपला धर्म सोडूं नकोस. आईसारखं वागूं नकोस. " हे त्याचे शेवटचे शब्द.

झाँ गेल्यानंतर दोन महिन्यांनींच पपा वारल्याची तार आली. आईनं काळे कपडे केले. मलाहि काळा कोट विकत आणला. पपांचे मित्र आईच्या भेटीला येऊं लागले. वरकरणी आई आपले पुढचे बेत लपवायची. पण हळुंहळुं तिनं आपलं बस्तान गुंडाळायला सुरुवात केली हें माझ्या आतां लक्ष्यांत येतंय्. ' परवडत नाहीं ' म्हणून सर्व नोकरांना तिनं काढून टाकलं. एकटी कोलेत् तेवढी जाईना. ' मी फुकट काम करीन पण छोट्या आँद्रेला सोडणार नाहीं ' असा तिनं हेका धरला. आईनं तिला आडून आडून सांगून पाहिलं; ऐकेना तेव्हां चक्क हाताला धरून बाहेर काढलं. मोठ्यांदा हंबरडा फोडून ती हमरस्त्यांतून रडत रडत घरीं गेली.

" आँद्रे, तुला नीसला माझ्या घरीं राहायला आवडेल ना ? " मस्सिअ न्वारेंनीं मला लाडांत येऊन विचारलं.

मला आतां समज येऊं लागली होती.

" तुम्ही ज्या घरांत असाल तिथें रहायला मला मुळींच आवडणार नाहीं. मग तें घर नीसला असो किंवा स्वर्गात असो. "

" जा तर कार्टे. तुला वसतिगृहांतच टाकतो. "

आईनं मस्सिअ न्वारेशीं लग्न लावलं आणि ते मधुचंद्राला ब्रिटनींत गेले. मला त्यांनीं 'लील'ला एका शाळेंत ठेवलं.

# ओळख

मला बरोबरीच्या मैत्रिणी कधींच नव्हत्या. त्यामुळें वसतिगृहांत रहाणं फार जड जाऊं लागलं. विशेषतः इतर मुलींना आईवडिलांचीं पत्रं, खाऊ, क्वचित् पुस्तकं नाहीं तर फ्रॉक वगैरे भेटी येत असत. माझे पैसे महिन्याच्या महिन्याला प्रमुख बाईकडे येत. कधीं कधीं आईचं कार्ड किंवा पत्र येई. पण एखाद्या अनोळखी माणसाचं पत्र वाचावं असं तिचं पत्र वाचतांना मला होत असे. तिला उत्तर लिहिणं मला कधींच जमलं नाहीं.

लहान मुलांचं जग मोठं क्रूर असतं. तिथं दयामाया, इतरांच्या भावनांचा विचार नसतो. म्हणूनच लपवाछपवीहि नसते. मला पत्रं येत नाहींत, खाऊ येत नाहीं हें लक्षांत येतांच मुली मला उघड उघड हिणवूं लागल्या. कोणाला पत्र आलं कीं तिनं तें फोडण्याआधीं माझ्या डोळ्यांसमोर आणून नाचवावं. एखादीला घरून केक आली तर पहिलं आमंत्रण मला मिळायचं !

खरं म्हणजे शाळेंत दोन अनाथ मुलीहि होत्या. पण एक खेळण्यांत, नाटकांत कामं करण्यांत हुशार तर दुसरी अभ्यासांत पहिली. त्यामुळें सर्वांना त्या हव्याहव्याशा वाटायच्या. पण उठून दिसतील असे कोणतेच गुण माझ्यांत नव्हते. माझी कड घ्यायला आईवडील नाहींत हें पाहून मोलकरणी व क्वचित् मास्तरणी मला रागावींत, माझा पाणउतारा करींत. रात्ररात्र मला झोंप नव्हती. हुंदके मोठ्यानं दिले तरी थट्टा होणार. ब्लँकेटचा बोळा तोंडांत कोंबून मी टिपं गाळीत सुन्न पडून रहायची.

महिन्याला थोडेसे पैसे प्रमुख बाई माझ्या स्वाधीन करायच्या—आईच्या सांगण्यावरून. चॉकलेट घ्यायला किंवा एखादा लहान मुलांचा सिनेमा पहायला त्या पैशांचा मी एकदोनदां उपयोग केला. पण एक दिवस रात्रीं रडतां रडतां मला एक युक्ति सुचली. थोडे पैसे देऊन एका मोलकरणीकडून मी कांहीं तिकिटं विकत आणवलीं. स्वतःच स्वतःला पत्र लिहून तिच्याकरवीं तें पोस्टांत टाकलं. हा सर्व व्यवहार गुप्त ठेवण्यासाठीं तिलाहि थोडे पैसे द्यावे लागले.

मला पत्रं येऊं लागलेलीं पहातांच सगळ्या मुलींचीं तोंडं बंद पडलीं. एकदोघी तर माझ्याशीं मैत्री करून पत्र वाचून पहायचा प्रयत्न करूं लागल्या. पण मी त्यांना दूरच ठेवलं. मात्र त्यांना दिसेल अशा ठिकाणीं मी पत्र घेऊन बसत असे. मधूनच हंसायचं, मधूनच चेहरा गंभीर करायचा, 'अरेच्चा' 'अरे बापरे' 'गंमतच आहे म्हणायची' वगैरे त्यांना ऐकूं जाईल अशा बेतानं उच्चारायचं या युक्त्या माझ्या आंगवळणीं पडल्या. आतां बऱ्याचशा मुली शरमिंध्या झाल्या कारण मी स्वतःभोंवतीं जिज्ञासेचं वलय निर्माण केलं होतं.

हे माझे दिवस अतिशय आनंदांत गेले. सर्व मुलींकडे मी तिरस्कारानं पहायची. जणुं कांहीं मी त्यांच्यांत मिसळावं अशी त्यांची लायकी नव्हती. माझ्या वागण्यानं त्यांचीहि माझ्याविषयीं भलतीच कल्पना झाली. पण एक दिवस हा बुडबुडा फुटला. त्या मोलकरणीनं माझं गुपित सर्वांना सांगून टाकलं.

मला किती कमीपणा घ्यावा लागला हें शब्दांत सांगतां येणार नाहीं. सुदैवानं माझ्या त्या आठवणी आतां बुजत आल्या आहेत. मात्र या प्रसंगामुळें लहानपणींच मी एक फार मोठा धडा शिकले—प्रामाणिकपणाचा. माणूस एक वेळ दुसऱ्याशीं प्रामाणिक राहूं शकेल पण स्वतःशीं प्रामाणिक राहणं त्याला क्वचितच जमतं. त्यानंतर मी कधीं स्वप्नांत रंगून गेले नाहीं कीं भलत्या आशा मनांत बाळगल्या नाहींत. माझं मन स्नेहक्षम नाहीं हें मी मान्य केलं. मला आईवडिलांची पांखर मिळणार नाहीं हें कटु सत्यहि निकराच्या दृढनिश्चयानं पचनीं पाडलं. त्या दिवसानं माझ्या मनाला जो आकार दिला तो आजतागायत कायम आहे.

वर्षांमागून वर्षं गेलीं. दरवर्षीं कांहीं नवीन मुली मला आपल्या गटांत ओढून घ्यायला पहायच्या. मला पोरकी समजून अनुकंपा देऊं पहायच्या. त्यांना मी स्पष्ट सांगायची, "माझे वडील युद्धांत मेले. माझ्या आईनं दुसरं लग्न केलंय्. ते पैसे पाठवतात. पण मला घरीं नेत नाहींत किंवा पत्रंहि पाठवत नाहींत."

माझा स्पष्टवक्तेपणा त्यांना विचित्र, विकृत वाटायचा. त्या घाबरून दूर रहायच्या. माझ्या मास्तरणीदेखील मला थोड्या भीत असत. एकदां माझ्याबद्दल आपसांत बोलतांना मी त्यांना ऐकलं— " एरवीं वागायला बरी आहे ती. पण डोक्यावर थोडासा परिणाम झालाय्. तिच्या घरची परिस्थिति ठीक नसेल."

पण मला वाईट वाटलं नाहीं. स्वत:ची ओळख मला इतकी चांगली पटली होती कीं दुसऱ्याच्या बोलण्यानं स्वत:विषयीं मी कधींच विपरीत ग्रह करून घेतला नाहीं."

बोलण्याच्या आवेशांत ऑंद्रेला धाप लागली होती. तिच्या चेहऱ्यावरचा भावहि बदलला होता. तिचे पातळ ओठ एका कडक रेषेंत आले होते. डोळ्यांत क्रोधाच्या शेंदरी छटा चमकत होत्या. कानाचीं पाळी लालबुंद झाली होती. उजव्या हाताचीं नखं तिनं डाव्या मनगटावर रोंवलीं होतीं तिथून रक्त ठिपकायला पहात होतं.

"अशी आहे मी समजलास ? स्वप्नांचा खेळ संपतो तेव्हां तारुण्याचा शेवट होतो असं कोणी तरी म्हटलं आहे. या न्यायानं मी वयाच्या अकराव्या वर्षींच म्हातारी होऊन बसलेंय्. कधीं कधीं माझं मलाच हें जाणवतं. मनांत कधीं बदल नाहीं, भावना नाहींत, रंग नाहींत, तरंग नाहींत, उबग येतो. पण जगण्याची आसक्ति सुटत नाहीं. तुला मुद्दाम सांगून ठेवते. नाहीं तर माझ्याबद्दल भलत्या कल्पना रंगवशील, कसल्यातरी तकलादु, रोमांचकारी, नकली स्वप्नांत मला बुचकळून काढशील."

उपेन्द्र भांबावला. पण क्षणभरच. कोंवळ्या चेहऱ्याच्या आणि भित्र्या मनाच्या या गोजिरवाण्या मुलीनं एखाद्या महान् तत्त्वज्ञानी बाईसारख्या गप्पा सांगाव्या याची त्याला मौज वाटली.

" माझ्यावर कां रागावतेस ? मी तुला कांहीं गैर बोललो आहे कां ? निमूटपणें बसून बिचारा ऐकतोय् ! "

" चुकलं माझं ! इतकं बोलायची मला संवय नाहीं. बोलत सुटलें त्यामुळें भान नाहीं राहिलं. "

" तर मग मी आणतों गाडी वळणावर. लहानपणच्या काऊ-चिऊच्या आठवणी सांगूनच थांबली आहेस तूं. सध्याचं एक दोन वर्षांतलं कांहीं तरी सांग कीं. "

" या काऊचिऊच्या आठवणी वाटतं ? " आँद्रे रुसव्यानं म्हणाली. पण त्याच्या बोलण्यानं तिच्या मनाचे सगळे बांध एकदम शिथिल झाल. तिला वाटलं—काय खोटं आहे याच्या म्हणण्यांत ? विनाकारण हीं कोळिष्टकं आपण उराशीं बाळगून ठेवलीं आहेत. आयुष्याची वाटचाल आपण मागें पहात करीत आलों आहोंत. एकाएकीं ती सुखावली, हलकी झाली, तिनं गोळा करून ठेवलेलं ओझं त्यानं सहज झाडलेल्या शेऱ्यानं गळून पडलं होतं.

" पुढें सांगण्याजोगतं कांहीं विशेष नाहीं. शालान्त परीक्षा होती त्या वर्षीची गोष्ट. परीक्षेला कांहीं महिन्यांचाच अवधि होता. संध्याकाळचं जेवण होतांच प्रमुख बाईनीं मला आपल्या ऑफिसमध्यें बोलावून घेतलं.

" आँद्रे, दोन महिने झाले, तुझ्या घरून पैसे आले नाहींत !" मला ही बातमी फारच अनपेक्षित होती. माझं जीवन इतक्या ठराविक चाकोरींतून चाललं होतं कीं त्यापलीकडे कशाचाच विचार मीं केला नव्हता. परीक्षा झाली कीं कॉलेजमध्यें जायचं, ग्रीक लॅटिन घेऊन पहिलं वर्ष करायचं. पुढें तौलनिक वाङ्मय हा विषय घ्यायचा वगैरे सर्व मी गृहित धरून चाललें होतें.

" तूं घरीं पत्र लिहून पहा. नाहीं तर नाइलाजानं मला तुला शाळेंतून काढावं लागेल. मी दोन पत्रं लिहिलीं. पण त्यांचं उत्तर नाहीं. "

प्रमुख बाई मनापासून बोलत होत्या. मी त्यांना आवडत नसले तरी सरावानं त्यांच्या मनांत माझ्याविषयीं थोडी कळकळ निर्माण झाली असावी.

" पत्र लिहायला मला जमणार नाहीं. गेल्या दोन वर्षांत मी आईला पत्र लिहिलं नाहीं. तिला पाहून तर सहा वर्षं झालीं ?"

" मग तार कर. हा घे तारेचा फॉर्म. तारेचे पैसे मी भरीन."

केवळ त्यांच्या सांगण्यावरून मी ' पैसे पाठवा ' अशी तार केली पण दुसऱ्याच दिवशीं ' या नांवाचं या पत्त्यावर कोणी रहात नाहीं' अशा शेऱ्यासह ती परत आली. प्रमुख बाईंनीं सांगण्यापूर्वींच मी माझं सामान बांधून टाकलं. कुठें जायचं हें मात्र ठरलं नव्हतं.

प्रमुख बाईंचा निरोप घ्यायला गेले तेव्हां त्या माझे मार्क व वागणूक यांचीं पत्रकं काढून वाचीत बसल्या होत्या.

" आँद्रे, तुझा अभ्यास बरा आहे, वर्तणूकहि चांगली आहे. पैशासाठीं तुझ्या अभ्यासांत व्यत्यय येऊं नयेसं वाटतं. तूं पुढें काय करायचं ठरवलं आहेस ? "

" कांहीं नाहीं. "

" स्वयंपाकघरांत आणि ग्रंथालयांत थोडीफार मदत केलीस तर तुझा इथला खर्च भरून निघेल. तुझी थोडी ओढाताण होईल खरी पण अजून तूं लहान आहेस. बाहेर कुठं तरी एकटी राहाण्यापेक्षां इथं रहा. "

त्यांना मी लगेच होकार भरला. स्वयंपाकघरांतलं काम मला मुळींच आवडत नव्हतं. तिथले वास, त्या कळकट स्वयंपाकिणी, त्यांची अश्लील बोलणीं या सर्वांची मला किळस यायची. पण ग्रंथालयांतल्या कामांत मी पूर्णपणें रमून गेले. वाचनाचा नाद मला होताच. शातोब्रिय्यॉँचे ग्रंथ देखील मी केव्हांच वाचून काढले.

परीक्षा पास झाले. प्रमुख बाईंच्या ओळखीनं ' लील ' मध्येंच एका कुटुंबांत मुलांना संभाळायचं व शिकवायचं काम मला मिळालं. नोकरी संभाळून मी कॉलेजांत जाऊं लागलें. पहिलं वर्ष करायला मला दोन वर्षं लागलीं. पण शेवटीं तें पदरांत पडलं.

आणि मग कां कोण जाणे मनाची तळमळ सुरू झाली. मला वाटूं लागलं गंजलेल्या तलवारीसारखं माझं जीवन बेचव, निर्जीव आहे. कांहीं तरी चित्तथरारक प्रसंग घडावेत, माझ्या आयुष्याची उलटापालट व्हावी असं मला वाटूं लागलं. याच सुमाराला मी

जिथं नोकरी करीत होते त्या कुटुंबाच्या एका स्नेह्यानं मोटार घेऊन 'नीस' ला जायचं ठरवलं— चारदोन माणसांना 'लिफ्ट' द्यायला आपण तयार आहोंत असं तो म्हणत असे.

माझ्या मनांत विचार आला, नीसला जाऊन आईचा पत्ता काढावा; कशीहि कां असेना ती, तिला भेटून जरा मौज वाटेल; तेवढाच एक आगळा अनुभव. तसेंच झाँचं काय झालं होतं याचीहि मला कल्पना नव्हती. त्याचाहि पत्ता काढायचं मी ठरवलं.

'नीस'ला गेले खरी. पण तिथल्या थाटानं भयंकर बुजल्यासारखं झालं मला. नीसचीं माणसं फक्त पैशाला व चैनीला ओळखत होतीं. मस्सिअ न्वारेंचा पत्ता माझ्याकडे होता. तिथं आतां एक हॉटेल झालं होतं. न्वारेंची माहिती कोणालाच नव्हती. भीड आवरून मी आसपासच्या प्रत्येक घरांतून न्वारे पतिपत्नींची चौकशी करूं लागलें.

कांहीं समजलं नाहीं. कोणी म्हणे बायकोला लुबाडून न्वारे पळून गेला, कोणी म्हणे बायको मेली, तिची व तिच्या मुलांची इस्टेट त्यानं दडपली व नीस सोडलं.

'नीस'ची खेप फुकट गेली. सांठवलेले पैसेहि संपले. पुन्हां लीलला जाऊन त्याच चाकोरींत पडलें. पण मन स्वस्थ बसेना. कुणीतरी प्रेमाचं माणूस शोधून काढण्याची त्याला तळमळ लागली होती. झाँचा मला पत्ता नव्हता. कुणी तरी सुचवलं युद्ध खात्याकडे चौकशी कर. म्हणून 'लील' सोडून पॅरीसला आले–कुणाचीं तरी मुलं सांभाळायचीं, कुठं तरी शिकायचं ! पण अखेर झाँचा पत्ता लागलाच नाहीं. युद्धखात्याच्या बऱ्याचशा फाइल्स् नष्ट झालेल्या आहेत आणि झाँ नेमका कुठल्या पलटणींत होता वगैरे माहिती मला नाहीं. बस्स्, एवढंच !

"एवढंच कसं ? काल सेनच्या कांठीं कशी आलीस ?"

" तूं आलास तशीच—जवळचे पैसे संपले, जायला दुसरं कोणतं ठिकाण नाहीं म्हणून."

उपेन्द्राचं एवढ्या खुलाशावर समाधान झालं नाहीं. पण जास्त

कांहीं सांगायची तिची इच्छा दिसली नाहीं म्हणून तो गप्प बसला. दुसरं म्हणजे आँद्रेचा आतां निरोप घ्यावा किंवा कसं हें त्याला कळत नव्हतं. एक मन म्हणत होतं, "अच्छा ठीक आहे, आपल्या भेटीनं आनंद झाला. भेटूं पुन्हां कधीं तरी असंच!" असं कांहीं तरी म्हण आणि आपला रस्ता धर. आणि सामान्य परिस्थितींत उपेन्द्रानं असंच केलं असतं हें निश्चित. पण आँद्रेची अडचण त्याला स्वतःपेक्षां अधिक जोरानं टोंचत होती. आपण पुरुषासारखे पुरुष असून पैशाशिवाय आपल्याला जीव नकोसा झाला आहे; तर या मुलीला काय होत असेल? असं त्याला वाटत होतं. पण तिला कोणत्याहि स्वरूपाची मदत करणं त्याच्या सर्वस्वी आंवाक्याबाहेरचं होतं. म्हणून त्याला भीति वाटत होती—हिला मदत करण्याची जबाबदारी स्वीकारल्यानं आपल्याबरोबर हिचाहि सत्यानाश होणार नाहीं ना? बरं, तिला आपल्याकडून मदतीची किंवा धीराची तरी अपेक्षा आहे असं कशावरून? कदाचित् तिला आपलं ओझं होतं असेल, केवळ जीवदात्याला दुखवायचं कसं म्हणून ती तडकाफडकीं आपला निरोप घ्यायला धजावत नसेल...अशा निरनिराळ्या परस्परविरोधी कल्पनांनीं उपेन्द्राचं मन नुसतं पिंजून टाकलं होतं. सुदैवानं आँद्रेच्या प्रश्नानं त्याच्या मनांतलं वादळ बरंचसं शांत केलं.

"आतां दुपारच्या खाण्याची कांहीं तरी सोय केली पाहिजे ना?" तिनं विचारलं.

म्हणजे इतक्यांत त्याला सोडून देण्याची तिची इच्छा नव्हती तर!

"हो." उपेन्द्र उत्तरला.

आँद्रेच्या चेहऱ्यावर एकाएकीं भीतीची छटा पसरली.

"चुकलें मी! तुला दुसरीकडे कुठं तरी जायचं असेल, हो ना? जरूर जा. माझं लोढणं तुझ्या गळ्यांत बांधायचा प्रयत्न नाहीं माझा—"

उपेन्द्राला हंसूं फुटलं.

" माझ्या मनांत नेमके याच तऱ्हेचे विचार चालू होते. कदाचित् तुला माझी अडचण होत असेल— "

" छेः छेः उलट मला एकटं रहाण्याची भयंकर भीति वाटते आहे !"

" पण कधीं कधीं दुसऱ्याचा सहवास अधिक भीतिदायक होऊं शकतो !"

" तूं त्यांतला नाहींस याची मला खात्री आहे. हें बघ एवींतेवीं आपण दोघंहि एकाच परिस्थितींत सांपडलों आहोंत. जगण्यासाठीं कांहीं तरी धडपड करणं दोघांनाहि आवश्यक आहे. ती एकेकट्यानं करण्याऐवजीं दोघं मिळून करूं. आपापल्या मार्गाला लागलों म्हणजे जाऊं दोन दिशांना !" उपेन्द्राला ऑंद्रेची कल्पना पसंत पडली. इतर कांहीं साहाय्य नाहीं तर नाहीं, निदान दोघांना एकमेकांचा धीर तर मिळणार होता ना ?

## ३

आणि पुढचे बरेच दिवस दोघांना फक्त एकमेकांच्या धीरावरच काढावे लागले.

' शुभस्य शीघ्रम् ' म्हणून दोघं लागलीच नोकरीच्या शोधाला लागलीं होतीं. भाजीचीं दुकानं, मासळीबाजार, किराणा मालाचीं दुकानं, पावाचीं दुकानं, रेस्टॉरंट्स्, हॉटेल्स, बार, मद्याचीं दुकानं— सुचेल त्या सर्व जागा त्यांनीं पालथ्या घातल्या. पण ' नोकरी पाहिजे ' हे शब्द उच्चारतांच ज्यानं त्यानं त्यांच्याकडे संशयानं पाहून नकारार्थी मान हालवावी. इतरदेशीय म्हणून आपल्याला नोकरी मिळणार नाहीं याची उपेन्द्राला कल्पना होती. पण ऑंद्रेलाहि नोकरी मिळत नाहीं याचं त्याला आश्चर्य वाटत होतं.

## ओळख

अपुरं खाणं, थंडींत बर्फांत कुठं तरी रात्रीं काढणं आणि दिवसभर वणवण भटकणं असल्या कंगाल आयुष्याचा परिणाम दोघांच्या शरीरावर दिसूं लागला होता. शरीरं वाळलीं होतीं, चेहरे मळकटले होते, डोळे खोल गेले होते.

पॅरीसचे सर्व विभाग त्यांनीं पायीं तुडवले होते. फक्त लॅटीन क्वॉर्टर काय तो त्यांनीं वगळला होता—उपेन्द्राच्या आग्रहाखातर. लॅटीन क्वॉर्टर म्हणजे विद्यार्थ्यांचं राज्य. मध्यभागीं सोर्बोन महाविद्यालयाची इमारत उभी. आसपासच्या रस्त्यांतून विद्यार्थ्यांची अशी रहदारी लागायची कीं मोटारी मुंगीच्या पावलांनीं पुढें सरकायच्या आणि हातांतला पांढरा दांडा हालवीत ओरडणाऱ्या पोलिसांचा घसा सुकून जायचा. कोणी तरी ओळखीचं तिथें भेटायचंच. उपेन्द्र हेंच टाळण्याचा प्रयत्न करीत होता. दाढी वाढलेली, कपडे गलथान, केंसाच्या झिप्र्या, डोळ्यांखालीं निळींजांभळीं वर्तुळं आणि सोबतीला एक अशाच वर्णनाची फ्रेंच मुलगी अशा परिस्थितींत एखाद्या मित्राला ओळख देणं त्याला जड जाणार होतं. पण आज नाइलाजानं दोघंहि त्या बाजूला निघालीं.

सेन ओलांडून ते सँ मिशेल् बुल्व्हार्‌ला लागले. बुल्व्हार्‌च्या तोंडचं भव्य कारंजं सकाळच्या थंडाव्यांत भर टाकीत होतं. 'द्यूपो' कॉफीगृहांत तुरळक गिऱ्हाइकं दिसूं लागलीं होतीं. मध्येंच एक अरब भाजलेल्या शेंगा विकीत होता. रविवार असल्यामुळें विद्यार्थ्यांची रहदारी कमी होती. सोर्बोनसमोरचा चौक मागें पडला. शेजारच्या पुस्तकांच्या दुकानांत आफ्रिकन मुखवट्यांची सजावट करून कसल्या तरी ग्रंथाची जाहिरात केली होती, त्यावर त्यांनीं क्षणभर नजर टाकली. 'कापूलाद' कॉफीगृहांत हिंदी विद्यार्थ्यांचं एक टोळकं चहा घेत बसलेलं उपेन्द्राला दिसलं. ऑद्रेला मागें खेंचीत तो परत वळला. 'कापूलाद' ला वळसा घालून दोघंहि सोर्बोनच्या मागच्या पडक्या घरांतून नोकरी मागूं लागलीं.

अर्ध्या खण जागेंत एका जख्खड म्हाताऱ्यानं वर्तमानपत्रांचं दुकान मांडलं होतं.

"यालाहि विचारून पहा. कदाचित् वर्तमानपत्रं घरोघरीं टाकायची नोकरी असेल!" आँद्रेनं सुचवलं.

म्हाताऱ्यानं पांढऱ्या भिवयांतून टवकारून उपेन्द्राकडे पाहिलं.

"हिंदी कीं पाकिस्तानी?"

"हिंदी!" उपेन्द्र म्हणाला.

"फ्रेंच मुलींवर पैसे उडवलेस वाटतं?"

"नाहीं. तसं नाहीं–"

"कशाला थापा मारतोस? मीहि एकेकाळीं तरुण होतो! पण नोकरी आहे. पहांटे पांच वाजतां वर्तमानपत्रं टाकावीं लागतील."

"कबूल."

"रविवारीं सुट्टी घेतलीस तर महिना पांच हजार फ्रँक नाहीं-तर सहा हजार."

"सुट्टी नको."

"ठीक तर, उद्यांपासून ये. आणि हें बघ या मुलीला रजा दे आतां. नाहीं तर सहा हजार काय सहा लाख पुरायचे नाहींत तुला!" डोळे मिचकावीत म्हातारा खालच्या आवाजांत म्हणाला.

सहा हजार फ्रँक म्हणजे अंदाजे ऐंशी रुपये. एवढ्यांत पॅरीस-मधला खर्च काय चालणार? खोलीचं भाडंच होईल चार हजार फ्रँक. महिना वीस हजार तरी कमीत कमी लागायचे. पण अगदींच कांहीं नव्हतं त्यापेक्षां बरं असं उपेन्द्रानं स्वतःचं समाधान करून घेतलं. पांचाची वेळ चुकूं नये म्हणून तो रात्रीं जागा राहूं लागला. दिवसा बागेंतल्या नाहीं तर रस्त्यावरच्या बांकावर पडून थोडीशी डुलकी घ्यायची हीच त्याची विश्रांति.

आँद्रेचं नशीब मात्र अजून उघडलं नव्हतं. मोलकरणीची नोकरी करायची म्हटलं तरी लोक ओळखपत्र मागत. लीलच्या कुटुंबाचं ओळखपत्र आँद्रेजवळ नव्हतंसं दिसलं.

म्हाताऱ्याची आणि उपेन्द्राची गट्टी जमली होती.

"अजून त्या मुलीचा मोह तुला सुटत नाहीं कां?" त्यानं पुनः एकदां उपेन्द्राला चिडवलं. "परवां दुपारीं दोन वाजतां तुम्हांला

फिरतांना पाहिलं मी. ”

“ तीहि बिचारी नोकरी शोधतेय्. अजून मिळत नाहीं. आजवर आम्ही अनेक कुटुंबांच्या आणि दुकानदारांच्या शिव्या खाल्ल्या अगांतुकपणें त्यांच्याकडे गेल्याबद्दल. ”

“ माझ्या माहितींत एक नोकरी आहे—त्रासाची आहे. शेजाऱ्याच्या घरांत तिसऱ्या मजल्यावर म्हातारी रहाते एक. तिला अंघोळ घालण्यापासून सर्व काम करावं लागतं. रागीट आहे म्हातारी. भारी बोलते. पगारहि कमी असतो. कोणी टिकत नाहीं तिच्याकडे. ”

“ आँद्रे टिकेल. गरजू माणसाला काय, कसलीहि नोकरी करायची. ”

म्हातारीला भेटून आँद्रे प्रसन्न चेहऱ्यानं खालीं आली.

“ काम फत्ते ना ? ” उपेन्द्रानं विचारलं.

“ हो. नुसतं फत्तेच नाहीं तर कमालीचं नशीब उघडलंय् ! ”

“ इस्टेट दिली कीं काय म्हातारीनं तुला ? ”

“ नाहीं. पण रहायला खोली दिलीय्. ”

“ आँ ? फुकट ? ”

“ रहायला खोली आणि चार हजार फ्रँक पगार. ”

“ आणि जेवण ? ”

“ जेवण नाहीं. ”

“ एवढ्यांत कसं भागेल तुझं ? खोली तरी बरी आहे कां ? ”

“ सहाव्या मजल्यावर आहे. पाहिली नाहीं अजून. किल्ली दिलीय् तिनं मला. ”

“ हरकत नाहीं. झोंपायला तुला निवारा झाला हें काय कमी झालं ? ”

“ उपेन्द्र, मी-मी म्हणणार होतें—तुला जागा मिळेपर्यंत तूं कां नाहीं येत तिथें राहायला ? ”

“ आँद्रे, तूं हें काय विचारतेस ? अडचणींत सांपडून आपली मैत्री जमली हें ठीक. पण—मी पुरुष आहे, लोक तुला काय म्हणतील ? ”


" मला बरं वाईट म्हणणारं जगांत कोणी नाहीं. आठ दिवस आपण एकमेकांसाठीं खस्ता खाल्ल्या. आतां तुला वाऱ्यावर सोडून देऊं ? तुला खोली मिळाली असती तर तूंहि नसतं बोलावलंय मला ?"

" माझी हरकत नाहीं. मी तर बागेंतल्या बांकावर आणि सेनच्या कांठीं झोंपून मेटाकुटीला आलों आहे. आपल्या दोघांचा पगार मिळून आपल्याला धड जेवण तरी मिळेल."

" आतां चोरायचं मात्र नाहीं हं. विकत घेतां येईल तेवढंच खायचं !"

" पण मी त्या खोलींत रहाणार हें म्हातारीला आवडेल कां ?"

" तिला समजणार देखील नाहीं. आणि समजलं तरी काय ? सहाव्या मजल्यावरच्या खोल्यांत कांहींहि चालतं. तिथें जनावरां-



२८६६८
वा.वा.
२०५६

सारखे रहातात लोक. ही खोली म्हणजे वसतिगृहांतली खोली समजूं नकोस तूं."

सहा मजले चढून जाईपर्यंत उपेन्द्र आणि अँद्रेच्या नाकीं नऊ आले.

"आतां एफेल् टॉवर पायीं चढून जायला हरकत नाहीं!" उपेन्द्र धापा टाकीत म्हणाला.

तरी पांच मजले चढायचे श्रम त्यांना फारसे जाणवले नाहींत. पायाखालीं मऊ, किरमिजी गालिचा होता; भिंतीवर अधून मधून एखादं सुरेखसं चित्र लटकत होतं. लांकडी नक्षीकाम केलेला कठडा इतका चकचकीत होता, कीं हात टेकवायचीहि भीति वाटावी. सावकाशीनं वळसे वेलांट्या घेत पांचव्या मजल्यापर्यंत वर चढणारा जिना सहाव्या मजल्याकडे जाण्यासाठीं मात्र ताठर नि रुंद होत होता. जणूं कांहीं तिथं जाण्याची त्याचीदेखील इच्छा नसावी. त्याचं स्वरूपहि बदललं होतं. कठडा, पायऱ्या लोखंडाच्या: झाल्या होत्या; कुठे गंज चढलेला तर कुठे पोपडे निघालेले. मधूनच त्याला शेंदरी रंगाचे पट्टे फांसले होते. एका पायरीवर दुधाची बाटली फुटली होती त्याचे ओघळ आणि कांचा पायथ्यापर्यंत लडबडत होत्या. कागदाचे कपटे, गुंतवळ, बटाट्यांच्या सालीं, अंड्यांची कवचं, सिगरेटचीं थोटकं यांची पखरण जिन्यापलीकडच्या बोळकंडीभर झाली होती.

बोळकंडीच्या उजवीकडे सहा खोल्यांचीं भुतं मरतुकड्यासारखीं उभीं होतीं. डावीकडे नांवाला कठडा होता, त्याच्या पलीकडे कांहीं मोडकळीला आलेलीं घरं. नकळत उपेन्द्राचा हात नाकाकडे जात होता, मन किळसत होतं. प्रत्येक खोलींतून बाहेर डोकावणारे त्याचे शेजारी त्याला दिसले तेव्हां तर तो शरमेनं अर्धमेला झाला.

पहिल्या खोलींतून एक काटकुळा, पंचकोनी चेहऱ्याचा माणूस बाहेर पडला. त्याच्या मागोमाग एक त्रासिक चेहऱ्याची ढेरपोटी बाईहि आली.

"मी लुई फिलिप. ही: ही: ही: नांव तेवढं राजाचं आहे. ही माझी बायको–लग्नाची."

त्यानं उपेन्द्राला आपली ओळख करून दिली. लुई फिलिपची प्रस्तावना ऐकून चौथ्या खोलींतलं जोडपं पुढं सरसावलं.

"मी मस्सिअ बुर्जे. सुतार आहे मी."

मस्सिअ बुर्जे पन्नाशीच्या आसपास होता. त्याच्या पाटलोणीच्या एका पायाला गुडघ्याशीं भलं मोठं भोंक पडलं होतं, दुसरा पाय घोट्यावर आठ इंच लक्तरांच्या अवशेषांत लुप्त झाला होता. अंगांतल्या कळकट्ट स्वेटरला अनेक वेळेला, अनेक रंगांच्या लोकरीनं रफू केल्यामुळें त्याचा मूळ रंग व वीण काय हें सांगतां येणं अशक्य होतं. या दरिद्री वेषाला शोभेसाच त्याचा चेहरा होता. डोळे मात्र अधाशी बेरकी होते. उपेन्द्राच्या मागें दडलेल्या आँद्रेकडे दृष्टि जातांच तो पुन्हां म्हणाला,

" आमच्या वसाहतींत तुमचं स्वागत असो ! तरुण रक्ताची वानवाच होती इथं. "

मादाम बुर्जेनं त्याच्या पाठींत एक रपाटा घातला. " हीं एवढीं सहा पोरं पोसतां येईनात आणि दुसऱ्याच्या बायकांना न्याहाळतोय् मेला !" ती खेकसली. त्यासरशीं तिच्या अंवतीभंवतीं नाचणारीं सहा शेंबडीं पोरं खी: खी: करीत हंसूं लागली.

" लग्नाची बायको म्हणे. कशाला रे थापा मारतोस ? तुझी लग्नाची बायको हिच्या झिंज्या उपटून गेली तें मला माहीत नाहीं कीं काय ? " मादाम बुर्जेनं लुई फिलिपला सुनावलं. पुढें होऊन तिनं आँद्रेचा डावा हात खस्‌कन ओढला. तिच्या हातांत अंगठी नाहींसं पाहून तिनं शेरा मारला—

" ही देखील त्यांतलीच. अजून तरी मी एकटीच लग्नाची बायको आहे या मजल्यावर. "

" म्हणूनच तुमचा नवरा दुसऱ्या बायकांच्या मागें लागतो. " मादाम बुर्जेला एका उत्तान शृंगार केलेल्या बाईनं उत्तर दिलं. तिनं केंस लालट रंगवून खांद्यापर्यंत सैरावैरा सोडले होते. ओठांना

आणि नखांना तांबडा भडक रंग लावला होता. हातांत सिगरेटचं थोटुक होतं. अंगकाठी टचटचीत, जरा लठ्ठपणाकडे झुकणारीच होती. एक तंग स्वेटर आणि आवळ स्कर्ट अशा पोषाखानं ती आपलं सौष्ठव प्रकट करीत होती.

" मी रोझ्; हा सिमोन्." तिनं ओळख करून दिली.

सिमोन्नं इतक्या थंडींतहि एक गंजिफ्रॉक व जीन्स् एवढाच पोषाख केला होता. त्यांतून त्याचे दगडी स्नायू बाहेर डोकावत होते. त्याची गर्दन बैलासारखी जाड होती. चुइंगम चघळीत तो निर्बुद्ध उद्दामतेनें उपेंद्राकडे बघत होता.

" पाहिलेस ना नवीन भाडेकरू ? चल आतां आंत. "

रोझच्या कंबरेला विळखा घालून त्यानं तिला तीन नंबरच्या खोलींत खेचलं.

ऑंद्रे इतका वेळ थिजल्यासारखी उभी होती.

" आपली दोन नंबरची खोली. " असं कांहींसं पुटपुटत तिनं दाराच्या दिशेनं पाऊल टाकलं.

" तुमचीं नांवं तरी सांगा आम्हांला; तुमच्या भानगडी विचारीत नाहीं आम्ही !" कोणी तरी म्हणालं.

पण उपेन्द्र आणि ऑंद्रे केव्हांच खोलींत शिरलीं होतीं.

शिसारीनं उपेंद्राला मळमळल्यासारखं होऊं लागलं. खोलीच्या दाराचा आधार घेऊन तो सुन्नपणें उभा राहिला. ऑंद्रे मात्र खोलींतला कचरा गोळा करूं लागली होती.

उपेन्द्रानं मित्राकडे ठेवलेलं सामान आणलं, कसंबसं जिन्यावरून वर नेलं आणि सहाव्या मजल्यावरच्या भुतावळीच्या नजरा चुकवीत खोलींत लोटलं. गरजेपुरते कपडे, एक स्टोव्ह, चारदोन भांडीं एवढं त्यानं बाहेर काढलं. बाकीचं कोंपऱ्यांत लोटून तो त्याच्यावर मान टाकून झोंप घेण्याचा प्रयत्न करूं लागला.

म्हातारीकडचं काम आवरून ऑंद्रे खोलींत परतली तेव्हां उपेन्द्राचं सामान पाहून तिच्यांत भलताच उत्साह संचारला.

" दोन पेट्या सामान ? काय काय आहे एवढं ? "

" असंच कांहीं तरी सटरफटर, थोडे मसाले, फोटो, दोनचार शोभेच्या वस्तु--बराच भावनाप्रधान असलों पाहिजे मी तेव्हां ! म्हणून हा कचरा बरोबर आणला. " विटलेल्या सुरांत उपेंद्रानं उत्तर दिलं.

" कचरा कसा ? खोली किती सुन्दर लावतां येईल कल्पना आहे तुला ? लावूं मी ? देतोस मला हें सामान ? "

" काय करायचंय् ? काय वाटेल तें केलं तरी या खोलींत कधीं फरक पडायचा नाहीं. हा स्टोव्ह घे, हें पातेलं. जें काय चार दोन बटाटे उकडायचे असतील ते पाण्यांत उकड आणि पड त्या कोंपऱ्यांत. मी इथं पडतों. " श्रमानं आणि ग्लानीनं उपेंद्र जीवनाविषयीं पराकाष्ठेचा खिन्न झाला होता.

ऑंद्रे कांहीं बोलली नाहीं. शेवटले चोरून आणलेले पांचसहा बटाटे तिनें उकडत लावले आणि थंड झाल्यावर सोलून उपेन्द्रापुढें ठेवले.

" हे घे खा. खाल्ल्यावर बरं वाटेल. खाणं कमी पडतंय् तुला."

" असलं खाणं जास्त कोण खाणार ? " उपेन्द्र घुश्श्यांत म्हणाला. पण दोनचार घांस पोटांत जातांच त्याला बरं वाटलं. चक्कर येण्याचं बंद झालं, शरीरांत ऊब आली.

ऑंद्रे एका बटाट्याशी नुसती चाळवा चाळवकरीत बसली होती.

" उपेन्, कांहींतरी सांगूं ? "

" हं !"

" आयुष्यापुढं अशी हार खाऊं नकोस. रुबाबात रहा. कंगाल असलों तरी आपण स्वतःच्या श्रमांचंच खातोंय् ना ? मग हें दीनवाणेपण कशाला ? "

" मग काय करूं ? सूट चढवूं ? सिगरेटचे झुरके मारीत, शिट्ट्या फुंकीत रस्त्यावरून हिंडूं ? "

" निदान रोज दाढी तरी करीत जा. आरशांत पहा, चेहऱ्याचं काय झालंय्. "

" पहांटे पाणी किती गार असतं–"

" असतं. पण इतके हाल सोसले, त्यांत आणखी थोडीशीच भर. आपलं दारिद्र्य तोंडावर लटकावूनच फिरलं पाहिजे कां ?"

" तुझ्यासारखा उसना रुबाब मला जमत नाहीं. "

" उसना बरा असेल ! माझा स्वतःचाच आहे तो. माझ्या परिस्थितीची मला नाहीं लाज वाटत. तुला वाटते या खोलीची– माझीसुद्धां ! हो ना ?"

उपेन्द्र गप्प बसला.

" उद्यांपासून ऐटींत वागायचं. ताठ उभा रहा पाहूं; खांदे मागें घे. हं असंच. किती राजबिंडा दिसतोस असा. महाराजा ऑफ् इंडिया. आतां ऑंद्रेबरोबर उपेंद्रहि हंसूं लागला.

" महाराजा ऑफ् इंडिया आपलं अभिवादन पेश करतो आहे!" लवून कुर्निसात करीत तो म्हणाला.

" आणि आतां महाराजा मुकाट्यानं कामाला लागा ही खोली सजवायची आहे."

" हा हट्ट कायम आहेच कां अजून ?"

" अर्थातच. शक्य असतांना ही खोली सुन्दर कां नाहीं करूं ?"

तास दोन तास ऑंद्रे अविरत खपत होती. अधूनमधून 'हें आण, तें दे, हें इकडे लाव' असं उपेन्द्राला फर्मावत होती. हलके हलके उपेन्द्रहि रंगला. त्यानंहि या सजावटींत भाग घेतला. भिंतींचे पोपडे व चिरा शक्य तितक्या प्रमाणांत फोटो किंवा चित्रांच्या मागें लपवण्यांत आले. कोनाड्यांत कपडे नीट लावून ठेवले. दोन ट्रंका चिटकवून उपेन्द्रानं ऑंद्रेच्या बिछान्याची सोय केली. ऑंद्रेनं दाराला शालीचा पडदा लावला. खोली बरीच नीटनेटकी दिसूं लागली.

" दर महिन्याला थोडे पैसे मी खोली सजवण्याकरतां वापरणार!" ऑंद्रेनं घोषणा केली.

" असा रंग दिसतोय् खरा. पण तुझ्याकडे कांहींच सामान नाहीं कसं ? तुझं सामान कुठें गेलं ?" उपेन्द्रानं विचारलं. " लीललाच ठेवलंस ?"

"नाहीं, लीलला नाहीं माझं सामान...खरं म्हणजे पॅरीसला येऊन दोन महिने झाले मला...मी सगळ्या गोष्टी तुला सांगितल्या नाहींत." क्षणभर थांबून आँद्रे म्हणाली.

उपेन्द्र गप्पच राहिला

"कां तें नाहीं विचारलंस ? रागावलास ?"

"रागावलों नाहीं. तूं सर्व कांहीं मला सांगितलं नाहींस हें माझ्या केव्हांच लक्ष्यांत आलं होतं पण मी मुद्दामच तुला विचारलं नाहीं. तुझ्या खाजगी गोष्टी मी कशाला विचारूं ?"

"इतकं कांहीं खाजगी नाहीं तें. तूं अशा सुरांत बोलतो आहेस कीं जसं कांहीं मी तुला भेटण्यापूर्वीं काय पापं केलीं आहेत नि काय नाहीं कोण जाणे !"

"असं सुचवण्याचा माझा उद्देश नव्हता–"

"एका कुटुंबांत मला मुलं संभाळायची नोकरी मिळाली होती. मुलांचा बाप फारच दुर्वर्तनी होता. एकदां मी मालकीणीला सांगून पाहिलं. ती म्हणाली, 'आम्ही दोघांनीं एकमेकांना संपूर्ण स्वातंत्र्य दिलं आहे. तुला मी महिन्याला पगार, जेवण आणि खोली द्यायचं कबूल केलं आहे. या पलीकडे तुझं तूं काय तें पहा !' तरी मी कसेतरी दिवस काढले. खिमसच्या दिवशीं मात्र कहर झाला मोठं जेवण होतं. नंतर नृत्य होतं. बहुतेक सर्वजण दारू पिऊन चांगलेच झिंगले होते. मुलांच्या बापानं मला असं कोंडींत धरलं कीं खिडकींतून उडी टाकून मला पळ काढावा लागला. मी नृत्यांत भाग घेतला नव्हता म्हणून माझ्या अंगावर साधे कपडे होते एवढं बरं झालं."

आँद्रे अवघडून बोलत होती. किती झालं तरी उपेन्द्र पुरुष होता; त्याला असले प्रसंग रंगवून सांगणं तिला मुष्किलीचं होतं.

" तूं आतां विशीला आलीस. हा असला पहिलाच प्रसंग तुझ्यावरचा ?"

" नाहीं. लीलच्या कुटुंबांतल्या मोठ्या मुलानं माझा फार पिच्छा पुरवला होता. आणखीहि दोनचारदां असं झालं. एकट्या स्त्रीला जगणं अशक्य करून टाकतात हे पुरुष. म्हणूनच असं वाटतं, ज्यॉ

सांपडावा; मोठ्या भावाच्या छायेंत ऐटीनं मिरवायला इतकं आवडेल मला—"

"त्याचा पत्ता लागेल तेव्हां लागेल. पण तोंपर्यंत काय? दुसरे कपडेसुद्धां नाहींत तुझ्याजवळ. सामान आणि पगार आणलास–"

"मी नाहीं जायची पुन्हां तिकडे. गेलं तर गेलं सामान. फारसं नव्हतंच."

"प्रश्न सामानाचा नाहीं. तत्त्वाचा आहे. वेळींच हा भित्रेपणा झाडून टाकला नाहींस तर जन्मभर पस्तावा करशील. एवढं त्यांत भिण्याजोगतं काय आहे? तरुण स्त्रीला असे अनुभव येणारच. झाडून टाकायचं, दम भरायचा, झालं काम. मुलगी त्यांतली नाहीं हें कळल्यावर पुरुष कशाला मागें लागेल तिच्या?"

"म्हणायला सोपं; तूं बाई असतास म्हणजे कळलं असतं!"

"बायका नाहीं कां पुरुषांच्या मागें लागत?"

"तें वेगळं!"

"तूं पुरुष नाहींस म्हणून तुला वाटतं असं. बाईनं पुरुषाचा सत्यानाश केल्याचीं किती उदाहरणं सांगूं? अगदीं माझ्या डोळ्यां-देखत–पॅरीसमध्यें घडलेलीं आहेत. एका हिंदी मुलानं आत्महत्त्या केली एका मुलीपायीं. मुलांना झुलवायचं, त्यांच्याकडून भेटी काढा-यच्या, पैसे उकळायचे एवढंच तिला माहीत. मुलगा बिचारा खालच्या मानेनं वागणारा, विवाहित.कुठल्या तरी पार्टीच्या ठिकाणीं दोघांची ओळख झाली; हिनं इतकं उच्छृंखल वर्तन केलं कीं त्याचाहि बिचाऱ्याचा पाय जरा घसरला. पण झाल्या प्रकाराची त्याला लाज वाटली. त्याचं मन त्याला खाऊं लागलं. ती असली खट कीं वसतिगृहांत त्याच्या खोलींत येऊन राहिली. अनेक मुली अशा राहतात. तो घाबरला. वसतिगृहाच्या मुख्यानं तिला एकदां पाहिलं, त्याला तंबी दिली. हें नियमबाह्य होतें. पण ती जाईना. हें सर्व प्रकरण त्याच्या घरापर्यंत पोचलं. वरून त्याला वेडींवांकडीं पत्रं आलीं. एक दिवस झोंपेच्या गोळ्या खाऊन तो झोंपीं गेला तो कायमचाच!"

ऑंद्रे निमूटपणानं ऐकत होती. त्याच्या बोलण्याचा तिच्यावर फारसा परिणाम झाला नाहीं, पण तो सोबत आल्यास सामान व पगार आणण्यास ती तयार झाली.

तिचं सामान फारसं नव्हतं. पण पगाराचे थोडे पैसे मिळाले, त्याचा फायदा झाला. नवीन नोकऱ्यांचे पगार मिळेपर्यंत कसं तरी भागवतां येणार होतं. खर्च व्हायला लागला म्हणजे पैशांची किंमत समजते. दोघांनींहि हिशेब केला. सकाळीं एकेक कप कोरी कॉफी, दोन वेळां पाव आणि उकडलेले बटाटे असं जेवण, एवढंच त्यांना परवडणार होतं. पहिला पगार होईपर्यंत तर सकाळची कॉफी घेतां येणंहि शक्य नव्हतं.

दोनचार दिवस या जेवणाचं उपेन्द्राला कांहीं वाटलं नाहीं. स्वतःच्या कमाईचं खातों आहे, डोक्यावर छप्पर आहे याच्या आनंदांत बाकी सगळं तो विसरून गेला. सेनच्या कांटीं कुडकुडत काढलेल्या रात्रींची आठवण पुसट होऊं लागली तसतसा उपेन्द्र कावूं लागला. पहांटेच्या थंडींत वर्तमानपत्रं वांटीत घरोघर हिंडायचं ही थट्टेची गोष्ट नव्हती. भूक अशी सडकून लागायची, पोटाचा स्नायू न् स्नायू पेटून उठायचा. घरीं यायचं, कपभर पाणी प्यायचं आणि कोटांत तोंड खुपसून पडून रहायचं ! जागरणामुळें झोंप तरी धड यावी ! पण छे : ! थंडीनं रक्ताच्या गुठळ्या व्हायच्या, अंगाला कळा लागायच्या. मेटाकुटीनं कधीं डोळा लागला तर लुई फिलिपला खोकण्याची उबळ यायची नाहीं तर रोझ आणि सिमोन् यांचं वेडविद्रं हंसणं, ओरडणं कानीं पडायचं. मस्सिअ व मादाम बुर्जे आणि त्यांचा पोरवडा यांची कलकल कायम चालूच असायची.

खोलींत बसून दिवस काढायचा म्हणजे उपेन्द्राचे प्राण कंठाशीं येत. एक दीड खणी खोली ती. माणसांनीं रहावं म्हणून बांधली नव्हतीं, खालच्या भाडेकरूंना माळ्यासारखा किंवा अडगळीची खोली म्हणून तिचा उपयोग व्हावा ही बांधणाऱ्याची इच्छा.

ॲंद्रेनं शक्य तितकी टापटीप ठेवली होती खरी, पण म्हणून तिचं मूळ स्वरूप फारसं लपत नव्हतं.

ॲंद्रेला सहा वाजतां म्हाताऱ्या मालकिणीकडे जावं लागे. म्हातारीला आपणहून उठतां येत नव्हतं. ॲंद्रेला तिनं दाराची किल्ली देऊन ठेवली होती. आल्या आल्या म्हातारीचं तोंड धुवायचं, तिला कॉफी द्यायची, कपडे बदलायचे आणि चाकाच्या खुर्चींत बसवायचं. म्हातारी इतकी खाष्ट कीं तोंडाचा पट्टा तिनं कधीं थांबवला नाहीं. ॲंद्रेला कपभर कॉफी तिनं कधीं दिली नाहींच, पण ती कांहीं चोरील या संशयानं म्हातारी सदैव तिच्यापाठीशीं खुर्चींत बसून राही. मोलकरणीच्या कामाची ॲंद्रेला संवय होती. पण म्हातारीची शुश्रूषा करण्याची तिला किळस येई. संध्याकाळीं साडेसहाला म्हातारी बिछान्यांत शिरली कीं ॲंद्रेला सुट्टी मिळे. संध्याकाळचं जेवण करून ती रात्रीच्या तासांना 'सोर्बोन'मध्यें जाई.

उपेन्द्रानं तिला विचारलं होतं—

" जीव जाईपर्यंत कशाला धडपडतेस एवढी ? काम झाल्यावर विश्रांति घे. कशाला शिक्षणासाठीं एवढी उरस्फोड ? "

" मग काय जन्मभर मी म्हाताऱ्या बायकांची सेवा करीत बसूं ? सुदैवानं शिक्षण फुकट मिळतं इथे. कां सोडां ? तूं सुद्धां शिक्षण पूर्ण कर तुझं. दिवसभर वेळ असतो तुला. "

" छट्. असल्या परिस्थितींत शिक्षणाकडे लक्ष काय लागणार माझं ? कांहीं तरी लटपट करून बरीशी नोकरी मिळवीन म्हणतो. आणि शिकणार तरी काय मी ? माझी चित्रकलेची आवडदेखील मेली. माझ्यामतें तूं सुद्धां नोकरी बघत रहा. एखाद्या मोठ्या दुकानांत नाहीं तर—"

" माझं सध्यां आहे तें बरं आहे पण तुझं काय ? इतर देशीयांना इथं नोकरीदेखील मिळत नाहीं. पण शिक्षण फुकट असतं. कांहीं तरी शिकून घे. वाचनांत नाहीं तर अभ्यासांत मन रमवलंस तर सध्यांचे हाल जाणवायचे नाहींत तुला ?"

पण उपेन्द्रानं मात्र ऑंद्रेचं म्हणणं कानामागें टाकलं. ' या गलिच्छ खोलींतून बाहेर पडायचं ' एवढंच त्याचं सध्यांपुरतं ध्येय होतं. पुढें काय ? हा विचार त्यानं केला नव्हता.

लाजेचीं, संकोचाचीं बंधनं सोडून उपेन्द्र नोकरीसाठीं ओळखीच्या अनेक हिन्दी लोकांना भेटूं लागला. वकिलातींत टायपिस्टच्या कांहीं जागा असत; पण त्या केव्हांच भरल्या होत्या. कांहीं हिंदी विद्यार्थी नोकरी करण्याचा परवाना काढून नोकरी करीत होते. पण त्यांचे विषय रसायनशास्त्र. अणुशक्ति असे वरच्या पातळीचे होते; त्यांना त्यांच्या प्रयोगशाळेनं खास परवाना मिळवून दिला होता. कांहीं हिंदी कुटुंबं व्यापारासाठीं पॅरीसला स्थायिक झालीं होतीं; पण त्यांचे व्यवहार ते स्वतः पहात, हाताखालीं नवखा तरुण घेण्याची त्यांना गरज नव्हती. शोधाअंतीं, परवान्याशिवाय नोकरी मिळूं शकते असं उपेन्द्राला आढळलं, पण अशा नोकऱ्या म्हणजे निव्वळ गुलामगिरी होती पगार अपुरा, कधीं मिळे, कधीं न मिळे, मिळाला नाहीं तरी तक्रार करतां यायची नाहीं. तक्रारीमुळें आपणच गोत्यांत यायचा संभव. काम बहुधा रात्रपाळीचं, अंग-मेहनतीचं असे. काळेकभिन्न आफ्रिकन लोक तेंहि काम करीत, कधीं हातपाय मोडून घेत तर कधीं फोरमनचा गळा दाबीत.

खंगलेल्या मनानं उपेन्द्र खोलीवर परतला.

"कुठें होतास इतका वेळ ? मी केव्हांची वाट पहातेय्." ऑंद्रे म्हणाली

"तुला काय करायचंय्? तूं कोण माझ्यावर पाळत करणार?"

"बरं राहिलं जेवून घे आधीं. दमला आहेस !"

"जेवून घे म्हणे. वा रे जेवण; तूंच जेव मिटक्या मारीत; मी पुष्कळ चांगलं अन्न खाल्लंय् जन्मभर !" उपेन्द्रानं बूट कोंपऱ्यांत फेंकून दिले आणि ओव्हरकोटासह कोपऱ्यांत बसकण घेतली

बर्फाच्या बोटांनीं रात्र अख्ख्या पॅरीसला कुरवाळीत होती. उपेन्द्र तडफडत होता. पलीकडे ऑंद्रे स्वस्थ निजली होती. थंडी वाजूं नये म्हणून अंगाचं तिनं पार वेटोळं केलं होतं. केसांची एक बट तिच्या

नाकावर बसून डौलानं वरखालीं होत होती. जिवणी किंचित् पुढें येऊन फुगीर झाली होती

झपाटल्यासारखा उपेन्द्र उठला. ऑंद्रेला त्यानं वेंघ घातली. तिच्या गालाचं त्यानं अधाशासारखं चुंबन घेतलं भीतीनं थरथरत ऑंद्रे जागी झाली. किंचाळी मारायला तिनं तोंड उघडलं. पण घसा सुकला होता. चांचपडत हात वर करून तिनं स्विच् दाबला. घाबरलेल्या सशाच्या डोळ्यांनीं तिनं उपेन्द्राकडे पाहिलं क्षणभरच. दुसऱ्याच क्षणीं तिचा जन्मजात रुबाब ठिकाणावर आला. केसांची बट शांतपणानं मागें सारीत तिनं फर्मावलं, "झोंप जा मुकाट्यानं. तुझा तोल सुटलाय्!"

"ऑंद्रे, ऑंद्रे—" उपेन्द्र तिची विनवणी करीत होता. मनाच्या आणि शरीराच्या यातना त्याला असह्य झाल्या होत्या.

गार पाण्यानं एक भांडं भरून ठेवलं होतं तें तिनं उपेन्द्रच्या डोक्यावर उपडं केलं. थंड पाण्याच्या स्पर्शानं त्याचा जीव गोळा होऊं लागला, पावलं लटपटूं लागलीं; मंत्रानं भारावल्यासारखा तो आपल्या कोपऱ्यांत जाऊन पडला.

जाग आली तेव्हां त्याच्या मनाला लाजेच्या इंगळ्या लागल्या होत्या. या मुलीनं आपल्यावर इतका विश्वास टाकला, निवाऱ्याची जागा दिली, अन् आपल्याहातून हें वर्तन कसं होऊं शकलं? वर्तमानपत्रं टाकून झालीं तरी तो परत आला नाहीं. ऑंद्रेला तोंड दाखवायची त्याला शरम वाटत होती.

पण दिवस पुढें सरकूं लागला, भूक वाढूं लागली, तसतसे त्याचे विचार वेष पालटूं लागले. त्याची एकट्याचीच चूक होती असं कसं म्हणतां येईल? ही तरुण मुलगी, योगायोगानं भेटलेल्या एका तरुणाला स्वतःबरोबर रहाण्याचं तिनं आमंत्रण द्यावंच कशाला? मदत करतांना कुठल्या थराला जायचं यालाहि सीमा असतेच. असलं आमंत्रण देण्यांत त्यापुढला धोका तिच्या लक्ष्यांत आला असलाच पाहिजे. तरीहि तिनं आपल्याला खोलींत रहायला बोलावलं म्हणजे

तिचं आपल्यावर प्रेम तर नसेल? कीं ती बद्चालच असेल? मग तिनं आपला इतक्या निश्चयानं प्रतिकार कां केला?

विचाराच्या आवेगानं त्याच्या मनाची नाव उलटीपालटी होऊन भरकटूं लागली. बागेंतली थंडी सोसवेना म्हणून तो सोर्बोनच्या मध्यभागीं असलेल्या चौकांतल्या पायऱ्यांवर जाऊन बसला. दुपारच्या जेवणाची वेळ टळून गेली तरी तो तसाच बसून राहिला होता. एकाएकीं हिमवृष्टि सुरू झाली. पीठ चाळल्यासारखा बर्फाचा चुरा जमिनीवर पडूं लागला. सोर्बोनचे काळेकभिन्न दगड बघतां बघतां पांढरा फरकोट घालून बसले.

नाइलाजानं उपेन्द्र उठला. बर्फ तुडवीत त्यानं एक वर्ग गांठला. इथली ऊब सुखावह होती. वाफेच्या रेडियेटरवर त्यानं आपले तळवे शेकले, गालाला लावले. इतक्यांत भराभरा बारापंधरा विद्यार्थी आंत शिरले; मागोमाग प्रोफेसर. काय होतंय् तें कळायच्या आंत 'अठराव्या शतकांतील फ्रेंच आर्किटेक्चर' या विषयावर व्याख्यान सुरू झालं. उपेन्द्राला फारसं कांहीं कळत नव्हतं. निर्विकारपणें तो कानांवर पडेल तें ऐकत होता. व्याख्यान संपल्यावर त्याला कळलं कीं आपल्या मनाची सर्व तगमग विसरून आपण विषयांत बरेच रमलों होतों.

दुसऱ्या दिवशीं तो पुन्हां त्या तासाला गेला—तिथली ऊब शरीराला आवडते असं त्यानं स्वतःला पटवून दिलं.

आठवडाभर तो तासाला बसला तेव्हा मनाविरुद्ध स्वतःशीं त्यानं कबूल केलं—विषय त्याला आवडत होता, त्याच्या मनाला विसांवा देत होता. आर्किटेक्चरवर जेवढे म्हणून तास होते तेवढे ऐकायला त्यानं सुरुवात केली. पॅरीसमधली प्रत्येक इमारत त्याच्याशीं कानगोष्टी करूं लागली. महिन्याभरांतच कुठलंहि एखादं घर कुठल्या सालच्या फॅशनप्रमाणें बांधलं आहे हें तो अजमावूं लागला. पॅरीसमध्यें प्रथम आला तेव्हां तिथल्या अणकुचीदार चर्चेसनीं आणि भव्य कमानी व राजवाड्यांनीं त्याला मोहिनी घातली होती; दुःस्थिति आली तेव्हां हेंच सौंदर्य त्याला

गुदमरून टाकत होतं; आतां त्या सौंदर्याचं अंतरंग त्याच्या पुढें उघडं होत होतं, त्याला झुलवीत होतं.

•••

## ४

---

आठवड्यापूर्वी ॲंद्रेच्यांत व त्याच्यांत जें कांहीं घडलं होतं त्यामुळं उपेन्द्र बराच अवघडल्यासारखा झाला होता. ॲंद्रेशी साधे दोन शब्द बोलतांनाहि त्याला स्वतःची लाज वाटत होती. अभ्यासांत मन गुंतवल्यानंतर व आठवडा उलटल्यानंतर त्याचं मन बरंच शान्त झालं. ॲंद्रेची खुल्या दिलानं क्षमा मागायची आणि पुन्हां पूर्ववत् मोकळेपणाचे स्नेहाचे संबंध प्रस्थापित करायचे असं त्यानं ठरवलं. पण नेमका याच सुमारास आद्रियान्नं ॲंद्रेच्या आणि पर्यायानं उपेन्द्राच्याहि आयुष्यांत प्रवेश केला; ॲंद्रेची आणि आद्रियान्ची गाढ मैत्री जुळली इतकी चट्कन् कीं उपेन्द्राला आद्रियान्चा थोडाफार मत्सरच वाटूं लागला. ॲंद्रेनं केलेली आद्रियान्चीं वर्णनं ऐकून तो चिडूं लागला आणि तिच्याजवळ जें कांहीं बोलायचं त्यानं ठरवलं होतं तें मनाच्या सान्दीकोंपऱ्यांत कुठल्या-कुठं पडून राहिलं.

ॲंद्रेनं त्या प्रसंगाला फारसं महत्त्व दिलं नव्हतं. उपेन्द्राशीं ती पूर्वीच्याच मोकळेपणानं आणि खेळकरपणानं वागूं पहात होती. पण उपेन्द्र दुरावल्याचं तिच्या लक्षांत येत होतं. उपेन्द्रानं आपल्याबद्दल भलतीच कल्पना केली असावी आणि ती चुकीची ठरल्यामुळें तो रागावला असावा अशी ॲंद्रेची समजूत झाली. तिनंहि त्याच्याशी बोलणं चालणं कमी केलं. दोघांतले स्नेहबंध साहचर्यानं दृढतर व्हायचे ते विलग होऊं लागले.

हलके हलके दोघांचेहि आयुष्यक्रम चाकोरींत आले होते आणि

एकमेकांपासून विलगहि झाले होते. उपेन्द्र पहांटे उठून वर्तमानपत्रं टाकण्यास जाई. तो परत येणार त्या सुमाराला आँद्रे कामा-वर गेलेली असे. जरासं इकडे तिकडे करून उपेन्द्र सोर्बोनमध्यें जात असे. बारा वाजतां आँद्रे बटाटे उकडत लावायची, पाव आणायची, थोडंसं खाऊन पुन्हां म्हातारीकडे धांव घ्यायची. उपेन्द्र दोन वाजतां परतायचा. त्याचा वांटा पोटांत ढकलून तासाला पळायचा. संध्याकाळचं जेवण दोघांचं बरोबर व्हायचं-एक प्रकारच्या निःस्तब्धतेंत. जेवण झाल्यावर आँद्रे रात्रीच्या तासांना पळायची. ती घरीं येईपर्यंत उपेन्द्र गाढ झोंपलेला असायचा. "निकटच्या सहवासांत राहूनहि दोन माणसं किती तिऱ्हाईत राहूं शकतात!"—आँद्रे खेदानं स्वतःशीं म्हणायची.

आँद्रेची आणि आद्रियान्‌ची पहिली ओळख झाली 'आ ला रोमान्स'च्या दाराशीं. साक्रेकर चर्चकडे जाणाऱ्या पायऱ्यांच्या विस्ता-राच्या पायथ्याशीं एक मोठा चौक आहे—प्लास द्यु तेर्त्र त्याचं नांव. दिवसा हा चौक झाडाच्या पायथ्याशीं उन्हाळलेल्या कुत्र्यासारखा मलूल होऊन पडून असतो. पण रात्र झाली कीं चित्रकार, नर्तक, लेखक, व्याख्याते अशा हजारों कलाकारांची इथें झुंबड उडते. चौकांत मांडलेल्या खुर्च्यांवर बसून कोणी कॉफी घेतात, कोणी मद्य, तर कोणी डुलक्या. जगांत जेवढं म्हणून विचित्र असेल तें इथं पहायला मिळतं. एखादी बाई हिरवी लिप्स्टिक लावून हातांत माणसाची कवटी घेऊन फिरत असते. तर कोणी दोन फूट लांबीचा पाइप ओढीत आराम करीत असते. पेहेरावाचा विक्षिप्तपणा तर पदोपदीं आढळतो. दाढी न वाढवलेला पुरुष औषधालाहि सांपडणार नाहीं. कोणी कॉफींत कुंचला बुडवून चित्र रंगवतो तर कोणी बाईच्या उघड्या पाठीवर कविता लिहितो.

ही सर्व आतषबाजी उन्हाळ्यांतच चालायची. हिवाळ्यांतल्या थंडींत या लोकांना उबेचा आसरा घ्यावा लागतो. त्यांच्या खास सोयीसाठीं आसपासच्या जुनाट घरांतून रात्रींचीं कॉफीगृहं-मद्यगृहं सुरू

होतात. 'आ ला रोमान्स' हें एक असलंच हिंवाळी मद्यगृह होतं. प्लास द्यु तेर्त्रच्या आसपास गल्ल्यांचं जें जाळं पसरलं आहे त्यांतल्या एका गल्लींत 'आ ला रोमान्स' ही मळकट, भुरकट पाटी चमकत होती. नांव मोठं फाकडू असलं तरी जागा कंगालच होती. एका लहानशा तळघरांत बऱ्याचशा मोडक्या खुर्च्या, खोकीं दाटीवाटीनं मांडलीं होतीं. मध्यभागीं जेमतेम पेटलेली एक लहानशी कोळशांची शेगडी होती. दाराच्या डावीकडे कोनाड्यांत मद्याच्या बाटल्या मांडल्या होत्या. विजेच्या दिव्यांची काटकसर केली होती-तेलाच्या मिणमिणत्या चिमण्यांवरच काम भागवलं होतं. कोंपऱ्यांत एक कण्याचा ग्रामोफोन होता त्यावर उत्तान संगीताच्या ध्वनिमुद्रिका कायम लावण्यांत येत.

रविवारचा दिवस. कंटाळा आल्यामुळें ऑंद्रे फिरायला बाहेर पडली होती 'मोंमार्त्र' विभागांतून फिरणं हा तिचा आवडता छंद होता. 'आ ला रोमान्स'च्या पायरीवर बसलेली एक वाटोळ्या चेहऱ्याची, अटकर बांध्याची आणि भरगच्च केसांची हंसरी लहानखोर मुलगी तिला फार आवडली. त्या मुलीचंहि ऑंद्रेकडेच लक्ष होतं.

"अहो, हें कॉफीगृह कधीं उघडतं माहीत आहे का तुम्हांला?" त्या मुलीनं सगळे उपचार गुंडाळून ठेवून म्हटलं.

विचाराच्या भरांत लांब लांब पावलं टाकीत ऑंद्रे वेगानं रस्ता कापीत होती आद्रियान्च्या प्रश्नानं ती मंदावली.

"दोन तास झाले मी इथें ताटकळत बसलें आहे!" आद्रियान्नं ओठांचा लाडीक चंबू केला आणि फुरंगटून म्हटलं.

"नाहीं, मला कल्पना नाहीं" ऑंद्रे पुनः चालू लागणार होती पण एवढ्याशा संभाषणावर आद्रियान्चं समाधान होणार नव्हतं

"मोंमार्त्रमध्यें काम करतेस कां तूं?" तिनं विचारलं

गप्पा करण्याचा आद्रियान्चा उद्देश ऑंद्रेच्या लक्ष्यांत आला. 'कशाला अनोळखी मुलीशी बोलण्यांत वेळ घालवा?' ऑंद्रेला एकदां वाटलं. पण आद्रियान्चा रुसव्यानं फुगीर झालेला वाटोळा चेहरा, दुसऱ्याकडे रोखून बघणारे काळेभोर टपोरे डोळे आणि चेहऱ्यावरचा खेळकर भाव याची तिला इतकी मोहिनी पडली कीं

तिला वात्सल्याचा गहिंवर फुटला. अशी धाकटी बहीण आपल्याला नसावी याचं तिला वाईट वाटलं.

" नाहीं; मी लॅटिन क्वार्टरमध्यें रहाते–तिथेंच कामहि करते." आँद्रे म्हणाली.

" मग आज इतक्या दूर आलीस? साक्रेकर पहायला कां?"




" नाहीं. सहज फिरत फिरत आले."

" इतक्या दूर? कमाल आहे बाई तुझी. मी येऊं कां तुझ्या बरोबर त्या दुकानापर्यंत? आद्रियान् माझं नांव. मला एकटीला फार कंटाळा आलाय्. आईपासून पहिल्यांदाच वेगळी राहिलेय् मी. आई म्हणजे खरी आई नाहीं बरं कां! पण माझ्या आईनं सत्य

टाकून दिलं आणि जेनीनं मला सँभाळलं म्हणून तिलाच आई म्हणते मी–"

आद्रियान्‌च्या बोलण्याला धरबंध नव्हता. आपल्या मास्तरणी, मित्र, खेड्यांतले प्रतिष्ठित लोक सगळ्यांचा ती नांवानं उल्लेख करून कांहीं तरी गोष्टी सांगत होती. आँद्रेचा भयंकर घोटाळा होत होता. 'कोण आई? कोण जेनी? मध्येंच हा मिशेल् ज्युनिअर कोण उपटला?' तिला कांहीं समजत नव्हतं. पण आद्रियान्‌चा हा वाक्प्रवाह तिच्या मनाला सुखवीत होता; उन्हांत तापलेल्या माणसानं धबधब्याचे तुषार अंगावर घेत स्वस्थ पडावं तसं तिला वाटत होतं.

आद्रियान्‌चे गाल फुगले होते, ओठ मुडपून पुढें आला होता. ती किंचित् रुसल्यासारखी वाटत होती.

पण मनांतून ती भलतीच आनंदली होती. काल पॅरीसला येते न येते तोंच 'आ ला रोमान्स'मध्यें नोकरी मिळण्याचं वचन त्याच्या मालकानं तिला दिलं होतं. दार किती वाजतां उघडतं हें जरी तिला माहीत नव्हतं तरी नोकरीसाठीं वाटेल तितका वेळ तिष्ठत बसायला तिची हरकत नव्हती. मनाला विरंगुळा म्हणून ती आपल्या आयुष्यांतले ऐकीव आणि आठवणींतले एकेक प्रसंग डोळ्यांखालून घालूं लागली–निव्वळ करमणूक म्हणून. आद्रियान्‌ला आपल्या गतायुष्याविषयीं प्रेमहि नव्हतं, दुःख तर नव्हतंच नव्हतं. तिची नजर सदैव भविष्यकालाकडे लागलेली आणि स्वतःचं भविष्य तिला नेहमीं उज्ज्वलच दिसायचं.

आद्रियान्‌चे खरे आईवडील कोण होते याचा पत्ता नव्हता. मोंपलियेच्या शेजारच्या खेडेगांवांतली गोष्ट. एक दिवस पहांटे चर्चच्या पायरीवर नुकतंच जन्मलेलं एक मूल कुणी तरी आणून टाकलं. तें कोणाचं असेल, तिथे कसं आलं असेल, यावर बराच काथ्याकूट झाला. पोलिसांनीं तलास लावण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण व्यर्थ! शेवटीं मूल दत्तक द्यायचं ठरविलं. पण ते इतकं अशक्त, किरकिरं, खत्रूड होतं कीं त्याच्याकडे पहायलादेखील

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
ग्रा. क्र.... ६१९८ नों. दि ............ ५० : ५१
दि. ...... ...... क्र. ...........

कोणी तयार होईना. शेवटीं मोंपलियेच्या अनाथालयांत त्याची रवानगी करायची असं ठरलं.

हा निर्णय घेतला गेला त्याच दिवशीं जेनी पोलिस कचेरींत जाऊन मूल मागूं लागली. लोकांना हंसूं आवरेनां. जेनी, आणि मूल संभाळणार ? चाळिशी उलटली तरी कैंसांना लाल रंग लावून पुरुषांकडे आशाळभूतपणें पहात असते. नवरा शोधण्यांत उभी हयात गेली. म्हातारपणासाठीं थोडा पैसा गांठीला टाकायचा कीं कोणाचं तरी बेवारशी पोर वाढवायचं ?

जेनीइतकी कुरूप स्त्री गांवांत नव्हती. तिचा चेहरा मोठाड आणि राकट होता. एका डोळ्यांत फूल पडलं होतं. नाकाचीं भोकंच काय तीं दिसत. दांत पुढें आलेले, वांकडे तिकडे, शरीराला आकार नाहीं अशी. गांवभरचीं घरं झाडणं, भांडीं घासणं, कपडे धुणं वगैरे कष्टाचीं कामं करून जेनी आपला देह जगवीत होती. गांवचे कष्ट तिनं उचलावे आणि स्वतःची थट्टा करून घ्यावी असा पायंडाच पडला होता. बायका म्हणत, "जेनीकडून काम करून घ्यायला बरं वाटतं. नवरा तिच्या प्रेमांत पडेल ही भीति नाहीं !"

मास्तरणी पोरींना रागावत, "अभ्यास नीट करा. नाहीं तर देव तुम्हांला जेनीचं रूप देईल." जेनीच्यासमोर हीं बोलणीं चालत. पण जेनीनं खालची मान कधीं वर केली नाहीं कीं कुणाला उलट उत्तरं दिलीं नाहींत. थट्टेला न जुमानतां जेनीनं तें पोर घरीं आणलं. जेनीच्या एका खोलींतल्या रिकाम्या संसारांत लहानुले कपडे, गजांचा पलंग, खेळणीं यांची गर्दी झाली. एरवीं तहानभूक न जुमानतां तासन् तास काम करणारी जेनी थोड्या थोड्या वेळानं घरीं परतूं लागली, मुलीला कुरवाळून, खाऊ घालून मगच कामावर जाऊं लागली. सहा महिन्यांत छोट्या आद्रियान्‌नं बाळसं धरलं.

आद्रियान् दोन तीन वर्षांची झाल्यावर ती दहाजणींत चांगलीच उठून दिसणार असं लोक म्हणूं लागले. जेनीनं याचं सर्व श्रेय स्वतःकडे घेतलं. तिच्या जोपासनेमुळेंच आद्रियान सुंदर दिसत होती !

इतके दिवस जेनीनं पैशांसाठीं कधीं कुरकूर केली नाहीं पण आतां कामाला सुरुवात करण्यापूर्वी ती विचारी,

" माझा भाव परवडेल ना तुम्हांला ? "

आद्रियान्चं कोणी कौतुक केलं कीं जेनी खेंकसायची—

" नका दृष्ट लावूं तिला. चर्चच्या पायऱ्यांवर पडली होती तर हात लावायलादेखील पुढें झालां नाहींत? "

एकदां एका बाईनं जेनीला आद्रियान्च्या मापाचा जुना फ्रॉक दिला. जेनीनं कृतज्ञता दाखवली नाहींच पण उलट बोलून दाखवलं—

" याहून महाग आणि आधुनिक फॅशनचे कपडे विकत घेत-लेत मी माझ्या राजकन्येला. तुमच्याच मुलीला पाहिजे तर आद्रियान्चा जुना फ्रॉक द्या. "

आणि हें खरंच होतं. आद्रियान्जोगती एखादी नवीन वस्तु दुकानांत आली कीं जेनीनं ती खरेदी केलीच. पांच वर्षांच्या आद्रियान्ला ती लिप्स्टिक लावायची, तिचे सोनेरी केस निरनिराळ्या पद्धतींनं कुरळे करायची. आद्रियान्च्या सौन्दर्याचा परिपोष करणं हा तिचा एकमेव विरंगुळा होता. अर्धशिक्षित जेनीनं आद्रियान्च्या अभ्यासाकडे कधीं लक्ष दिलं नाहीं कीं तिला समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या नाहींत. मिशेल् वकील तिला एकदां म्हणाले—

" जेनी त्या मुलीला फार चढवून ठेवूं नकोस. पैसा शिल्कींत टाक. तिला भरपूर शिकव. "

जेनी कुर्र्यांत उत्तरली—

" माझ्या आद्रियान्ला लिहितां वाचतां येत नसलं तरीदेखील देखणा नवरा मिळेल. कोणी सांगावं तुमचाच मुलगा मागणी घालायचा तिला !"

मिशेल् वकील खेटर मारल्यासारखा चेहरा करून चालते झाले. आद्रियान् आल्यापासून जेनीच्या तोंडाला भलता तिखटपणा आला होता. आद्रियान्च्या मास्तरणीनं जेनीला कांहीं सांगायला सुरुवात केली कीं जेनी असा आरडाओरडा करायची कीं गांवभर

बोभाटा व्हायचा. "म्हणे आद्रियान् वर्गांत मुलांकडे पाहून मुरकण्या-पलीकडे कांहीं करीत नाहीं. न करीना ? शिक्षणावर नवरे मिळत असते तर मास्तरणी कशाला कुंवार राहिल्या असत्या ? हेडमास्तरशी चोरून लब्बाडपणा करण्यावर कां भागवावं लागलं असतं ?"

जेनीचं हें वक्तव्य ऐकून आद्रियान्‌ला हास्याच्या उकळ्यावर उकळ्या फुटत. जेनीला मिठी मारीत ती म्हणे—

" आई, तूं किती ग छान आहेस !"

आद्रियान् वयांत आली तशी गांवची पोरंसोरं तिला नजरेनं टेहळूं लागली. मिशेल् वकीलाच्या मुलानं तर तिला एकदां सिने-माला नेलं. जेनीनं आद्रियान्‌ला सल्ला दिला——

" वकिलाचा मुलगाच बरा वाटतो मला.उगीच फालतू मुलांकडे लक्ष देऊं नकोस."

जेनीनं आद्रियान्‌ला तंग कपडे शिवले, उंच टाचांचे बूट आणून दिले. आद्रियान् रात्रीं बेरात्रीं बाहेर भटकली तर आनंदच मानला.

आद्रियान्‌ची आणि धाकट्या मिशेल्‌ची चांगलीच घसट झाली तेव्हां जेनीनं मिशेल् वकीलाच्या ऑफिसची वाट धरली.

" कधीं लग्न करतांय् मुलाचं आद्रियान्‌शीं ? बोला !" तिनं हंसत विचारलं.

" कोणाचं लग्न ? तोंड संभाळून बोल. मी गांवांतला एक प्रति-ष्ठित वकील आहे समजलीस.घालवून द्या या म्हातारीला बाहेर. फार माजली आहे अलीकडे !"

जेनीनं मिशेल् वकीलांना दम भरला, अर्वाच्य शिव्या घातल्या, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. मिशेल् वकीलाचा मुलगा लहानच होता, त्यानं कानावर हात ठेवले. जेनीच्या आकांडतांडवानं आद्रि-यान्‌चं नांव मात्र गांवभर वाईट झालं. आद्रियान् अवघी चवदा वर्षांची होती पण आईची समजूत घालीत ती म्हणाली——

" आई, तूं कशाला त्रास करून घेतेस स्वतःला ? नाहीं करीत लग्न तर राहूं दे. हजारोंजण माझ्यासाठीं झुरताहेत. त्याच्याशींच लग्न केलं पाहिजे अशी वेळ नाहीं आली !"

पण जेनीनं आद्रियान्‌ला पोटाशीं धरून मोठा गळा काढला
" वेडे पोरी, तुझ्याशीं कां कोणी लग्न करणार आहे आतां ? माझं लग्न झालं नाहीं म्हणून पुरुषांचा स्वभाव मला माहीत कां नाहीं ? माझ्याशीं कोणी लग्न केलं नाहीं—मला वाटायचं मी दिसायला अशी म्हणून; पण तुझ्याहि बाबतींत तेंच. गरीबाचा कोणी वाली नाहीं ग ! "

त्या दिवसापासून जेनीनं आपलं ध्येय बदललं. एखाद्या श्रीमंत माणसाला भुलवून त्याच्या पदरीं रहा असा उपदेश ती आद्रियान्‌ला करूं लागली. आद्रियान्‌नं शाळा सोडून दिली. शेजारच्या गांवीं एका दुकानांत ती नोकरी करूं लागली. पण मनाजोगता श्रीमंत तिला आढळला नाहीं. दोन वर्षं निघून गेलीं. जेनी थकली होती, तिच्यानं काम होत नव्हतं.

"आद्रियान्, तूं सुखांत असलेली पाहून मी आनंदानं डोळे मिटीन!" जेनी म्हणायची, " आतां एकच उपाय आहे. थोडेसे पैसे आहेत. पॅरीसला जाऊन नोकरी धर. मात्र पैशांचा अदमास काढल्याशिवाय कोणाच्या आधीन होऊं नकोस हं !"

आद्रियान्‌ची कळी खुलली—

" आई, तूं मुळींच काळजी करूं नकोस. तुला देखील ऐषारामांत रहातां येईल अशी व्यवस्था करीन मी. दोनतीन महिने थांब. "

आईला कबूल केल्याप्रमाणें आद्रियान् पॅरिसला आली होती, आणि आल्या आल्याच तिला ' आ ला रोमान्स ' मध्यें नोकरी मिळाली होती.

' आ ला रोमान्स ' चा मालक म्हातारा लोलो आतां बराच थकला होता. नाहीं तर आद्रियान्‌ला नोकरी देण्याचं त्यानं कधीं कबूल केलं नसतं. पण एक तर आद्रियान् दिसायला मोठी गोड पोरगी होती; तिच्यामुळें गिऱ्हाईक वाढण्याचा संभव होता. दुसरं म्हणजे दोन वेळचं जेवण, दिवसा 'आ ला रोमान्स'च्या जागेंत झोपायची परवानगी आणि वर दोन हजार फ्रँक एवढ्या अल्प

पगारांत ती गिऱ्हाइकांना मद्य देण्याचं आणि झाडझूड करण्याचं काम करणार होती.

पगार कमी आहे, जेवण कदाचित् पोटभर मिळणार नाहीं याची आद्रियान्ला खंत नव्हती. नोकरी हें तिचं ध्येय होतं थोडंच ? एखादा श्रीमंत माणूस तिच्यावर खूष व्हावा एवढ्या-पुरतीच तिला नोकरीची गरज होती आणि या दृष्टीनं 'आं ला रोमान्स' मधील नोकरी तिला पसंत पडली होती.

अर्ध्या पाऊण तासांतच आँद्रेनं आद्रियान्चा निरोप घेतला, पण एकटीनं चालायला सुरुवात करतांच आपली फार फार जुनी मैत्रीण हरवल्यासारखं तिला झालं. पण आद्रियान् तिला पुनः भेटणार होती. वेळांत वेळ काढून आद्रियान्ची शक्य तितक्या लवकर भेट घेण्याचं तिनं स्वतःच कबूल केलं होतं.

राजे ग्रंथ संग्रहालय, अनु. २९६६६ ... वि. ... २०३६ ... ३-७-६

५

---

'गालेरी लाफाय्येत' दुकानांतील स्त्रियांच्या विभागांत मुंगी शिरणार नाहीं अशी गर्दी होती. उन्हाळ्यासाठी नवीन पद्धतीचे रंगीबेरंगी फ्रॉक, हातमोजे, पायमोजे, प्रसाधनसाहित्य, पर्सेस, स्वेटर्स, सन् ग्लासेस्, स्कार्फ वगैरेंचा खच पडला होता नुसता. भांबावलेल्या मुद्रेनं उपेन्द्र रिबिनींच्या काउंटरपाशीं उभा राहून भोंवतालचा समुद्र निरखीत होता. रागीट मुद्रेनं धक्काबुक्की करीत चालणाऱ्या म्हाताऱ्या, मुलांच्या गाड्या ढकलीत मध्यें अडमडणाऱ्या स्त्रिया, मित्रांना चिकटून लाडीक लाडीक बोलणाऱ्या तरुणी, तशाच एकजात काळा पोषाख घातलेल्या सडपातळ रेखीव विक्रेत्या–या सर्वांच्या हालचालींचं आणि चेहऱ्याचं चक्र त्याच्या डोळ्यांसमोर गोलगोल

फिरत होतं. रिबिनींच्या काउंटरपाशीं जरा कमी गर्दी होती. म्हणून तिथं तो क्षणभर टेकला होता.

" मस्सिअ, तुम्हांला मदत करूं ?" काउंटरवरच्या चिटुकल्या मुलीनं त्याला स्वतःची जाणीव करून दिली.

" अं ?"

" तुम्हांला रिबीन पहायची आहे ?" त्याचा गोंधळ लक्षांत घेऊन मुलीला हंसूं फुटलं होतं.

आपण रिबिनींच्या काउंटरपाशीं उभे आहोंत हें उपेन्द्राला आतांच जाणवलं.

" नाहीं. "

" तुम्ही कोणाला तरी शोधताहांत वाटतं ? " काउंटरजवळ दुसरं गिऱ्हाइक नव्हतं; मुलगीहि एकटीचं उभी राहून कंटाळली होती.

" नाहीं. मी काय घ्यावं याचा विचार करतोय्. मला कांहीं सुचत नाहीं. इथें इतक्या वस्तु आहेत—"

" कोणासाठीं घ्यायचंय् ? मैत्रिणीलाच ना ? मी असते तर फरकोट मागितला असता !"

" तुमच्या मित्रानं कदाचित् दिलाहि असता. पण मला तें शक्य नाहीं ! " ती मुलगी मनापासून हंसली.

" माझा मित्र नालायक आहे अगदीं. माझ्याकडूनच पैसे उकळतो. पण तें जाऊं द्या. नायलॉनचे पांढरे हातमोजे कां नाहीं घेत तुम्ही ? सध्यां फॅशन आहे ती. "

" पांढरं कांहीं नको बुवा. आधींच पांढरीफटक गोरी आहे ती. शिवाय नायलॉन्चे हातमोजे घातले म्हणजे त्याला शोभेलसा बाकीचा थाट हवा ! "

" मग नवीन गुलाबी रंगाची लिप्स्टिक निघाली आहे, ती कां नाहीं घेत ? फिकट माणसांसाठींच काढली आहे. महाग नाहीं. फक्त अडीचशे फ्रँक. "

" बघायला हरकत नाहीं ! "

मुर्लीनं खाणाखुणा करून लिप्स्टिकच्या काउंटरवरच्या मुलीचं लक्ष वेधून घेतलं आणि उपेन्द्राची तिकडे रवानगी केली. पंधरा मिनिटांच्या आंत दुसऱ्या काउंटरवरच्या मुलीनं उपेन्द्राला लिप्स्टिक् तर विकलीच, शिवाय त्याच्या जोडीला गालाला लावायचा रंगहि त्याच्या गळ्यांत बांधला आणि अत्तराची एक लहानशी बाटली नमुन्यादाखल भेट दिली.

पुडकं खिशांत घालून उपेन्द्र लगोलग घरीं आला. ऑंद्रेला आश्चर्याचा धक्का देऊन चकित करून सोडायचं त्यानं ठरवलं होतं. मनांतल्या मनांत त्यानं तो प्रसंग हजारदां रंगवला होता—

"ऑंद्रे, तुला गंमत आणलीय् "

ऑंद्रे फारसा उत्साह न दाखवतां पुडकं स्वीकारते, कारण सतत कुचंबणेंत राहिल्यानं तिचा उत्साहहि आटूं लागला आहे. शिवाय उपेन्द्राचं तिऱ्हाइतासारखं वागणं तिच्या लक्षांत आल्याखेरीज रहात नाहीं. उपेन्द्राची गंमत म्हणजे कॉफीचा डबा, भिंतीला ठोकायला खिळे, किंवा असंच कांहीं तरी गरजेचं एवढा तर्क तिला सहज करतां येतो. पण पुडकं उघडतांच अविश्वास, आश्चर्य. आनंद या भावना तिच्या चेहऱ्यावर क्रमाक्रमानं उमटून जातात.

'उपेन्, लिप्स्टिक कशाला ?—मला ? —कां ? " तिची मुद्रा गोंधळलेली आहे. चेहऱ्यावरचे स्नायू शिथिल झाल्यामुळें ती एरवींपेक्षां सौम्य, आणि प्रौढ भासत आहे.

"तुलाच भेट म्हणून !" उपेन्द्र सांगतो—अगदीं सहज, जणुं कांहीं असल्या भेटी देणं म्हणजे त्याच्या हातचा मळच होता.

"पण कशासाठीं ? आणि—आणि—"ऑंद्रेला विचारायचं असतं "पैसे असे वांया कां घालवले ?" पण ती विचारायला धजावत नाहीं.

"कशासाठीं काय ? सहज ! मला वाटलं तुला भेट द्यावी म्हणून. "

"असं काय करतोस ? सांग ना खरं कारण—"

आणि मग तिला चिडवून रडकुंडीला आणल्यानंतर उपेंन्द्र सांगणार होता—

" कांहीं फारसं मोठं कारण नाहीं. मला पार्ट टाईम नोकरी मिळाली—प्रोफेसरच्या ओळखीनं. एका घरबांधणीच्या फर्मसाठीं इंग्लिश मासिकांतल्या मजकुराचं फ्रेंचमध्यें भाषान्तर करायचं आणि कांहीं आराखड्यांच्या प्रती तयार करायच्या. रोज चार तास काम; केव्हांहि चार तास करावं. महिन्याला वीस हजार फ्रँक पगार. "

आणि हें ऐकतांच आँद्रे किती हंसली असती, नाचली असती, उत्साहित झाली असती याला सुमार नव्हता.

विचारांच्या भरांत उपेन्द्राला आपण खोलीशी केव्हां येऊन ठेपलों हें समजलं नाहीं कीं आसपासची घाण जाणवली नाहीं. जिन्याच्या टोंकापासूनच तो 'आँद्रे आँद्रे' अशा हांका मारीत खोलींत शिरायचा पण रोझनं त्याच्याशीं बोलणं उकरण्याचा प्रयत्न केला त्यांत थोडा वेळ गेला.

खोलीचं दार उघडंच होतं. चटकन् लावतां येत नसल्यामुळें तें बहुधा उघडंच असायचं. आंतून आद्रियान्च्या हास्याची लकेर बाहेर येतांच उपेन्द्राच्या उत्साहावर पाणी पडल्यासारखं झालं. आद्रियान्शीं ओळख झाल्याचा प्रसंग आँद्रेनं वर्णन केला तेव्हांच उपेन्द्राच्या कपाळावर नापसंतीच्या आंठ्या पसरल्या होत्या पण आँद्रे मनस्वी खूष झाली होती म्हणून तो कांहीं बोलला नाहीं. मात्र आँद्रेच्या व आद्रियानच्या वरचेवर भेटीगांठीं होऊं लागल्या, तेव्हां त्यानं स्वतःची नापसन्ती व्यक्त करायला सुरुवात केली. आद्रियान्वरून त्यांचे वारंवार खटके उडूं लागले.

"तुला मैत्रीच करायची होती तर दुसऱ्या मुली नव्हत्या कां?" उपेन्द्रानं विचारलं.

"असतील! पण आद्रियान् काय वाईट आहे?"

"जी मुलगी उघड उघड—न लाजतां स्पष्ट शब्दांत सांगायचं म्हणजे बाजारबसवीचा धंदा करूं पहाते ती मोठी चांगलीच म्हटली पाहिजे."

"लपून छपून असं कांहीं केलं तर तें चालतं वाटतं ?"

"कोण म्हणतं चालतं म्हणून ? तें लक्ष्यांत येत नाहीं म्हणून आपण फसतो एवढंच. पण जिथं तें स्पष्ट दिसतं आहे तिथं विस्तवाशी खेळ कशाला ?"

"यांत विस्तवाशी खेळ कसले ? आद्रियान् मला काय करणार आहे ?"

"तूं तिच्या आहारीं गेलीस कीं तिच्या मनोवृत्तीचा तुझ्यावर परिणाम झाल्याखेरीज रहाणार नाहीं."

"माझ्यावर अशा तऱ्हेचा परिणाम व्हायला आद्रियान्च कशाला हवी ? व्हायचा असता तर कुणीहि करूं शकलं असतं, केव्हांच; आणि होणार असला तर अजूनहि होईल. त्याला आद्रियान्चंच निमित्त कशाला हवं ? स्वभाव आपल्याला कोणी उसना देत नाहीं. आपल्यांतच असतो तो. हलके हलके त्याचे पापुद्रे उलगडत जातात एवढंच !"

"आपल्या मित्रवर्गावरून जग आपली परीक्षा करतं अशा अर्थाची इंग्रजींत एक म्हण आहे !"

"स्वतःची परीक्षा स्वतःच करायची असते आणि किंमतहि स्वतःच ठरवायची असते. मला वाटतं तुझं नेमकं इथंच चुकतंय्. एवढ्यातेवढ्यासाठीं मित्र काय म्हणतील ? जग काय म्हणेल ? याची लाज वाटते तुला." असं म्हणून ऑंद्रे उपेन्द्राला गप्प बसवायची. पण कधीं कधीं ती बरीच गंभीर होऊन म्हणायची,

"तुझा दृष्टिकोन मला समजतो. मी फारशा माणसांत वावरलेली नाहीं. पण ज्यांच्यांत वावरलेंय् त्यांचींहि मनं अशींच होतीं. पण नैतिक मूल्यें एवढी एकच कसोटी आहे कां ?"

ऑंद्रे असं कांहीं बोलूं लागली म्हणजे उपेन्द्र थबकायचा; स्वतःच्या विचारांचा सखोल आढावा घ्यायचा

"नीतीच्या पारड्यांत आद्रियान्ला जोखून तिला मी जगायला, हंसायला, बोलायला, नालायक ठरवली आहे अशांतला भाग नाहीं. ती अजाण आहे, अवघी सोळा सतरा वर्षांची आहे, तिच्या हातून

जें कांहीं घडलं किंवा घडतं आहे त्याला तिच्या सभोंवतालची परिस्थिति कारण आहे वगैरे सगळं मला पटतं. पण म्हणून तें विसरतां कसं येईल ? आद्रियान्चं वर्तन समर्थनीय असेल एक वेळ, पण स्तुत्य खचित नाहीं.

" तुझ्या नीतीच्या कसोट्या आद्रियान्ला लागू पडणार नाहींत. पाप म्हणजे काय किंवा आपण करतों तें वाईट आहे याची अंशमात्र जाणीव तिला नाहीं. या दृष्टीनं ती मोठी निर्व्याज वाटते मला. आणि समजा नैतिकदृष्ट्या तिची किंमत शून्य आहे; मला त्याचं काय ! माझी मैत्रीची भूक तर ती भागवते आहे ना ? कोणाशीं तरी स्नेह जोडायचा म्हणून तिच्याशीं जोडला असं मुळींच नाहीं. आपोआप जुळला. तिच्यासारखीशींच स्नेह जुळावा अशीच माझ्या मनाची ठेवण असणार ! जास्त मी तरी काय सांगूं ? माझी मैत्रीची भूक आद्रियान्मुळं भागते एवढं खरं. "

एकदां उपेन्द्रानं हंसल्यासारखं करून तिला विचारलं होतं,

" आणि मी ? मी तुझा मित्र नाहीं ? "

" तूं आहेस रे, तरी पण मैत्रीण हवीच " तिनं संदिग्ध उत्तर दिलं होतं.

असे लहानमोठे वादविवाद अनेकदां झाले. पण त्यांतून निष्पन्न कांहींच झालं नाहीं. ऑंद्रेचे विचार बदलले नाहींत कीं उपेन्द्रानं आपलीं मतं सोडलीं नाहींत. म्हणून आज खोलींतून आद्रियान्चा आवाज ऐकूं येतांच तो चांगलाच तिरसटला.

आंत जावं कीं नाहीं या विचारानं उपेन्द्र क्षणभर खोलीच्या दाराशी घुटमळला.

" शाबास ! म्हणजे तुझीच खोली आणि तो आयतोबासारखा रहातो इथं ? मला वाटलं तो तुला पैसे देत असेल !" आद्रियान् तावातावानं म्हणत होती.

" तसं नाहीं ग. तुला समजत नाहीं. तो फार चांगला आहे. तुला पैशाशिवाय कांहीं सुचत नाहीं."

" कां सुचेल ? पैसे देतात म्हणून पुरुषांचा आब राखायचा. नाहीं तर कोणी विचारलं असतं त्यांना ?"

" लहान आहेस तूं. आमचे संबंध तसे नाहींत, फार वेगळे आहेत ! "

" त्याच्या प्रेमांत पडण्याचा मूर्खपणा तर नाहीं ना करून बसलीस ? गरीब माणसाच्या प्रेमांत पडूं नये कधीं—आई नेहमीं म्हणते."

उपेन्द्राच्यानं पुढें ऐकवेना. तो ताड्ताड् जिना उतरून खालीं उतरला आणि पिसाटासारखा भटकत सुटला बऱ्याच वेळानं त्याचं डोकं शांत झालं तेव्हां त्यानं स्वतःला लाखों शिव्या मोजल्या.

" नोकरीचं नुसतं बोलणं होतांच धांवत जाऊन आँद्रेला भेट आणायची कांहीं गरज होती ? असल्या उतावळेपणाला आंधळी भावनाप्रधानता म्हणूं नये तर काय ? आँद्रेनं आपली भूमिका पूर्वींच स्पष्ट केलेली नाहीं काय ? 'एकाच परिस्थितींत आहोंत तोंवर एकमेकांना साथ देऊं, मग होतीलच दोघांचे दोन मार्ग'—पहिल्याच दिवशी ती म्हणाली होती. त्यानंतर 'त्या' दिवसाची ती अंतःकरण जाळीत जाणारी आठवण— एखाद्या मवाल्यानं आँद्रेवर हल्ला केला असता तर ती ओरडली असती, घाबरली असती, रागावली असती. आपल्या बाबतींत मात्र ती थंड राहिली. एखाद्या किटाणूला टिचकीनं उडवावं तसं तिनं आपल्याला झटकून् टाकलं. ती आपल्याला तिऱ्हाइतासारखी आहे हें वेळोवेळीं स्पष्ट केलंय् तिनं. ' मी नाहीं कां तुझा मित्र ? ' आपण तिला विचारलं होतं, त्यावेळीं कशी घुटमळली, चांचरली..."

बऱ्याच प्रयासानं स्वतःला शांत करून उपेन्द्र खोलींत आला.

" किती उशीर केलास ? मी केव्हांची वाट पहातेंय् " आँद्रे म्हणाली.

" लवकर येणार होतास ना ? "

" आलों होतों. पण आद्रियान् होती तुझ्या सोबतीला म्हणून गेलों निघून ! " उपेन्द्रानं ठरवलं होतं आँद्रेशीं संपूर्णतः परक्यासारखं वागायचं, तिला कसलेहि प्रश्न विचारायचे नाहींत, उपदेश

करायचे नाहींत, मघां ऐकलेल्या संभाषणाचा तर चुकून उल्लेख करायचा नाहीं. पण नकळत त्याच्या मनाची बोंच बाहेर पडली.

आद्रियान्‌चा विषय उपेन्द्राला किती अप्रिय आहे हें माहीत असल्यामुळें ऑंद्रेनं संभाषण पुढें वाढवलं नाहीं. मुकाट्यानं ती बटाटे सोलायला लागली.

नीरवतेंत जेवण सुरू होतं. पण उपेन्द्र मनांतल्या मनांत धुमसत होता. शिवाय नोकरी मिळाल्याचं ऑंद्रेला सांगितल्याशिवाय त्याला रहावत नव्हतं.

" आद्रियान्‌ला तूं आतां सांगूं शकतेस, उपेन्द्र मला खोलीभाडं व जेवण यासाठीं महिना पंधरा हजार फ्रॅंक देतो म्हणून. मला वीस हजाराची नोकरी मिळालीय् ! " तो खंवचटपणानं म्हणाला.

त्याच्या स्वरांतली धार ऑंद्रेच्या जिव्हारी झोंबली.

" उपेन्, तूं आमचं बोलणं ऐकलंस ? " तिनं धक्का बसून विचारलं.

" अर्धवट ऐकूं आलं. आडून ऐकण्याची इच्छा नव्हती. "

" ती – आद्रियान् – दुष्टपणानं बोलत नव्हती. तिला कांहीं समजलं नाहीं—कांहींच. " स्वतःशीं पुटपुटल्याप्रमाणं ऑंद्रे बोलली.

" माझ्यासंबंधीं तिला कांहीं सांगायची गरज होतीसं मला वाटत नाहीं. "

" कांहीं गोष्टी कोणाला तरी सांगितल्याशिवाय रहावत नाहीं. "

" माझ्याखातर थोडा संयम राख. निदान आद्रियान्‌शीं तरी माझ्यासंबंधानं कांहीं बोलूं नको "

ऑंद्रे गप्प राहिली; उपेन्द्र भलताच रागावला होता, त्याची समजूत घालणं किंवा त्याला शांत करणं तिला शक्य नव्हतं.

रात्रींची वेळ. सगळीकडे सामसूम झालेली. वसन्त ऋतु जवळ आल्यानं रात्री उबदार झालेल्या. चेस्टनट्‌च्या तुऱ्यांचा मंद सुगंध सहाव्या मजल्यावरच्या कोंदट खोल्यांपर्यंत पोंचत होता. डोक्या-वरून पांघरूण घेऊन उपेन्द्र एका कोपऱ्यांत लांकडासारखा पडला होता. ऑंद्रे विव्हल होऊन अश्रू ढाळत होती. उपेन्द्राचा राग

घालवावा, त्याचा गैरसमज दूर करावा निदान त्यानं नेमकं काय ऐकलं हें तरी समजून घ्यावं असं तिला राहून राहून वाटत होतं. पण तोंडांतून शब्द फुटत नव्हते. एक महत्त्वाची गोष्ट सांगून टाकल्याखेरीज उपेन्द्राला सर्व खुलासा करणं ऑंद्रेला अशक्य होतं. तिचं उपेन्द्रावर प्रेम होतं. पहिल्या भेटींतच ही भावना ऑंद्रेच्या मनांत रुजली होती, परिचयानं विकसित झाली होती. याच भावनेनं ऑंद्रेला माणसांत आणलं होतं, तिच्या आयुष्याला आकार दिला होता.

पण कांहीं झालं तरी ऑंद्रे स्त्री होती, मानिनी होती. जी भावना स्वतःपाशीहि कबूल करायला तिला अनेक दिवस लागले ती सहजगत्या उपेन्द्राला कळवणं शक्य नव्हतं. कदाचित् ती त्याला समजली नसती, कदाचित् त्यानं ती अव्हेरली असती, कदाचित् त्यानं तिची थट्टा केली असती. उपेन्द्राविषयींचं प्रेम हा ऑंद्रेच्या मनांतला कोमलांतला कोमल भाव होता. एरवीं कशाचीहि पर्वा न करणारी बेदरकार ऑंद्रे याबाबतींत भलतीच हळुवार होती त्या भावनेला धक्का लागेल अशा नुसत्या भीतीनं कळवळून जात होती. मनांतलं गुपित मनांत मावत नव्हतं म्हणून ऑंद्रेनं ते वळसेवेलांटे घेऊन कां होईना पण आद्रियान्‌ला सांगायचा प्रयत्न केला होता. पण प्रेम हा शब्दहि आद्रियान्‌च्या शब्दविस्तारांत नसल्यामुळं ऑंद्रेला हवा तो दिलासा ती देऊं शकली नव्हती. राहतां राहिला स्वतः उपेन्द्र. त्याला ही भावना समजण्याची एकच संधि होती. कांट्याची जाळी अलगद दूर करून आंत लपलेलं एखादं नाजूक फूल हळुवारपणानं बाहेर काढावं अशी त्यानं ही भावना ऑंद्रेकडून काढून घेतली असती तरच ! स्वतः ऑंद्रे त्याच्याजवळ तिला तोंड फोडणं शक्य नव्हतं. विशेषतः तो रागांत असतांना तर नाहींच नाहीं.

भावनांचा आवेग अश्रूंबरोबर वाहून गेला. ‘ दुसरा माणूस तुम्हांला प्रेम देत नाहीं म्हणून शोक कां करतां ? प्रेमभावनेचा तुम्हांला साक्षात्कार झाला, ओळख पटली हेंच काय कमी आहे ? ’ अशा स्वरूपाचे अनेक फ्रेंच कवींनीं वेळोवेळीं लिहिलेले शब्द आठ-

वून ऑंद्रेनं स्वतःचं समाधान करून घेतलं. पहांटेच्या पहिल्या झोताबरोबर तर ती नेहमींची विचारी आणि रुबाबदार ऑंद्रे बनली.

" उपेन् वीस हजार फ्रँक म्हणजे बराच पगार झाला. तुला एकट्याला त्यांत चैनींत नाहीं तरी इथल्यापेक्षां चांगल्या तऱ्हेनें रहातां येईल. तुला ही खोली अजिबात आवडत नाहीं हें माहीत आहे मला !" कॉफीचा कप पुढें ठेवतां ठेवतां ऑंद्रे उपेन्द्राला म्हणाली.

उपेन्द्र चमकला. ऑंद्रेनं सुचवलेला विचार त्याच्या मनांतहि आला नव्हता.

" मग तुझं काय म्हणणं आहे ? मी इथून जावं ? " त्यानं विचारलं

" तुला तें जास्त सोयीचं होईल नाहीं कां ? "

" ऑंद्रे, तुला काय म्हणायचं आहे तें स्पष्ट सांग. तुला मी इथं नको आहे कां ? माझी तुला अडचण होते कां ? "

" असं नाहीं. "

" मग मी इथून जाणार नाहीं ! "

" पण उपेन्द्र इतका पैसा मिळत असतांना तूं माझ्याखातर अडचण का सोसायची ? "

" प्रश्न माझा आहे. तूं नाहीं कां मला साहाय्य केलंस ? "

ऑंद्रे गप्प झाली—पण थोडीशी हिरमुसली होऊनच. केवळ मदत किंवा कृतज्ञता म्हणून त्यानं तिला सोडून जाऊं नये यावर तिचं समाधान होत नव्हतं; तिची इच्छा होती त्या उत्तराच्या जवळपासदेखील तो पोंचला नव्हता.

बाहेर जाण्यासाठीं उपेन्द्रानं कोट चढवला. काल खरेदी केलेलं लिप्स्टिक्चं पुडकं त्याच्या हातीं लागलं. आपण केलेल्या मूर्खपणाची खूण म्हणून हें पुडकं पेटींत खोलवर गाडून टाकायचा त्याचा बेत होता पण आतां त्याला वाटलं—एरवींतेवीं पैसे खर्च केलेच आहेत तर वाया कशाला घालवायचे ? ऑंद्रेच्या दिशेनं पुडकं भिरकावीत तो म्हणाला—

“ हें घे ”

“ हें काय ?”

“ मला वाटलं तुला गरज असेल म्हणून आणलंय् लिप्स्टिक्; साधंच आहे. ”

“ थँक् यू ! ”

काल आनंदाच्या आवेगांत धांवत येऊन त्यानं आँद्रेला ते लिपस्टिक देण्यांत जी गंमत होती त्याच्या एक शतांशहि आज दोघांपैकीं एकाच्याहि वांट्याला आली नाहीं.

आद्रियान् कितीतरी दिवसांत आँद्रेकडे फिरकली नव्हती.

आँद्रेलाहि तिच्याकडे जायला वेळ झाला नव्हता.

आज आद्रियान् आली ती टण्टणा उड्या मारीतच. आँद्रेच्या गळ्याला एका हातानं मिठी मारीत आद्रियान्नं तिच्या हातांत ‘ रोझे वाइन् ’ची बाटली ठेवली.

“ आँद्रे, आठवड्याच्या आंत मी श्रीमंत झालेली तुला दिसेल बघ. आई वाट पाहून पाहून टेकीला आली असेल ! ”

“ काय झालं कळूं दे तरी. त्या अमेरिकन मुलानं–”

“ शी : त्याचं पाणी मी केव्हांच ओळखलं होतं. दोन वेळ पाव आणि अंड्याचं जेवण देऊन माझ्याबरोबर चैन करायचा विचार होता त्याचा. मी कसली बधतेंय् ? तरुण होता, दिसायला बरा होता म्हणून त्याच्याशीं बोलत होते एवढंच. दोन तीन दिवसांपासून आमच्याकडे एक गृहस्थ येतो. आयरिश आहे पण मलायांतच आयुष्य गेलंय् त्याचं. खूप उंच आणि धिप्पाड आहे–रबराचे मळे आहेत त्याचे तिथें म्हणजे किती श्रीमंत असेल तो हें सांगायला नकोच.

आज पांच वाजतां मी ‘ आ ला रोमान्स’च्या पायरीशी उभी होते तेव्हां तो रस्त्यावरून चालला होता–यीट्स बरं कां त्याचं नांव; इंग्रजींत म्हणतात तसं मिस्तर यीट्स. त्याचं लक्ष नव्हतं माझ्याकडे. पण मीच त्याला हटकलं–‘बों झूर’ म्हटलं आणि इकडच्या तिकडच्या

गप्पा करायला सुरुवात केली. पण तो इतका कंटाळल्यासारखा वागतो कीं सांगायची सोय नाहीं. या पैसेवाल्या माणसांना असं विनाकारण कंटाळायला काय होतं ग? सुंदर मुलींच्याकडेसुद्धां त्यांचं लक्ष जाऊं नये ? ”

“ पण झालं काय पुढें ? तो कंटाळून निघून गेला ? ”

“ बरा जाईल निघून ! शिवाय सरावानं माझं टेक्निकहि बरंच सुधारलंय्. मी ओठांचा चंबू केला, डोळ्यांत थोडसं पाणी आणलं आणि म्हटलं—

“ माझ्या बोलण्याला कंटाळलांत ना तुम्ही ? सगळेच कंटाळतात ! मी कोणालाच आवडत नाहीं. ‘ अद्रियान् तूं मूर्खासारखी बडबडत असतेस ’ असंच मला प्रत्येकजण म्हणतो. ”

ही मात्रा मात्र चांगली लागू पडली. तो एकदम उद्गारला—

“ कंटाळलों नाहीं मी. तुला माझ्याबरोबर जेवायला यायला वेळ असेल कीं नाहीं याचा विचार करीत होतों ! ”

“ मी आपलं चटकन् तें आमंत्रण स्वीकारलं. इतकं भरमसाट जेवलेंय् म्हणून सांगूं. फारच सुंदर होतं जेवण. अजून चव जिभेवर रेंगाळतेय्. एकदां वाटतं असा अधाशीपणा त्याच्यासमोर करायला नको होता. पण सहा महिने ‘आ ला रोमान्सचं’ भिकार अन्न खातेंय् आणि बांकड्यावर झोपतेंय् तेंव्हां असलं जेवण कसं सोडूं ?

“ मात्र जेवण झालं आणि मला तुझी आठवण आली. त्याला म्हटलं माझी एक मैत्रीण आजारी आहे तिला भेट म्हणून ‘वाइन’ची बाटली द्यायची आहे. ताबडतोब एक बाटली घेऊन दिली त्यानं मला. अग बाई, पण तो खालीं टॅक्सींत बसला आहे तें विसरलेंच. जातें हं आतां. ‘आ ला रोमान्स’ पण उघडेल थोड्या वेळांत.”

धांवत पळत आद्रियान् आली तशी निघून गेली. “ किती बालिश, निष्पाप आहे बिचारी ! ” उपेन्द्र खंवचटपणें उद्गारला.

● ● ●

# ☛ ६

'तीन चांदण्या' अशा अर्थाचं नांव असलेल्या रेस्टॉरंटमध्यें बसून आद्रियान् एका नाजूक देंठाच्या ग्लासांतून मार्टिनीचा आस्वाद घेत होती. मधूनच ती कोंपऱ्यांतल्या घड्याळाकडे पहायची. साडे-सहा वाजले होते, सातपर्यंत येतो असं यीट्स्नीं तिला कबूल केलं होतं. यीट्स्ची आठवण येतांच आद्रियान् रुष्ट झाली. त्यांची तिची ओळख होऊन सहा महिन्यांच्यावर दिवस लोटले होते. पण आद्रियान्ला हवं तें मिळालं नव्हतं. लहर लागेल तेव्हां यीट्स् तिला जेवायला नेत, सिनेमाला नेत. तिनं एखादी वस्तु मागितली तर ती घेऊन देत. तीन महिन्यापूर्वींची गोष्ट. यीट्स्नीं तिला 'ज़ॉर्ज सँक्' या राजेशाही हॉटेलांत जेवायला नेलं होतं. इतक्या थाटानं जेवायचा आद्रियान्चा पहिलाच प्रसंग.

आसपासच्या टेबलावर आधुनिक कपडे घातलेल्या स्त्रिया होत्या. त्यांचे केंस सुरेख वळवलेले होते; चेहऱ्यावर भडक दिसणार नाहीं अशी खास रंगप्रसाधना केली होती. बहुतेकींच्या गळ्यांत किंवा हातांत हिऱ्याचे दागिने होते. त्यांची हनुवटी उंचावून चालायची तऱ्हा, हावभाव सगळं कसं ऐटदार, शानबाज होतं. बरोबरचे पुरुष त्यांची सिगरेट काळजीपूर्वक पेटवत होते. त्यांचे फरचे कोट काढून घेण्यासाठीं, खुर्ची मागें ओढण्यासाठीं राजबिंड्या वेटर्सची धांवपळ चालली होती. किंमतीकडे लक्षहि न देतां त्या बिनदिक्कत संत्र्याच्या रसांतलं बदक आणि १९२७ ची लाल वाइन् असं कांहीं तरी मागवीत होत्या.

आद्रियान् ओशाळी झाली. तिच्या अंगांतला लाल फ्रॉक विटून गेला होता. पायांतील प्लॅस्टिकचे सँडल्स् कसेतरीच दिसत होते.

केंसांतून आद्रियान् एकसारखा हात फिरवूं लागली. तिचे तिनंच ते कापले होते, चिमणीच्या घरट्यासारखे ते राठ आणि विसकटलेले दिसत होते. ओठांची स्वस्त, भडक रंगाची लिप्स्टिक बाजूला ओघळली होती. टेबल दाखवणाऱ्या वेटरनंदेखील तिच्याकडे कुत्सित-तपणें पाहिलं. पुस्तकाएवढा जाडा मेनू पाहून तर तिला काय मागवावं हेंच सुचेना. अशांत तिचा एका ग्लासाला धक्का लागून तो पडला...

" जेवण नको इतक्यांत. दोन चिंझानो आणा फक्त ! " यीट्सनं वेटरला फर्मावलं.

आद्रियान् आंतल्या आंत धुमसूं लागली—यीट्स तिच्या बावळट-पणावर नाखूष झाले होते. कदाचित् दोघांची ही शेवटली भेट तर ठरणार नाहीं ना अशी तिला भीति वाटत होती.

घाईघाईनं चिंझानो संपवायला लावून यीट्सनीं तिला बाहेर काढलं. समोरच शाँझेलिझेचीं आलिशान दुकानं दिसत होतीं,



त्यांपैकीं एका दुकानांत ते शिरले. काळे कपडे घातलेली दुकानाची मालकीण लगाबगा पुढें आली——

" मस्सिअना काय पाहिजे ? "

" हिला कांहीं चांगले कपडे चढवा;'जॉर्ज सँक'मध्यें जेवायचंय!"

मालकिणीनं आद्रियान्‌ला आंतल्या खोलींत नेलं खोलीभर लावलेल्या आरशांत आद्रियान्‌ला स्वतःचा मळका फ्रॉक दिसत होता, लाजवीत होता. काळ्या कपड्यांतील विक्रेत्या आणि नवीन पद्धतीचे पोशाख घालून दाखविणाऱ्या मॉडेल्स ये जा करीत होत्या.

आद्रियान्‌चा फ्रॉक मालकिणीनं काढून टाकला. चारदोन क्षण तिच्या अर्धावृत्त देहाकडे निरखून पाहिलं आणि विक्रेतीला फर्मावलं—

" प्रिन्सेस् लाइन्, निळं काश्मिरी कापड, निळसर स्टॉकिंग्ज, व्हेल्व्हेटची बॉनेट्, पांढरे हातमोजे."

अर्ध्या तासांत आद्रियान्‌ची बाहेर रवानगी झाली. छातीखालीं आवळ होणाऱ्या प्रिन्सेस् लाइनमुळें ती बरीच उंच दिसत होती. मखमलीची तिरकस बॉनेट् तिचें केंस झांकत होती. निळा रंग तिच्या पिंवळसर कातडीला खुलून दिसत होता.

" सगळं ठीक आहे. बॉनेट् तेवढी नको." यीट्सनीं शेरा मारला.

जवळच्या दुकानांतून त्यांनीं आद्रियान्‌ला निळे पांढरे उंच टांचांचे बूट आणि तसलीच पर्स घेऊन दिली. एका ब्यूटी सलून मधून केशरचना आणि रंगप्रसाधन करून घेतल्यानंतर आद्रियान् फारच सुंदर दिसूं लागली.

पण सहा महिन्यांत मनांत भरण्यासारखा हा एकच प्रसंग. त्याच रात्रीं यीट्स ' आ ला रोमान्स ' मध्यें आले होते तेव्हां आद्रियान्‌कडे त्यांनीं ढुंकूनहि पाहिलं नव्हतं. बिअरचा ग्लास हातांत धरून कोपऱ्यांत ते एकटेच बसून राहिले होते.

यीट्सच्या या विचित्र वागण्यामुळें त्यांच्या मनाचा थांगपत्ता आद्रियान्‌ला लागत नव्हता. नवीन कपड्यांवर आणि जेवणांवर ती खूष नव्हती असं नाहीं. पण तिला कायमचं घर हवं होतं. यीट्सचं

हें घरसोडीचं धोरण तिला पसंत नव्हतं. धड त्यांचा नादहि तिला सोडतां येत नव्हता आणि इतरत्र मनहि घालतां येत नव्हतं. यीट्सची वाट पहाण्यांत कधीं कधीं तिचे दिवसन् दिवस वाया जायचे. आँद्रेला तर ती गेले चार–पांच महिने भेटली नव्हती. सोर्बोन सुरू होऊन तिचे तासहि सुरू झाले असणार. आँद्रेहि अलिकडे 'आ ला रोमान्स'च्या बाजूला फिरकली नव्हती.

" कोमाँ सा व्हा आद्रियान् " हें यीट्सचें शब्द तिच्या कानांवर पडले तेव्हां आद्रियान्नं आपल्या संत्रस्त चेहऱ्यावर हास्याचा मुखवटा चढवला.

" मी ठीक आहे–पण किती वेळ मला एकटीला बसून रहावं लागलं इथें. लवकर नाहीं का यायचं ? " लटक्या रुसव्यानं आद्रियान् म्हणाली.

पण असल्या नाटकांचा यीट्सवर कधीं कांहीं परिणाम होत नसे.

" किती मार्टिनी घेतल्यास ? " त्यांनीं उलट विचारलं.

आद्रियान् मनांतून संतापली. काय करायचं अशा माणसापुढें ? डोकं आपटायचं ? स्त्रीसौन्दर्याविषयीं त्यांना फारसं आकर्षण नव्हतं; आद्रियान्नं भल्यामोठ्या गळ्याचा फ्रॉक बरेचदां घातला होता तरी त्यांची दृष्टि कायम सिगरेटच्या धुराकडे. एखाद्या गरीब शालीन मुलीसारखं लाडीक बोललं तरी ते तिकडे दुर्लक्ष करायचे. त्यांची स्तुति करणंहि जमायचं नाहीं. एकदां आद्रियान् त्यांना म्हणाली होती—

" कोंपऱ्यांतली बाई माझ्याकडे किती असूयेनं पहाते आहे; तिच्या बरोबरचा माणूस पहा कसा खप्पड आणि नीरस आहे. "

" मीहि कांहीं तरुण नाहीं. चाळीस वय आहे माझं. आणि नीरसपणांत माझी कोणीहि बरोबरी करूं शकणार नाहीं. " यीट्स रुक्षपणें उत्तरले होते.

" अं ऽऽऽ मुळींच नाहीं. तुम्ही कित्ती चांगले आहांत आणि रुबाबदार—"

" ए, गप् बस. मूर्खासारखं बोलूं नकोस ! " असं खडसावून यीट्सनीं तिला एकदम चूप करून टाकलं होतं.

आजहि यीट्सनीं त्याच पद्धतीचीं उत्तरं देण्यास आरंभ केल्या-वर आद्रियान् नाटकीपणाला इतकी विटली कीं कधीं नव्हे तें गप्प बसून तिनं जेवण केलं. जेवण आटोपल्यावर सिनेमा झाला. आद्रि-यान् मनानं शिणली होती. पैसा, घर, आसरा मिळवण्याची खटपट त्या कोंवळ्या मनाला झेपली नव्हती. खुर्चीच्या पाठीवर मान टेकून तिनं डोळे मिटून घेतले.

" आद्रियान्, आद्रियान् ! चल, घरीं जायचं ना ? " यीट्सनीं तिला हालवलं तेव्हां ती खडबडून जागी झाली. अकरा वाजले होते.

" बाई ग, 'आ ला रोमान्स' केव्हांच सुरू झालं असेल. नोकरी गेली तर मी काय करूं ? " आद्रियान्‌ला खरोखरीचं रडूं यायला लागलं.

" कांहीं काळजी करूं नकोस. मी आहे ना ? माझ्या घरीं चल आधीं. मला थोडी कॉफी करून दे. "

यीट्सचा फ्लॅट ' बुल्व्हार् हाऊसमान् ' या हमरस्त्यावर होता. तिसऱ्या नेपोलियनच्या वेळच्या सोनेरी हिरव्या फर्निचरनं दिवाण-खाना सुशोभित केला होता. रस्त्याच्या बाजूला भिंतीऐवजी मलं मोठं कांचेचं सरकतं दार होतं. त्याला सोनेरी गोंड्यांचे हिरवे पडदे लावले होते. जमिनीवर मोरोक्कोचा मोठा गालिचा अंथरला होता.

" कॉफी करूं ना ? " आद्रियान्‌नं विचारलं

" मी करतों; मला संवय आहे. "

आद्रियान् एका हिरव्या दिवाणवर अलगद टेकली, त्याच्या सोनेरी नक्षी कामावरून बोटं फिरवूं लागली एका ट्रेवर कॉफीचा पर्कोलेटर, कपबशा, साखर, साय वगैरे साहित्य घेऊन यीट्स् बाहेर आले. त्यांनीं कोट व बूट काढून टाकले होते. टाय् सैल केला होता, शर्टाच्या बाह्या सैल केल्या होत्या, पायांत स्लिपर्स चढवले

होते. आद्रियान्च्या खांद्यावर हात टाकून ते गटागटा दोन कप कॉफी प्यायले. आद्रियान् नाजूकपणें कॉफीचे घुटके घेत होती.

एकाएकीं यीट्‌सनीं तिच्या हातांतला कप हिसकावून घेतला, तिच्या कंबरेला विळखा घालून तिला घट्ट ओढून धरलं.

" मस्सिअ, मस्सिअ, हें काय ? सोडा सोडा मला म्हणते ना ? याच्यासाठीं मला घरीं आणलंत ? माझा गैरफायदा—"

नाटकीपणानं आद्रियान् त्यांचा प्रतिकार करूं लागली. तिला वाटलं यीट्‌स म्हणतील– " आद्रियान् माझं तुझ्यावर फार प्रेम आहे, तुझ्याशिवाय मी जगूं शकत नाहीं. " पण तसं कांहींच झालं नाहीं. तिच्याकडे दुर्लक्ष करून यीट्‌स तिच्या फ्रॉकशीं धसकाफसक करूं लागले. आद्रियान्‌ला राग आला. यीट्‌सच्याबरोबर कायम रहाण्याची तिची तयारी होती. पण त्यांच्या लहरीप्रमाणें त्यांनीं तिच्याशीं विनामोबदला वाटेल तसं वर्तन करावं हें तिला पसंत नव्हतं. होता नव्हता तो जोर एकत्र करून तिनं त्यांच्या हाताचा चावा घेतला. यीट्‌सनीं तिच्याकडे चमत्कारिकपणें पाहिलं—

" मूर्ख मुली, कां उगीच नसतं नाटक करतेस ? मी दुधखुळा मुलगा आहे असं वाटतं कां तुला ? कॉफीगृहांत काम करणाऱ्या मुली कशा असतात हें मला फार पूर्वींपासून माहीत आहे–"

" असं काय म्हणतां. माझं प्रेम आहे तुमच्यावर. खरंच तुमची शप्पथ, येशूची—"

यीट्‌सनं आद्रियान्च्या एक मुस्काडींत ठेवून दिली.

" देवाच्या नांवानं खोट्या शपथा घेतेस ? फोडून काढीन खोटं बोललीस तर ! खरं सांग, माझ्या जवळून काय हवंय् तुला. किती पैसे हवेत ? बोल."

" नको–हो. म्हणजे पैसे नकोत मला. तुमच्याकडे राहूं द्या."

" माझ्याकडे रहाणं जड जाईल तुला. मी तरुण नाहीं, रोमँटिक नाहीं. पण दुसऱ्या कोणाकडे पाहिलंस तर जीव घेईन मी तुझा !"

" मी चांगली वागेन."

“ तुझी इच्छा असली तर रहा बापडी. सरळ वागशील तोंपर्यंत तुझ्या चैनींत कांहीं कमतरता पडणार नाहीं. ”

• • •

## ७

यीट्सच्या तुसड्या स्वभावाचा आद्रियान्‌ला कधीं कंटाळा आला नाहीं कीं त्यांच्या रुंद, लालबुंद, कठोर चेहऱ्याची तिला भीति वाटली नाहीं. त्यांच्या घरीं रहायला आल्याच्या दुसऱ्याच दिवशीं आद्रियान्‌नं यीट्सच्या परवानगीनं जेनीला पॅरीसला येऊन आपल्याजवळ रहाण्याचं आमंत्रण दिलं. पण जेनीनं तें स्वीकारलं नाहीं. महिनाभरानं येईन असं मोघम उत्तर तिनं पाठवलं—आद्रियान्‌चं आसन बळकट झाल्यानंतरच आपण तिच्याकडे जावं असा तिचा बेत होता. अर्थात्‌ यीट्सकरवीं आईला एक लठ्ठ मनीऑर्डर पाठवायला आद्रियान्‌ विसरली नाहीं.

आद्रियान्‌वर यीट्सनीं कडक पहारा ठेवला होता. अशा तऱ्हेच्या संबंधांची निष्पत्ति काय होते हें त्यांना संवयीनं माहीत होतं. आपल्या पैशांवर चैन करून आद्रियान्‌ एखाद्या तरुणाशीं संधान बांधील अशी त्यांना रात्रंदिवस भीति वाटत असे. परंतु आद्रियान्‌च्या मनांत हा विचार चुकूनहि कधीं डोकावला नाहीं. रात्रभर पायांवर उभं रहायचं आणि दिवसा बांकड्यावर मिळेल ती झोंप काढायची हा आयुष्यक्रम टळला एवढ्या एकाच गोष्टीवर ती बेहद्द खूष होती. यीट्स घुम्यासारखे बसून राहिले तर ती खुशाल लोळत पडे. नवे कपडे कुरवाळीत बसण्याचा तर तिला दांडगा षोक होता. प्रथम प्रथम ‘इथं जेवायला जाऊं या’ ‘मला तो फ्रॉक घेऊन द्या’ अशा बऱ्याच मागण्या तिनं अधाशीपणानं

केल्या. पण मागावं तें मिळतं आहे आणि मिळत जाईलहि असं दिसतांच ती फारसा हट्ट करीनाशी झाली.

यीट्सना तिचं कधीं कधीं फार कुतूहल वाटे. तिला वाचण्याचा नाद नव्हता, कपडे शिवायची हौस नव्हती, स्वयंपाक करण्याची आवड नव्हती. चांगले कपडे ती घाली, पण दुसऱ्यापुढें– विशेषत: पुरुषांपुढें मिरवावं असं तिला वाटल्याचं दिसून येत नव्हतं. तिचा वेळ जायचा तरी कसा ? स्वत:च्याच सहवासांत ती इतकी बेहद्द खूष कशी रहायची ?

एकदां त्यांनीं खोंचून तिला विचारलं––

" आद्रियान् तुझी आँद्रे नांवाची एक मैत्रीण आहे ना ?"

" होय, आहे तर ! कित्ती महिन्यांत भेट नाहीं आमची."

" तिला भेटावंसं नाहीं वाटत तुला ? करमतं तिच्यावांचून ? "

" भेटावंसं वाटतं ना पण वेळ कुठें आहे ? "

" वेळ काढायचा. केव्हांहि जा तिच्याकडे."

" तुम्हांला नेलं असतं. पण तिला आवडेल कीं नाहीं कोण जाणे–" आद्रियान् अर्धवट स्वत:शी पुटपुटली.

आँद्रेला भेटण्याची तिला बरीच उत्कंठा लागली होती. पण यीट्सना आपण कुठेंच एकटं गेल्याचं आवडत नाहीं हें जाणून तिनं आँद्रेचा विषय कधीं काढला नव्हता. आतां पडल्या फळाची आज्ञा घेऊन आँद्रेकडे जायची तिनं जंगी तयारी केली. एक मोठा चॉकलेटचा डबा, शँपेनची बाटली, बरींचशीं ताजीं व सुकीं फळं आणि एक भाजलेली कोंबडी या भेटी तिनं उत्साहानं खरेदी केल्या. आँद्रेसाठीं एखादं पोलकं किंवा कापड विकत घ्यायचाहि तिचा बेत होता, पण फार वस्तु नेल्या तर आँद्रेला वाईट वाटेल, आपण तिला मदत करतों असं दिसेल म्हणून तिनं तो बेत रद्द केला.

आद्रियान्ला पाहून आँद्रेला आनंद झाला आणि बरंच आश्चर्यहि वाटलं. आद्रियान्मध्यें आमूलाग्र बदल झाला होता. अंगानं ती बरीच भरली होती. तिची केशभूषा, पोषाख, सँडल्स् सर्व उंची,

उंच अभिरुचीचं होतं. हातांत हिऱ्याची अंगठी होती, मनगटावर जाड सोन्याचं ब्रेसलेट होतं, गळ्यांत सोन्याची सांखळी होती. आद्रियान्‌ला ओळखणं कुणालाहि जड गेलं असतं. बऱ्याच गप्पा सांठल्या होत्या त्या आद्रियान्‌नं श्वास घेण्याचीहि उसंत न घेतां आँद्रेला ऐकवल्या. मगच तिला आपण आणलेल्या भेटींची आठवण झाली.

" आँद्रे, विसरलेंच मी. हें बघ तुझ्यासाठीं काय आणलंय् !" आद्रियान्‌नं हातांतली पुडकी आँद्रेपुढें सरकवली. आँद्रे एकदम गंभीर झाली.

" खूप आभार आद्रियान्—" सामान कपाटांत ठेवीत ती म्हणाली.

" आंत कशाला ठेवतेस ? आतां जेवायला काढ ना. उपेन्‌ला आवडेल. पुढल्या वेळेला आणखी कांहीं तरी गंमत आणेन मी. "

" आद्रियान्, कसं सांगूं तुला ? पण तूं कीं नाहीं भेटीं आणत जाऊं नकोस एवढ्या. तुझ्याशीं गप्पा करायला खूप आवडतं मला. पण भेटी कशाला ? "

आद्रियान्‌ला चटका बसल्यासारखं झालं. तिचा चेहरा पडला. आपल्या वर्तनांत आँद्रेला न आवडण्याजोगं कांहीं आहे याची तिला झालेली ही पहिलीच जाणीव !

" तुला हिणवण्याकरतां किंवा मदत करण्याकरतां म्हणून नाहीं ग आणल्या—" आद्रियान् काकुळतीला येऊन म्हणाली.

" तसं नव्हे ग—" आँद्रे घुटमळली, आद्रियान्‌कडून भेटी स्वीकारणं उपेन्‌ला मुळींच खपलं नसतं, तिला स्वतःलाहि तें बरोबर वाटत नव्हतं. पण आद्रियान्‌ची समजूत कशी काढायची तें तिला कळेना.

" ज्या गोष्टी आम्हांला स्वतःला विकत घेणं परवडत नाहीं त्या दुसऱ्या कुणाकडून—तुझ्याकडूनसुद्धां—स्वीकारलेलं बरं दिसत नाहीं, नाहीं का ? "

" एवढंच ना ? यीट्‌सचा पैसा अन् मी त्यांची लग्नाची बायको नाहीं म्हणून तर तूं माझ्या भेटी नाकारीत नाहींस ना ? केविलवाणे-

पणानं आद्रियान् पुनः पुनः विचारूं लागली. एकदां ऑंद्रेला वाटलं– आद्रियान्‌ला म्हणावं–होय म्हणूनच या मार्गानं पैसा मिळवलेला मला पसंत नाहीं. पण आद्रियान्‌ची बालिश मुद्रा पाहून असं कांहीं बोलण्याचा धीर ऑंद्रेला झाला नाहीं. “ छेः असं मनांत देखील आणूं नकोस ! ” ऑंद्रेनं तिचं समाधान केलं आणि आद्रियान् नेहमीच्याच आनंदांत निघून गेली.

कबूल केल्याप्रमाणं महिन्याभरांत जेनी पॅरीसला आली. मिस्टर यीट्‌सनीं तिच्यासाठीं जवळच दोन खोल्या घेऊन ठेवल्या होत्या. आद्रियान्‌चा चेहरा समाधानानं उजळला. आईला कुठें नेऊं आणि कुठें नको असं तिला झालं. एफेल् टॉवरच्या भल्यामोठ्या लिफ्ट-मधून मायलेकींनीं कितीदां वरखालीं केलं असेल याला गणतीच नाहीं. सेनच्या पात्रांतून सफर करणें हा त्यांचा दररोज दुपारचा ठरलेला कार्यक्रम होऊन बसला. व्हॅसॉं आणि बूलोन्य या पॅरीसच्या लगतच्या बनांतून त्या दिवसभर भटकूं लागल्या. मुलीचं सुख पाहून जेनीचे डोळे निवत होते. मात्र मधून मधून ती म्हणायची—

“ आद्रियान्, कसा राकट दिसतो ग हा माणूस ! तुला भीति नाहीं वाटत ? किती रुंद चेहरा, धिप्पाड आंग आणि उन्हाळ-लेला रंग ! ”

आद्रियान् गुदगुल्या केल्यासारखी हंसायची.

“ कांहीं तरीच आई तुझं. मलायांत उघड्यावर आयुष्य गेलंय् म्हणून असे दिसतात. खरं म्हणजे आई फ्रेंच होती त्यांची. कितीहि पैसे खर्च केले तरी रागवत नाहींत, पाहिलंस ना ? ”

जेनीचं रूप पाहून यीट्‌सहि चमकले होते. असल्या कुरूप आईला इतकी सुन्दर मुलगी ?—त्यांना आश्चर्य वाटायचं. पण आद्रियान् खुषींत आहे, तिला एक सोबतहि झाली एवढ्यावर त्यांनीं समाधान मानलं. आद्रियान् जेनीची खरी मुलगी नव्हे वगैरे कांहींच त्यांना माहीत नव्हतं. त्यांनीं आद्रियान्‌ला विचारलं नव्हतं हें खरंच, पण बडबड्या आद्रियान्‌नं त्यांना आपल्या पूर्वा-युष्याबद्दल एवढंदेखील सांगायचं कटाक्षानं टाळलं होतं.

पॅरीसमध्यें जेनी रुळली तेव्हां आद्रियाननं तिला आँद्रेकडे एक दोनदां नेऊन आणलं. दुसऱ्या वर्षीच्या परीक्षा जवळ आल्या होत्या त्यामुळें आँद्रे व उपेन्द्र बरींच गडबडींत होतीं. यीट्स मात्र आद्रियानला सहज म्हणाले—

"आई आल्यापासून मैत्रिणीवरचं प्रेम कमी झालंय् कां ग तुझं ?"

"नाहीं; कां ? ती अभ्यासाच्या गडबडींत आहे म्हणून फारशी जात नाहीं मी ! सुट्टींत जाणारच आहे."

"जातेस तेव्हां तिला चार फुलं देखील नेत नाहींस म्हणून विचारलं. पहिल्या वेळेला बरंच कांहीं नेलं होतंस नाहीं कां ?"

आद्रियान् गोरीमोरी झाली.

"ती घेत नाहीं भेटी !"

"कां ? गरीब आहे म्हणालीस ना ? तिच्या त्या हिंदी मुलाला मोठी इस्टेट बिस्टेट मिळाली कीं काय ?"

"अं हं ! पण 'आम्हांला परवडत नाहींत त्या वस्तु इतरांकडून भेट म्हणून घ्यायला बरं वाटत नाहीं' असं म्हणाली ती."

यीट्सना चांगलाच धक्का बसला. आद्रियान्ची मैत्रीण ती काय, तिच्याचसारखी कोणी तरी असणार एवढीच त्यांची कल्पना. आद्रियान्नं आँद्रेबद्दल त्यांना फारसं कांहीं सांगितलं नव्हतं. फक्त एक हिंदी मुलगा तिचा मित्र आहे एवढीच त्यांना माहिती होती. त्यांची जिज्ञासा जागृत झाली. आँद्रेबद्दल बरेच प्रश्न ते आद्रियान्ला येतां जातां विचारूं लागले.

"एकदां जेवायला नेऊं या आपण त्या दोघांना. परीक्षा झाल्यावर मोकळी होतील ना ती ?" यीट्सनीं सुचवलं.

"मला बाई भीति वाटते. ती नाहीं आली तर ?"

"तुझा वाढदिवस आहे असं सांग, म्हणजे येईल."

आद्रियान्चा चेहरा उजळला.

"खरंच ! ही युक्ति छान आहे."

आद्रियान्चं आमंत्रण आँद्रेनं स्वतःपुरतं चटकन स्वीकारलं.

असतं. पण उपेन्द्राबद्दल ती साशंक होती. भांडणं नकोत म्हणून 'आद्रियान्' हा विषय दोघांनीं काळजीपूर्वक टाळला होता. उपेन्द्राची आद्रियान्बद्दलचीं मतं बदललीं नाहींत हें ऑंद्रे जाणून होती.

" पाहूं या." ऑंद्रेनं गुळमुळीत उत्तर दिलं. पण आद्रियान्चं आमंत्रण उपेन्द्रानं दारांतून आंत येतांना ऐकलं होतं. तो चटकन् म्हणाला—

" तुमचा वाढदिवस ? मग यायलाच पाहिजे आम्हांला ! परीक्षा संपल्या आहेत आणि हवा चांगलीच उबदार होऊं लागली आहे. तेव्हां कसलीच सबब नाहीं आतां."

आमंत्रण स्वीकारल्यानं आद्रियान् खूष झाली होती. तेवढीच ऑंद्रेहि झाली. उपेन्द्राचं मत बदललं—निदान निवळलं असावं असं तिला वाटलं.

" आद्रियान्ला काय भेट द्यावी ? " तिनं उपेन्द्राला विचारलं.

" इतक्यांतच काय घाई आहे ? अजून चार दिवस अवकाश आहे. " उपेन्द्रानं टाळाटाळ केली.

पण ऑंद्रेच्यानं रहावलं नाहीं. दुपारीं दोन तीन दुकानं हिंडून तिनं आद्रियान्साठीं बऱ्याच वस्तु पाहिल्या. पण तिच्या पैशांत बसेल अशी एकहि चांगली वस्तु तिला आढळली नाहीं. एक टाय मात्र तिला खूप आवडला, तो घेण्यांतच मग तिनें सगळे पैसे खर्चून टाकले.

ती घरीं आल्या आल्या उपेन्द्रानं तिच्यासमोर दोन रेशमी स्कार्फ टाकले.

" एक तुला ठेव. एक आद्रियान्ला दे. "

" काय सुंदर आहेत ! हिंदुस्थानचे ना ? थांब, मीच चित्रं ओळखते हीं. याच्यावर ताजमहाल छापलेत आणि हें—हा आंब्याचा आकार ना ? " कुयऱ्या न्याहाळीत ऑंद्रे म्हणाली.

" अरे वा; हिन्दी संस्कृतीची बरीच माहिती झालेली दिसते तुला ! "

" त्यांत आश्चर्य कसलं ? तुझी ओळख होऊन दीड वर्षं झालं;

शिवाय पुस्तकंहि बरींच वाचलींत मी. ”

“ तुला कुठला आवडला त्यांतला ? ”

“ मी ताजमहालांचा घेते. ” ऑंद्रे पुढें म्हणणार होती—

“ ताजमहाल हें प्रेमाचं स्मारक ना ? ” पण तिनं स्वतःला सांवरलं.

उपेन्द्रासाठीं आणलेला टाय त्याला फार आवडला. पण तो म्हणाला,

“ माझ्याकडे बरेच आहेत खरं म्हणजे. लावायचा प्रसंगच कुठें येतो ? उगीच पैसे खर्च केलेस. स्वतःला फ्रॉक तरी आणायचा होतास !”

“ फ्रॉक आणि टाय दोघांची किंमत एकच वाटतं ?” फ्रॉक करायचा आहे काय मला ? माझे तीनहि फ्रॉक चांगल्या अवस्थेंत आहेत अजून ! ”

“ म्हणजे फाटले नाहींत एवढंच !”

“ मग, आणखी काय हवं ?”

“ तें कांहीं नाहीं. आपले थोडेसे पैसे शिल्लक आहेतना ? त्यांतून एक फ्रॉक आणलाच पाहिजे तूं. त्याशिवाय मी तुझ्याबरोबर जेवायला येणार नाहीं. ”

“ छे, छे, नको रे !”

“ घेतलाच पाहिजे तूं. ”

“ पण एवढा हट्ट कां तुझा ? ”

“ आपण फार श्रीमंत नसलों तरी चांगल्या परिस्थितींत आहोंत असं वाटलं पाहिजे त्याला—तो यीट्स कां कोण आहे त्याला. आपण दोन दरिद्री विद्यार्थी, तो आपल्याला उदार अंतःकरणानं मदत करतोय्, जेवण घालतोय् असं मुळींच वाटतां कामा नये त्याला, आपल्याला किंवा इतरांना. नाहीं तर मी असा बेफाम होईन—”

बोलतां बोलतांच उपेन्द्र संतापल्याचीं लक्षणं दिसूं लागल्यामुळें ऑंद्रेनं घाईघाईनं विषय बदलला.

" फ्रॉक विकत घेण्यापेक्षां कापड आणून मी स्वतः शिवला तर स्वस्त पडेल. "

" तें तुझं तूं पहा. जन्मभर मोठमोठाल्या रेस्टॉरंटमध्यें जेवत आली आहेस असं वाटलं पाहिजे तुझ्याकडे पाहून. "

ऑंद्रेनं तलम लोकरीचं कापड आणलं. एक पॅटर्न आणली. रात्रीं जागून तिनं एक फ्रॉक आणि पर्स तयार केली. गळ्याला तिनं उपेन्द्रानं दिलेला स्कार्फ खोंचून दिला. केस तिनं लांब वाढवले होते ते अंबाड्यासारखे गोल बांधले. उपेन्द्रानं दिलेली लिप्स्टिक लावली. ऑंद्रे रुबाबदार दिसेच, आतां ती सुंदरहि दिसूं लागली.

कधीं नव्हे तो उपेन्द्र आज तिच्यावर बेहद्द खूष होता.

" ऑंद्रे, तूं एखाद्या महालांत वाढली आहेस असं वाटेल एखाद्याला !" तो तिला म्हणाला.

" तूं आद्रियान्‌वरचा राग सोडलास, तेव्हां आतां मला तुझ्या मनासारखं वागलंच पाहिजे.

" हा तुझा गैरसमज आहे तिचा विषय मी टाळतों एवढंच!"

" मग तिचं आमंत्रण चटकन् स्वीकारलंस तें ? "

" तुला जायची इच्छा असणार हें माहीत होतं मला !"

" तुला यायची जबरदस्ती नसती केली मी बरं कां. "

" पण तुला एकटीला मी बरा त्यांच्या तावडींत सोडेन ? "

ऑंद्रेला हंसूं फुटलं.

" तूं एकटाच असा विचित्र आहेस कीं तुम्ही सगळेच हिंदी लोक असे विचित्र असतां रे ? " तिनं विचारलं.

'ऑपेरा' जवळच्या एका रेस्टॉरंटमध्यें यीट्स व आद्रियान् त्या दोघांना भेटणार होते ' उपेन्द्राचं मन पूर्वग्रहदूषित होतं आणि प्रथमक्षणीं आवड उत्पन्न व्हावी असं यीट्सच्या व्यक्तित्वांत कांहींहि नव्हतं. तेव्हां उपेन्द्राच्या मतें ते अगदीं 'जनावर' ठरले. यीट्सचं उपेन्द्राकडे फारसं लक्ष नव्हतंच. तें ऑंद्रेला न्याहाळण्यांत गुंतले होते. या झुंजार वृत्तीच्या मुलीचं कल्पनाचित्र त्यांनीं रंगवलं

होतं, तशीच ती होती. किंचित् पुढें आलेली करारी जिवणी, बारीक पण रसरशीत डोळे, दाट तपकिरी केंस आणि उभांडा चेहरा सुंदर नसला तरी डोळ्यांत भरायचा. ऑंद्रेचा बांधा आद्रियान्सारखा घाटदार नव्हता. ती उंच, सरळ, सडसडीत होती. पण ताठ उभं रहाण्याचा तिचा जन्मजात डौल यीट्सच्या रसिक नजरेतून सुटला नाहीं. वेळ घालवायचं साधन म्हणून यीट्सना स्त्रिया आवडायच्या–स्त्रियांबद्दल ते चोखंदळ नव्हते. आपल्याला अमुक एका विशिष्ट बाईची ओढ वाटेल असं त्यांच्या स्वप्नांत-देखील कधीं आलं नव्हतं. पण ऑंद्रेला पहातांच त्यांना थांगपत्ता नसलेली एक विचित्र भावना त्यांच्या मनांत डोकावूं लागली–प्रेमाची नसेल कदाचित्–पण बरीचशी तशीच.

रेस्टॉरंट बाहेरून साजेसं दिसत होतं. पण पायऱ्या उतरून तळ-घरांत गेल्यावर तिथला खरा थाट दृष्टीस पडत होता. तेथें विजेचा एकहि दिवा नव्हता. पण लहान मोठ्या रंगीबेरंगी मेणबत्त्यांचा चांग-लाच झगझगाट केला होता. भिंतींना कांचेनं झांकलेले मोठमोठाले कोनाडे केले होते. एकांत पोंवळ्यांची बाग केली होती, एकांत खडकांची, एकांत मासे पोहत होते. उरलेल्या जागीं भिंतीवर नृत्याची चित्रं रंगविलीं होतीं. दोन कोंपऱ्यांत निळसर पोषाख घातलेल्या मुली वाद्यवृंद वाजवीत होत्या. त्यांच्या मधली जागा नृत्यासाठीं मोकळी ठेवण्यांत आली होती.

जेवायला बरीच गर्दी होती. पण यीट्ससाठीं एक खास टेबल राखून ठेवण्यांत आलं होतं. खाद्य प्रकारहि यीट्सच्या सांगण्यावरून मुद्दाम तयार केले होते. लालबुंद कलिंगडाच्या तुकड्यानं जेवणास सुरुवात झाली. दुसरा कोर्स माशाचा. एक संबंध मोठा मासा यीट्सनीं तयार करवून घेतला होता. त्याच्या पाठीवर मेयोनेज्नं 'पोटभर जेवा' अशा अर्थाचीं अक्षरं काढलीं होतीं. टमाट्याच्या रसांत शिज-वलेला भात, लिंबाच्या चकत्या, पोपटी व काळीं आलिवं, पार्स्लेचे हिरवे झुबके आणि लोण्याचे गोळे माशाभोंवती इतक्या कलात्मक-

तेनें मांडले होते कीं खाण्याऐवजीं त्याच्याकडे नुसतं पहातच रहावं. लोणी चोपडून भाजलेला फेजंट पक्षी हा मुख्य पदार्थ होता. जोडीला तळलेले बटाटे व ताज्या लेटयूसची कुरकुरीत हिरवीगार पानं होतींच. फेजंट संपल्यावर कामाँबेर, ग्रुय्येर, गार्गोन्झोला इत्यादि चीझनीं भरलेली गाडी प्रत्येकाजवळून सरकत गेली. गोड पदार्थ मात्र मुख्य वेटरनं, त्यांच्यादेखत स्वतः जातीनं तयार केला. एका पसरत्या थाळ्यांत दूध तापवलं, त्यांत लहान लहान पॅन्केक्स सोडल्या. ठराविक मिनिटांनीं त्यांत दोन तीन तऱ्हेचीं मद्यं सोडलीं आणि काडी पेटवून थाळ्यांतलें मिश्रण पेटवून दिलं. निळ्या ज्वाळा उसळूं लागल्या. मद्यांतलं अल्कोहोल जळून गेलं, साखर पॅन्केकमध्यें मिसळली. एका लांब कांट्यानें त्यानें त्या गरम गरम पॅनकेक्स प्रत्येकाच्या बशींत वाढल्या.

उपेन्द्राचा यीट्सवर आणि आद्रियान्वर राग होता खरा, पण या थाटानं तो इतका दिपला कीं त्याला कशाचंच भान राहिलं नाहीं. मद्याची चव त्याला फारशी आवडत नसे. मुख्य वेटरला हें कळल्यावर त्यानं फूटभर उंचीचा एक ग्लास आणला.

"मस्सिअ, मी देतों त्या पद्धतीनं तुम्हांला शांपेन इतकी आवडेल कीं लहान ग्लास पुरणार नाहीं!" तो उपेन्द्राला म्हणाला.

आंब्याच्या आकाराचं आणि रंगाचं एक इटालियन् पीच बरींचशीं छिद्रं पाडून त्यानं ग्लासांत टाकलं. वर शांपेन ओतली. ताज्या पीचच्या रसानं शांपेनला एक फारच आल्हादकारक चव आली होती. शेवटीं काळ्याभोर कॉफीबरोबर शांपेनमध्यें मुरलेल्या पीच्‌चा एक मऊमऊ तुकडा उपेन्द्रानं तोंडांत सोडला तेव्हां तर मुख्य वेटरचे त्यानं मनांतल्या मनांत शतशः आभार मानले.

आँद्रे व उपेन्द्र घरीं पोचलीं तेव्हां पहाटेचा एक वाजून गेला होता. जेवण आवडलं हें उपेन्द्राला नाइलाजानं कां होईना पण मान्य करावं लागत होतं.

"शरीराच्या अधाशीपणापुढें मनाचा कडवेपणा नाहींसा होतो

तो असा. उगीच नाहीं दरिद्री माणसं लाचार होत ! " उपेन्द्र म्हणाला.

" मला जेवणाचं विशेष वाटलं नाहीं. संगीत सुंदर होतं. नाचायला मिळालं असतं तर बरं वाटलं असतं !"

" एवढं गच्च जेवल्यावर नाचायची शक्ति कोणाला राहणार ? आणि त्या माणसाला नृत्याची किंवा संगीताची आवड दिसली नाहीं. कसा धिप्पाड आणि राक्षसी दिसतो नाहीं ? "

" हो. पण आद्रियानवर बरंच प्रेम आहे त्याचं. ती खूप आनंदांत दिसली. तुझाहि वेळ चांगला गेला—"

" अं हं ! मी फक्त जेवण आवडलं एवढीच कबुली दिलीय्— आणि तेंसुद्धां आवडायचं कारण म्हणजे आपण घरीं एवढ्या थाटानं जेवण्याची शक्यता नाहीं म्हणून. "

" जेवण चांगलं होतं, पण वेळ चांगला गेला नाहीं हें काय कोडं आहे बाई ? "

" कोडं नाहीं. उत्तर अगदीं सोपं आहे त्याचं. तुला पटणार नाहीं पण सांगतों—मी जितक्या आवडीनं जेवत होतों तितक्याच अधाशीपणानं तो नालायक माणूस तुझ्याकडे पहात होता. "

●●●

## ८

" यीट्सनीं जेवण दिल्याचा दुसराच दिवस. उपेन्द्र अजून घरीं आला नव्हता. ऑंद्रेनं रात्रींचं जेवण स्टोव्हवर चढवलं होतं. कसलं तरी गाणं गुणगुणत ती नृत्याची पावलं टाकीत होती. यीट्सनी आपल्याकडे पाहिलं म्हणून उपेन्द्रानं त्यांचा राग करावा यामुळं ती सुखावून गेली होती. दारावर टक्टक् झालं. ऑंद्रेनं पडदा बाजूला

करून पाहिलं तर यीट्स ! " तुम्हाला आश्चर्य वाटल्याचं उघड दिसतं आहे. " आंत येत यीट्स म्हणाले.

" आश्चर्य नाहीं. पण आद्रियान् बरी आहे ना ? "

" हो, ती चांगली आहे. तिच्यातर्फे नाहीं आलों मी. तुमच्याशीं कांहीं तरी बोलायचं होतं; बाहेर येतां ? "

" आतां नाहीं जमणार. जेवण चुलीवर ठेवलं आहे. इथेंच काय तें सांगा. घरांत कोणी नाहीं. "

" यीट्सना नेहमीं मुद्यावर येऊन बोलायची संवय होती. पण आँद्रेच्या स्वरांतला पक्केपणा पाहून ते जरा थिजल्यासारखे झाले.

" तुम्हांला हें आयुष्य आवडतं ?" खोली न्याहाळीत त्यांनीं आँद्रेला विचारलं.

" हो. त्यांत काय वाईट आहे ? "

" जेमतेम जेवणापुरते पैसे मिळतात असं आद्रियान् म्हणत होती. "

" हो. पण परीक्षा झाल्यावर चांगल्यापैकीं नोकरी मिळेल—"

" माझ्याबरोबर मलायाला कां येत नाहीं ? कशाची कमतरता पडणार नाहीं. मनसोक्त प्रवास करायचा, उघड्या हवेवर खूप भटकायचं—"

" मला नाहीं त्याची आवड. "

" आँद्रे, वेड घेऊन पेडगांवला जाऊं नकोस. मी काय विचारतों आहे हें तुला पक्कं समजतंय्. तुझी झुंजार वृत्ति मला आवडते. वाटल्यास लग्न करीन मी तुझ्याशीं ! "

लग्न करणं हा यीट्सच्या दृष्टीनं फार मोठा त्याग होता हें उघड होतं.

" पाहिजे तर तूं सावकाशीनं विचार कर. "

" विचार करायलाच नको. माझा विचार झालाय्. असं भलतं सलतं विचारण्याचं तुम्हांला धाडस झालं तरी कसं ? माझ्या वागण्यांत एवढी तरी हांव कधीं दिसली कां ? "

" नाहीं. पण म्हणून तें आयुष्य तुला आवडणार नाहीं असं थोडंच ? आद्रियान्च्या मैत्रीखातर नाहीं म्हणत नाहींस ना तूं ? तिची काळजी नको तुला. तिला आणि तिच्या आईला जन्मभर ठराविक् रक्कम मिळत राहील अशी सोय करीन मी. पैशापुढें आद्रियान्ला माझी किंमत नाहीं हें माहित असेलच तुला. "

" असं बोलणं तुम्ही किती वाढवीत बसणार ? एकदां ' नाहीं ' सांगितलं तें समजत नाहीं कां ? मला वाटतं आतां तुम्ही जावं हें बरं. मला बरींच कामं आहेत. "

यीट्स जातील या अपेक्षेनं आँद्रे उभी राहिली.

" या कंगाल माणसावर प्रेम तर नाहीं ना तुझं ? एरवीं या खोलींत रहाणं कोणी पसंत करीलसं मला वाटत नाहीं. प्रेमबीम सगळं काव्यांत ठीक आहे. पैसा सुख देतो असं कोणी देत नाहीं."

" ते ज्याचं त्यानं ठरवावं. आपण आतां जितक्या लवकर जाल तितकं बरं. " यीट्स बाहेर पडले पण " केव्हांहि मत बदललं तर न लाजतां, न संकोचतां माझ्याकडे ये " असं म्हणतच.

" डॉक्टर,डॉक्टर,माझ्या आईला बरं वाटेल ना ?" आद्रियान् काकुळतीला येऊन विचारीत होती. जेनीच्या दुखण्यापायीं तिनं दोन रात्री जागून काढल्या होत्या. पलंगावर जेनीचं अस्थिपंजर शरीर निःस्तब्ध पडलं होतं.

" मी शक्य तितके प्रयत्न करतों आहे " डॉक्टरनीं ठराविक आश्वासन दिलं.

" आद्रियान् माझं ऐक, थोडी विश्रांति घे. डोळे बघ खालून कसे निळे झाले आहेत तुझे. " यीट्स आद्रियान्ला विनवीत होते.

" थांबा जरा आई कांहीं तरी बोलतेय्—"

" आद्रियान्—तूं—एकटीच —येथें रहा— " जेनी कष्टानं एकेक शब्द उच्चारीत होती.

डॉक्टरनीं यीट्सना खूण केली. दोघंहि बाहेर गेले.

"आद्रियान् मी आतां मरणार–त्याच्याकडून– यीट्सकडून थोडी इस्टेट घे–त्याशिवाय–बाळाचं–सांगू नको..." जेनी अजून कांहीं तरी सांगत होती. पण शब्द फुटत नव्हते, ओठ तेवढे हालत होते.

"डॉक्टर, डॉक्टर–पहा–पहा–" आद्रियान् ओरडली. पण सगळं कांहीं शांत झालं होतं.

आईच्या मृत्यूनं आद्रियान्ला केवढा मोठा धक्का बसला असेल याची यीट्सना चांगली कल्पना होती. त्यांनीं आद्रियान्ला पालट व्हावा म्हणून इटलींत नेलं. आँद्रेचा विसर पडावा म्हणून त्यांना स्वत:लाहि प्रवास करण्याची इच्छा होतीच. व्हेनिसचे निळेनिळे कालवे, फ्लॉरेन्सचीं चित्रं आणि शिल्प, रोमची मोठमोठालीं चर्चेस, नेपल्सचा ज्वालामुखी वगैरे पहाण्यांत आद्रियान् रमली. पण आईचे शेवटले शब्द तिला चरचरा जाळीत होते.

आई होणार असल्याची जाणीव आद्रियान्ला झाली तेव्हां अत्यानंदानं तिनं जेनीला सांगून टाकलं होतं––

"आई, तुला नातवंड होणार; किती गंमत येईल ग! मला हल्लीं नवीन फ्रॉक विकत घेत बसण्याचा फार कंटाळा आलाय्. आतां बाळाच्या तयारींत वेळ कसा पट्कन निघून जाईल आणि पुढें तर बाळाशीं खेळायला वेळ पुरा पडायचा नाहीं!"

आद्रियान्चा आनंद पाहून जेनीच्या डोळ्यांतून घळाघळा पाणी वाहूं लागलं. किती अजाण होती ही पोर! जेनीच्या हातांत पडली म्हणून तिच्या आयुष्याचं असं मातेरं झालं होतं. उद्यां यीट्सची मर्जी फिरली म्हणजे कोण संभाळणार तें मूल? पण कसं समजायचं हें या वेडीला? मातृत्वाच्या चाहुलीनं किती सुखावली होती ती!

"आद्रियान् यीट्सना नको एवढ्यांत कांहीं सांगू?"

"कां आई? तूं उगीचच त्यांच्याबद्दल गैरसमज करून घेतला आहेस. तसे ते प्रेमळ आहेत बरं कां. बाळाचं किती कौतुक करतील बघ."

" तरी पण नको सांगूस एवढ्यांत. "

मोठ्या मिनतवारीनं जेनीनं आद्रियान्‌चा उत्साह आवरून धरला होता. शेवट समीप आल्याची खात्री झाली तेव्हांच जेनीनं आद्रियान्‌ला चार गोष्टी सांगण्याचा प्रयत्न केला होता. आद्रियान्‌ला अर्थ समजला होता, पण उमगला नव्हता. ' यीट्‌सकडून इस्टेट घ्यायची ? कशाला ? त्यांनीं कमी कां दिलंय् आपल्याला ?' तिला वाटायचं. एकीकडे यीट्‌सना सांगण्याची ओढ आणि दुसरीकडे आईच्या अंतिम शब्दापाठीमागचं गूढ अशा कात्रींत सांपडून बिचारीच्या मनाची कुतरओढ होत होती.

●●●

## ९

म्युएत् विभागांत असणारी भारतीय वकिलातीची इमारत चांगलीच गजबजली होती. पॅरीसमधील सर्व हिंदी विद्यार्थी, पॅरीसला स्थायिक झालेलें हिंदचे रहिवाशी, नोकरी किंवा प्रवासानिमित्त पॅरीसला आलेले भारतीय आणि या सर्वांच्या मित्रमंडळांतील इतरदेशीय लोक लहानमोठे कंपू करून पहिल्या मजल्यावरील विस्तीर्ण दिवाणखान्याच्या रोखानं चालले होते. आज पंधरा ऑगस्ट ! वकिलातींत एक पार्टी होती. हिन्दी विद्यार्थ्यांच्या संघानं गाण्याचा एक अनौपचारिक कार्यक्रम करायचंहि योजलं होतं.

कसल्या तरी अनाकलनीय ओढीनं उपेन्द्र त्या इमारतीच्या दाराशी येऊन ठेपला होता. पूर्वीं विद्यार्थ्यांच्या तांड्याबरोबर तो मोठ्या उत्साहानं असल्या प्रसंगाला हजर रहात असे, पण कफल्लक झाल्यापासून हिंदी लोकांत मिसळण्याची त्याची ही पहिलीच वेळ. पंधरा ऑगस्टनिमित्त वकिलातींत लहानशी कां होईना पार्टी होणार हें

त्याला माहीत होतं. उपस्थित रहावं कीं नाहीं हा निर्णय घेण्यासाठीं गेले पंधरा दिवस तो विचार करकरून शिणला होता.

हाताच्या बोटांवर मोजतां येणारे कांहीं विद्यार्थी सोडले तर तसं त्याला ओळखणारं तिथें कोणी नव्हतं. तरीहि उपेन्द्राला स्वतःची अत्यंत लाज वाटत होती. निवारा मिळाला म्हणून तो स्वतःला भाग्यवान् समजत होता हें खरं. पण आसपासचे गलिच्छ लोक आठवले कीं त्याला स्वतःचा उबग येई. असल्या सार्वजनिक प्रसंगांना जायला तो यासाठींच धजावत नव्हता. पायांनीं जेव्हां त्याला आयत्या वेळीं जबरदस्तीनें वकिलातीकडे खेंचीत नेलं होतं तेव्हां त्यानं स्वतःची समजूत केली होती.

:" कोण ओळखतंय् तुला तिथें ? जो तो आपापल्या मोठेपणांत दंग असेल. तूं काय करतोस, कुठे रहातोस इकडे कुणाचं लक्ष नसेल. चार क्षण हिंदुस्थानांत गेल्याचा भास होईल. तेवढंच बरं वाटेल. कोणास ठाऊक पुन्हां तूं कधीं हिंदुस्तानांत जाणार आहेस कीं नाहीं तें ?"

हा शेवटला विचार त्याच्या मनांत आजकाल सारखा घोळत होता, त्याला असह्य डंख मारीत होता. फक्त वर्तमानपत्रं टाकायची नोकरी त्याला होती तेव्हां दारिद्र्यानं त्याचं मन असं पिचून गेलं होतं कीं त्याला कसल्या भावनाच राहिल्या नव्हत्या; त्याचीं सुखं, दुःखं सगळीं नाहींशी झालीं. पण ही नवीन नोकरी लागतांच त्याच्या मेलेल्या मनाला आशेचे अंकुर फुटूं लागले. आपला अभ्यासक्रम पूर्ण झाला आहे, आपल्याला बऱ्यापैकीं नोकरी मिळाली आहे, अशीं स्वप्नं त्याच्या डोळ्यांपुढें उभी रहात, कांहीं क्षण तो एक प्रकारच्या धुंदींत स्वतःला विसरून जाई, पण लगेच त्याचं मन दारुण निराशेनं वेडावून जाई. 'कशावरून, कशावरून तूं जन्मभर मादाम बुर्जेचं ओरडणं आणि रोझचं फिदफिदणं ऐकणार नाहींस ? कदाचित् लुई फिलिप्सारखा दमेकरी होऊन तूंहि असाच कुठेंतरी खितपत पडशील...' कोणी तरी त्याच्यावर वार करूं लागे. या सगळ्या भरांत जगाविषयीं संतापाची अन् द्वेषाची एक तिडीक त्याला

पिळवटून टाकायची. त्याला वाटायचं, ऑंद्रेला झोडपून काढावं, दूर कुठें तरी पळून जावं...त्याच्या या विचित्र मन:स्थितीमुळें ऑंद्रेला त्याच्याबद्दल कसलाच कयास कधीं करतां आला नाहीं. कधीं तो इतका प्रेमानं वागायचा कीं तिचं मन बहरून जायचं. पण दुसऱ्याच दिवशीं क्षुल्लक कारणावरून त्यानं असं आकांडतांडव करावं कीं ऑंद्रेच्या सर्व आशांचा जागच्या जागीं चुराडा होत असे.

रंगीबेरंगी साड्यांचा समुद्र, कपाटांत मांडलेल्या हस्तिदंती आणि लांकडी वस्तु, भिंतीवरील चित्रं, टेबलावरील हिंदी मासिकं या सर्वांनीं उपेन्द्राला दिलासा दिला. एका अपूर्वाईनं त्याचं मन आकंठ भरून गेलं. जिन्यावरून लोक हंसत खिदळत वर चालले होते, भारावल्यासारखा उपेन्द्रहि त्यांच्यांत मिसळला.

"काय आज बऱ्याच महिन्यांनीं दिसतां? 'सिते' सोडल्यापासून पत्ताच नाहीं तुमचा. कुठें असतां हल्लीं?" चौधरीनं उपेन्द्राला पाहून चौकशी केली. चौधरीच्या छाकटेपणाची उपेन्द्राला मनस्वी चीड होती. पण मराठी भाषा कानांवर पडतांच त्याला बरं वाटलं! चौधरीला तो प्रेमानं म्हणाला,

"असतो इथंच; आर्किटेक्चर करतोय्! अभ्यासामुळें वेळ नाहीं मिळत. तुमचा काय उद्योग चालू आहे?"

पण चौधरीचं उपेन्द्राकडे लक्ष नव्हतं. जिन्याच्या पायथ्याशीं सुलक्षणा अय्यर कोणाशी तरी बोलत होती, तिच्या दिशेनं तो दौडत निघून गेला. त्याच्या मागोमाग जावं, त्याच्याशीं कांहीं गप्पा कराव्या अशी उपेन्द्राला तीव्र इच्छा झाली. पण सुलक्षणा अय्यरच्या वाऱ्यालाहि उभं रहाण्याची त्याची तयारी नव्हती. दिवसभर सिगारेट फुंकणाऱ्या आणि हिंदी वेषाचं विडंबन करणाऱ्या या मुलीचं मुलांना कां आकर्षण वाटावं हें त्याला उमगलं नव्हतं. तिचं वय तिसाच्या आंत खासच नव्हतं. गेलीं सात वर्षं ती एका फ्रेंच माणसाबरोबर रहात होती, हिंदी विद्यार्थ्यांना झुलवीत होती आणि भेटेल त्या पुरुषाकडून चहा, कॉफी, जेवण, सिनेमा मिळेल तें उकळून खूष होत होती.

ओळखीचं असं दुसरं कोणी उपेन्द्राला दिसेना. त्या गर्दींत एकट्यानंच वेड्यासारखं उभं रहाणं त्याला जड जाऊं लागलं. ॲंद्रेला बरोबर आणलं असतं तर बरं झालं असतं, असं त्याला वाटलं. पण ॲंद्रेला त्यानं हेतुपूर्वक टाळलं होतं. वकिलातींत जाणार असल्याचा उल्लेखहि त्यानं ॲंद्रेजवळ केला नव्हता. घरीं गेल्यावर अचानक तिथें गेल्याची थाप तो ठोकणार होता.

ॲंद्रेला या पार्टीला आणूं नये असं त्याला कां वाटलं हें त्याचं त्यालाच सांगतां आलं नसतं. कदाचित् त्याला एकट्यालाच हिंदी जीवनाचा मनमुराद आस्वाद घ्यायचा असेल; कदाचित् ॲंद्रेबरोबर गेल्यानं कांहीं कुत्सित कंपूंत आपली टवाळी होईल अशी त्याला भीति वाटली असेल किंवा ॲंद्रेला इथें गंमत वाटणार नाहीं अशी त्याची समजूत झाली असेल.

उपेन्द्र एकटाच घुटमळतो आहे असं पाहून श्री. सुब्रह्मण्यम् पुढें झाले. ते वकिलातींत नोकरी करीत होते. अशा समारंभांच्या प्रसंगीं अनाहूतपणें स्वागतकमिटीचं काम करणं त्यांना फार पसंत होतं. शिवाय बायकोच्या ससेमिऱ्यांतून सुटण्याची अशी दुर्मिळ संधि त्यांना क्वचितच मिळे. “Hallo young fellow, तूं अगदीं एकटाच कसा? पॅरीसमध्यें नवीनच आलेला दिसतोस. इतर विद्यार्थी पहा–”दारालगतच्या कोचावर एक हिन्दी मुलगा एका धिप्पाड मेक्सिकन मुलीचा हात हातांत घेऊन बसला होता, तिकडे खोंचकपणें पहात सुब्रह्मण्यम् उद्गारले. “Any way चल तुझी खाण्यापिण्याची व्यवस्था लावून देतो.”

उपेन्द्राला घेऊन गर्दींतून मार्ग काढीत सुब्रह्मण्यम् लगतच्या दिवाणखान्यांत गेले. टेबलावर बरेचसे खाद्यपदार्थ मांडून ठेवले होते. पण भोंवतालच्या गर्दींतून त्यांचं दर्शन मिळणंदेखील दुर्मिळ होतं. टेबलाजवळच बायकांचा एक जथ्था एकमेकींच्या पोषाखाबद्दल व इतर स्त्रियांच्या नवऱ्यांबद्दल कांहींतरी बरं वाईट, खरं म्हणजे बहुतांशीं वाईटच, बोलत होता. वकिलातींत काम करणाऱ्या

୧୦ : ୧୧



लोकांच्या त्या बायका आहेत हें त्यांच्या 'हें आपलंच घर आहे' अशा तऱ्हेच्या वागणुकीवरून स्पष्ट कळून येत होतं.

उपेन्द्रांचं लक्ष वेधून घेतलं टेबलापलीकडच्या एका कोंपऱ्यांत उभ्या असलेल्या एका भारतीय मुलीनं. रुंद कपाळ आणि टोंकेरी हनुवटी असा बदामाकृति चेहरा, निरुंद गुळगुळीत मान, पोटिमा चोळींतून दिसणारा कंबरेचा निमुळता भाग—सगळी घडण कशी कोरींव, कांतीव होती तिची. कोपरापर्यंतच्या बाह्यांची हिरवी चोळी तिनं घातली होती आणि त्यावर पिवळं म्हैसूर जॉर्जेट ती अशा खुबीनं नेसली होती कीं ख्रिस्त्यान ड्याऊनं शिवलेला ड्रेस यापुढें फिका पडेल. अनेकांच्या नजरा तिच्याकडे वळल्या होत्या हें जाणवल्यामुळें किंचित् लाजून हातांतल्या हिरव्या बटव्याशीं अधीरा चाळा करीत ती एकटीच उभी होती.

एवढ्यांत कोणी तरी धाडस केलं आणि तिला सरबताचा पेला नेऊन दिला. ताबडतोब चारी दिशांकडून तिच्याकडे रीघ सुरू झाली. बघतां बघतां तिच्याभोंवती मोठाच कळप तयार झाला.

श्री. सुब्रह्मण्यम् मोठ्या मिनतवारीनं कबाबचा एक तुकडा आणि पैशाएवढी जिलबी घेऊन परत आले तेव्हां उपेन्द्राचं लक्ष कुठें आहे हें त्यांनीं अचूक ओळखलं.

"ती पॅरीसची रहाणारी नाहीं बरं कां. पाहुणी आली आहे. लंडनला असतात तिचे आई वडील. वेळेवरच सांगून ठेवतों तुम्हांला !" सुब्रह्मण्यम्नीं उपेन्द्रला चिडवलं.

"मी आपला सहज वेळ घालवण्यासाठीं पहात होतों."

"ओळख करून देऊं कां ? चला—"

उपेन्द्र हो नाहीं म्हणण्यापूर्वींच सुब्रह्मण्यम्नीं एक मुसंडी मारून त्या मुलीसमोरचं कोंडाळं फोडलं.

"मञ्जु, हे इथले एक चांगल्यापैकीं विद्यार्थी आहेत बरं कां. नांव काय म्हणालांत ?...हं. उपेन्द्र कीर्तने. आर्किटेक्चर शिकतात. ही मञ्जुघोषा दयाळ."

एवढी ओळख करून देतात न देतात तोंच बायकोचा करडा डोळा आपल्यावर रोखला गेल्याचं सुब्रह्मण्यमच्या लक्ष्यांत आलं. त्यासरशीं उपेन्द्राला तिथेंच सोडून त्यांनीं पळ काढला.

एकाच माणसाशीं बोलत राहून इतरांकडे पर्यायानं दुर्लक्ष करणं हा रूपगर्वितांचा एक आवडता खेळ आहे. अठरा वर्षांच्या मंजु-घोषेनं तो नुकताच आत्मसात केला असला तरी त्यांत ती चांगली तरबेज झाली होती. आपले काळेभोर डोळे विस्फारीत, कमानदार भिंवया उंचावीत ती म्हणाली—

" आर्किटेक्चर ? How interesting मला फार आवडतो तो विषय ! "

" छानच आहे तो विषय ! प्रश्नच नाहीं. " एक वीर उद्गारले.

" पॅरीसमधल्या निरनिराळ्या इमारतींचा इतिहास तुम्हांला चांगला माहीत असेल नाहीं ? " ती म्हणाली.

मंजुघोषेनं फक्त उपेन्द्राकडे पाहून बोलणं चालू ठेवलं होतं. एक तर इतरांसारखा तो तिच्याकडे अधाशीपणानं पहात नव्हता; त्याचं सारं लक्ष होतं सुब्रह्मण्यम् कुठें गेले आहेत इकडे होतं. दुसरं म्हणजे दीर्घकाळ सोसलेल्या दुःखानं त्याच्या चेहऱ्यावर एक पुरुषी राकट-पणा आला होता त्याची मंजुघोषेला ओढ वाटूं लागली होती.

" बाकी अशा प्रश्नांचा तुम्हांला चांगलाच कंटाळा आला असेल नाहीं ? चला आपण कॉफी मिळते कां पाहूं." उपेन्द्र गप्प राहिला असं पाहून मंजुघोषेनं एक निकराचा प्रयत्न केला.

तिच्या गप्पांमुळें उपेन्द्र किंचित् अस्वस्थ झाला असला तरी उपचार विसरला नव्हता.

" न मिळायला काय झालं ? मी देतों आणून ! "

कॉफी घेऊन तो माघारीं वळला तर मंजुघोषा त्याच्या मागेंच उभी असलेली त्याला दिसली.

" बरेच लोक तुमच्याशी बोलायला जमले होते. त्यांना तोडून टाकलंत तुम्ही ? " उपेन्द्र म्हणाला.

" चुकलं माझं ? " मंजुघोषेनं पुन्हां डोळे मोठे केले आणि त्याच्या डोळ्यांत रोखून पाहिलं.

" तसं नव्हे—"

" मुद्दामच वागलें मी तशी. मला असल्या लोकांचा फार कंटाळा येतो. पपांची नोकरी फॉरीन सर्व्हिसमध्यें असल्यामुळें जगभर हिंडण्यांत आयुष्य गेलंय् माझं. नेहमीं असल्या पार्ट्या चालतात. नवे कपडे घालायचे आणि त्याच त्या माणसांशीं तेंच तें बोलायचं–"

मंजुघोषा बोलत होती त्याचं उपेन्द्राला हसूं येत होतं. पिढीजात श्रीमंत नेहमीं श्रीमंतीला कंटाळल्यासारखं बोलतात असं म्हणतात तसंच मंजुघोषेचं चाललं होतं. उपेन्द्रासारख्याला नवा सूट मिळायची मारामार तर तो घालायचा कंटाळा येईल असं कधीं शक्य होतं कां ?

" हंसायाला काय झालं ? मी फार बडबड करतेंय् कां ? तुम्हाला वाटत असेल हिंदी स्त्रियांनीं पायाच्या अंगठ्याकडे बघत उभं रहावं."

" छेः छेः हिंदी आणि पाश्चात्य संस्कृति यांचा सुंदर मिलाफ तुमच्यांत झाला आहे. पाश्चात्य स्त्रीचा मोकळेपणा असला तरी त्यांतहि एक प्रकारची शालीनता आहे; आडदांडपणा नाहीं. " उपेन्द्रानं अस्सल फ्रेंच पद्धतीनं तिची स्तुति केली अन् मञ्जुघोषा चक्क लाजली.

" This is the nicest compliment I have ever had; Thank you." तिनं आभार मानले.त्याच्या कपाळावर दोन उभ्या आंठ्या पडल्या.

" मुद्दाम तुमची स्तुति करायचा माझा उद्देश नव्हता. मनांत आलं तें सांगितलं."

" अय्या, रागावलांत ? मी मनापासून आभार मानले होते. There wasn't the slightest touch of formality' मञ्जुघोषा किंचित् शरमिंधी होऊन म्हणाली. त्याच्या स्पष्ट किंबहुना किंचित् तुसड्या बोलण्यानं तो तिला आवडूं लागला होता.

" मला पॅरीस दाखवाल ?" तिनं विचारलं प्रवासी लोक

बघतात तें पॅरीस नाहीं. फ्रेंच लोकांचं–मोपार्नास भागांतले चित्रकारांचे स्टुडिओ, सँ जेर्मँ द प्रे मधले जीवनवादी लोकांचे क्लब्ज्. ”

“ बाप रे, फारच दांडगी महत्त्वाकांक्षा आहे तुमची. हे क्लब्ज फक्त सभासदांसाठींच उघडे असतात. ”

“ पण ओळख असेल ना तुमची ? मला तिथलं वातावरण पहायचं आहे–”

“ तुम्ही जावं असं वातावरण नाहीं तिथें–”

“ तें मी ठरवीन. ” ती फुरंगटून म्हणाली. “ लंडनला गेल्यावर मला गर्वानं सगळ्यांना सांगतां येईल कीं, कोणी पाहिलं नसेल असं पॅरीसचं स्वरूप मी पाहिलंय्–”

“ शेख महंमद, अजून पाहिलं नाहीं. ”

“ पण तुम्ही दाखवणार आहांत ना ? मी शर्मांकडे उतरलेय्. थांबा फोन नंबर देते तुम्हांला. त्यांचं घर जवळच आहे इथून. सकाळीं मी घरींच असते. तुमच्या सोयीनं केव्हांहि या.”

कांहीं झालं तरी उपेन्द्र माणूस होता. मञ्जुघोषेनं त्याच्याकडे लक्ष पुरवल्यामुळें आसपासच्या लोकांत त्याचं महत्त्व बरंच वाढलं होतं हें त्याच्या नजरेंतून सुटलं नव्हतं. जगानं त्याचा हेवा कधींच केला नव्हता. गेल्या कांहीं दिवसांत तर खासच नाहीं. जो रुबाब त्याच्या अंगवळणीं पडावा म्हणून आँद्रे त्याला हजारों सूचना देत होती, तो आपोआप त्याच्या अंगांत संचारला. शेजारच्या कंपूकडे त्यानं एक तुच्छतेचा कटाक्ष टाकला, मञ्जुघोषेच्या डोळ्यांत रोखून पहात एक दिलखुलास हास्य केलं—

“ जरूर येतो, एक दोन दिवसांत वेळ काढून !” मञ्जुघोषेचा निरोप घेतां घेतां त्यानं तिला आश्वासन दिलं.

वकिलातीच्या दारांत उपेन्द्राची व श्री. सुब्रह्मण्यमची पुन्हां एकदां टक्कर झाली.

“ हॅलो, ऑल्रेडी लीव्हिंग ? अरे तुमच्यासारखीं तरणीं पोरं पार्ट्यांना कंटाळूं लागलीं तर आम्ही काय करावं ? त्यांतून मी तुझी

एका फाकड्या मुलीशीं ओळख करून दिली होती."

श्री. सुब्रह्मण्यम्‌नीं तोंडाचा पट्टा सुरू केला.

"जातों आतां अशीर झाला!" श्री. सुब्रह्मण्यम्‌च्या तावडींतून स्वतःची सुटका करून घ्यायचा उपेन्द्रानं प्रयत्न केला. घरीं आँद्रे त्याची वाट पहात असल्याचा विचार त्याला टोंचणी देत होता.

"एवढ्यांत निघालास? दोन मिनिटं थांब. तुझी आणि सक्सेनाची ओळख करून देतों. अरेच्चा, कुठं गेले ते? आतां इथं होते—" सुब्रह्मण्यमना सक्सेना सांपडले नाहींत पण सक्सेनासंबंधीं त्यांनीं थोडासा खुलासा केला. श्री. सक्सेना वकिलातीत बऱ्याच वरच्या हुद्द्यावर होते. आठवड्यांतून दोनतीनदां त्यांना रात्रीं बाहेर जाण्याचा प्रसंग येत असे; त्यांच्याकेडहि बरेचदां रात्रींचे भोजन-समारंभ होत. इतके दिवस त्यांच्या चार मुलांना संभाळायला नोकर होता तो नुकताच भांडून निघून गेला होता. नोकरांच्या प्रश्नाला कंटाळून श्री. सक्सेना एखादा हिन्दी विद्यार्थी आपल्या घरीं रहायला तयार होतो कां पहात होते. रहायला स्वतंत्र खोली, दोनहि वेळेला भारतीय जेवण, फक्त मुलांना तासभर फ्रेंच शिकवायचं आणि सक्सेना पतिपत्नी बाहेर जातील तेव्हां मुलांकडे लक्ष ठेवायचं; बास्!

उपेन्द्रासाठींच निर्माण करावी अशी नोकरी होती ही. पैशापेक्षां किंवा खोलीपेक्षां भारतीय अन्नाचा, कुटुंबाचा व वातावरणाचा मोह त्याला विशेष होत होता. इतका कीं ताबडतोब सुब्रह्मण्यमना गळ घालून ती नोकरी आपण मिळवावी असं पहिल्याच फटक्यांत त्याच्या मनांत आलं. सुब्रह्मण्यम् दोन क्षण गप्प बसले असते तर उपेन्द्रानं या नोकरीची याचनाहि केली असती. पण सुब्रह्मण्यम् पुढें म्हणाले—

"चौधरी म्हणत होता, तुला सध्यां वाईट दिवस आले आहेत; कसल्या तरी नोकरीची गरज आहे म्हणून सक्सेनांना तुझं नांव सुचवलं!"

भारतीयांसाठीं आसुसलेलं उपेन्द्राचं मन या शब्दांनीं वस्तु-

स्थितीच्या कांटेरी पाऊलवाटेवर येऊन थडकलं. त्याचा अभिमान जागृत झाला. आपण ही नोकरी स्वीकारल्यास आँद्रेचं काय? हा विचारहि त्याच्या मनांत डोकावूं लागला.

"वाईट दिवस? कोण म्हणतो? तुमचा कांहीं तरी गैरसमज झालेला आहे. मी मजेंत आहे. चांगली हवी तशी नोकरी आहे मला. असली घर संभाळण्याची नोकरी मी करणार? Any way, thanks for thinking of me येतों मी आतां. बाय्, बाय्!"

आँद्रेची त्याला आतां तीव्र आठवण येत होती! तिला न सांगतां उशीर केल्याबद्दल पश्चात्ताप होत होता. आणखीहि एक विचार त्याला शरमिंधा करीत होता—मञ्जुघोषेला दिलेल्या आश्वासनाचा. हें आश्वासन त्यानं द्यायला नको होतं; मञ्जुघोषेसाठीं बसचं तिकीट काढण्यानंहि त्याचं महिन्याचं अंदाजपत्रक ढांसळून पडणार होतं. हल्लींच कुठं त्यांच्या जेवणांत बटाट्यांव्यतिरिक्त दुसरा पदार्थ दिसूं लागला होता! एका सुंदर श्रीमंत मुलीच्या हट्टाखातर आँद्रेचं व स्वतःचंहि जेवण हिणकस करणं त्याला शोभून दिसणार नव्हतं. मञ्जुघोषेला भेटायला जायचं नाहीं असा त्यानं लागलीच निर्णय घेतला. मञ्जुघोषा श्रीमंत होती, सुखी होती, उपेन्द्राचं तिला यत्किंचित्‌हि खास महत्त्व नव्हतं. त्यानं पॅरीस न दाखवण्यानं ती उपाशी राहणार नव्हती कीं तिच्या इस्त्रीच्या जीवनावर उद्विग्नतेची चुणी पडणार नव्हती.

●●●

## १०

---

घरीं पोचायला उपेन्द्राला अकरा वाजले. आँद्रे तिष्ठत बसली असेल याबद्दल त्याची खात्री होती. अचानक सणक येऊन आपण

हिंदी वकिलातींत कसें गेलों, तिथं काय काय घडलं, वगैरे सर्व कधीं एकदां ऑंद्रेला सांगतो असं त्याला होऊन गेलं होतं. श्री. सक्सेनांच्या नोकरीबद्दल आणि आपण ती ऐटीनं नाकारल्याबद्दलहि तो ऑंद्रेला सांगणार होता. ऑंद्रे आनंदानं बहरून गेली असती. ती खुष झाली म्हणजे तिच्या निळ्या डोळ्यांत हजारों बारीक सोन्याचे कण निर्माण व्हायचे आणि चमचम करूं लागायचे.

" छान केलंस उपेन्द्र; लोकांचं काय वाटेल तें घ्यावं पण अनुकंपा घेऊं नये कधीं !" ऑंद्रे म्हणाली असती. पण आनंदाचा आवेग ओसरतांच ती गंभीर बनणार होती.

" उपेन्द्र, ती नोकरी तुला चांगली होती. कां सोडलीस ? "

" तुझ्यासाठीं ऑंद्रे; तुला सोडून रहायची कल्पना कशीशीच वाटली ! " उपेन्द्र म्हणणार होता. हें शेवटलं वाक्य मनांत घोळवून घोळवून उपेन्द्र स्वत:शींच लाजल्याप्रमाणें हंसत होता.

" ऑंद्रे, मी आलों !" खोलींत पोंचण्यापूर्वींच उपेन्द्रानं हांक दिली.

, " काय शिंची कटकट आहे ! ' लुई फिलिप गरजला. पडदा दूर सारून उपेन्द्र चोरपावलांनीं खोलींत शिरला. ऑंद्रेला झोंप लागली असेल अशी त्याची कल्पना.

पण ऑंद्रे खोलींत नव्हती. उपेन्द्राला एकदम खालीं आपटल्यासारखं झालं. न सांगतां गेली तरी कुठें ? चिठ्ठी लिहून ठेवली असल्यास पहावी म्हणून त्यानं खोलींतल्या सर्व वस्तूंची उलथापालथ केली. तो आतां फारच नाउमेद झाला होता.

" भटकत असेल आद्रियान्‌बरोबर. आद्रियान्‌चे चाळे वाढतील तसं हिचं तिच्यावर जास्त प्रेम बसेल !" असं चिडक्या सुरांत पुटपुटत उपेन्द्र झोंप घेण्याचा प्रयत्न करूं लागला. पण डोळा लागेना. त्याला न सांगतां ऑंद्रे रात्रींची बाहेर जात नसे—इतक्या रात्रीपर्यंत तर ती कधींच बाहेर राहिली नव्हती. थोडंसं जरी जागरण झालं तरी दुसऱ्या दिवशीं काम व अभ्यास दोन्ही उरकतां येत नाहीं असं तिचं म्हणणं असायचं.

अनुक्रम २९८६९
विभाग वा. वा.
क्रमांक २०३६९८
दि. ३-७-६१

रात्र अधिकाधिक दाट्ट लागली तसं उपेन्द्राच्या संतापाचं काळजींत रूपान्तर झालं.

साडेबाराचा सुमार झाला तेव्हां उपेन्द्राच्यानं रहावेना. तशा अपरात्रींहि त्यानं मादाम बुर्जेला उठवलं—ऑंद्रे तिच्याशीं बरेचदां गप्पा करीत असे.

" मला वाटतं कामावरून ती परत आली नाहीं. " डोळे चोळीत मादाम बुर्जेनं सांगितलं.

खोकल्यामुळें लुई फिलिप बहुधा जागाच असे. आवाज ऐकून तोहि बाहेर आला.

" गेली असेल कुठं तरी. तिच्यावर तुझी काय सत्ता आहे ? " त्यानं खंवचटपणा केला.

पण उपेन्द्राचं तिकडे लक्ष नव्हतं. 'आ ला रोमान्स'कडे चक्कर टाकावी म्हणून तो बाहेर पडला. म्हातारीच्या फ्लॅटमध्यें उजेड दिसत होता. उपेन्द्रानं बराच वेळ घुटमळून टकटक केलं. स्वतः ऑंद्रेच बाहेर आली.

" तूं आहेस ना इथं ? मी आद्रियानकडे निघालों होतों. तुला काय झालं हेंच कळेना. चिठ्ठी तरी ठेवायची मला ! "

" तेवढं सुचलं नाहीं मला. मी आठ साडेआठला वर येऊन गेलें पण तूं नव्हतास. येऊन गेल्याचीहि चिन्हं नव्हतीं. म्हातारीला एकदम झट्का आला. डॉक्टरला बोलावलं मी. तिचे सॉलिसिटर पण आले आहेत थोड्या वेळापूर्वीं. आजवर मरणाचा प्रसंग पाहिला नाहीं मी. इतकी भीति वाटतेय्—" उपेन्द्रानं ऑंद्रेचे हात हातांत घेतले. ती थंडगार पडली होती.

" घाबरूं नकोस. ते सॉलिसिटर सगळी व्यवस्था करतील. तूं शेवटपर्यंत नाहीं राहिलीस तरी चालेल. "

" हो. पण राहीन मी. खाष्ट आहे खरी. पण आपल्याला किती मदत झाली त्या खोलीमुळें ! "

" ठीक. मी वर आहेच. तूं आल्या आल्या कॉफी करून देतों. मात्र झोंप लागली असली तर उठव बरं कां. "

पहांटे तीनच्या सुमाराला ॲंद्रेनं उपेन्द्राला उठवलं.

" सगळा खेळ संपला. उजाडल्यानंतर सॉलिसिटर दफनाची व्यवस्था करणार आहेत. "

"बघ, किती ओढलेली दिसतेस ! कॉफी घेतेस ?"

" नको. मला कसंसंच होतंय्. दररोज एखाद्या माणसाला नुसतं पाहिलं तरी त्याचा किती लळा लागतो आपल्याला !"

ॲंद्रेला भरून आलं होतं. बिछान्याच्याकडेला तिनं गुढघे टेकले आणि आंसू गाळीत ती म्हातारीच्या आत्म्यासाठीं प्रार्थना करूं लागली.

मृत्यूनं ओढून नेलेल्या माणसामुळं आपली भावनिक हानि कितीहि मोठी झाली असली तरी रोजचा व्यवहार कांहीं थांबत नाहीं. म्हातारी गेली म्हणजे नोकरी नाहीं, रहायला खोलीहि नाहीं; पुढें काय ? हा प्रश्न ॲंद्रेला सतावूं लागला. ॲंद्रेपेक्षां आद्रियान्‌ला तर तिच्या भवितव्याची जास्त तळमळ.

ॲंद्रेला कुठली नोकरी मिळूं शकेल याचा विचार करीतच आद्रियान् ॲंद्रेकडून बाहेर पडली. जुजबी ओळखीच्या प्रत्येक माणसाला तिनं आपल्या मैत्रिणीला नोकरी मिळूं शकेल कां विचारलं आणि तिला एक महत्त्वाची बातमी समजली. विद्यार्थी विद्यार्थिनींना नोकरी मिळवून देणारी एक संस्था आहे. बहुतेक विद्यार्थ्यांना कसली ना कसली तरी नोकरी मिळतेच.

सकाळ होते न होते तोंच आद्रियान्‌नं पुनः ॲंद्रेकडं धांव घेतली. उपेन्द्र कामाला गेला होता. ॲंद्रेनं त्याच्याकडे अद्यापि स्वतःच्या नोकरीचा किंवा खोलीचा विषय काढला नव्हता. ' माझा पगार कसा तरी पुरवूं ' असं तो म्हणेल अशी तिची खात्री होती. म्हातारी गेल्याच्या गडबडींत उपेन्द्राला आपण वकिलातींत गेल्याची हकीकत सांगणं जमलं नव्हतं. नंतर त्यानं तें मुद्दाम टाळलं होतं. आपण एक चांगली नोकरी तिच्याखातर गमावली हें तिच्या मानी स्वभावाला मानवणार नाहीं असं त्यानं विचारांतीं ठरवलं.

प्रा. क्र...८१.९८ ग्रं. हि ... ...... १००
वि. ... बाव. क्र. ... ......


" आँद्रे, अगदीं गांवढळ आहेस तूं. प्रत्येक विद्यार्थ्याला नोकरी देणारी संस्था आहे इथं जवळच, सूफ्लो रस्त्यावर. शालान्त परीक्षा पास झालेल्यांना हमखास नोकऱ्या मिळतात म्हणे. आहेस कुठें ? "

आँद्रेला घुसळीत आद्रियान् ओरडली.

आँद्रे लांब दांड्याच्या झाडूनं जमीन झाडीत होती. झाडूवर रेलून खालच्या मानेनं ती म्हणाली—

" मला माहीत आहे. माझी पहिली नोकरी त्या संस्थेमार्फतच मला मिळाली होती. "

" मग ही भिकार नोकरी, घाणेरडी खोली पत्करलीस कशाला ? चांगली नोकरी मिळाली असती कीं तुला. "

" आद्रियान्, तुला सांगायचा प्रयत्न करतें. कदाचित् समजेल, न समजेल. न समजल्यास सोडून दे. आयुष्याचीं वीस वर्षे मी काढलीं एवढंच—पण मनाला आनंद देईल असं एवढंदेखील कांहीं घडलं नाहीं या दिवसांत. जिवंत होतें म्हणून हीं वर्षे मी जगले म्हणायचं ! नाहीं तर खऱ्या अर्थानं जीवन नव्हेंच तें. कुणाचा स्नेह नाहीं, लोभ नाहीं, लहानपणचींच कां होईना साहसं नाहींत, उत्कंठा नाहीं—कांहीं नाहीं. नुसती धडपड—अन्न मिळवायची धडपड. या नीरस धडपडीला मी कंटाळलें, वैतागलें. माझ्या आयुष्यांत कांहीं तरी आगळं घडावं, त्यांत रंग भरले जावे असं मला वाटूं लागलं. परमेश्वराला माझी तळमळ समजली असावी कारण थोड्याच दिवसांनीं माझी आणि उपेन्द्राची भेट झाली. भेट झाली तो प्रसंग अनपेक्षित-आगळा. माझ्या ओळखीच्या चारदोन पुरुषांपेक्षां उपेन्द्राचं व्यक्तित्वहि वेगळं. त्याचे काळेभोर विशाल डोळे मला आवडले, चेहऱ्यावरचा निर्व्याज भाव माझ्या मनांत भरला. तो भेटला त्या सुमाराला नवीन वर्षाच्या सुट्ट्या चालू होत्या. 'सूफ्लो' रस्त्यावरची संस्था बंद होती—नाहीं तर मी त्या संस्थेतर्फेच दुसरी नोकरी मिळवणार होते. मला भेटलेला माणूस असहाय्य होता, मला आवडला होता. त्याला रामराम ठोकणं माझ्या जिवावर आलं. मी वेडी असेन कदाचित् पण मी तडकाफडकी निर्णय घेतला—हाल

सोसावे लागले तरी परवडलं पण चाकोरीतलं जिणं सोसायचं नाहीं. मीहि तितकीच असहाय्य आहे असं मी उपेन्द्राला भासवलं आणि नशीब माझं कीं आजवर त्याला या संस्थेच्या कार्याची नीटशी माहिती झालेली नाहीं.

माझं स्वप्न सत्यसृष्टींत उतरलं होतं—माझ्या आयुष्यांत कांहीं तरी वेगळं चित्तथरारक घडलं होतं. आजवर मला इथल्या दारिद्र्याची खंत वाटली नाहीं कीं हालअपेष्टांचा त्रास झाला नाहीं. हें पाऊल टाकण्यापूर्वीं मनांत आलं—हा विस्तवाशीं खेळ तर होणार नाहीं ना ? सत्यसृष्टींत उतरलेलं स्वप्न भयान्त तर ठरणार नाहीं ना ? बोलून चालून पुरुषाची जात, काय करील नि काय नाहीं सांगतां येत नाहीं—पण हा विचार मी काढून टाकला. म्हटलं परमेश्वरानं एकुलती एक संधि दिली आहे ती सोडली तर जन्मभर पस्तावा करावा लागेल.

आणि उपेन्द्र माझ्या कल्पनेपेक्षां सच्चा दिलाचा निघाला. मला त्याचा केवढा आसरा आहे हें मी शब्दांत सांगूं शकत नाहीं. जन्मभर जिनं कोणाचाच पाश स्नेह, साहचर्य अनुभवलेलं नाहीं त्या मुलीला उपेन्द्रासारख्याची किंमत किती असेल तूं कल्पना कर. फक्त एकदांच त्याचा तोल सुटला होता— फारच हलाखीची स्थिति होती तेव्हां म्हणून—" आँद्रे बोलायची थांबली. तिच्या निळ्या डोळ्यांत आंसवं गोळा होऊं लागली होती

आद्रियान् आजवर कधीं गंभीर झाली नव्हती. पण आँद्रेची मुद्रा इतकी म्लान व्हावी, तिच्या डोळ्यांत टिपं यावींत या दृष्यानं आद्रियान् गंभीर झाली.

" आँद्रे, तुझं त्याच्यावर प्रेम आहे, हो ना ? " हलक्या, दबलेल्या सुरांत तिनं विचारलं.

आँद्रेची मान होकारार्थी अस्पष्ट हालली.

" त्याला—त्याला सांगितलंस ? " थोडा वेळ थबकून आद्रियान्नं विचारलं.

पुन्हां मानेनंच नकार.

" कां ? "

" अशा गोष्टी चटकन् सांगतां येत नाहींत ! "

" पण पुढें काय ? त्याच्यासाठीं स्वतःचे हाल तूं किती दिवस करून घेणार ? उद्यां त्याचा अभ्यासक्रम संपून तो निघून गेला म्हणजे ? "

" पुढचं पुढें. आद्रियान् कृपा करून भविष्याचा विचार मला एवढयांत करायला लावूं नकोस !"

" संध्याकाळीं उपेन्द्रानंहि हाच विषय काढला.

" आँद्रे, 'सूफ्लो' रस्त्यावरच्या संस्थेंत नांव कां घालत नाहींस ? तूं नोकरी धरलीसच पाहिजे असा माझा दुराग्रह नाहीं. पण तुझा स्वभाव मला माहीत आहे. माझी मदत स्वीकारलीस तरी मनांतल्या मनांत तूं झुरशील हें मला माहीत आहे. खरं म्हणजे या संस्थेंत तूं पूर्वींच नांव घालायला पाहिजे होतंस. तुला हें सुचवायचं माझ्या लक्ष्यांत आलं नाहीं. "

" या संस्थेतर्फें मला नोकरी मिळणार नाहीं. " आँद्रेनं थाप मारली.

" कां ? "

आँद्रे केविलवाणेपणानं संयुक्तिक थाप शोधूं लागली.

" कारण पहिली नोकरी केव्हां व कां सोडली हें मी त्यांना कळवलं नव्हतं. शिवाय माझ्याकडे कोणाचंच ओळखपत्र नाहीं. आणि ती नोकरी बहुधा मुलें संभाळायचीच असणार; मला ती आवडणार नाहीं. "

" नाहीं तर राहिलं. माझी नोकरी आहे तोंवर तुला काळजी नाहीं. खरं म्हणजे तूं नोकरी केली नाहींस तरच मला बरं वाटेल."

पण शक्य असून नोकरी न करणं आँद्रेला बरं वाटत नव्हतं. चांगल्यापैकीं नोकरी मिळवावी तर तिला भीति होती कीं उपेन्द्र तिनं स्वतंत्र रहावं अशी सूचना करील. काय करावं हें आँद्रेला सुचत नव्हतं. पण कांहींतरी मार्ग शोधून काढायला हवा होताच.

तें काम म्हातारीच्या मृत्युपत्रानं केलं. म्हातारीनं मृत्युपत्रांत लिहिलं होतं— " मरतेसमयीं माझ्याकडे जी मोलकरीण असेल तिला माझी सर्व इस्टेट मिळावी. "

म्हातारीकडे रोकड फारशी नव्हती, होती ती दफनविधीच्या व इतर खर्चाला कामाला आली. तिची चार खोल्यांची जागा व आंतलं जुनाट सामानसुमान मात्र आँद्रेच्या वांट्यला आलं.

या योगायोगाला हंसावं कां रडावं हें आँद्रेला समजेना. जी गोष्ट ती टाळायला पहात होती, तीच नेमकी तिच्या नशिबीं आली होती. म्हातारीच्या ' फ्लॅट ' मधल्या दोन खोल्यांचं चांगलं भाडं येऊं शकलं असतं, उरलेल्या दोन खोल्यांत आँद्रेची रहायची सोय झाली असती. उपेन्द्रानं आँद्रेला नेमकं हेंच सुचवलं असतं. आँद्रेला मिळणारं भाडं बुडेल म्हणून फ्लॅटमध्यें रहायला तो तयार झाला नसता. आपल्यामुळें दुसऱ्याचं कुठल्याहि तऱ्हेचं नुकसान होऊं नये अशी काळजी तीं दोघं नेहमींच कांटेकोरपणानं घेत आली नव्हती कां ?

" पण आँद्रे किती दिवस उपेन्द्रपासून तूं ही बातमी लपवून ठेवणार ? " आद्रियान्नं विचारलं.

" मला माहीत नाहीं आद्रियान्. कधीं नव्हे इतकी अगतिक झालेय् मी. काय करावं सुचत नाहीं. "

" पण समजा तो दुसरीकडे रहायला गेला म्हणून बिघडलं कुठें ? फावल्या वेळीं तुम्ही भेटूं शकतां; तूं त्याला इथं जेवायला बोलावूं शकतेस. "

" एकदां दूर गेला कीं तो फारसा इकडे फिरकेलसं मला वाटत नाहीं. मला मदत करायची म्हणून सध्यां इतकं लक्ष पुरवतो तो. मला मदतीची गरज नाहीं असं समजल्यावर तो कशाला येईल ? त्याला माझ्याकडे खेंचून आणील असा आमच्यांत कोणताच बंध नाहीं. योगायोगानं भेटलों, एकत्र आलों. दुसरं कोणी बोलायला नाहीं म्हणून माझ्याशीं तो बोलतो एवढंच. "

" मला नाहीं हें पटत. एखादं माणूस आवडलं नसतांना त्याच्याजवळ रहाणं कसं शक्य आहे ? तूं आज विनाकारण निराश झाली आहेस. "

" माझं असंच चालतं. कधीं कधीं मला वाटतं, मी त्याला चांगली ओळखते, तो स्वतःला ओळखतो त्यापेक्षांहि जास्त. पण मध्येंच वाटतं—कशावरून ? त्याच्या काळ्याभोर डोळ्यांच्या आड कसलीं स्वप्नं लपलीं आहेत मला काय माहीत ? त्यानं स्वीकारलेल्या फ्रेंच उपचारामागं त्याचे खरेखुरे विचार दडले असतील ते मला अज्ञात नाहींत काय ? त्याची संस्कृति, आचार, संवयी, मन-सर्वच मला नवखं परकं आहे. त्याला नीटसं समजून घेणं मला कसं शक्य होईल ? असे आशा निराशेचे हेलकावे माझ्या मनाला क्षणा-क्षणाला मिळत असतात."

" पण 'फ्लॅट' बद्दल तूं त्याला जितक्या लवकर सांगशील तितकं बरं नाही कां ? कधीं कधीं क्षुल्लक कारणावरून तो डोक्यांत राख घालून बसतो हें आपल्याला माहीत आहेच.

" त्याहिबाबतींत माझी अशी द्विधा मनःस्थिति आहे. एकदां वाटतं, त्याची इच्छा असली तर जाऊं दे त्याला दुसरीकडे. अखे-रीस जायचा असला तर तो जाणारच. मी किती दिवस त्याला ओढून धरायचा प्रयत्न करूं ? एकदां वाटतं शक्य आहे तितके दिवस तो इथं राहील अशी खटपट करावी. नसता मान कशाला पाहिजे. त्याला सरळ सांगायचं, मला तुझी गरज आहे. माझ्या 'फ्लॅट'मध्यें तूं राहिलंच पाहिजेस. "

●●●

## ☛ ११

---

" दोन दिवसांनीं उपेन्द्र प्रसन्न मनःस्थितींत असल्याची संधि साधून म्हातारीचा फ्लॅट मिळाल्याची गोष्ट तिनं त्याच्या कानांवर घातली.

" उत्तम. जन्मभर तुला दुसऱ्याची ताबेदारी करायला नको. भाडेकरी ठेवले कीं झालं. " उपेन्द्र.

" खरं म्हणजे हा 'फ्लॅट' स्वीकारतांना कसंसंच होतंय् मला. माझा आणि म्हातारीचा काय संबंध होता तसं पाहिलं तर ? तिनं मृत्युपत्र केलं तेव्हां माझी तिच्यावर सांवलीदेखील पडली नव्हती."

" त्याला काय करणार ? तूं तिची कमी सेवा केलीस कां ? झालं हें ठीक झालं. लहानपणापासून तूं हाल काढलेस; तुझं नशीब कधीं तरी उघडायला हवंच होतं ! "

" मग 'फ्लॅट'मध्यें कधीं जायचं आपण ? " ऑंद्रेनं मुद्द्याची गोष्ट काढली.

" आपण ? "

" अर्थात्. "

" ऑंद्रे, खोलींत तूं मला बोलावलंस, मला आसरा दिलास तें ठीक झालं. मला त्यावेळेला जेमतेम जेवणापुरते पैसे मिळत होते. पण आतां मी एकटा राहूं शकेन एवढे पैसे मिळवतो आहे. त्यांतूनहि तुला एका खोलीचं भाडं देणं मला परवडत असतं तर मी आनंदानं राहिलों असतो. पण माझी मजल अडीच तीन हजार फ्रॅंकपुढें जाणार नाहीं. दुसऱ्या कोणालाहि खोली दिलीस तर पंधरा हजार सहज मिळतील, दहा हजार तर नक्कीच. जेवण पुरवलंस तर पंचवीस तीस हजारांपर्यंत मिळतील. तेव्हां मला वाटतं तूं शक्य तितक्या तांतडीनं भाडेकरी पहावेस. "

ऑंद्रे शब्दांसाठीं घुटमळत होती. फ्लॅटचा प्रश्न काढण्यापूर्वीं उपेन्द्राची कसकशी आर्जवं करायचीं हें ऑंद्रेनं मनाशीं विस्तृतपणें ठरवलं होतं. पण प्रत्यक्ष प्रसंग येतांच तिला कांहींच सुचेना.

" पण, उपेन्—" कांहीं तरी बोलण्याचा ऑंद्रेनं क्षीण प्रयत्न केला.

" आद्रियान्, आद्रियान् काय झालं ? " उपेन्द्र ओरडला. त्याचं दाराकडे तोंड होतं. कोलमडत दाराशीं येऊन उभी राहिलेली आद्रियान् प्रथम त्यानं पाहिली.

आद्रियान्‌चा फ्रॉक् दोनचार ठिकाणीं फाटला होता; हातावर, मानेवर व गालांवर निळे वण उमटले होते. ओठ पांढरेफटक होते. अनवाणी पायांनीं दिसेल त्या वस्तूचा आधार घेत ती कशी तरी चालत होती! ऑंद्रेनं पुढं होऊन तिला सांवरलं.

"आद्रियान्-बिचारी आद्रियान्; उपेन् पाणी दे जरा; हिला भयंकर घाम फुटला आहे!"

"उपेन्द्रानं पाणी आणलं पण आद्रियान् जवळ जवळ बेशुद्ध झाली होती.

"हिला व्यवस्थित झोंपवलं पाहिजे. काय झालं कोण जाणे!" उपेन्द्र पुटपुटला.

"इथं कुठें झोंपवणार! 'फ्लॅट' मध्यें नेऊं या." दोघांचीहि तारांबळ सुरू झाली. ऑंद्रेनं फ्लॅटमधली एक खोली घाईघाईनं सुसज्ज केली. उपेन्द्रानं आद्रियान्‌ला उचलून खालीं नेलं आणि डॉक्टरच्या शोधांत तो बाहेर पडला.

"काळजी करण्याजोगं विशेष कांहीं नाहीं. सहावा महिना चालू आहे. कुठं तरी मार बसला आहे म्हणून अस्वस्थ झाल्या आहेत. मी टॉनिक आणि झोंपेच्या गोळ्या लिहून देतों." डॉक्टरांनीं निदान केलं.

पण रात्र उलटल्यावर आद्रियान्‌ला वात झाला. "आले, आले, मला गोळ्या देतात. उपेन्, मला वांचव, माझं बाळ मला पाहिजे!" असं ती मोठमोठ्यांदा ओरडूं लागली. तिच्याजवळून हालणं उपेन्द्राला अशक्य झालं. तिच्याखातर त्यानं आठ दिवसांची रजा काढली. रात्रंदिवस तो व ऑंद्रे आद्रियान्‌ला धीर देत होती.

आठवड्यानंतर आद्रियान्‌मध्यें थोडा फरक पडला. झोंपेच्या गोळ्यांचा तिच्यावर कांहीं परिणाम होत नव्हता त्या लागूं पडूं लागल्या इतकंच. पण तिला एकटं ठेवणं शक्य नव्हतं; आलटून पालटून उपेन्द्र व ऑंद्रे तिच्याजवळ सतत बसून रहात होते. यामुळें उपेन्द्रानं दुसरीकडे जाण्याचा प्रश्न उद्भवलाच नाहीं; आद्रियान्‌ची

केंविलवाणी अवस्था पहातां असा विचार करणंहि त्याला शक्य नव्हतं.

त्या दिवशीं नेमकं काय घडलं हें आद्रियान् सविस्तर कधींच सांगूं शकली नाहीं. पण तिच्या तोंडच्या शब्दांवरून ऑंद्रे व उपेन्द्र यांनीं तें अनुमानानं ताडलं.

स्वतःची अवस्था लपवणं कठीण होऊं लागलं तरी आद्रियान्‌नं बाळाच्या आगमनाची बातमी यीट्‌सच्या कानांवर घातली नव्हती. पण यीट्‌सच्या सूक्ष्म नजरेनं एक दिवस आद्रियानमधला फरक टिपून घेतला. आद्रियान् आपणहून कांहीं बोलेल म्हणून त्यांनीं कांहीं दिवस वाट पाहिली. ती ह्या गोष्टीचा उल्लेख आवर्जून टाळते असं दिसतांच आपल्याला लग्नबंधनांत अडकविण्यासाठीं ती कांहीं तरी डाव खेळत असावी असा त्यांचा समज झाला. एक दिवस संध्याकाळीं यीट्‌सनं आद्रियानपुढें चार गोळ्या धरल्या. " घे मुकाट्यानं " ते खेंकसले. जेनी गेल्यापासून यीट्‌स आद्रियानशीं तुसडेपणानं बोलायचं टाळीत असत. त्यामुळें अचानक व विनाकारण प्रगट झालेल्या त्यांच्या रागाचं तिला आश्चर्य वाटलं.

" कसल्या आहेत गोळ्या ? " तिनं सहज विचारलं.

" घे म्हणतों ना ? "

" पण गोळ्या कशाला मला ? काय झालंय् एवढं ? "

" काय झालंय् तें आरशाला विचार. "

आद्रियान् लाजली.

" तुम्ही ओळखलंत ? " कोचावर गुढघे रोंवून यीट्‌सच्या खांद्यावर नाक घासत तिनं विचारलं.

" भलत्या वेळीं अंगचटीला येऊं नकोस. पूर्वींच कां नाहीं मला सांगितलंस ? मुकाट्यानं गोळ्या घे या. "

" सांगितलं नाहीं त्याचा राग आला ? सांगणार होतें मी. पण जमेना मला. आतां बाळासाठीं एक खोली तयार करायची ना ?"

" पुरे झाला मानभावीपणा. पक्की बनेल आहेस तूं. गोळ्या घे

या मुकाट्यानं. म्हणजे तुझ्या पोरासाठीं खोली तयार करायची कांहीं गरज रहाणार नाहीं !"

" माझं पोर ? तुमचं नाहीं कां तें ?

" तुझा संसार चालवायचा पत्कर घेतला नाहीं मी. पोराबाळांचं लफडं नकोय् मला. तेवढ्यासाठींच मी लग्न केलं नाहीं आणि ठेवलेल्या बाईचीं पोरं संभाळीत बसूं ?"

आन्द्रियान् ऐकेना तशी यीट्सनीं तिला खालीं पाडून दाबून धरलं. जबरदस्तीनं त्यांनीं त्या गोळ्या तिला घ्यायला लावल्या. श्रमानं आणि मानसिक धक्क्यानं आद्रियान् इतकी विव्हल झाली कीं गालिच्यावरून उठून खुर्चीवर बसण्याचं त्राणदेखील तिला राहिलं नाहीं. पण दार आपटून यीट्स बाहेर गेल्याचा आवाज ऐकतांच तिच्या अंगांत कुठली शक्ति संचारली कोण जाणे, होती तशीच ती बाहेर पडली.

कसंहि करून ऑंद्रेकडे जायचं एवढा एकच विचार तिच्या मनांत होता.

आद्रियान् आल्याला सात आठ दिवस झाले होते, तिला किंचित् उतार पडला होता. तिचा डोळा लागल्यामुळें ऑंद्रेला अभ्यासाचीं पुस्तकं हातांत धरणं शक्य झालं होतं. एवढ्यांत दारावरची घंटा वाजली. अभ्यासांत व्यत्यय आल्यामुळें जरा नाखुषीनंच ऑंद्रेनं दार उघडलं.

—बाहेर यीट्स उभे होते.

पूर्वीं ते ऑंद्रेकडे आले होते तेव्हां त्यांचा राकट चेहरा स्मिताच्या छायेनं थोडासा तरी सौम्य झाला होता. आतां ते अधिकच उग्र दिसत होते.

" ती आहे ना इथं ?" यीट्स.

" हो, आहे. " ऑंद्रे संतापानं पण कुज्यींत उत्तरली. कांहींच न बोलतां यीट्सनीं आंत येण्याचा प्रयत्न केला. ऑंद्रे अंगाभोंवतीं दार गुंडाळून उभी राहिली. तसा प्रसंगच आला असता तर यीट्स-सारख्या आडदांड माणसाचा प्रतिकार करणं तिला शक्य झालं

नसतं. पण आद्रियानूचं रक्षण करायचं हा एकच विचार तिच्या मनांत होता.

" मूर्खपणा करूं नकोस; मी तिला इजा करणार नाहीं. " यीट्स म्हणाले.

" तुम्ही या घरांत यावं अशी माझी इच्छा नाहीं. तुमचा तिच्यावर कांहींहि हक्क नाहीं. तुमची एक कवडीहि आणली नाहीं तिनं. "

आँद्रेनं आपले बारीक डोळे यीट्स्वर रोखून धरले होते. त्यांच्याबद्दल तिला वाटणारी जुगुप्सा त्यांना जाणवली. त्यांचा आवेश ओसरला, ते घुटमळले. दोन चार क्षणांनीं त्यांनीं स्वतःला सांवरलं. खिशांतून पैशाचं पाकीट काढून यीट्सनीं नोटांचा एक भला मोठा जुडगा बाहेर काढला.

" या घे; आणखी लागल्या तर देईन. तिचं वाईट व्हावंसं मला वाटत नाहीं ! "

" तिचं वाईट होणार नाहीं. पैसा असला म्हणजेच माणसाचं चांगलं होतं ही चुकीची कल्पना आहे तुमची. "

आँद्रेनं धाड्कन् दरवाजा लावून घेतला. पण जरा वेळानं तिचं मन तिला खाऊं लागलं—तिनं केलं हें ठीक होतं, त्याबद्दल तिला कोणत्याहि तऱ्हेचा पश्चात्ताप होत नव्हता हें खरंच. पण तरी वास्तवतेला तोंड देणं आँद्रेला भाग होतं—आद्रियान्साठीं लागणारा पैसा तिच्याजवळ नव्हता आणि दाराशी चालून आलेला पैसा तिनं नुकताच लाथाडला होता.

त्यांतहि प्रश्न तिच्या एकटीचा असता तर आँद्रेला कांहीं वाटलं नसतं. प्रश्न उपेन्द्राचाहि होता आणि सहानुभूति म्हणून तो आद्रियान्ला जपत असला तरी तिच्यासाठीं स्वतःच्या खिशाला गरज नसतांना एवढी मोठी चाट बसवून घेणं त्याला पसंत नसणं शक्य होतं.

उपेन्द्र घरीं येतांच आँद्रेनं त्याला यीट्स येऊन गेल्याचं सांगून टाकलं.

" बरं केलंस, ऑंद्रे ! असंच करायला पाहिजे. मी असतों तर त्याला धक्के मारूनच घालवून दिला असता. " उपेन्द्र म्हणाला.

" पण मागून मला वाटलं भावनेच्या आधीन होऊन मी आद्रियान्ची व्यावहारिक हानि तर केली नाहीं ना ? "

" मुळींच नाहीं. आद्रियान्चं बाळ आपल्या पैशावर वाढेल. कमी असला तरी प्रामाणिकपणानं मिळवलेला आणि सच्चा दिलानं दिलेला आहे तो ! " उपेन्द्रानं ठाम सांगितलं.

' सँ स्युल्पिस ' चर्चच्या मागें दिसणाऱ्या जुनाट, धुरकटलेल्या इमारतींत एक मोठंसं सूतिकागृह आहे अशी कल्पना बाहेरून येणं अशक्य होतं. दारांतून आंत शिरलं कीं एक अंधारी बोळकंडी लागत असे. त्याच्या टोंकाला एक लहानसा व्हरांडा होता. वीस पंचवीस स्त्रीपुरुष धडधडत्या अंतःकरणानं तिथें बसून राहिले होते. कळकट कपडे घातलेली एक बाई गुडघे टेकून लांकडाची जमीन पुसत होती. मधूनच पांढऱ्या पोषाखांतली परिचारिका मांजराच्या पावलांनीं दारांत यायची आणि एखादं नांव पुकारायची. केंस विसकटलेला एखादा काटकुळा माणूस घाबऱ्याघाबऱ्या उठायचा.

" अभिनंदन ! मुलगा झालाय् तुम्हांला. " परिचारिका ठराविक शब्द उच्चारायची आणि नाहींशी व्हायची.

या खेपेला मात्र उपेन्द्रानं परिचारिकेला अडवलं.

" सतरा नंबरच्या कॉटवरचा पेशंट—" तो चांचरत विचारूं लागला.

" अजून कांहीं झालं नाहीं. कितीदां विचाराल ? झाल्यावर लपवून कां ठेवणार आहोंत आम्ही ? " परिचारिकेनं तुसडेपणानं उत्तर दिलं.

" इथल्या परिचारिका अशाच असतात. दिवसाला पांच-दहा बाळंतपणं होतात म्हणून त्यांना त्याचं महत्त्व नसतं. तुम्ही काळजी करूं नका. माझीहि मुलगी आहे आंत. " एक म्हातारी बाई म्हणाली.

" हिचं काय जातंय्—काळजी करूं नका म्हणायला ? आम्हांला काय होतंय् आमचं आम्हांला माहीत. " ऑंद्रेच्या कानाशीं लागून उपेन्द्र पुटपुटला.

रात्रभर दवाखान्यांत बसून राहिल्यामुळें त्याचे डोळे सुजले होते, दाढी वाढली होती, केंस पिंजारलेले होते. एका जागीं बसून रहाणं त्याला शक्य होत नव्हतं. उपेन्द्राची अवस्था पाहून ऑंद्रेला हंसू दाबणं कठीण झालं होतं. गेल्या चार महिन्यांत उपेन्द्रानं ऑंद्रेला एवढंहि कमी पडणार नाहीं याची खबरदारी घेतली होती. ऑंद्रेनं दोन भाडेकरी ठेवले होते, त्यांचं जवळ जवळ सर्व भाडं एकट्या आद्रियान्च्या खाण्यापिण्यासाठीं व औषधासाठीं खर्च केलं जात होतं. शक्य तिथें काटकसर करून उपेन्द्रानं लहान मुलाच्या कपड्यासाठीं व रुग्णालयांतल्या खर्चासाठीं एक लहानशी रक्कम सांठवली होती; कामावर जातांना बस न घेतां तो हल्लीं पायींच जाऊं लागला होता. आद्रियान्ला घरांत ठेवून घेतांना ऑंद्रेला एकच भीति वाटली होती—उपेन्द्राची प्रतिक्रिया कशी काय होईल ? ती बरी झाल्यावर तो तिला 'तुझी तूं सोय पहा' असं तर सांगणार नाहीं ना ? पण उपेन्द्राच्या वागणुकीनं या भीतीचा केव्हांच धुव्वा उडवून दिला होता.

" नंबर सत्तावीस—" दारांतून दुसऱ्या एका परिचारिकेनं पुकारा केला.

" बाई, सतरा नंबरचं कसं काय ? " उपेन्द्रानं तिला विचारलं.

" थोड्याच वेळांत सुटका होईल. गॅस दिला आहे. " नर्स उत्तरली.

" बाप रे, गॅस ! ऑंद्रे, तिला गॅस दिला आहे ! " घाबऱ्या स्वरांत उपेन्द्र ओरडला. आसपासचे दोन चार लोक हंसूं लागले.

" शूः, केवढ्यानं बोलतोस ? " ऑंद्रे हलकेच म्हणाली. " गॅस दिला यांत घाबरण्याजोगतं काय आहे ! गॅस दिल्यानं तिला वेदना जाणवणार नाहींत. बरंच कीं ते. "

उपेन्द्र ओशाळला. " असं होय ! " तो पुटपुटला पण दोनच सेकंदांनीं त्याची अस्वस्थता नव्यानं परत आली.

" छे : बुवा, आई होण्यासाठीं बायकांना भलताच त्रास सहन करावा लागतो. कसं सहन करतात त्या, तें करोत ! माझ्याच्यानं मात्र आतां मुळींच धीर धरवत नाहीं. "

पण लवकरच नर्सनं बातमी आणली—

" सतरा नंबरला मुलगी झाली. "

तीन चार तासांनीं त्यांना आद्रियानला भेटायची परवानगी मिळाली. आद्रियान् फिक्कट झाली होती. पण गेले कांहीं महिने दिसत होती त्यापेक्षां अनेकपटीनं टवटवीत दिसत होती. नर्सनं नुकतंच तिच्या शेजारीं आणून ठेवलेलं गुलाबी गाठोडं जागं करण्याचा तिचा प्रयत्न चालला होता.

" आँद्रे, किती सुंदर दिसते आहे पाहिलंस ? सारखी झोंपते. उठवलं तरी उठत नाहीं." ओठांचा चंबू करून आद्रियानूनं लाडीक तक्रार केली.

" झोंपूं दे तिला. पण हिचं नांव काय ठेवायचं ? लगेच रजिस्टर करावं लागतं. " आँद्रे.

" आँद्रे ठेवूं या कां ? कीं एखादं भारतीय नांव ठेवूं या ? " आद्रियान्.

" एक नांव जेनी ठेवावं असं मला वाटतं. एक भारतीय ठेवूं. " आँद्रे म्हणाली.

चांगलंसं नांव सुचवण्याबद्दल दोघी उपेन्द्राच्या पाठीस लागल्या. पण त्याला नीटसं नांवच सुचेना. एकाएकी कोंपरापर्यंतची हिरवी चोळी आणि पिवळं जॉर्जेट नेसलेली मञ्जुघोषेची प्रतिमा त्याच्या डोळ्यांसमोर उभी राहिली.

" मञ्जु ! मञ्जु ठेवा दुसरं नांव. " त्यानं सांगितलं.

उपेन्द्र आणि आँद्रे घरीं जायला निघालीं तेव्हां आद्रियान् बरीच गंभीर झाली. आँद्रे, तुम्ही मला हें एवढं केलंत, पैसे—त्याचे

पैसे–" तिच्याच्यानं जास्त बोलवेना." आमचेच आहेत आद्रियान्. त्याचा एक फ्रँकहि आम्ही घेतलेला नाहीं. तूं काळजी करूं नकोस." उपेन्द्र चटकन् उत्तरला. " मेर्सी, मेर्सी. उपेन्, बाकी कांहीं मी विसरले तरी हें कधींच विसरणार नाहीं. स्वतःबद्दल थोडा तरी आदर बाळगायची संधि दिलीत तुम्ही मला." •

बाहेर पडतांच आँद्रे मोठमोठ्यानं हंसूं लागली.

" काय झालं? कां हंसतेस?" उपेन्द्रानं विचारलं.

" तुलाच हंसते आहे मी! अशी तुझी अवस्था पाहिली नव्हती आजवर. वितळलेलं लोणी झालंय् तुझं. नाहीं तर एरवीं नुसता गुरकावत असतोस."

" दुसऱ्याचं दुःख पहावत नाहीं बुवा! आद्रियान्च्या क्लेशांनीं तिचं पूर्वायुष्य पार धुवून टाकलंय्. मातृत्वापायीं आद्रियान्नं इतक्या यातना भोगल्याहेत कीं मांझा तिच्यावर मुळींच राग राहिलेला नाहीं आतां!"

●●●

## १२

उत्साहानं उपेन्द्र 'सिते युनिव्हेर्सिते'कडे निघाला होता. हिंदी विद्यार्थ्यांनीं चहाचा अनौपचारिक कार्यक्रम ठेवला होता; उपेंद्रांलाहि आमंत्रण होतं. 'फ्लॅट'मध्यें रहायला आल्याला वर्ष उलटून गेलं होतं. 'फ्लॅट'मध्यें आल्यापासून उपेन्द्राला आपल्या पूर्वींच्या मित्रांची लाज वाटेनाशी झाली होती. स्वतःच्या हलाखीच्या दिवसांबद्दल तो आतां मोकळेपणानं बोलूं शकत होता; सहजगत्या कोणी भेटल्यास निःसंकोचपणानं त्यांना 'फ्लॅट'वर आणून चहा पाजत होता.

जेनी सात महिन्यांची झाली होती. जेनीच्या आगमनानं आद्रियान्, ऑँद्रे, उपेन्द्र तिघांच्याहि आयुष्याला एक प्रकारचं कौटुंबिक वळण मिळालं होतं. उपेन्द्र–ऑँद्रेचे खटके जवळजवळ थांबले होते. आद्रियान् मुलीच्या कौतुकांत दंग असली तरी कायम खिन्न होती. तिचा पूर्वीचा रसरशीतपणा लपला होता, लडिवाळपणाचं तर अस्पष्ट चिन्हहि राहिलं नव्हतं. दहा बारा वर्षांनीं मोठी झाल्यासारखी दिसत होती ती.

"पाप मी केलं, प्रायश्चित्त माझ्या लाडक्या जेनीला मिळणार. बदचाल आईला लग्नबाह्य संबंधापासून झालेली मुलगी म्हणून तिला सगळे दूर लोटणार !" आद्रियान् येतां जातां म्हणायची. जेनीचं पुढें कसं होईल हा विचार उपेन्द्र–ऑँद्रे यांनीं कितीहि प्रयत्न केले तरी आद्रियान्च्या डोक्यांतून जात नव्हता.

पण एकंदरीनं त्यांचं जीवन सुखवस्तु, शांत, सरळ, सुरळीत चाललं होतं. आणि म्हणूनच कीं काय उपेन्द्राला भारतांत परतण्याची अनिवार ओढ लागली होती. एक तर स्वतःच्या परिस्थितीबद्दल त्याला आतां लाज वाटत नव्हती, त्यामुळें परत जाण्याचे विचार मनांत घोळवणं त्याला शक्य होत होतं. दुसरं म्हणजे लवकरच त्याची शेवटली परीक्षा पार पडणार होती; त्यानंतर भरपगाराची नोकरी मिळतांच परतण्यासाठीं पैसा सांठवणं त्याच्या आंवाक्यांतलं होतं.

शक्य तितक्या लवकर मायदेशी परतण्याचा आपला निश्चय उपेन्द्रानं ऑँद्रे व आद्रियान् यांच्यापासून लपवून ठेवला होता; इतकंच नव्हे तर त्या दोघींच्या सान्निध्यांत या निश्चयानं डोकं वर काढलं तर उपेन्द्र अस्वस्थ होत असे. ऑँद्रेविषयींच्या त्याच्या भावना कांहींहि असोत, जवळ जवळ लावलेल्या झाडांचीं मुळं एकमेकांत अडकून बसावीत तसं त्याचं आणि ऑँद्रेचं झालं होतं. ऑँद्रेपासून दूर जायचं, एकदां सुरळीत चालणारं आयुष्य विसकटायचं हा विचार उपेन्द्राला मानवत नव्हता. पण भारतीय वातावरणाबद्दलची तळमळ फारच वाढली म्हणजे उपेन्द्र स्वतःची

समजूत करून घ्यायचा—तसा ऑंद्रेचा आणि आपला काय लागाबांधा आहे ? अथांग सागरांत प्रवास करणाऱ्या या दोन नावा, चुकून जवळ आल्या, कधीं तरी त्या दूर जाणारच; नव्हे जायलाच हव्या. पांच दहा वर्षांनीं, पॅरीसमधील वास्तव्यांत आपल्याला उपयोगी पडलेली एक मुलगी एवढीच तिची स्मृति आपल्याजवळ राहील आणि माझा हिन्दी मित्र असा उल्लेख ऑंद्रेच्या बोलण्यांत मधून मधून येईल एवढंच ! ”

आज ‘सिते युनिव्हर्सिते’च्या लगतचं हिरवं लॉन ओलांडतांना उपेन्द्राचं लाडकं स्वप्न विशेष जोमानं मान वर काढीत होतं.

त्याच्या पायाखालचं दाट हिरवं गवत थंडावलं होतं. झाडांवरचे फुलोरे गळले होते, पण पानांनीं शेंदरी, पिवळी, तपकिरी, लाल, गुलाबी अशा हजारों छटा गळून पडण्यापूर्वीं नेसून घेतल्या होत्या. झाडांचे बुडखे पेटल्या मशालीसारखे दिसत होते. सगळं जग थंडीच्या चाहुलीमुळें नीरव, भयभीत झालं होतं.

पण उपेन्द्राच्या डोळ्यांसमोर सह्याद्रीच्या कुशींत दडून बसलेलं अवखळ पुणं उभं राहिलं होतं. दुपारची वेळ; भाजून पिंवळ्या झालेल्या गवतावर रखरखीत उन्हं सांडलीं होतीं. उपेन्द्र आंब्याच्या सांवलींत पडून पुस्तक वाचीत होता. मोहोराच्या वासानं सावलीचा थंडावा दृढतर होत होता. मध्येंच एखादी झुळुक कोकिळेची आरोळी वाहून आणत होती, गुलमोहोराचीं फुलं कुस्करीत होती...

पुण्यांत त्याला चांगल्यापैकीं नोकरी मिळाली होती, जुने मित्र गवसले होते. आसपासच्या काकू आणि मावशा कौतुकानं त्याचं वर्णन इतरांना ऐकवीत होत्या —

“ काकानं फसवलं याला. पण स्वतःच्या पायांवर उभं राहून शिक्षण घेतलंन् हो यानं. चार वर्षांचा अभ्यास तीन वर्षांत केलान्. ”

“ अहो ऽ अहो, दादा ऽ ओळखाल कीं नाहीं आम्हांला ? कीं पॅरीसचे रहिवासी झाला म्हणून जुन्या दोस्ताचा विसर पडला ? ”

कोणीतरी खड्या आवाजांत उपेन्द्राला पुकारीत होतं.

बन्या शिरोडकराची ओळख पटायला उपेन्द्राला थोडा वेळ लागला. लेंगा शर्ट घालून पोरींच्या पाठीमागें भटकणारा बन्या भलताच बदलला होता. बिल्क्रीम लावून चप्प बसवलेले केंस, तोंडांत एक सिगारेट्, हेरिंगबोन्चा सूट, रेशमी टाय, टायला एक मोती खोंचलेला, खिशांत रेशमी रुमालाची टोंकेरी घडी, या थाटांतून बन्याला ओळखणं कठीण होतं. तशी उपेन्द्राची आणि बन्याची फारशी दोस्ती नव्हती. पुण्याला असतांना ते जवळजवळ राहात होते एवढंच. पण त्याची ओळख पटतांक्षणींच उपेन्द्राला प्रेमाचं भरतं आलं. त्याचं स्वप्न हळुंहळुं प्रत्यक्षांत उतरूं लागणार असल्याचीच हीं प्रसादचिन्हं नव्हतीं का ?

" शिरोडकर ? तूं इथें कसा ? " उपेन्द्र उत्साहानं ओरडला.

" न्यूयॉर्कला चाललोंय् मी. माझी फर्म पाठवतेय् मला. इथं तो चौधरी रहातो, त्यानं रहाण्याची व्यवस्था केली माझी. "

उपेन्द्राचं त्याच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतं. त्याच्या मनांत हजारों प्रश्न गर्दी करीत होते. सत्यंकाकूंची मांजरी अजून आहे कां ? अण्णांच्या केसचा निकाल काय लागला ? फर्ग्युसन कॉलेजचा आंबा स्टँड बंद पडला कीं नाहीं ? गोदाक्कांच्या पमीचं लग्न शेवटीं जमलं कीं नाहीं ? सुधीर मोकाशीनं मिशी वाढवली होती त्याचं पुढें काय झालं ? ' मोरू ' शब्द अजून प्रचारांत आहे कां ?...

मनांत येतील तसें असंबद्ध प्रश्न उपेन्द्र भराभरा विचारीत होता. पण शिरोडकरकडून त्याला एकाचंहि उत्तर मिळत नव्हतं. एवढी दुर्मिळ नोकरी आपल्याला कशी मिळाली, ' फॉरिन ' ला जायचा ' चान्स ' मारण्यासाठीं काय काय खटाटोप करावे लागले याचं रसभरीत वर्णन तो उपेन्द्राला ऐकवीत होता. सर्व हकीकत साग्रसंगीत सांगून पुरी झाली तेव्हां शिरोडकर विश्वासाच्या सुरांत म्हणाला—

" ते जाऊं दे. लेका अडीच वर्षं पॅरीसमध्यें राहिलास तर मला कांहीं पॅरीसच्या गमती दाखवशील कां नाहीं ? तुझं तूं बरं जमवलं आहेस. माझ्याहि असल्या एकदोन ओळखी करून देना !"

" ए, तूं काय बरळतो आहेस, तुझं तुला समजतं आहे ना? कुणाची ओळख? कुणाला करून द्यायची?"

" तुझ्या घरची ओळख करून दे असं नाहीं म्हणालों मी."
' घरची ' शब्दावर जोर देत शिरोडकर म्हणाला.

उपेन्द्राचं रक्त तापूं लागलं.

" बऱ्या बोलानं नीट काय तें सांग. नाहीं तर—"

" अरेच्च्या, मला लाजतोस? मला सगळं माहीत आहे बरं. दहा हजार ताबडतोब पाठवले पाहिजेत म्हणून उसने मागायला तुझे काका आमच्याकडेच आले होते. बाबांनीं दिले नाहींत अर्थात्. बाबांच्या हातून कवडी कधीं सुटली नाहीं—"

" दहा हजार कशाला मागत होते काका?"

" कां उगीच वेड पांघरतोस बाबा? मला सगळं माहीत आहे. इथं आल्या आल्या तुमचीं एकेक प्रकरणं सुरू झाली, बिचारे काका पैसे भरताहेत–शेवटले दहा हजार पाठवले तेव्हां त्यांना आशा होती, तूं परत येशील म्हणून, पण तूं इथंच रहायचं ठरवलंस–आणि मी तुला त्याबद्दल दोष देत नाहीं बरं कां. अरे पॅरीसला येऊन असली चैन करायची नाहीं तर काय?"

" माझी हीं प्रकरणं काकांनींच सांगितलीं ना?"

" सांगायला कशाला हवं? असल्या गोष्टी काय लपून रहातात? तुझं पत्र आलं कीं म्हातारा अक्षरशः टिपं गाळायचा. त्याला बाकी बरंच दुःख झालं हं. त्यांत शेजारी एकेक फूस लावणारे. कोणी म्हणे उपेन्द्र जन्मतःच वाह्यात होता, कोणी म्हणे तिकडे पाठवल्यामुळें मुलगा वांया गेला...अरे ए पण थांबना निघालास कुठें? चहा वगैरे–"

शिरोडकर उपेन्द्राला मोठमोठ्यांदा हांक मारीत होता. पण उपेन्द्र पिसाटासारखा लांबलांब पावलं टाकीत केव्हांच दिसेनासा झाला. त्याला राग आला नव्हता कीं वाईट वाटलं नव्हतं. त्याला फक्त गळून गेल्यासारखं झालं होतं, मोठ्या दुखण्यांतून उठल्यासारखा अशक्तपणा आला होता.

स्वयंपाकघराच्या खिडकीवर रेलून आँद्रे विषण्णपणानं बाहेर पहात होती. हल्लीं नोकरी करीत नसल्यामुळें तिनें दुपारचे तास घेतले होते. आद्रियान्‌चा व जेनीचा डोळा लागला होता. आँद्रे स्वतःसाठीं चहा बनवायलों म्हणून स्वयंपाकघरांत आली होती. पण चहा बनवण्याकडे तिचं लक्ष नव्हतं. उपेन्द्रांत अलीकडे झालेला बदल तिला जाणवला होता. अनेकदां जेवायच्या वेळीं तो हातांतला कांटा रिकामाच ठेवून कसल्या तरी स्वप्नांत रंगून जायचा. कित्येक वेळां विनाकारण स्वतःशीं स्मित करतांना आँद्रेनं त्याला पाहिलं होतं. आजवर उपेन्द्राचं प्रेम तिला कधीं मिळालं नव्हतं तरी त्यानं तिच्यापासून कांहीं लपवून ठेवलं असंहि झालं नव्हतं. उलट मनांत असेल तें, येईल तें, एकमेकांशीं स्पष्टपणानं बोलून दाखवायचं ही दोघांनाहि संवय होती. म्हणूनच उपेन्द्राच्या या स्वप्नांत, आनंदांत सहभागी न झाल्याचं आँद्रेला अमाप दुःख झालं होतं.

उपेन्द्र कुणाच्या तरी प्रेमांत पडला असावा अशी तिला प्रथम शंका आली होती, पण ती लवकरच नाहींशी झाली. कामाव्यतिरिक्त उपेन्द्र एक क्षणहि बाहेर रहात नव्हता. उपेन्द्र परत जाण्याचीं स्वप्नं रंगवीत असेल हा विचार मात्र आँद्रेच्या मनाला पुसटतादेखील चाटून गेला नाहीं. दोन वर्षांत उपेन्द्रानं त्या स्वरूपाची कसलीहि ओढ न दाखवल्यामुळं तो परदेशीय आहे याचा देखील तिला जवळ जवळ विसर पडला होता.

'पाँथेओ'च्या कडेनं उपेन्द्र आंत वळल्याचं आँद्रेनं पाहिलं. धांवत धांवत ती दार उघडून त्याचं स्वागत करायला म्हणून गेली. पण दाराशीं पोंचतांच तिचं मन पुन्हां निराश झालं—कसल्या तरी स्वप्नांत रमला असेल तो, त्याची तन्द्री मोडणारी मी कोण?—तिला वाटलं. पुन्हां ती स्वयंपाकघरांत परत आली. पण या खेपेला तिनं गॅस पेटवून आधणाचं पाणी ठेवलं. मनांतल्या मनांत तिला वाटत होतं—उपेन्द्र आपला शोध घेत स्वयंपाकघरांत येईल, चहाची मागणी करील; त्याला चहा किती आवडतो हें तिला चांगलं माहीत होतं.

उपेन्द्रानं किल्लीनं दार उघडलं, पुन्हां लोटलं अन् तो स्वतःच्या खोलींत गेला वगैरे सर्व आँद्रेला खुडबुडीवरून कळलं. पण पंधरा मिनिटं—वीस मिनिटं—अर्धा तास झाला तरी तो स्वयंपाकघराकडे वळला नाहीं आँद्रेला भरून आलं. उकळलेलं पाणी मोरींत फेकून देऊन ती पुन्हां खिडकीला खेटून उभी राहिली.

पण थोडाच वेळ. उपेन्द्रानं नाहीं मागितला चहा म्हणून रुसण्याजोगतं काय आहे ? आपले संबंध असे औपचारिक नाहींत. त्याला आवडतो मग आपण नेऊन दिला तर काय झालं ? अशा विचारांची वावडी तिच्या मनांत उसळली. तिनं पुन्हां पाणी तापवलं. गरम पाण्यानं विसळून कपबशा उबदार बनवल्या. एका 'ट्रे'मध्ये कपबशा, चहाची किटली, साखर व दूध घेऊन ती उपेन्द्राच्या खोलीकडे गेली. बराच वेळ तिनं दारावर टक्टक् केलं, पण आंतून उत्तर आलं नाहीं. ' उपेन्द्र आजारी तर नसेल ना ' या शंकेनं आँद्रेनं दार किलाकिलं करून आंत डोकावलं. कोट व बूट न काढ-तांच उपेन्द्र बिछान्यावर पसरला होता. आँद्रे घाईनं आंत शिरली. हातांतला ट्रे तिनं एका टेबलावर ठेवला. संधिप्रकाशाचा चिटका प्रकाश खोलीला पुरेसा नव्हता. आँद्रेनं टेबलावरचा दिवा लावला. उपेन्द्राच्या कपाळावर हात ठेवतांच तो जागा झाला.

" क–कोण ?" उपेन्द्रानं विचारलं.

" मी आँद्रे. तुला बरं नाहीं कां ? "

उपेन्द्रानं उत्तर दिलं नाहीं. ही वेळ जास्त बोलत बसण्याची नव्हे हें आँद्रेनं ओळखलं.

" चहा आणला आहे. इथंच घेणार कीं स्वयंपाक घरांत येतोस ? " तिनं विचारलं.

" तिकडेच येतो. "

स्वयंपाकघरांत बराच प्रकाश असल्यानं तिथं प्रसन्न वाटत होतं. उपेन्द्रानं चेहऱ्यावर थंड पाण्याचा हबका मारला व तो टेबलाशीं येऊन बसला.

दोन कप त्यानं कांहींहि न बोलतां घेतले. ऑंद्रे मुद्दामच गप्प होती.

" ऑंद्रे, एवढ्या मोठ्या वयांत मीं एक मूर्खपणा केला !"

" मूर्खपणा ? "

" हो. लहान मुलाप्रमाणं स्वप्नं रंगवीत बसलों—पुण्याला परतण्याचीं. "

ऑंद्रेचं मन निवळलं, हलकं झालं.

" त्यांत मूर्खपणा कसला ? परत जावंसं वाटणारच तुला. पुरेसे पैसे सांठले तर मीसुद्धां येईन तुझं पुणं पहायला ! "

" मी एक मोठी चूक केली—मी पुणं सोडतांना माझ्या आसमंतांतलीं माणसं जशीं होतीं तशींच्या तशींच तीं माझ्या स्वप्नांत आणलीं. दोन वर्षांत तीं बदललीं असतील, त्यांच्या जीवनांत आतां मला कांहींच स्थान नसेल हें मीं लक्ष्यांत घेतलं नाहीं. "

" स्थान नाहीं असं कसं होईल ? "

" होतंच असं. अगदीं नैसर्गिक आहे हें. मनुष्य मरतो तेव्हां आपण दुःख करतों कीं नाहीं. याच्यावांचून आपलं कसं होईल असं वाटतं आपल्याला. पण कुणाचं कांहीं अडत नाहीं. जगाचे व्यवहार आहे तसेच चालू रहातात. "

" कांहीं तरीच विचार येताहेत तुझ्या मनांत आज ! "

" येत नाहींत; मी आणतो आहे. शेजारच्या एक पोक्त बाई-रोज माझ्याकडून भाजी आणून घ्यायच्या, घरांत कांहीं खायला केलं तर मला द्यायच्या. ' उपेन्द्र गेल्यावर माझं कसं होईल ' म्हणायच्या. पण सगळं व्यवस्थित चाललंय् त्यांचं. उपेन् नाही तर दुसरा कोणी मिळाला असेल ! "

" मग नक्की म्हणायचंय् काय तुला ? "

" कांहीं नाहीं. सैरभैर विचार करतोय्. स्वतःची समजूत घालतोय् कीं हें सर्व नैसर्गिक आहे, योग्य आहे, जगरहाटीला, मनुष्यस्वभावाला धरून होतंय्; हें असंच व्हायला पाहिजे. मूर्खपणा माझा झाला, नसतीं स्वप्नं रंगवण्याचा ! "

" मग ? "

"मग कांहीं नाहीं. आतां परत जायचं कारणच राहिलं नाहीं."

" कारण आहे तर. तूं तिथं वाढला आहेस हें कारण नाहीं कां ? "

" माझं कोण आहे तिथं आतां ? इतके दिवस मी स्वतःला पोरका समजत नव्हतों. पण आतां समजतों. मला आई-वडील असते तर त्यांनीं माझ्या जीवनाचा असा खेळखंडोबा केला नसता !"

उपेन्द्र केंविलवाणा झालेला आँद्रेनं कधीं पाहिला नव्हता. तिला भडभडून आलं. प्रयासानं अश्रू आंवरीत ती पुटपुटली—
" पण उपेन्, मी आहे ना !"

बऱ्या शिरोडकरकडून पुण्याची हकीकत कळल्यापासून परत जाण्याचे विचार उपेन्द्राच्या मनांतून दूर पळाले होते. स्वतःबद्दल इतकी नाचक्की झाली असतांना परत जायचं कशाला आणि कोणासाठीं ? पदवी मिळाल्यानंतर त्याला मोठ्या पगाराची नोकरी खास परवाना काढून करतां आली असती; तिघांचीहि चणचण दूर झाली असती. मांडलेलं घर होतं, जेनी होती, बरेच मित्र होते. हें आयुष्य डावलून मृगजळामागें धांवण्याचं त्याला कांहीं कारण नव्हतं.

निकाल लागून पास झाल्याचं कळतांच त्याचा जीव भांड्यांत पडला. आँद्रेच्या परीक्षेचा निकाल आठवडाभर आधीं लागला होता. एका प्रकाशकाच्या कचेरींत तिला तिच्या आवडीची चांगल्या पगाराची नोकरीहि ताबडतोब मिळाली होती. उपेन्द्राच्या परीक्षेचा निकाल लागला त्यावेळीं आँद्रे नोकरीवर रुजूं झाली होती. आद्रियान् जेनीला घेऊन फिरायला गेली होती.

आनंद तर झाला होता, पण तो सांगायचा कोणाला ? शेवटीं उपेन्द्रानं आपल्या हिंदी मित्रांची गांठ घ्यायचं ठरवलं. ' सिते युनिव्हेर्सिते'भर फिरून दहा बारा लोक त्यानं गोळा केले, सगळ्यांना कॉफी प्यायला नेलं. नेहमींची औपचारिक अभिनंदन झालीं, हास्य-विनोद झाले.

" पण काय रे तूं पुढें काय करणार आहेस ? " कोणी तरी विचारलं.

" माझा मालक मला फुल्टाइम नोकरी देणार आहे. काम करायचा परवाना काढून आणीन–मालकाच्याच ओळखीनं अर्थात्."

" हिंदुस्थानांत जाणार नाहींस ? "

" सध्यां नाहीं जाणार ! "

" इथें नोकरी करण्यापेक्षां लंडनला कां नाहीं करत ? पुष्कळ इंग्लिश फर्म्सच्या हिंदुस्थानांत शाखा असतात. तुला परत पाठवतील. "

" अरे तो कसला जातोय् पॅरीस सोडून. त्याचं–" चौधरीनं जीभ चावली आणि वाक्य अर्धंच सोडलं. पण चारपांच जणांना त्याचा अर्थ कळला; ते मिस्कीलपणें हंसले.

" काय रे चौधरी ? अर्धवट कां बोललास ? सांगून टाक सरळ." कोणी तरी ओरडलं.

" काय ? सांगूं कां ? कीं राग येईल ? " चौधरीनं उपेन्द्रला विचारलं.

" राग काय यायचा आहे ? पॅरीस आहे हें. मनाला येईल तसं वागावं. सगळं उघड्यावर चालतं इथें. याचं प्रेमबीम जमलं असेल एवढंच ना ? त्यांत एवढें आढेवेढे कशाला घ्यायचे ? मी एक फ्रेंच बाई ठेवली आहे; सरळ सांगतों तुम्हांला." कोणी तरी भाष्य केलं.

" मग एका फ्रेंच बाईनं याला ठेवलं आहे; मीहि सरळ सांगतों तुम्हांला." चौधरी खिंकाळला. मागोमाग हास्याची एक फेरी झडली.

" हात्तिच्या, मग परीक्षेचं एवढं महत्त्व कशाला ? "

" नाहींच मुळीं. तिची चिक्कार इस्टेट आहे. दिसत नाहीं मात्र विशेष चांगली. काटकुळा बांबू आहे नुसता. असं कांहीं असल्याशिवाय कां हा एकाएकी ' सिते ' सोडून गेला– "

" बाकी चैन आहे खरी, आम्ही लेकाचे महिना दोन जेवणं मिळवायला धडपडतो, शिष्यवृत्ति पुरत नाहीं म्हणून ओरडतो–"

बराच काथ्याकूट झाला. उपेन्द्र मात्र सुन्नपणें बसला होता. स्वत:बद्दलच्या अफवा अनपेक्षितपणें ऐकून त्याला किळसल्यासारखं झालं होतं.

उपेन्द्रानं या अफवांचं निराकरण केलं नाहीं. अशक्यच होतं तें. शिवाय अफवा किळसवाण्या होत्या खऱ्या पण त्याबद्दल अंशत: तरी तो स्वत:च कारणीभूत झाल्याची जाणीव त्याला होत होती. परिस्थितीनं गांजल्यामुळें ऑँद्रेच्या बारक्या खोलींत त्याला रहावं लागलं होतं हें खरं. त्यानंतर स्वत:ला नोकरी मिळाली तेव्हां ऑँद्रेला मदत करण्यासाठीं म्हणून तो दूर गेला नाहीं. ऑँद्रेला फ्लॅट मिळाला तेव्हां त्यानं दूर जायला हवं होतं, तें आद्रियान्‌च्या गडबडींत राहिलं. आतां पदवी मिळाली तरी दूर जाण्याचे विचार त्याच्या मनांत कां येऊं नयेत ? विनाकारण त्यानं इथं गुरफटून कां पडावं ?

संवय-निव्वळ संवय ! उपेन्द्राच्या मनानं उत्तर दिलं. संवय आणि आळस. आयुष्याची घडी एकदां साधारण बसली होती ना ? ती कशीहि कां असेना, पुन्हां मोडायची अन् नव्यानं सुरुवात करायची याचा त्याला कंटाळा आला होता.

शांतपणें उपेन्द्रानं स्वत:च्या मनाचं विश्लेषण केलं, त्याची खडसून हजेरी घेतली आणि तांतडीनं लंडनला जाण्याचा निश्चय केला.

" ऑँद्रे, उपेन् लंडनला जाऊन नोकरी करणार म्हणाला तें तूं ऐकलंस ना ?" आद्रियान्‌नं विचारलं.

" हो. ऑँद्रे पाठमोरी असतांनाच उत्तरली. पण दु:खावेगानं थरथरणाऱ्या तिच्या रुंद खांद्यांवरून तिच्या मन:स्थितीची कल्पना सहज करतां येत होती.

" तो लंडनला कां जाणार, परत केव्हां येणार वगैरे खुलासाहि त्यानं केला नाहीं !" आद्रियान् स्वत:शी पुटपुटली. तिचा गोंधळ उडाला होता. काय बोलावं, काय करावं हें तिला सुचत नव्हतं. पूर्वीं एकदां तिचं आणि ऑँद्रेचं उपेन्द्राबद्दल बोलणं झालं होतं,

त्यानंतर दोघींत तो विषय पुन्हां निघाला नव्हता. पण अलीकडे पहावं तेव्हां ऑंद्रे व उपेन्द्र परीक्षा संपतांच चांगली नोकरी मिळवायची, प्रवास करायचा, वगैरे बेत करीत असल्यामुळें चांगली नोकरी मिळतांच उपेन्द्र ऑंद्रिला मागणी घालणार असं आद्रियान्नं गृहीतच धरलं होतं. त्याला उपेन्द्राच्या अनपेक्षित घोषणेनं चांगलाच धक्का बसला होता.

" त्याला तूं जाऊं देणार ?" थोडा वेळ घुटमळून आद्रियान्नं पुन्हां विचारलं. होतय् हें बरं नाहीं असं तिला राहून राहून वाटत होतं.

" त्याला थांबवण्याचा मला काय हक्क ?"

" पण ऑंद्रे, तुझं तो ऐकेल. "

उत्तर नाहीं.

" निदान त्याचं मन वळवण्याचा प्रयत्न तर करशील " आद्रियान्.

पण ऑंद्रे होती तशी स्तब्ध उभी होती. तिचं मन इतकं जबरदस्त दुखावलं होतं कीं आद्रियान्च्या बोलण्याचा तिच्यावर कांहींहि परिणाम होत नव्हता

नाइलाजानं आद्रियान्नं उपेन्द्राच्या खोलीकडे पावलं वळवलीं उपेन्द्र हाताला येईल ती वस्तु बॅगेंत टाकत होता. लंडनला निघाला होता खरा, पण इथें निर्माण केलेले बंध सुटत नव्हते, शेजारीं वाढलेलीं दोन झाडं मुळं तोडल्याशिवाय दूर होत नव्हतीं.

" जाण्याची इतकी घाई कां ? " आद्रियान्.

" जितक्या लवकर जाईन, तितक्या लवकर नोकरी मिळेल. "

" परत कधीं येणार ? "

" पाहूं या. आतांच काय सांगूं ? "

" मग–मग–ऑं–आमचं कसं ? " आद्रियान्नं धीर करून विचारलं.

" जेनीसाठीं पैसे पाठवायचं मी ठरवलं आहेच. ऑंद्रेला चांगली नोकरी आहे. "

" तुझ्या पैशासाठीं कां मी विचारलं ? आम्हांला तुझ्याबद्दल कांहींच वाटत नाहीं असं समजतोस तूं ? "

उपेन्द्र ओशाळा झाला.

" माझ्या म्हणण्याचा तसा अर्थ नव्हता आद्रियान्. मलासुद्धां जातांना वाईट वाटत नाहीं कां ? चार दिवस तुम्हांलाहि वाटेल. मग होईल संवय. जगाचा न्यायच आहे हा. जेनीचे मात्र मुळींच हाल करूं नकोस हो ! कांहीं लागलं तरी मला कळव. "

आद्रियान् उत्तर न देतां निघून गेली, आणि भकास मुद्रेनं जेनीला घेऊन बसली. याहून अधिक कांहीं करणं तिला शक्य होत नव्हतं.

● ● ●

## १३

लंडनमध्यें आल्यानंतर उपेन्द्राला एकलकोंडेपणामुळं अक्षरशः वेडावल्यासारखं झालं. त्याचा चिडकेपणा वाढला, दिसेल त्या गोष्टीला तो नांवं ठेवूं लागला—लंडनची हवा भिकार होती आणि लोक आणखीनच भिकार होते, इत्यादि इत्यादि. खरी वस्तुस्थिति अशी होती कीं त्याच्या कल्पनेपेक्षांहि अधिक आँद्रेच्या साहचार्यावर तो अवलंबून राहिला होता. आँद्रेच्या स्नेहामुळें त्याला एकलकोंडे-पणा कधीं जाणवला नव्हता कीं त्याची बौद्धिक उपासमार कधीं झाली नव्हती. हिशेब ठेवणं, कपड्यांना इस्त्री करणं वगैरे लहान-सहान गोष्टी देखील पार पाडणं त्याला आँद्रेच्या अभावीं जड जाऊं लागलं.

वास्तविक पहातां घरांतून बाहेर पाऊल टाकणं उपेन्द्राला भल-तंच जड गेलं होतं.

" ओ र्व्हार् आँद्रे " हे शब्द त्यानं उच्चारले तेव्हां त्याचं

अन्तर्मन आशा करीत होतं—अजून आँद्रे आपल्याला पॅरीसलाच रहाण्याची विनंति करील ! पण आँद्रेनं उत्तर दिलं होतं,

" ओ रव्हार् उपेन्. अं द से झूर ( भेटूं केव्हां तरी ) !"

या उत्तरावर उपेन्द्र चिडला होता. आपण लंडनला जातों म्हणावं आणि आँद्रेनं निमूटपणानं आपल्याला निरोप द्यावा हें बरोबर नाहीं असं त्याला वाटत होतं. आँद्रेनं त्याचं मन वळवण्यासाठीं एखादाच शब्द उच्चारला असता तरी उपेन्द्रानं लंडनला जाण्याचा बेत रद्द केला असता. पण आँद्रेच्या मौनाचा अर्थ त्यानं वेगळाच केला. त्यानं निघून जावं अशीच आँद्रेची इच्छा होती. स्वतःचं आयुष्य स्वतंत्रपणानं जगण्याचा प्रयत्न तिला करायचा होता.

" कंटाळून तिनं माझा अपमान करण्यापूर्वीच मी बाहेर पडलों हा शहाणपणाच झाला ! " उपेन्द्रानं स्वतःचं समाधान करून घेतलं.

लंडनला आल्यावर आठवड्याभरांत त्याला एक चांगली नोकरी मिळाली. एका हॉटेल्मध्यें तो राहूं लागला. आँद्रेला त्यानं एक लहानसं पत्र लिहून टाकलं; नोकरीची माहिती दिली, पत्ता कळवला आणि जेनीसाठीं एक चेक पाठवला.

आँद्रे, उपेन्चं पत्र. आद्रियान्ची आरोळी ऐकतांच आँद्रे बाथ गाऊन चढवून स्नानगृहांतून घाईघाईनं बाहेर आली.

" बघूं, बघूं !" स्वतःचं दुःख विसरून पत्र तिनं घाईघाईनं ओढून घेतलं. पण तें चार ओळींचं तुटक पत्र वाचून तिला चांगलाच राग आला. जवळच घुटमळणाऱ्या आद्रियान्कडे तिनं तें फेंकून दिलं.

" हें घे वाच; तुला चेक पाठवला आहे तोहि घे. "

आद्रियान्नं पत्र वाचून काढलं.

" यांत रागावण्यासारखं काय आहे आँद्रे ? "

" कांहींच नाहीं ? रागावण्यासारखं कांहीं नाहीं यांत ? दोन वर्षं आम्ही एकमेकांना मनांत येईल तें सांगितलं, जगण्यासाठीं एकत्र धडपडलों, जीवनाचा अर्थ शोधायचा प्रयत्न केला व आमच्यांत मित्रत्वाचे बंध निर्माण झाले—निदान त्यानं तसा भास

तरी निर्माण केला. त्याची कांहींच कां किंमत नाहीं ? माझी कांहींच किंमत नाहीं ? एक दिवस त्यानं उठावं आणि कांहींहि खुलासा न करतां लंडनला चालूं लागावं ? मी त्याच्यावर प्रेम करते म्हणून स्वतःचा मान-अपमान मी सोडलेला नाहीं. त्यानं कसंहि वागावं, जुजबी ओळख असलेल्या माणसाची फिकीर करतो एवढीहि माझी करूं नये आणि तरी मी त्याची विनवणी करावी ? माझ्या हातून हें कधींच होणार नाहीं. मी जन्मभर दुःखी राहिलें तरी बेहत्तर. हें चार ओळींचं पत्र माझ्यासाठीं नाहीं. हें कुठल्याहि सोम्यागोम्याला लिहिलं असतं त्यानं. मला वाटलं होतं तो एकाएकी लंडनला कां चालला हें त्याला प्रत्यक्ष शब्दांत सांगतां आलं नसेल, तं तो लिहून कळवील—"

आद्रियान्नं आग्रहानं केलेल्या सूचना न जुमानतां आँद्रेनं उपेन्द्राला उत्तर न पाठवण्याचा निश्चय कायम केला. शेवटीं आद्रियान्नंच त्याला पत्र लिहिलं :

प्रिय उपेन्,

तुझी खुशाली समजून आनंद झाला. आँद्रे नोकरीच्या गडबडींत असल्यामुळें तिला उत्तर लिहायला वेळ झाला नाहीं. जेनी मजेंत आहे. तिला चेक पाठवल्याबद्दल आभार. पण मला येत्या आठवड्यांत नोकरी मिळते आहे म्हणून तुझा चेक परत पाठवीत आहे. गरज पडली कीं हक्कानं मागून घेईन. रजा मिळतांच इकडे ये. मी, जेनी व आँद्रे वाट पहात आहोंत.

आद्रियान्.

पत्रांतले दोनच मुद्दे उपेन्द्राला विशेष जाणवले—आँद्रे नोकरीच्या गडबडींत गुंतली आहे व आद्रियान्नं चेक परत पाठवला आहे.

"आद्रियाननं कोणती कोपरखळी मारायचं शिल्लक ठेवलं आहे ?" विषण्णपणानं उपेन्द्रानं स्वतःशी विचार केला.

"चेक परत पाठवून तिनं माझी मदत नको असल्याचं सूचित केलंच आहे. आँद्रे गडबडींत असल्याचंहि लिहिलं आहे. मला पत्र

लिहायला वेळ मिळूं नये तिला ? मला वाटलं होतं त्याहिपेक्षां लवकर माझ्या अस्तित्वाच्या खुणा त्यांच्या स्मृतींतून नष्ट झाल्या तर ! ”

आद्रियान्चं पत्र उपेन्द्रांनं शेकोटींत टाकून दिलं आणि कितीहि तीव्र इच्छा झाली तरी पुन्हां आँद्रेला पत्र लिहिण्यासाठीं हात उचलला नाहीं.

उन्हाळ्याला प्रारंभ झाला तेव्हां उपेन्द्राचं मन किंचित् प्रसन्न होत चाललं. ऑफिस सुटायची वेळ होईपर्यंत उन्हं थंडावूं लागायचीं; पण बागेतल्या हिरवळीवर पडलेला तो पिवळट प्रकाश डोळ्यांना सुखवायचा, काल्पनिक ऊब द्यायचा. पांच वाजले कीं उपेन्द्र घाई-घाईनं पिकॅडली सर्कसच्या गर्दीतून मार्ग काढीत जेम्स पार्ककडे निघायचा. उन्हांत चमचमणारीं तिथलीं बदकं पहाण्यांत तासभर तो आनंदानं घालवायचा.

पण आजचा योग कांहीं वेगळाच होता. आयत्या वेळेला कांहीं नवीन घरांचे आराखडे तांतडीनं तपासण्याचं काम त्याच्याकडे आलं त्यामुळें ऑफिस सोडायला त्याला जवळ जवळ सहा वाजले. त्यांतून गुरुवारचा दिवस. पिकॅडली विभागांतलीं सर्व दुकानं संध्याकाळीं सातपर्यंत उघडीं असायचीं. बायका-पुरुषांची नुसती झुंबड उडाली होती. त्रासिक चेहऱ्यानं उपेन्द्र जवळ जवळ धक्काबुक्की करीत पुढें सरकूं लागला.

“ आई गऽ ” एक बायकी आरोळी त्याच्या कानांवर पडली. त्यानं कोणाच्या तरी पायांवर पाय दिला असावा.

“ माफ करा हं ! ” तो ओशरतं पुटपुटला. आतां पुढें सटकणार एवढ्यांत त्या मुलीनं त्याला अडवलं.

“ आतां पुन्हां मला टाळायला पहातांहात होय ? ” ती विचारीत होती.

आठवणींची सांगड जुळायला थोडा विलंब लागला.

“ मंजुघोषा !” तो ओरडला “ आय् मीन मिस् दयाळ. ” त्यानं स्वतःला सांवरून घेतलं.

" आठवण आहे तर तुम्हांला ! "

" मला अर्थात् आहेच. तुम्हाला आहे हें विशेष ! "

" कां बायकांना स्मरणशक्ति नसते या मताचे आहांत कीं काय तुम्ही ? "

" अंहं ! पण बायकांना स्वतःपुढें इतरांचं भान नसतं या मताचा आहे. "

मंजुघोषा बोलघेवडीच होती. नेहमींच्या नीरस आयुष्यक्रमांत थोडासा बदल झाल्यामुळें उपेन्द्रहि खुषींत आला होता. तसंच पॅरीसमध्यें तिनं आर्जवानं दिलेलं आमंत्रण आपण फेंटाळलं हें त्याला नकळत खोल कुठें तरी डांचत होतं, तें त्याला आतां प्रकर्षानं जाणवूं लागलं. ती उणीव भरून काढण्याचा त्यानं निश्चय केला.

" इथें रस्त्यांत उभं राहून शब्दांची फेंकाफेंक करण्यापेक्षां आपण स्वस्थ कुठेंतरी बसून चहा घेतला तर ? "

उपेन्द्रानं सुचवलं

" अरे वाः तुम्ही बरेच सुधारलेले दिसतां. पॅरीसला तुम्ही मला बरेंच घाबरलां होतां ! " त्याचं आमंत्रण स्वीकारीत मञ्जुघोषा उद्गारली.

उपेन्द्रानं पाहिल्यापासून मञ्जुघोषेंत थोडासा फरक पडला होता. दोन वर्षांपूर्वी आपल्या सौंदर्याची व तारुण्याची जाणीव तिला नुकतीच कुठें होऊं लागली; एखाद्या पुरुषानं थोडंसं रोंखून पाहिलं तरी लाजून ती कावरीबावरी होत होती. आतां सौंदर्याचा उन्माद तिच्या अंगवळणी पडला होता. प्रत्येक तरुणानं तिच्या पुढेंपुढें करायचं हें तिच्या चांगलंच परिचयाचं झालं होतं. आपण सुंदर आहोंत एवढ्या ज्ञानावर तिचं समाधान होत नव्हतं तर तें सौंदर्य वाढविण्याचा ती कसोशीनं प्रयत्न करीत होती. केस कुरळे करून डाव्या कानाच्या मागें तिनं अंबाड्यासारखे बांधले होते. पुसटशी फाउंडेशन क्रीम लावून चेहरा अधिकच तुकतुकीत केला होता. भिवया रेखल्या होत्या, ओठांना फिकट लिप्स्टिक् लावली होती.

चेहऱ्याचा बदामाकृति घाट बघणाऱ्याच्या ध्यानांत यावा म्हणून हनुवटीमधूनच मानेच्या पायथ्याशीं टेंकाविण्याची लकब तिनं स्वतःला लावून घेतली होती. तिच्या हालचालींतला नवखेपणा, गोंधळ कमी झाला होता; तिचं बोलणं-चालणं तोलून, मापून, एक प्रकारच्या संथ ढबीनं पार पडत होतं.

उपेन्द्रानं तिला जवळच्याच एका आलिशान रेस्टॉरंटमध्यें नेलं. रेस्टॉरंटच्या दाराशीं अदबीनं उभं राहून तिच्या पाठीला पुसट स्पर्श करीत त्यानं तिला आंत चलण्याची विनंती केली. असे बारीक सारीक उपचार मञ्जुघोषेला फार प्रिय होते. ऐटींत ती आंत शिरली. न बुजतां प्रत्येक टेबलाचं तिनं निरीक्षण केलं. कुठें बसणं आवडेल हें मनाशीं जोखलं आणि लालबुंद टोंकेरी नखाची तर्जनी नाचवीत खड्या सुरांत ती म्हणाली,

" त्या खिडकीजवळच्या टेबलावर बसूं या कां ? "

" तुम्हांला आवडेल तसं." मान झुकवून उपेन्द्रानं उत्तर दिलं.

उपेन्द्रानं पाश्चात्य उपचार इतक्या नैसर्गिकपणें पाळावेत यावर मञ्जुघोषा बेहद्द खूष झाली. दोन वर्षांपूर्वी तो तिला आवडला होताच, आतां रुबाबदार कपडे आणि सफाईदार वागणूक याची भर पडल्यामुळें तर तिचं त्याच्यावर बरंच मन जडलं.

" आधीं सांगा, मला पॅरीस कां नाहीं दाखवलंत तें ? कबूल करून आला नाहींत ! " लटक्या रुसव्यानं मञ्जुघोषेनं गाल फुगवले.

" चुकलों म्हणतों ना ! त्याबद्दल किती वेळां माफी मागूं ? कीं पॅरीसला नेऊन आणूं तुम्हांला ? "

" एवढं नको करायला. पण एकदां माझ्याकडे येऊन माझ्या सगळ्या मित्रमैत्रिणींना पॅरीसच्या गप्पा सांगितल्या पाहिजेत तुम्ही."

"अरे बापरे, पॅरीसच्या गप्पा काय अशा वेगळ्या असतात ?"

" तुमची एकहि सबब मी ऐकून घेणार नाहीं. आतां आधीं तुमचा पत्ता आणि फोन नंबर द्या बरं लिहून. त्याशिवाय चहा घेणारच नाहीं मी ! "

मञ्जुघोषेनं गोळा केलेल्या मित्रमैत्रिणी हेंच तिचं जग होतं. दर दोन तीन वर्षांनीं तिच्या वडिलांची नवीन देशांत बदली व्हायची. जुनं घर, जुनी शाळा, मैत्रिणी सगळ्यांना रामराम ठोकायचा, पुन्हां नवा डाव मांडायचा, हेंच मञ्जुघोषेचं आयुष्य होतं. वकिलातींत काम करणारे लोक असतील, त्यांचीं मुलं गोळा करायची, सिनेमा पहायचा, पार्ट्या झोडायच्या, नवीन देशांतल्या नवीन वस्तु खरेदी करायच्या या पलीकडे जीवनांत कांहीं असतं याची मञ्जुघोषेला कल्पनाच नव्हती. तिच्या आईवडिलांचं, मित्र मैत्रिणींचं जगहि असंच संकुचित होतं. लंडनमध्यें तिचं मित्रमंडळ बरंच मोठं झालं होतं खरं, पण शॉपिंग, रेडियो टेलिव्हिजन, सिनेमा, नाटक, पार्ट्या या करमणुकी आणि बोलण्याचे हेच विषय कायम राहिले होते.

या मित्रमंडळाच्या पार्श्वभूमीवर उपेन्द्र आपल्या वेगळेपणानं उठून दिसत होता. प्रत्येक गोष्टीवर सखोल विचार करण्याची त्याला संवय होती. त्यानं भोगलेल्या संघर्षांचं प्रतिबिंब त्याच्या वागण्यांतून प्रतीत होत होतं. इतरांपेक्षां तो जास्त परिपक्व, निधड्या छातीचा वाटत होता. मञ्जुघोषेनं मोठ्या कौतुकानं आपल्या मित्रमंडळाशी त्याची ओळख करून देण्याचं ठरवलं.

सोफ्यावर पडून उपेन्द्र विषण्णपणें गॅसच्या ज्वालांकडे टक लावून पहात होता. हिंवाळ्याची चुणूक जाणवूं लागली होती. उपेन्द्रानं नुकताच दोन खोल्यांचा टुमदार फ्लॅट भाड्यानं घेतला होता. संध्याकाळभर एकट्यानं तिथं पडून रहाणं त्याच्या जिवावर आलं होतं. मुख्य म्हणजे सकाळपासून लेडी हेस्टिंग्ज हॉलमध्यें नृत्याला जायचं, अर्थात् मञ्जुघोषेला बरोबर घेऊन, असा बेत त्यानं मनाशीं इतका पक्का केला होता, पुन्हां गिरवला होता कीं मञ्जुघोषेनं साफ नाहीं म्हटल्यावर तो नुसता खट्टू झाला नव्हता तर चांगलाच चिडला होता. कधीं नव्हे तीं त्यानं तिची फोनवर बरींच आर्जवं केलीं होतीं.

"चला कीं! पहिली अपॉइंटमेंट रद्द करा."

" तें कसं शक्य आहे ? " मञ्जुघोषा.

" माझ्या मतें ही थाप आहे तुमची. चार मैत्रिणी गोळा करून टेलिव्हिजन पहात बसणार असाल. "

" खरंच नाहीं ! "

" कोणाबरोबर जायचंय् ? "

" मी नाहीं सांगणार. "

" तो बुटबैंगण बंगाली बाबू असेल ! "

" अंहं ! "

" मग बिहारीलाल ? शिरीन मेहता ? "

" छेः ! "

एकामागोमाग एक त्यानं तिच्या सर्व मित्रमैत्रिणींचा पाढा वाचला.

" हरलों बुवा ! " त्यानं शेवटीं कबुली दिली.

" आतां एकच नांव उरलंय्. "

" रिचर्ड ? " त्यानं विचारलं.

ती नुसतीच हंसली. कंटाळून त्यानं फोन ठेवून दिला. तिनं मुद्दामच टोलवाटोलवी केली, खरं महत्त्वाचं कांहींच काम तिला नाहीं याची कल्पना त्याला आली. पण तिच्यावर जबरदस्ती करून तो तिला नृत्याला नेऊं शकत नव्हता.

मञ्जुघोषेचं आकर्षण कुणालाहि वाटणं साहजिक होतं. शिवाय कुणाच्या तरी सहवासाची उपेन्द्राला निकडीची गरज होती अशा-वेळीं तिनं त्याच्या जीवनांत प्रवेश केला होता. परिचय वाढल्या-नंतर त्याला ती बरीच आवडली. सुन्दर मुली त्यानं पॅरीसमध्यें पुष्कळ पाहिल्या होत्या. पण पाश्चात्य समाजांतल्या मुली पाळण्या-बाहेर पडतात न पडतात तोंच आयुष्याच्या झळीला तोंड द्यावं लागतं त्यांना. आईवडिलांनीं घराच्या उबेंत वाढवलेल्या, मायेच्या पंखाखालीं दडवलेल्या हिंदी मुलींच्या चेहऱ्यावर जीवनाविषयीं जी ओढ, जें प्रेम दिसतं, परक्याविषयींदेखील जो निरागस विश्वास प्रतीत होतो त्याची अपूर्वाई वेगळीच. पाश्चात्य मुली सुंदर तित-

क्याच निढावलेल्या; त्यांच्या नजरेंत राकटपणा व संशय असतो. मंजुघोषा मऊ लोणी होती, अवखळ होती, जगाच्या टक्क्या-टोणप्यांनीं तिच्या सौंदर्याला राठपणाच्या मुशींत ओतलं नव्हतं.

उपेन्द्राच्या दृष्टीनं मंजुघोषेंतलं दुसरं आकर्षण म्हणजे तिच्या भोंवतालीं नित्य वावरणारं तिचं मित्रमंडळ. दहापंधरा लोकांनीं गप्पा करण्यांत वेळ घालवायचा या सुखाला उपेन्द्र पॅरीसमध्यें आंचवला होता; सामाजिक बाबतींत त्याची चांगलीच उपासमार झाली होती. लंडनला हिंदी लोक बरेच होते, त्याला ओळखी करून घेतां आल्या असत्या—नाहीं असं नाहीं. पण चौधरीनं त्याच्याबद्दल उघड उघड काढलेले उद्गार आठवले कीं तो गांगरायचा. ओळखी करायच्या, मित्र जोडायचे, त्यांचें आपल्यावर प्रेम आहे असं समजायचं आणि एखाद दिवशीं असा धक्का बसायचा. पाहिजे कशाला कटकट ? अशी त्याची याबाबतची विचारसरणी अलिकडे बनली होती.

पण मंजुघोषेनं आपलं मित्रमंडळ त्याच्या माथीं मारलं होतं. दाराशीं आयतं चालून आलेलं, मनांतून हवंहवंसं वाटणारं सौख्य डावलण्याइतका तो कुढा आणि बुजरा झाला नव्हता. उलट चहा पितां पितां आपल्या मित्रमैत्रिणींच्या अनेक गमतीजमती बडबड्या मञ्जुघोषेनं त्याला ऐकवल्या होत्या तेव्हां त्या सर्वांमध्यें मिसळण्याची एक दुरापास्त ओढ त्याला लागली होती. दोनचार दिवस त्याचा हात एकसारखा मञ्जुघोषेला फोन करण्यासाठीं शिवशिवत होता. चौधरीची आठवण ताजी होती म्हणूनच तो संयम राखूं शकला. चार पांच दिवसांनी मञ्जुघोषेनंच त्याला फोन केला.

“ ओळखा पाहूं कोण आहे तें ? ”

“ नाहीं बुवा ओळखत; सगळ्या बायकांचा आवाज फोनवर एकसारखाच येतो. ” उपेन्द्रानं खट्याळपणा केला.

“ बरं, एकदोन नांवं तरी घ्या. ”

“ छान. म्हणजे तुम्हांला माझ्या सगळ्या मैत्रिणींचीं नांवं कळतील. ”

" भारी खट्याळ आहांत तुम्ही. तुम्हांला पक्कं माहीत आहे, मी मञ्जुघोषा बोलतेंय् म्हणून ! "

" कसं माहीत असेल ? तुम्ही काय मला रोज फोन करतां ? कीं आज करीन असं कबूल केलं होतं ? "

" बाई बाई बाई. तुमच्या या बोलण्यानं मला काय सांगायचं होतं तें विसरून जाईन मी ..हॅलो, हॅलो, are you there? "

" Of-course, मी कुठें जाणार ? "

" मग बोलत कां नाहीं ? "

" तुम्हींच सांगितलं जरा गप्प बसा म्हणून ! "

" You silly thing ! उद्यां माझ्याकडे येणार कां ? "

" कां ? काय आहे ? "

" येणार कीं नाहीं तें सांगा अगोदर. "

" तुमचा वाढदिवस कीं—"

" वेळ आहे ना ? "

" आहे. "

" मग संध्याकाळीं सहा वाजतां या. " मञ्जुघोषेनं रिसीव्हर जोरांत खालीं ठेवला.

त्या दोघांमधलं संभाषण नेहमीं याच स्वरूपाचं होई—टेनिसचे शॉट् मारल्यासारखं. तसं पाहिलं तर गंभीर विषयांची देखील उपेन्द्राला बरीच आवड होती. पण मञ्जुघोषेच्या सान्निध्यांत त्यानं चुकून देखील गांभीर्याची बैठक कधीं घेतली नाहीं ! कुठलाहि प्रसंग असो, मनाची कसलीहि लहर असो उपेन्द्र मञ्जुघोषेशीं या सुरांत गप्पा करायचा. आपण तिच्याशीं इतक्या निकटपणानं बोलतों हे बरं नाहीं असं उपेन्द्राला कधीं कधीं वाटायचं पण गुटगुटीत लहान मुलाचे गालगुच्चे घेण्याचा मोह आवरत नाहीं तसं मञ्जुघोषेला चिडविल्याशिवाय त्याला कधीं रहावलं नाहीं.

आठवड्यांतून एकदां तरी तीं दोघं एकत्र बाहेर जात. सफाई-दार नृत्य करण्याचा तिला सराव व्हावा म्हणून नृत्याला जाण्याची इच्छा तिनंच अनेकदां व्यक्त केली होती. त्यानं तिला चारपांचदा



नृत्याला नेलंहि होतं. पाश्चात्य नृत्य ती शिकली होती हें खरं पण बहुसंख्य हिन्दी स्त्रियांप्रमाणें बॉल् नृत्य करतांना आंग घुसळण्याची व पाय उचलून आपटण्याची तिची संवय अजून गेली नव्हती. संगीताच्या बेहोषींत बुडून लाटेवर आंदुळल्याप्रमाणें वरखालीं होण्याचा कैफ आहे तो मञ्जुघोषेबरोबर मिळणं अशक्य होतं; त्यासाठीं पिसाप्रमाणें जमिनीसरपट तरंगणारी अँद्रेच हवी होती अर्थातच मञ्जुघोषेबरोबर नृत्याला जाण्यापेक्षां सिनेमाला अगर जेवायला जाणंच उपेन्द्र पसंत करीत होता..

पण आज मात्र नृत्य करण्याची त्याला पोटांतून लहर आली होती. मञ्जुघोषेखेरीज ओळखीची दुसरी मुलगीहि त्याच्या डोळ्या-समोर नव्हती. ऑफिसांतल्या टायपिस्ट मुलीशी खाजगीरीत्या ओळख वाढवणं त्याला संमत नव्हतं. अर्थात् मञ्जुघोषेनं त्याला नकार दिल्याची ही पहिलीच वेळ होती असं नाहीं. उपेन्द्राखातर स्वत:चे व्याप मञ्जुघोषेनं कधीं सोडले नव्हते. फोन करून उपेन्द्रानं तिला जेवायला यायचं आमंत्रण दिलं कीं कधीं कधीं ती म्हणायची—

“ आज नको. आज नाहीं जमणार ! ”

उपेन्द्रालाहि त्याचं विशेष कांहीं वाटायचं नाहीं. एकमेकांशिवाय पान हालणार नाहीं अशी जवळीक त्यांच्यांत उत्पन्न झाली नव्हती. एकदां थट्टेनं तो तिला म्हणाला—

“ राहिलं बुवा. आमचा नंबर केव्हां लागतो तें सांगा ! ”

त्यानंतर तिला कधीं वेळ नसला तर ती म्हणायची—

“ आज तुमचा नंबर नाहीं. दुसऱ्या कोणाचा तरी आहे. ”

त्यांतलाच आजचा प्रकार होता याची उपेन्द्राला खात्री होती. पण त्यामुळें नृत्याला जायच्या त्याच्या बेतावर पाणी पडल्यासारखं झालं होतं तें त्याला विसरतां येत नव्हतं. शेवटीं रागारागानं तो एकटाच नृत्याला गेला.

एकदोन अनोळखी स्त्रियांबरोबर उपेन्द्रानं दोनतीन नृत्यप्रकार केले. पण त्याचं समाधान होत नव्हतं. चालू नृत्य संपलं कीं घरीं

जायचं असा त्यानं निश्चय केला. एवढ्यांत हॉलच्या दुसऱ्या टोंकाला मञ्जुघोषा आणि रिचर्डची जोडगोळी त्याला दिसली. फॉक्स ट्रॉट-सारखा कठीण नृत्यप्रकार मञ्जुघोषेला जमत नव्हता. पण गर्दींत फारशी हालचाल केली नाहीं तरी चालत होतं. रिचर्डच्या खांद्यावर हात टाकून ती जागच्याजागींच थोडीशी चळवळ करीत होती.

तिनं केंसांच्या कुरळ्या नळकांड्या मानेवर सोडल्या होत्या. जरीठिपक्याचं मखमली पोलकं आणि झकपकणारी सोनेरी जरी-जॉर्जेटची साडी ती नेसली होती. एकदां उपेन्द्राबरोबर हीच साडी नेसून ती नाटकाला आली होती तेव्हां त्यानं विचारलं होतं,

" अरे वा: आज फॅन्सी ड्रेस पार्टी होती कां ? "

" असं काय करतां ! किती चिडवाल ! "

" पॅरीसमध्यें एका चौकांत डायनाचा सोनेरी पुतळा मांडला आहे त्याची आठवण झाली म्हणून विचारलं. "

यावर ती बरीच लाजली होती.

रिचर्ड स्टोनला उपेन्द्र नीटसा ओळखत नव्हता. मञ्जुघोषेनं त्यांची एकदां जुजबी ओळख करून दिली होती तेवढीच. वरकरणी पहातां रिचर्डचे कपडे अगदीं साधे वाटत. पण अशा साध्या काप-णीच्या अंगालगत बसणाऱ्या कपड्यांना बरेच पैसे मोजावे लागतात हें दर्दी माणसाला सहज कळून येत असे. रिचर्ड उंचच उंच आणि काटकुळा होता. पण यत्किंचित्‌हि पोंक नसल्यामुळें डौलदार दिसा-यचा. त्याचे केंस काळे होते. पण त्यामध्यें पिंगट छटा चमकायच्या तें फार गमतीदार दिसायचं. कपाळ रुंद होतं आणि दोन्ही टोकांना किंचित् वर चढलं होतं. डोळे हिरवट, लहान होते. पण काळ्या सुस्पष्ट भिंवयांमुळें त्यांचा लहानपणा बोंचत नसे. नाक सरळ टोंकेरी होतं. कानशिलाकडच्याँ व गालावरची हाडं स्पष्ट दिसत होती. पण तोंडवळ्याच्या बांध्याची सुबकता इतकी अप्रतिम होती कीं रिचर्डचा चेहरा एकदां पहातांच विसरणं कठीण होतं.

त्याच्या चेहऱ्याइतकंच त्याचं वागणंहि डोळ्यांत भरायचं. तो हंसरा खेळकर तर होताच. पण त्याच्या हालचालींतली सहजता

अवर्णनीय होती. चारचौघांत वागतांना प्रत्येकाला स्वतःचं कांहीं तरी न्यून डांचूं लागतं. कोणी नाकावरचा काल्पनिक घाम टिपूं लागेल, कोणी खाण्याचा संकोच करील, कोणाला टक्कल म्हणून तर कोणाचं पोलकं उसवलं म्हणून तर कोणी लिप्स्टिक् ओठांबाहेर पसरली या शंकेनं बावरल्यासारखी वागेल. रिचर्डचं वागणं मात्र नेहमींच अकृत्रिम, गंडरहित असायचं. जणुं कांहीं या बाह्य गोष्टींकडे तो पूर्ण दुर्लक्ष करूं शकत होता. किंवा त्यानं त्या इतक्या चोख-पणानं पार पाडल्या होत्या कीं त्याबद्दल पुसटसा विचार करण्याचं देखील त्याला कारण नव्हतं.

मंजुघोषेला रिचर्डबरोबर पाहून उपेन्द्राला नेमकं काय वाटलं हें सांगणं कठीण आहे. त्याच्या नकळत त्याच्या मनानं मंजुघोषेबद्दल कांहीं कयास बांधून ठेवले होते ते धडाधड कोसळले. मंजुघोषेवर त्याचा कांहीं हक्क नव्हता, रिचर्डबरोबर आपण बाहेर जात असल्याचं तिनं त्याला स्पष्ट सांगितलं होतं वगैरे सर्व त्याला पटत होतं. पण तरीसुद्धां आपल्याला आवडलेली ती सोनेरी साडी तिनं नेसावी, केसांचा अंबाडा न बांधतां ते मोकळे सोडावे, रिचर्डला खेटून—त्याच्या मतें वाजवीपेक्षां जास्त खेटून—नाचावं असल्या क्षुल्लक गोष्टींवर तो पोरकटासारखा तापला होता

मंजुघोषेकडे पहातां पहातां उपेन्द्राची पावलं ताल सोडून पडूं लागलीं होतीं. त्याच्या पार्टनरनं त्याला विचारलं—

" त्या हिंदी मुलीकडे टक लावून कां पहातोस ? तिच्याबरोबरच्या तरुणाचा तुला मत्सर वाटतो कां ? " " छे: छे:, एका महत्त्वाच्या कामाची आठवण आली. मला गेलंच पाहिजे; माफ करा !" आणि सर्व उपचारांना धाब्यावर बसवून उपेन्द्र नृत्य संपण्यापूर्वींच बाहेर पडला

दुसऱ्या दिवशीं सकाळच्या डांकेनं उपेन्द्राला ऑंद्रेचं पत्र आलं.

प्रिय उपेन्द्र,

आद्रियान्‌ला तूं चार समजुतीच्या गोष्टी सांगाव्यास या इच्छेनं हें पत्र लिहीत आहे. तूं गेल्यानंतर थोड्याच दिवसांनीं तिनं एका

नाइटक्लबमध्यें सिगरेट्स विकण्याची नोकरी धरली. दिवसा जेनीला संभाळून नोकरी करणें तिला शक्य होत नाहीं व माझ्याकडून कसलीच मदत ती स्वीकारत नाहीं. ही नोकरी तिला झेंपली नाहीं. 'चेहरा आनंदी दिसत नाहीं, झोंपाळु दिसतो' या सबबीवर तिला काढून टाकण्यांत आलं. त्यानंतर तिला दुसऱ्या नाइटक्लब-मध्यें 'कान् कान्' नृत्य करण्याची नोकरी मिळाली. पण तें नृत्य शिकत असतांनांच तिचा उजवा पाय दुखावला आणि मॅनेजरहि फार लघळपणा करूं लागल्यामुळं ती नोकरी तिनं सोडून दिली. सध्यां ती अत्यंत निराश झाली आहे—शिक्षण नाहीं, नोकरी मिळत नाहीं म्हणून एकसारखी रडत असते. एखाद वेळेला निराशेच्या भरांत ती स्वतःचं कांहीं तरी बरं वाईट करून घेईल अशी भीति वाटते. म्हणून तुला कळवलं आहे तूं तिला पत्र लिहून पहा.

—आँद्रे.

आँद्रेनं पत्र मुद्दाम तुटकपणानं आणि खुपेल अशा दूरत्वानं लिहिलं होतं. पण पत्र आलं एवढ्यावरच उपेन्द्राचं समाधान झालं. मंजुघोषेला रिचर्डबरोबर नाचतांना पाहून त्याचं कांहीं तरी बिनसलं होतं. पत्राचं निमित्त घेऊन त्यानं पॅरीसला जायचा बेत केला. स्वतः गेल्याशिवाय आद्रियान्‌ची समजूत पटवतां येणार नाहीं अशी त्यानं स्वतःची सोयिस्कर समजूत करून घेतली. त्याची वार्षिक रजा त्याला इतक्या लवकर मिळणं शक्य नव्हतं. पण दुसऱ्याच दिवशीं शनिवार होता. शनिवार रविवार सुट्टीचे दिवस, वाटल्यास सोमवारीं रजा काढतां आली असती म्हणून एका खाजगी विमानकंपनीचं स्वस्तांतलं तिकीट काढून उपेन्द्र पॅरीसला गेला.

आँद्रे बाहेर जाण्याच्या तयारींत होती. रात्रींचं जेवण नुकतंच आटोपलं होतं. आद्रियान् जेनीला झोंपवत होती. आँद्रेच्या प्रकाशना-तर्फे आज बऱ्याच लेखकांना व इतर संबंधितांना पार्टी होती. पार्टीला हजर राहून देखरेख ठेवणं आँद्रेला आवश्यक तर होतंच पण बऱ्याच

मोठ्या लेखकांना पहायला मिळणार म्हणून ती खूषहि झाली होती. शिवाय एरवीं संध्याकाळचा तिला कंटाळा यायचा, एकसारखा उपेन्द्राच्या विचित्र वागण्याचा विचार करून तिचं डोकं फिरायचं. असं कांहीं तरी विरंगुळ्याचं साधन तिच्या वांट्याला क्वचितच यायचं.

दोनच दिवसांपूर्वी आँद्रेला बढती मिळाली होती. हे पार्टीचे प्रसंग संस्थेच्या भरभराटीच्या दृष्टीनं महत्त्वाचे असल्यामुळें व्यवस्थित पोषाख करून येण्याची सूचनाहि तिला मिळाली होती. पार्टीसाठीं आँद्रेनं काळा बिन बाह्यांचा गाऊन खरेदी केला होता. तिच्या फिकट रंगाला तो फारच शोभून दिसला. उपेन्द्रानं दिलेली लिपस्टिक् लावून, खांद्यावर काळी शाल गुंडाळीत तिनं दार उघडलं तर दाराशीं उपेन्द्र उभा

आँद्रे इतकी वेगळी व सुंदर दिसत होती कीं, पट्‌कन तिला ओळखणं उपेन्द्राला जड गेलं. उंची पोषाखांत त्यानं आँद्रेला कधींच पाहिलं नव्हतं. उपेन्द्राला पहातांच आँद्रेचं हृदय आनंदानं धडधडूं लागलं. पण तिचा रुसवा अजून मावळला नव्हता. कांहींहि न बोलतां त्याला आंत येण्यापुरती वाट द्यायला ती मागें सरली.

आँद्रेनं केलेलं थंड स्वागत पाहून उपेन्द्र सरदला. तसंच आँद्रेचं सौंदर्य त्याला विशेषत्वानं जाणवत असलं तरी आपण नस्तानांच फक्त हिनं ही वेषभूषा केली हा विचार त्याचा अहंभाव दुखवीत होता आंत येऊन त्यानं दिवाणखान्यांत आपली बॅग ठेवली.

" बाहेर चाललीस ? " त्यानं आँद्रेला विचारलं.

" हो. पण थोडा वेळ थांबेन. " डाव्या मनगटावरच्या घड्याळाकडे दृष्टिक्षेप टाकीत आँद्रेनं उत्तर दिलं.

काळ्या चकचकीत आणि भरदार गाऊनमध्यें लपेटलेला आपला उंच बांधा ताठ धरून रुबाबानं, थंड अलिप्ततेनं बोलणारी आँद्रे उपेन्द्राला अजिबात नवखी होती. तिनं त्याचा गोंधळ उडवला. इकडे तिकडे घुटमळत तो एका खुर्चीत बसला. खिशांतल्या रुमा-

लानं त्यानं चेहरा टिपला. ऑॅंद्रे दरवाजांत उभी राहून त्याच्याकडे पहात होती.

" आद्रियान्‌बद्दल तूं लिहिलं होतंस म्हणून आलों. " बोलणं सुरू करण्याचा उपेन्द्रानं प्रयत्न केला.

" असं असं. आणतें आद्रियान्‌ला बोलावून. " ऑॅंद्रेचा राग क्षणाक्षणाला वाढत होता. अद्यापि उपेन्द्रानं म्हणावं, ' तुला कांहींच धड न सांगतां मी लंडनला निघून गेलों ! चुकलों खरा पण आतां कां रागावतेस ? मी आलोंय् ना परत ? " एवढे चार साधेसेंच शब्द ऑॅंद्रेचा राग घालवायला समर्थ ठरले असते

खोलींत जाऊन ऑॅंद्रेनं आद्रियान्‌ला बोलावून आणलं. दोघांच्यांतला मानाचा पडदा नाहींसा होण्याची जी थोडीफार शक्यता होती ती आद्रियान्‌च्या आगमनानं पार नाहींशी झाली. आद्रियान् बरीच काळवंडली होती, स्वतःच्या दुःखांत चूर होती. उपेन्द्राच्या अनपेक्षित आगमनाचं तिलाहि आश्चर्य वाटलं होतं. ऑॅंद्रे-उपेन्द्रांत निर्माण झालेला दुरावा तिला दिसत होता, समजत होता. पण तो दूर करण्याचं सामर्थ्य आणि चतुराई आद्रियान्‌मध्यें नव्हती. त्या दोघांपेक्षांहि ती जास्त गोंधळली, कांहीं तरी औपचारिक प्रश्न विचारीत बसून राहिली.

नऊ वाजतां ऑॅंद्रे म्हणाली—

" मला गेलंच पाहिजे! जरूरीचं काम आहे, मी येतें. "

कोणी कांहीं बोलायच्या आधींच ती वाऱ्यावर तरंगणाऱ्या पिसासारखी नाहींशी झालीदेखील.

" मला भूक लागली आहे. या घरांत मला कांहीं खायला मिळणार आहे कां ? कीं रेस्टॉरंटचा रस्ता धरूं ?" ऑॅंद्रे जातांच उपेन्द्रानं रागानं विचारलं

" मी देतें ना. लक्ष्यांतच आलं नाहीं. तुझ्या खोलींत ठेव तुझी बॅग. " आद्रियान्.

उपेन्द्राची खोली होती तशी ठेवलेली होती. भाडेकऱ्यांनीं गळ घातली तरी ऑॅंद्रे ती कुणाला द्यायला तयार नव्हती. पण खोलीकडे

उपेन्द्राचं लक्षहि गेलं नाहीं. बिछान्यावर बॅग फेकून तो स्वयंपाकघरांत गेला.

" रात्रींच्या वेळीं नटूनसजून कुठल्या महत्त्वाच्या कामाला गेली ही ? " दुखावलेल्या लहान मुलाच्या आकस्ताळेपणानं त्यानं विचारलं.

" तिच्या ऑफिसमध्यें पार्टी आहे—बरेच लेखक, प्रकाशक, चित्रकार, जाहिरातदार वगैरे यायचे असतात. काम करणाऱ्या मुलींनाच पार्टीची व्यवस्था ठेवावी लागते. गेले कांहीं दिवस त्याच गडबडींत गेले तिचे. "

" हं ! "

" बैस. कर सुरुवात." आद्रियान् अलिकडे बरीच अबोल झाली होती. त्यांत उपेन्द्राचा राग पाहून तिला कांहींच बोलतां येईनासं झालं होतं.

" आणि तूं हें नाचून पोट भरण्याचं कसलं वेड घेतलं आहेस डोक्यांत ? स्वतःचे आणि मुलीचे हाल केल्याशिवाय बरं वाटत नाहीं होय तुला ? "

" नाचण्याचीच असं नाहीं, कसलीहि नोकरी करायला तयार आहे मी. शिकलें असतें थोडीफार तर दुसरी चांगली नोकरी मिळाली असती. "

" मी हें खूळ चालू देणार नाहीं. आद्रियान् तूं नोकरी करायची नाहींस. "

उपेन्द्राच्या रागाला आद्रियान् घाबरत होती. पण या बाबतींत तिनं कच खाल्ली नाहीं.

" मी नोकरी करणार आहे उपेन् ! " त्याच्या डोळ्याला डोळा भिडवून तिनं सांगितलं.

" कां ? आम्ही काय मेलों आहोंत ? कीं आमची मदत घ्यायची लाज वाटते तुला ? "

" मुळींच वाटत नाहीं. आजवर काय कमी मदत घेतली ?— तुझी आणि आँद्रेची ? "

विभाग
क्रमांक

" मग माझं ऐक, नोकरी करायची नाहींस. केलीस तर तूं मला परकी मानतेस असं मी समजेन—"

" उपेन्," आद्रियान् प्रौढपणानं बोलूं लागली. " असा त्रागा करून घेऊं नकोस. दुसऱ्याचा दृष्टिकोन समजून घेण्याची थोडीशी संवय ठेव. प्रश्न नुसता पैशाचा नाहीं. माझ्या स्वाभिमानाचा आहे. आजवरच्या आयुष्यांत मी स्वतःबद्दल आदर वाटेल असं कांहीं केलं नाहीं. चुकाच केल्या आहेत सगळ्या. निदान श्रम करून मुलीला वाढवलं तर मन थोडं शान्त होईल. स्वतःला इतकं हिणकस मानणार नाहीं मी. तुला तुझा स्वाभिमान आहे, आँद्रेला तिचा आहे. प्रसंगीं तुम्ही एकमेकांना दुखवतां, पण स्वतःच्या स्वाभिमानाला धक्का लागूं देत नाहीं. थोडासा, अंशमात्र स्वाभिमान मिळवण्याची माझी तळमळ तुम्हांला कां समजूं नये ?" खुर्चीच्या पाठीवर आपले थरथरणारे सुबक हात टेंकून आद्रियान् कळवळून बोलत होती. उपेन्द्राला जिव्हारी मारल्यासारखं झालं. पुरुषांना भुलवून पैसा मिळवूं पहाणाऱ्या या मुलीच्या अंतरंगांत इतकं प्रौढत्व, इतकी मंगलता सांठून राहिली असेल याची त्याला कल्पना नव्हती. अचानक झालेल्या या दर्शनानं तो दिपला, थिजला. आद्रियान्चं म्हणणं बरोबर होतं—दुसऱ्याच्या दृष्टिकोनाचा त्यानं कधीं विचार केला नव्हता.

" माझी चूक होत होती आद्रियान्; पुन्हां मी असला दुराग्रह धरणार नाहीं !" उपेन्द्र म्हणाला.

बिछान्यावर पडतांच उपेन्द्राची टोंचणी हजारपटीनं वाढली. याच आद्रियान्ला त्यानं एकेकाळीं ' चवचाल ' म्हणून निकालांत काढलं होतं. दुसऱ्याची परीक्षा करण्याचा, त्यांना लेबलं चिकटवण्याचा काय हक्क होता त्याला ?...आद्रियान्ला मदतीची गरज आहे ही त्याची आणखी एक मूर्खपणाची समजूत ! त्याच्यापेक्षां तिला जास्त अक्कल होती !...घायकुतीला येऊन पॅरीसला येण्यांत घोडचूक झाली होती त्याची...आँद्रेवर रागावण्यांत अर्थ नव्हता. तो होऊन तिच्यापासून दूर गेला होता, आतां ती स्वतःचं आयुष्य

निर्माण करीत होती. तिथं स्वत:साठीं स्थान शोधण्याचा त्याला हक्क नव्हता...रात्रभर असे परस्परांशी फारसा संबंध नसलेले विचार उपेन्द्राला भंडावीत राहिले. झोंप तर त्याला मुळींच आली नाहीं.

पहांटे उठून त्यानं आद्रियान्च्या खोलीच्या दारावर टकटक केलं. आँद्रेला रात्रीं परतायला बराच उशीर झाला होता, तिचा नुकताच डोळा लागला होता.

" आद्रियान् मी जातो. "

" जातोस ? इतक्या पहांटे ? कुठें ? "

" परत लंडनला. "

" उपेन् तुला झालंय् काय ? आँद्रेला सांगून तरी जा. "

" नको. तूंच सांग. तिला कांहीं फारसं वाईट वाटणार नाहीं या खेपेला. काल माझी अडचणच झाली तिला जरा. माझंच चुकलं, तिला आधीं कळवून तिची संमति घेऊन मगच यायला पाहिजे होतं मी ! "

" असं मुळींच नाहीं उपेन्. फक्त पार्टीला जाणं रद्द करणं तिला शक्य नव्हतं म्हणून—"

" अर्थात् मला तें सर्व मान्य आहे. माझा तिच्यावर मुळींच राग नाहीं. मी नेहमीं म्हणत नसतो कां, कुणाला कुणाची गरज नसते. चार दिवस जवळ राहिलं कीं दूर जातांना वाईट वाटतं एवढंच. अर्थात् माझं हें तत्त्वज्ञान फक्त बोलण्यापुरतंच आहे. प्रत्यक्षांत मला वाटतं माझी कुणाला तरी गरज असावी, केव्हांहि गेलं तरी प्रेमानं स्वागत होईल असं एखादं घर असावं; पण या सर्व इच्छा वेडगळपणाच्या आहेत. तेव्हां स्वत:च्या चुका सुधारण्याचं ठरवलंय् मी. आँद्रेला म्हणावं मी आलोंच नाहीं असं समज. पुन्हां असला घायकुतेपणा होणार नाहीं माझ्या हातून !"

" उपेन्—" आद्रियान्च्या ओठावर शब्द आले होते—"हेंच तें घर. आँद्रेचं तुझ्यावर प्रेम आहे. एवढं तुला अजून समजूं नये?" पण प्रयासानं तिनं ते मागें रेटले. जे शब्द आँद्रे उपेन्द्राजवळ स्वत:

उच्चारायला तयार नव्हती तें आद्रियान्‌नं उच्चारणं बरं नव्हतं. आँद्रेला समजल्यानंतर तिचा स्वाभिमान दुखावला असताच आणि आद्रियान्‌लाहि तिनं कधीं क्षमा केली नसती. . आपला स्वाभिमान टिकवण्यासाठीं ' आद्रियान् खोटं बोलते आहे ' असा आरोप करायलाहि आँद्रेनं मागेंपुढें पाहिलं नसतं.

" अच्छा आद्रियान् ! जेनीला तेवढीं खेळणीं दे. " उपेन्द्र निघून गेला.

सकाळच्या प्रसन्नतेनं आँद्रेला जाग आली तेव्हां उपेन्द्रावरचा तिचा राग नाहींसा झाला होता. उपेन्द्र परत आला, याक्षणीं तो आपल्या घरांत आहे ही जाणीव तिला सुखवूं लागली होती. भराभरा ती उठली; उपेन्द्राची आणि तिची पहिली भेट झाली त्यावेळीं तिनं घातलेला जुनाट पोषाख तिनं चढवला, स्वयंपाकघरांत जाऊन तिनं पाणी तापत ठेवलं.

" एवढं पाणी कोणाला ? " आद्रियान्‌नं विचारलं.

उपेन् किती चहा पितो विसरलीस वाटतं ? "

" तो गेला; आँद्रे तो परत लंडनला गेला ! " कसे तरी शब्द बाहेर ढकलून आद्रियान् आँद्रेसमोरून नाहींशी झाली.

● ● ●

## १४

शहाणपण गंवसल्याच्या आनंदांत उपेन्द्र लंडनला परत आला. एकदां आँद्रेपासून दूर जायचं ठरवल्यावर पुन्हां मनाच्या कच्चेपणानं तिच्याकडं धांव घेतल्याबद्दल त्यानं मनाची हजेरी घेतली, पुन्हां कसलेहि पाश उत्पन्न होऊं द्यायचे नाहींत असं स्वतः ला बजावलं आणि ओढून ताणून आणलेल्या उत्साहानं तो कामाला लागला.

मंजुघोषेनं त्याला एक लहानसं चिठ्ठीवजा पत्र लिहिलं होतं तें घरीं येऊन पडलं होतं.

प्रिय उपेन्द्र,

तुम्हांला दोन तीनदां फोन केला. तुम्ही एकाएकी पॅरीसला गेल्याचं समजलं. अचानक हा बेत कां ठरवला? कांहीं अडचण तर आली नाहीं ना? परत आल्यावर फोन करा.

मञ्जुघोषा.

पत्र वाचून त्याचं मन त्याला अधिकच खाऊं लागलं. मञ्जुघोषेनं रिचर्डबरोबर नृत्य करावं यासारखा साधासा प्रसंग घडतो काय आणि आपण लगेच लंडन सोडून पळतो काय सगळाच मूर्खपणा!

लंडनच्या वातावरणांत दोन तीन दिवस रुळल्यानंतर मगच त्यानं मञ्जुघोषेला फोन केला. आणखी दोनचार दिवस उलटल्यानंतर तिच्याच सूचनेवरून तो तिला भेटायला गेला.

तिच्या सहवासांतली पूर्वीची गोडी आतां त्याला अनुभवतां येत नव्हती. मञ्जुघोषेनं हजारों गमतीजमती त्याला ऐकवल्या. पण तो अंशमात्रहि उद्दीपित झाला नाहीं. सध्यां त्याला गंभीर, सखोल, समंजस मैत्रीची तहान होती. ती पुरवणं मञ्जुघोषेच्या आटोक्याबाहेरचं होतं. मञ्जुघोषा स्वतः गंभीर होऊं शकत नव्हती तशीच दुसऱ्याच्या गांभीर्याला साथहि करूं शकत नाहीं.

पण वेळ घालविण्याचं एक साधन म्हणून तो तिला अनेकदां भेटत असे. उदासीनपणें यंत्रवत् कांहीं तरी बोलत असे. मञ्जुघोषेला मात्र त्याच्यांतला फरक कधींच जाणवला नाहीं.

"उद्यां मला रिचर्डकडे डिनरला बोलावलंय्." मञ्जुघोषेनं एक दिवस त्याला सांगितलं.

"बरं मग?"

"म्हणजे त्याच्या घरीं. तो स्वतः स्वयंपाक करणार आहे."

उपेन्द्र गप्पच होता. आपल्याला हें सांगण्याचा तिचा काय उद्देश असावा हें त्याच्या लक्ष्यांत येत नव्हतं.

" साडेदहाच्या सुमाराला मला न्यायला याल ? " जरा वेळ थांबून घुटमळत मञ्जुघोषा म्हणाली.

" मी न्यायला यायचं ? छेः तें फारच वाईट दिसेल. रिचर्ड पोंचवील कीं तुला. It is his duity !"

" असं काय करतां ? या कीं please—

तिच्या चेहऱ्यावरचा याचनेचा भाव पहावेना म्हणून त्यानं होकार दिला.

रिच्मंड विभागांत एका टुमदार बंगलींत रिचर्ड एकटाच रहात होता. बरोबर साडेदहा वाजतां उपेन्द्रानं दारावरची घंटा दाबली.

" कोण आहे तें ? Get out !" रिचर्ड आंतून कातावून ओरडला.

" मी मञ्जुघोषेला न्यायला आलों आहे. तिनं मला बोलावलं होतं. " उपेन्द्रानं शांतपणें उत्तर दिलं.

Oh I see, I am sorry. मला वाटलं शेजारच्या घरांतलीं वात्रट पोरं असतील—" असं कांहींसं बोलत रिचर्डनं दार उघडलं मञ्जुघोषा मागेंच उभी होती. रिचर्डला ' गुड नाईट ' देखील न म्हणतां ती बाहेर पडली. तिचा चेहरा पांढरा फटक पडला होता.

फाटकाबाहेर येतांच ती हमसाहमशीं रडूं लागली. " आज तु-तुम्ही आलां नसतां तर भलताच प्रसंग—ती कांहीं तरी सांगण्याचा प्रयत्न करीत होती. पण उपेन्द्रानं तिला बोलूं दिलं नाहीं.

" Sleep over it and you will forget everything " त्यानं तिला समजावलं आणि टॅक्सींत घालून घरीं नेऊन सोडलं.

रिचर्डच्या घरीं काय झालं असावं याची पुरेशी कल्पना त्याला आली होती. मञ्जुघोषा त्याच्या मनांतून अधिकच उतरली होती. स्वतःचं रक्षण करण्याची अक्कल नव्हती तर हिनं असलं आमंत्रण स्वीकारावं कशाला ? अचानक असा प्रसंग येऊन ठेपला तर त्याचं निराकरण हिला कां करतां येऊं नये ? असं त्याला वाटलं. या बाबतींत ॲंद्रिशीं त्याचं अनेकदां भांडण झालं असलं तरी तिचं

वागणं कसं चोख होतं, हंसत खेळत बोलूनदेखील दुसऱ्याला दोन हात लांब ठेवण्याची कला तिला कशी अवगत होती, हें आठवून तो विनाकारणच बेचैन झाला.

आठवड्यानंतर मञ्जुघोषेचं त्याला एक मोठं पत्र आलं-

प्रिय उपेन्द्र,

तुमचे मी औपचारिक आभार मानावेत इतका आपला स्नेह वरवरचा नाहीं. परंतु तुमची भेट घ्यावी आणि तुम्हांला सर्व गोष्टींचा खुलासा करावा म्हणून आज आठवडाभर मी फोनकडे जात आहे. पण फोन करण्याचा धीर मात्र मला होत नाहीं. जें कांहीं घडलं त्याबाबतींत स्वतःलाच मी मोठ्या प्रमाणांत दोष देत आहे.

थोडक्यांत सांगायचं म्हणजे 'त्यानं' माझा गैर फायदा घ्यायचा प्रयत्न केला. तुम्ही वेळेवर आलां नसतां तर माझी काय स्थिति झाली असती याची कल्पनाहि मला करवत नाहीं.

माझ्या मतें चूक माझीच आहे. मी त्याच्यावर इतका विश्वास टाकायला नको होता. किती झालं तरी आपली संस्कृति या लोकांपेक्षां वेगळी आहे. कदाचित् त्यानं त्याच्या मूल्यांच्या चष्म्यां-तून माझी किंमत केली असेल.

स्त्रियांना असल्या संकटांची चाहूल आगाऊ लागते म्हणतात. मला ती लागली असावी. कारण जाण्याविषयीं मी साशंक होतें. तुम्हांला घ्यायला बोलावलं तें यासाठींच. तुम्ही माझ्या बोलण्याकडे मुळींच लक्ष दिलं नाहींत. नाहीं तर तुमचा सल्ला घेऊन आमंत्रणाचा स्वीकार रद्द करावा कीं काय अशा विचारांत मी होते. तुमचे आभार मानणं तुम्हांला आवडणार नाहीं म्हणून तसं कांहीं लिहीत नाहीं. पण तुम्हांला मी कधींहि विसरणार नाहीं.

तुमची मञ्जुघोषा.

एकदां वाचून उपेन्द्रानं पत्र फाडून फेकून दिलं. मञ्जुघोषेला त्यानं फोन केला नाहीं किंवा भेटण्याचा प्रयत्नहि केला नाहीं.

चार दिवसांनीं तो ऑफिसमधून बाहेर पडला तेव्हां ती समोरच उभी होती.

" चहा घेऊं या ? " तिनं मंदस्मित करीत विचारलं.

" नको आतां. मला घरीं गेलं पाहिजे. "

ती निघून जाईल या अपेक्षेनं तो किंचित् थांबला. पण ती उलट म्हणाली—

" चला ना मग. मी येतेंय् तुमच्याबरोबर. तुमची हरकत नाहीं ना ?

उद्धटपणानं 'तूं येऊं नको' असं सांगणं त्याला जमलं नाहीं.

त्यानंतर अनेकदां ती त्याच्या 'फ्लॅट'वर आली. बरेचदां तिनं त्याला जबरदस्तीनं सिनेमाला किंवा फिरायला नेलं.त्याला हें फारसं आवडत नव्हतं. पण स्त्री असल्यामुळें तिचं निराकरण करणं त्याला जमत नव्हतं. त्याच्या ऑफिसांत ' स्टाफ पार्टी ' होती त्या दिवसाची गोष्ट. तो पार्टीला जाण्याची तयारी करीत होता एवढ्यांत ती आली.

" My Fair Lady चीं तिकीटं मिळालींत मला आजचीं. अगदीं अकस्मात् बरं कां. एका मैत्रिणीनं काढलीं होतीं. ती बरीच आजारी आहे. तिला जातां येणार नाहीं. " मञ्जुघोषेनं हर्षभरानं सांगितलं.

" आज शक्य नाहीं; स्टाफची पार्टी आहे." बुटांना पॉलिश करीत उपेन्द्र उत्तरला.

" एवढंच ना ? ती सहज बुडवितां येईल."

" वाः असं कसं माझी वाट पहातील ना सर्व. "

" उंः पाहूं देत !"

तिची ताबेदारी त्याला झोंबली.

" मला पार्टीला गेलंच पाहिजे." तो आडमुठेपणानं म्हणाला.

" असं काय करतां ? तिकीटं वांया जातील ना."

" मी सांगितलीं होतीं आणायला ?"

मञ्जुघोषेच्या डोळ्यांत पाणी गोळा होऊं लागलं.

त्या दिवसापासून तुम्ही रागावला आहांत माझ्यावर. नीट बोलत नाहीं, कधीं फोन करीत नाहीं—तुम्हांला वाटतं मी इतक्या मोकळेपणानं रिचर्डशीं बोलायला नको होतं. हो ना ? हल्लीं नाहीं मी कोणाशीं बोलत—"

"मूर्ख मुली, पुन्हां पुन्हां त्याच त्या गोष्टी तूं मला सांगूं नकोस. एकदां चूक केलीस तरी डोळे उघडत नाहींत तुझे ? तुला काय वाटतं रिचर्ड इंग्लिश आहे म्हणून असा वागला ? मुळींच नाहीं. कोणत्याहि पुरुषानं त्याच्या जागीं असचं केलं असतं आणि कां करूं नये ? स्वतःला संभाळण्याची अक्कल नाहीं त्या मुलीनं विस्तवाशीं खेळावं कशाला ? माझ्या घरीं मी न बोलावतां तूं एकसारखी येतेस. मीहि तुझा गैरफायदा घेणार नाहीं कशावरून ? मला पार्टीला जायचंय् म्हणजे जायचंय् ! माझं मन बदलायचा प्रयत्न करूं नकोस. "

धाड्कन दार आपटून तो बाहेर पडला. त्याच्या बोलण्याचा मञ्जुघोषेवर बराच परिणाम झाला. तिनं त्याला दोन ओळीची एक साधी चिठ्ठी लिहून ठेवली—

" माझ्या वर्तनाबद्दल मला फार वाईट वाटत आहे. यापुढें माझ्या चुका सुधारण्याचा मी अवश्य प्रयत्न करीन. "

तिच्या मनांत लिहायचं होतं—" पूर्वीप्रमाणेंच तुमचा स्नेह मला मिळेल कां ? " पण ती धजावली नाहीं.

स्टाफपार्टी उपेन्द्राला बरीच बाधली. घरीं येतां येतांच त्याचा घसा दुखूं लागला. बिछान्यावर पडला तो इन्फ्लुएन्झाच्या जोराच्या झटक्यानंच. आठ दिवस त्याला भयंकर त्रास झाला. पुढें सर्दीचा जोर ओसरला. पण अशक्तपणामुळें उशीवरून डोकंहि उचलतां येईना.

मञ्जुघोषेनं आठ दहा दिवस कसा तरी दम धरला शेवटीं न रहावून तिनं त्याला ऑफिसांत फोन केला. तो आजारी आहे असं कळतांच ती लगोलग त्याच्या फ्लॅटवर गेली. त्याचं हाड न् हाड

वर निघालं होतं. जेमतेम दार उघडण्यापुरताच जोर त्याच्या अंगांत होता. आजारपणांत त्याची भलतीच हेळसांड झाली होती.

मञ्जुघोषेनं त्याला थोडीं फळं, मासिकं आणून दिलीं. गरम सूप करून दिलं. कॉफी भरलेला थर्मास त्याच्या उशाशीं ठेवला. पंधरावीस दिवस ती वेळ मिळेल तेव्हां उपेन्द्राला कांहीं ना कांहीं-तरी करून देत होती.

उपेन्द्र बहुधा डोळे मिटून पडलेला असे. तिचे आभार मानण्याचं किंवा तिच्याशीं दोन शब्द बोलण्याचंहि त्राण त्याला नव्हतं. मात्र आपल्या आसपास कोणी तरी वावरत आहे ही जाणीव विलक्षण सुखावह वाटत होती. त्यानंच तो झपाट्यानं सुधारला.

एवढं मोठं दुखणं त्याला आयुष्यांत प्रथमच झालं होतं. त्यामुळें स्वतःच्या एकाकीपणाची, असहाय्यतेची, तीव्र जाणीव त्याला झाली. आपल्याला कोणाची तरी सोबत असावी, लग्न करून संसार थाटावा असेंहि विचार त्याच्या मनांत डोकावूं लागले. पण अर्थात् त्यांना कांहीं निश्चित आकार नव्हता.

उपेन्द्राचा थकवा बराच कमी झाला होता. चार पांच दिवसांनीं तो कामावर रुजू होणार होता. उन्हाळ्याला सुरुवात झाली होती. दिवस लांबले होते. रात्रीं नऊ वाजेपर्यंत उबदार प्रकाश असायचा. हिवाळ्यांतले काळे जाडजूड कपडे टाकून लोकांनीं रंगीबेरंगी हलके फुलके पोषाख वापरायला सुरुवात केली होती. बागांतून ट्यूलिप्स, लिलॅक्स्, गुलाब, मेरिगोल्ड, डॅफोडिल्स वगैरेंची रंगांत लयलूट झाली होती. काळं धुरकट लंडन प्रसन्न दिसूं लागलं होतं. मञ्जुघोषा कधीं कधीं वडिलांची मोटार घेऊन येत असे. उन्हाळ्याच्या रम्य व सुगंधित संधिप्रकाशांत उपेन्द्राला घेऊन वेगानं रपेट करणं तिला फार आवडायचं.

आजहि तिनं मोटार लंडनबाहेर भरधांव सोडली होती. मात्र नेहमींची तिची बडबड आज बंद होती. मधूनच ती उपेन्द्राकडे एखादा कटाक्ष टाकायची एवढंच. ही शान्तता आणि रस्त्यालगतचीं हिरवींगार कुरणं उपेन्द्राला सुखवीत होती. आजारपणांतून उठल्या-

पासून तो मूक झाला होता; बडबड त्याला सहन होत नव्हती. मोटारच्या सीटवर डोकं टेंकून तो स्वस्थ बसला होता. मोटारच्या गतीनं त्याला आंदुळल्यासारखं होत होतं नी ती संवेदना त्याला आवडत होती.

कँऽऽव्...मञ्जुघोषेनं मोटारला एक सफाईदार वळण दिलं आणि जवळच्या एका माळरानांत ती थांबवली.

"इथं उतरायचं ?" उपेन्द्रानं आश्चर्यानं विचारलं. बहुधा तीं दोघं एखाद्या कॉफीगृहांत कॉफी घेऊन मग परत फिरत.

"उतरायचं नाहीं." मञ्जुघोषा.

उपेन्द्रानं पुन्हां सीटवर डोकं टेकलं आणि डोळे मिटून घेतले.

"हें काय ? झोपतां काय असे ?"

"सॉरी, झोंपत नव्हतों. डोळे मिटून पडायला बरं वाटतं !"

"माझ्याशीं गप्पा करायला बरं वाटत नाहीं ?"

"कोण म्हणतो ? पण डोळे मिटून गप्पा करायला हरकत आहे तुमची ?"

"आहे. मला तुमच्याशीं एका महत्त्वाच्या विषयावर बोलायचं आहे."

"असं ? अरे बापरे. जरा थांबा—" उपेन्द्रानं घसा साफ केला, टाय् चांचपला. ताठ बसत तो म्हणाला— "कुठला तो महत्वाचा विषय ? येती निवडणूक कीं निःशस्त्रीकरण ?"

"तुम्हांला थट्टा करण्यापलीकडे कांहींच सुचत नाहीं !" मञ्जु-घोषा फुरंगटून म्हणाली.

"तुम्ही विषय काय तें सांगा, मी गंभीर झालों नाहीं तर माझा कान धरा; झालं ?"

"'विषय' 'विषय' काय लावलंय् ? इथं काय निबंध लेखन चाललंय् कां ?"

"पहा. कांहीं म्हटलं तरी तुम्हाला पटत नाहीं. मी गप्प बसतो कसा. तुम्हीच काय सांगायचं तें सांगा."

" अं हं, मी नाहीं सांगणार." नखांनीं मोटरचं चाक उकरीत मञ्जुघोषा म्हणाली.

" नाहीं सांगणार ? मग महत्त्वाच्या विषयावर बोलायचंय् काय म्हणालांत ? "

" तें तुम्हीच ओळखायचं. "

" अं......नेहमींप्रमाणें तुमच्या साडीच्या आणि ब्लाऊजच्या रंगाची गफलत झाली. "

" असं हो काय करतां ? गुदगुल्या केल्यानं जीव जातो तसं तुमच्या थट्टेनं व्हायचं !"

" मी तरी काय करूं, मला ओळखतां नाहीं येत. "

" पपा माझं लग्न ठरवताहेत. "

" लग्न हा काय महत्त्वाचा विषय झाला ? अगदींच गौण बाब आहे ती. " उपेन्द्रानं पुन्हां तिला चिडवायला सुरुवात केली. तिच्याशीं गंभीरपणानं बोलणं त्याला कधींच जमलं नव्हतं.

" मी आतां रडेन हं, नाहींतर बडवून काढीन तुम्हाला " मञ्जुघोषा रडवेली झाली होती.

" पुन्हां चुकलों. कॉंग्रॅच्युलेशन्स, कुणाशीं ठरतंय् ? "

" मला करायचं नाहीं त्याच्याशीं ! "

" I see ! I get you ! असल्या गोष्टी माझ्या चटकन् ध्यानांत येत नाहींत. वडील तुमच्यावर जबरदस्ती करताहेत का ?"

" छे: तसं तें मुळींच करणार नाहींत. त्यांनीं मला किती स्वातंत्र्य दिलं आहे तुम्ही पहातांच. फक्त मी आतां लग्न करावं असं त्यांना वाटतं."

" मग ? "

" मग काय ? You fat head ! तुम्हांला प्रत्येक गोष्ट उलगडून समजावून सांगितलीच पाहिजे कां ?" लाजत उपेन्द्राकडे रोंखून पहात मञ्जुघोषा म्हणाली. तिच्या नजरेचा अर्थ स्पष्ट होता. आपल्यावर कोणाचं तरी प्रेम असावं या कल्पनेनं उपेन्द्रालाहि

लाजल्यासारखं झालं. सर्वच प्रसंग इतका अनपेक्षित होता कीं तो गडबडून गेला मञ्जुघोषा अपेक्षेनं त्याच्याकडे पहात होती.

" वेल्...वेल्...आय् डोन्ट् नो..." उपेन्द्र पुटपुटूं लागला.

" काय माहीत नाहीं तुम्हांला उपेन्द्र ?" मञ्जुघोषेनं हळुवारपणानं विचारलं.

उपेन्द्राच्या चेहऱ्यावर गांभीर्य पसरलं. तो नीट सांवरून बसला.

" मी चुकत असेन तर मला क्षमा करा, पण मला असं वाटलं कीं तुम्हांला माझ्याशीं... तुम्हांला माझ्याशी...हँग् इट्" त्यानं वाक्य अपूर्णच सोडून दिलं.

त्याचा गोंधळ उडालेला पाहून मञ्जुघोषेला स्मित फुटलं.

" तुम्ही चुकत नाहीं." ती म्हणाली आणि लाजून तिनं आपला चेहरा दोन्ही हातांत लपवला.

उपेन्द्राला कांहींच निर्णय घेतां येईना. लग्न करण्याचे विचार त्याच्या मनांत आले होते. पण मञ्जुघोषेबद्दल त्यानं या स्वरूपाचा विचार केला नव्हता. पण शक्य तितक्या लवकर मञ्जुघोषेला कांहीं तरी निश्चित उत्तर देणं आवश्यक होतं.

" लिसन् मञ्जुघोषा—मञ्जुघोषा—" मञ्जुघोषेनं मान वर काढली नाहीं. उपेन्द्रानं तिचा डावा खांदा किंचित् वर ओढला, तिचं डोकं वर उचललं गेलं. पण ती त्याच्या डोळ्यास डोळा देईना.

" मञ्जुघोषा, मला याबद्दल विचार केला पाहिजे. हें सगळंच अचानक, अनपेक्षित झालं !"

मञ्जुघोषा कांहींच बोलली नाहीं.

बोलणं खुंटलं होतं. किती तरी वेळ दोघंहि गप्प बसलीं होतीं.

" मला वाटतं घरीं परतूं या " उपेन्द्रानं सुचवलं. मञ्जुघोषेनं मोटार सुरू करायला म्हणून किल्लीकडे हात नेला आणि पुन्हां खालीं ठेवला.

" कसला विचार केला पाहिजे ? " तिनं विचारलं.

" लग्नाचा. " हा शब्द उच्चारतांनाहि उपेन्‌ला कसंसंच होत होतं.

" मी—मी आवडत नाहीं तुम्हांला ? "

" आवडतेस. "

" मग ? "

" लग्न करायचं, जन्मभरासाठीं एका परक्या जिवाची जबाबदारी घ्यायची म्हणजे चेष्टा नाहीं. "

" त्यांत जबाबदारी कसली ? " मञ्जुघोषेला हंसूं फुटलं. मनांतल्या मनांत उपेन्द्र म्हणत होता—ही ऐषारामांत नांदली आहे, जीवनांतला दगाफटका हिच्या वांट्याला कधीं आला नाहीं म्हणून प्रत्येक गोष्ट यशस्वी ठरेल हा विश्वास रक्तांत भिनलाय् हिच्या. पण जीवनाच्या सुरुवातीलाच मला असा मोठा धक्का बसला आहे कीं मी लग्नाचा विचारदेखील करायला घाबरतो आहे.

" जबाबदारीच आहे ती !" प्रत्यक्षांत उपेन्द्र म्हणाला. एवढ्या बोलण्यानं मञ्जुघोषेची भीड चेपली होती. शिवाय हवी ती गोष्ट मिळवायची एवढं एकच तत्त्व तिला माहीत होतं.

" एवढी एकच हरकत आहे तुमची ? "

" म्हणजे ? "

" दुसरं कारण नाहीं ना ? "

" अहं ! "

मञ्जुघोषा हुरळली. मोटार सुरू करून तिनं ती भरधांव सोडली. उपेन्द्राच्या घराशीं थांबल्यावर तो निमूटपणानं खालीं उतरूं लागला.

" Aren't you ever going to tell me ? " तिनं विचारलं-थोड्याशा रुसव्यानं, थोड्याशा निराशेनं.

" Tell you what, मञ्जुघोषा ? "

" That you love me ! "

रस्त्यावरच्या दिव्याचा प्रकाश तिच्या डोळ्यांवर आणि जिवणीवर पडला होता. कसल्या तरी अगम्य हुरहुरीनं तिचे ओठ थरथरत होते. डोळे आर्ततेनं त्याच्याकडे लागले होते. खेळण्यासाठीं

हट्ट करणाऱ्या लहान मुलासारखी वाटली ती त्याला. तिची समजूत काढायची तर तिला जवळ घेऊन त्यानं म्हणायला हवं होतं–' होय मञ्जुघोषा, माझं तुझ्यावर नितान्त प्रेम आहे. ' असं कांहीं तरी म्हणण्याचा इशारा तो मनाला देत होता. पण तें थिजलं होतं. हवे ते शब्द बाहेर पडत नव्हते. तो जवळ जवळ खालीं उतरलाच होता. खिडकींतून आंत डोकं घालून त्यानं मायेनं तिचा हात थोपटल्या-सारखं केलं.

" Of corrse, I do. Good--night " तो कसाबसा म्हणाला आणि मागें वळूनहि न पहातां पायऱ्या चढून नाहींसा झाला.

" सारखं सारखं रेस्टॉरंटमध्यें काय जायचं ? आपण ' सेल्फ्रि-जेस् ' मध्यें जाऊं आज. " मञ्जुघोषा.

" दुकानांत ? कशाला बुवा ? काय घ्यायचंय् ? " उपेन्द्रानं चौकशी केली दुकानांत जाण्याचा त्याला मनस्वी कंटाळा होता.

" चला कीं. "

' सेल्फ्रिजेस् ' मध्यें फर्निचरच्या खात्यांत मञ्जुघोषा शिरली. तासभर खर्च करून तिनं कोंचं, खुर्च्या, टीपॉइज्,—जेवढं म्हणून पहातां आलं तेवढं सर्व पाहिलं. प्रत्येकाच्या किंमती विचारल्या; लक्षांत ठेवल्या.

" हा सोफा तर आवडला तुम्हांला ? " " हें टीपॉय सुंदर आहे नाहीं ? " वगैरे प्रश्न ती अधूनमधून उपेन्द्राला विचारत होती. पण तो कंटाळला होता, ताटकळला होता. आपला वेळ निष्कारण वाया चालल्यासारखं त्याला वाटत होतं. मञ्जुघोषा मात्र विक्रेत्याबरोबर चर्चा करण्यांत दंग झाली होती.

त्यादिवसापासून मञ्जुघोषा उपेन्द्रावर हक्क गाजवूं लागली होती—त्याच्याशीं लग्न ठरल्याप्रमाणें वागूं लागली होती. उपेन्द्रानंहि तिला फारशी हरकत घेतली नव्हती. कुणाशी तरी लग्न करायचं मग मञ्जुघोषा कां नको ? अशा तऱ्हेची वृत्ति त्यानं स्वीकारली होती. तिच्याशी त्याचं खेळीमेळीचं वागणं

पूर्ववत् चालू होतं. मञ्जुघोषा मात्र घर सजवण्याच्या स्वप्नांत रंगून गेली होती. मात्र गेले पंधरावीस दिवस त्या दोघांत लग्नाचा विषय पुन्हां निघाला नव्हता.

" छेः कंटाळलों बुवा शनिवारची सुट्टी अशी दुकानांत घालवायची जिवावर येतं !" बाहेर पडतांच उपेन्द्र उद्गारला.

" तें दिसतंच फ्रॅटमध्यें तुम्ही काय सामान भरलंय् त्यावरून."

" म्हणजे आतां या सामानाची चौकशी केली ती माझ्यासाठीं ?"

" अर्थात् ! मला तिथंच रहावं लागणार आहे ना ?" मञ्जुघोषा नकळत बोलून गेली. पण मागून तिला खूप लाजल्यासारखं झालं. तिचा गोंधळ उडालेला पाहून उपेन्द्राला मौज वाटली.

" एवढं लाजायला नको. मला माहीत होतं तूं स्वतःच्या संसारासाठीं हें पहाते आहेस हें "

एवढं प्रोत्साहन मञ्जुघोषेला पुरेसं होतं. पुढील आठवड्यांत तिनं आख्खं लंडन पालथं घातलं आणि उपेन्द्रापुढं एक यादी टाकली.

" ही आपल्याला लागणाऱ्या वस्तूंची यादी "

उपेंद्रानं यादी वाचली. तो चपापला. एवढ्या वस्तू विकत घेणं त्याला शक्य नव्हतं. मञ्जुघोषेला त्याच्या आर्थिक परिस्थितीची वेळींच कल्पना देणं इष्ट होतं.

" मञ्जुघोषा, संसाराच्या सुरुवातीलाच एवढं सामान घेणं आपल्याला परवडणार नाहीं."

" नाहीं कसं ! एवढी चांगली नोकरी असतांना आपण एका खोलींत रहायचं ?"

" नाहीं. पण एवढा श्रीमंती थाटहि आपल्याला मांडतां येणार नाहीं."

" पपांकडून मी लग्नांत मोटार घेणार आहे."

" तेंहि मला आवडणार नाहीं. मला शक्य होतांच मीच मोटार घेणार आहे."

“ पण पपांनीं दिली तर काय झालं ? ”

“ दुसऱ्याचा पैसा घेणं मला बरं वाटत नाहीं. ”

“ मग आपण संसार थाटायचा कसा ? ” निराशेनं मञ्जुघोषा उद्‌गारली.

“ माझ्याजवळ थोडे फार पैसे आहेत; नाहीं असं नाहीं. त्यांतले थोडे शिल्लक ठेवून बाकीच्यांचं तूं काय वाटेल तें करूं शकतेस. ” एवढी साधीशी गोष्टहि मञ्जुघोषेला समजूं नये म्हणून उपेन्द्र हबकला होता. पण मञ्जुघोषेनं त्याचं बोलणं साफ कानांमागे टाकलं. त्याच्या बोलण्याचा अर्थच तिला नीटसा उमजला नव्हता त्याला ती तरी काय करणार.

प्रसंग साधा होता, क्षुल्लक होता. उपेन्द्रानं तिकडे बुद्ध्या दुर्लक्ष केलं. पण मञ्जुघोषेच्या सहवासांत त्याला पदोपदीं जाणीव होऊं लागली कीं तिचा व त्याचा पिंड आमूलाग्र भिन्न होता. दोघं वाढलीं होतीं, जगत होतीं, अत्यंत भिन्न परिस्थितींत. मञ्जुघोषा निवाऱ्यांत वाढली होती, उपेन्द्रानं जीवनाचे प्रखर चटके सहन केले होते. तिचं सौंदर्य, तिचा लाडीकपणा त्याला तात्पुरता सुखवीत असला तरी त्याला कायमची साथ देऊं शकत नव्हता. शेवटीं मञ्जुघोषेच्या सान्निध्यांत अधिक काळ राहिल्यास उपेन्द्राला कंटाळल्यासारखं होऊं लागलं. एक दिवस तिला भेटण्याचं कबूल केलं असूनहि तो मुद्दाम एकटाच भटकत सुटला.

थेम्सच्या कांठाकाठानं उपेन्द्रानं मैल दोन मैलाची रपेट केली. तहान लागल्यामुळं रस्त्यावर येऊन तो एका कॉफीगृहांत शिरला.

त्याचं मन पुनः पुनः मञ्जुघोषेबद्दल, आपल्या भावी संसाराबद्दल विचार करीत होतं. एकाएकीं आपल्याला कोणीतरी न्याहाळतंय् अशी भावना त्याला झाली. मान उंचावून त्यानं समोर पाहिलं. कोपऱ्यांतल्या टेबलावर एक ओळखीचा चेहरा त्याला दिसला.

—यीट्स !

उपेन्द्राच्या कपाळाला आंठ्या पडल्या. खालीं मान घालून तो कॉफीचे घुटके घेऊं लागला, पण त्याच्या एका दृष्टिक्षेपानंहि यीट्स-मध्यें झालेला जो फरक टिपून घेतला होता तो त्याच्या मनांत घोळत होता. यीट्सचं शरीर पूर्वीसारखंच भरदार होतं. पण चेहऱ्यावर बऱ्याचशा रेषा उत्पन्न झाल्या होत्या. त्यांतल्या चारदोन वार्ध-क्याच्या सुरुवातीच्या असतील खऱ्या पण बऱ्याचशा हास्यरेषा होत्या. यीट्सच्या चेहऱ्यावर तुसड्या भावाचं पुसटसं देखील चिन्ह नव्हतं. पाठीला मान टेंकवून ते एकसारखे खो खो हंसत होते. त्यांच्याबरोबर एक स्त्री होती. एरवींच्या त्यांच्या निवडीपेक्षां कितीतरी वेगळी! तिचं वय असेल पस्तीस छत्तीस. केंस खूपच आंखूड कापले होते—विंचरण्याचा त्रास चुकावा म्हणून बहुतेक. पोषाख गबाळा, शरीर सुटलेलं, रंगरंगोटी मुळींच नव्हती. ओंठाला थोडीफार लिप्स्टिक् लावली असावी पण बोलण्याच्या भरांत ती बहुतांशीं पुसली गेली होती. यीट्सकडे पाहून ती अविरत कांहीं तरी बोलत होती आणि यीट्स खो खो हंसत होते.

यीट्सचं हें स्वरूप उपेन्द्राला इतकं अभिनव होतं कीं चोरून त्यांच्याकडे पाहिल्याखेरीज त्याला रहावेना. जरा वेळानं यीट्स-बरोबरची स्त्री बाहेर उठून गेली. उपेन्द्रानं डोळे पुन्हां कॉफीच्या कपाकडे लावले. कप वर उचलतों तर यीट्स समोर उभे! यीट्सनीं आपल्याला पाहिलं आहे एवढीहि कल्पना उपेन्द्राला नसल्यामुळें त्याची तारांबळ उडाली. यीट्स उपेन्द्रासमोरच्या खुर्चीवर बसले.

"ठीक आहे ना सगळं?" एक खुलं हास्य करीत त्यांनीं विचारलं.

"हो." उपेन्द्र.

"प्रकृति फारशी बरी दिसत नाहीं. ऑंद्रे, आद्रियान् ठीक आहेत ना?"

"अं? हो!"

"मोकळीं उत्तरं मिळत नाहींत. माझ्यावरचा राग कायम आहे कीं काय तुझा?"

" छे:—" यीट्सच्या या बोलण्यानं उपेन्द्र अधिकच गोंधळला होता.

" रागावला असलास तर सरळ सांग. अर्थात् रागवायला पुरेसं कारण आहे म्हणा तुला. पण आतां पूर्वीचा राहिलों नाहीं मी. पार बदललों आहे. माझ्याबरोबर बाई होती ना ? मेरी आर्डन नांव तिचं. तिच्याशीं लग्न करणार आहे मी. तुझी ओळख करून देतों. येईलच एवढ्यांत. मैत्रिणीला फोन करायला गेली आहे. केक्स् फार सुन्दर बनवते आणि बोलते तर इतकी छान—" मेरीचं वर्णन करण्यांत यीट्स रंगून गेले.

थोड्याच वेळांत मेरी परतली. यीट्सनीं हात उंचावून तिचं आपल्याकडे लक्ष वेधून घेतलं.

" हा उपेन्द्र कीर्तने. ही मेरी आर्डन. तुझ्याबद्दल याला मी सांगितलं आहेच. याची माझी पॅरीसमधली ओळख."

" असं ? मग माझ्याशी यांची ओळख करून देणं धोक्याचं नाहीं कां ? तुमच्याबद्दल यांनीं मला कांहीं सांगितलं म्हणजे ?" मेरीनं खट्याळपणानं विचारलं.

" तुला माहीत नाहीं असं माझ्या जीवनांत कांहींच नाहीं." मेरीकडे प्रेमभरानं पहात यीट्स म्हणाले—उपेन्द्राचा त्यांना क्षणभर विसर पडला होता.

" त्यांना आपल्याबरोबर जेवण घ्यायचं तरी आमंत्रण द्या." मेरीनं यीट्सना सुचवलं.

" आमंत्रणाचा उपचार कशाला पाहिजे ? त्याला न्यायचंच आपल्याबरोबर !"

उपेन्द्राला नाहीं म्हणतां आलं नाहीं. मेरी आर्डन त्याला फारच आवडली होती आणि गंमत म्हणजे यीट्सच्या या व्यक्तिमत्त्वाचाहि त्याच्याच्यानं राग करवत नव्हता.

यीट्सनीं एक उंची रेस्टॉरंट मुक्रर केलं. निवडक भोजन-पदार्थांची ऑर्डर दिली. बऱ्याच हास्यविनोदांत जेवण सुरू झालं. जेवण संपतां संपतां यीट्सनीं विचारलं—

"तूं आपण होऊन सांगत नाहींस तेव्हां आतां विचारणं भाग आहे—आँद्रेचं काय?"

"ती पॅरीसला आहे. तिला चांगली नोकरी आहे."

"म्हणजे अजून तुम्ही लग्न केलं नाहीं तर?"

"लग्न? मी आणि आँद्रे? छेः—तुमचा गैरसमज—" गोंधळून गेल्यामुळें उपेन्द्राला धड उत्तरहि देतां येईना.

यीट्स खो खो हंसले आणि मेरीला म्हणाले—

"पहा कशा बतावण्या करतो आहे. एकमेकांबद्दलचं प्रेम दोघांच्याहि चेहऱ्यावरून ओसंडत होतं. पण अजून कबूल करायला लाजतो."

"नाहीं हो, तसं कांहीं नाहीं!"

"नाहीं कसं? तीन वर्षं तिनं याची बटणं शिवलीं, त्याला काय आवडतं तें खायला करून घातलं, तें काय याच्यावर प्रेम असल्याशिवाय? हाहि तिच्या जवळपास असला म्हणजे तिच्याकडे कायम डोळे लावून असायचा."

यीट्सच्या हल्ल्यानं उपेन्द्राला फारच लाजल्यासारखं झालं. तें पाहून मेरीनं त्याची बाजू उचलून धरली.

"काय उगीच सतावतां त्यांना! जेवूं द्या तरी नीट."

मेरीनं तात्पुरता विषय बदलला. पण उपेन्द्राचा निरोप घेतांना यीट्सनीं त्याला बजावलं—

"आँद्रेसारखं रत्न हातचं सोडूं नकोस हं! इथं लंडनला राहून ती काय मिळणार तुला? एखादा फ्रेंच माणूस पळवून न्यायचा तिला. अरे या बायकांनीं 'हो' म्हणावं म्हणून बराच खटाटोप करावा लागतो. ही मेरी अशी साधीभोळी वाटते ना—वर्षभर तिनं मला असं छळलं म्हणून सांगूं. तिच्या किती विनवण्या केल्या, कितीदां लग्नासाठीं मागणी घातली याला सुमारच नाहीं. वर्षभरांत माझं तीस पौंड वजन कमी झालं—"

"पुरे पुरे आणि तुमच्याकडे पाहून खरंच वाटेल तें एखाद्याला. चला आतां, मला घरीं पोंचवा."

●●●

## १५

यॅट्स आणि मेरी ही जोडगोळी निघून गेली—पण उपेन्द्राला अस्वस्थ करूनच. ऑंद्रेचा पुन्हां पुन्हां केला गेलेला उल्लेख त्यानं दडपून टाकलेल्या स्मृति चाळवून गेला. नोकरी मिळतांच त्यानं धांवत पळत जाऊन तिच्यासाठीं लिप्स्टिक् खरेदी केली होती; सक्सेनानीं देऊं केलेली सोयीस्कर नोकरी त्यानं केवळ ऑंद्रे एकटी पडूं नये म्हणून नाकारली होती; आद्रियान्‌ची शुश्रुषा करतांना ऑंद्रेला त्यांतल्या त्यांत कमी त्रास व्हावा असा त्यानं हरघडी प्रयत्न केला होता. एक ना दोन हजारों प्रसंगांचीं मालिका त्याच्या डोळ्यांसमोर धांवूं लागली. या धमालीनं उपेन्द्र बेचैन होऊन गेला रात्रभर त्याला असंबद्ध वेडीवांकडीं स्वप्नं पडत होतीं. त्याची स्वतःची प्रतिकृति त्याला ओरडून सांगत होती—"तुझं ऑंद्रेवर प्रेम आहे, तुझं ऑंद्रेवर प्रेम आहे."

पण सकाळ होतांच उपेन्द्राच्या मनांतलं वादळ निवळलं. त्याच्या जीवनाच्या पुस्तकांतलं ऑंद्रेचं प्रकरण त्यानं केव्हांच संपवलं होतं, मागें टाकलं होतं. आतां त्याचा विचार करण्यांत अर्थ नव्हता. त्या दिवसापुरती त्यानं रजा काढली, मञ्जुघोषेसाठीं एक उंची अत्तराची कुपी खरेदी केली आणि आदल्या दिवशीं तिला न भेटण्याबद्दलची तिची नाराजी उतरवण्याकरतां तो तडक तिच्या घरीं निघून गेला.

संध्याकाळीं साडेपांचाचा सुमार उपेन्द्राचे सहकारी काम आवरून घरीं निघाले होते. उपेन्द्र पेनशीं चाळवाचाळव करीत टेबलाशींच बसला होता. त्याला कल्पना होती, मञ्जुघोषा खालीं मोटारींत त्याची वाट पहात असेल, नेहमींपेक्षां तिचा पोषाख विशेष थाटाचा असेल, गालांवर लज्जेची लाली असेल, डोळ्यांत

उत्साहाची चमक असेल. कालच मञ्जुघोषेनं उपेन्द्राला बजावलं होतं—

" कांहीं झालं तरी उद्यां ममीला आणि पपांना आपण लग्न ठरवल्याचं सांगायचंच. विनाकारण लपवालपवी कशाला ? मी उद्यां तुला ऑफिसमधून परस्पर घरीं नेईन."

उपेन्द्रानं संमति दिली होती. पण मञ्जुघोषेशीं लग्न करणार असल्याचं जगजाहीर करायचं या गोष्टींत एक प्रकारची निर्वाणी होती ती त्याला आवडत नव्हती. गेले कांहीं दिवस मञ्जुघोषा म्हणेल तिथं तो तिच्याबरोबर फिरला होता, तिला त्यानं भेटी दिल्या होत्या, तिच्यातलं आणि त्याच्यांतलं अंतर डोळ्याआड केलं होतं. पण आज त्याला वाटत होतं—आला अखेरचा क्षण आला. यानंतर पुढें टाकलेलं पाऊल मागें घेतां येणार नाहीं.

उपेन्द्राचे सहकारी घरीं गेल्याचं पाहून मञ्जुघोषा त्याच्या ऑफिसांत शिरली. उपेन्द्राच्या हातांतलं पेन हिसकावून घेत तिनं लाडीक रोषानं डोळे मोठे करीत विचारलं—

" आज उशीरांपर्यंत काम करीत बसायचं ? "

" नाहीं, काम नाहीं, सहज—" असं कांहींसं पुटपुटत उपेन्द्र बाहेर पडला. पण तिच्या बोलण्यांतला ' आज ' शब्द त्याला पुन्हां एकदां टोंचणी देऊन गेला.

मञ्जुघोषा आज गप्प गप्प होती. पण मोटार चालवतां चालवतां ती स्वतःशींच खुदुखुदूं हंसत होती. उपेन्द्र तिच्याकडे पहात नव्हता, पण तिच्या हालचालींची त्याला मनांतल्या मनांत बरोबर कल्पना करतां येत होती. दोन तीनदां त्यानं तिच्याकडे पाहिलं. तिच्या चेहऱ्यावर झळकणारं स्मित पाहून त्याला चिडल्यासारखं झालं. विवाहाच्या अनिश्चित, अगम्य पायरीवर पाय ठेवतांना तिनं गंभीर, विचारी होऊं नये ? दुसऱ्याच्या हातांत स्वतःचं भावी जीवन देतांना तिला पुसटतीहि चुटपुट लागूं नये याचा त्याला राग आला.

" कां हंसतेस ? " उपेन्द्रानं कठोरपणानं विचारलं.

- कांहीं नाहीं. आनंदानं हंसते आहे. आपल्या लग्नाची बातमी ऐकून सगळे खूष होतील. आपल्याला एकत्र पाहिलं कीं हें जोडपं किती सुन्दर दिसतं असं म्हणतात सगळेजण."

" म्हणजे आपण लग्न करणार हें सगळ्यांना माहीत आहे ?"

" त्यांना तर्क करतां येतात. मात्र एक विसरूं नकोस—' माझ्याजवळ एवढेच पैसे आहेत आणि अमकंच आहे ' असं पपांजवळ बोलूं नकोस हं. त्यांना तें मुळींच आवडायचं नाहीं आणि त्यांच्या मित्रांना कळलं तर बरीच नाचक्की होईल आमची. गेल्याच महिन्यांत दुसऱ्या एका ऑफिसरच्या मुलीचं लग्न झालं, तिच्या नवऱ्यानं तिला हिऱ्यांच्या कुड्या घातल्या नाहींत म्हणून सगळे त्यांना हंसले."

" मग मलाहि हंसतील. मी तुला हिऱ्याच्या कुड्या घालणार नांहीं."

": ममी देणार आहे!"

" मी तुला घेऊं देणार नाहीं."

" पण एवढा अट्टाहास कां ? ती माझी आईच आहे ना ?"

" हो. आहे. एरवीं मला कांहीं वाटलं नसतं. पण या वस्तूंशिवाय तुझं अडतंय् असं दिसतंय् म्हणून मी हरकत घेतों आहे."

" माझं मुळींच अडत नाहीं. पण पपांच्या पोझिशनचा विचार करायला नको कां ?"

" पोझिशनच्या दृष्टीनं माझ्यासारखा गरीब जांवई त्यांना मुळींच शोभणार नाहीं.

" गरीब बरा असेल, हिंदुस्थानांत इस्टेट आहे ती ? "

" तुला कुणी सांगितलं ? "

" सांगितलं कुणी तरी ! "

" हिंदुस्थानांत माझं कांहीं नाहीं. " ओंठ आवळीत उपेन्द्र ओरडला.

" तुला माझ्या पैशांशी लग्न करायचं आहे कां ? "

" मुळींच नाहीं. तुला पाहिल्या दिवसापासून माझं तुझ्यावर प्रेम आहे. म्हणूनच तुझी काळजी मला घ्यायला नको ? "

" नको. माझं मी पाहीन. " उपेन्द्र आतां चांगलांच रागावला होता. पण मञ्जुघोषेनं आपलं नेहमीचं लाडीक स्मित केलं.

" पहिलं भांडण म्हणतात तें हेंच वाटतं ? " ती म्हणाली. उपेन्द्र गप्प बसला. मञ्जुघोषेनं घराच्या दिशेनं मोटर वळवली. दोघांमधली ही बोलाचाली आज जरा विशेष दमांत झाली असली तरी नवीन नव्हती. पण तेवढ्यानंहि उपेन्द्रानं काय तो निर्णय घेतला.

" मञ्जुघोषा, जरा मोटर थांबव. " उपेन्द्रानं फर्मावलं.

पण मञ्जुघोषा अवखळपणा करण्याच्या रंगांत आली होती.

" अंहं ! " वेण्या हालवीत ती म्हणाली.

" मञ्जुघोषा. "

" मी नाहीं थांबवणार ! "

उपेन्द्रानं मोटरची किल्ली फिरवली, इंजिन थंड पडलं. मञ्जुघोषाला सगळा खेळच वाटत होता. तिला हंसूं येऊं लागलं.

" मञ्जुघोषा आपली चूक होते आहे..."

" कोणती ? "

" आपण एकमेकांशीं लग्न करायला लायक नाहीं. आपले स्वभाव, आपली परिस्थिति, आपल्या आकांक्षा सगळंच फार वेगळं आहे. "

" Don't be silly. आपण—"

" माहीत आहे, आपण एकमेकांना फार शोभून दिसतो. पण रूप म्हणजे सगळं नाहीं. पण अजून वेळ गेलेली नाहीं तेवढ्यांतच माघार घेतलेली बरी. "

" You are mad. मला किल्ली दे. घरीं पपा–ममी वाट पहात असतील. त्यांना surprise देण्याचं मी कबूल केलं आहे. "

" त्यांची फार मोठी निराशा होईल हें तर खरंच. पण माझा नाइलाज आहे. " खोंचक स्वरांत उपेन्द्र म्हणाला. मोटारचं दार उघडून त्यानं बाहेर पाऊल टाकलं.

" बाय्–बाय् मञ्जुघोषा. "

–मञ्जुघोषा उपेन्द्राच्या बाजूच्या दाराकडे सरकली.



"You can't leave me Upendra; I love you so much!" मञ्जुघोषा स्फुन्दत होती.

"हें प्रेम नाहीं मञ्जुघोषा, हें वेड आहे, हा हट्ट आहे. बालहट्ट. तुझ्या सभोंवतालच्या दुनियेपेक्षां मी वेगळा आहे म्हणून तुला माझी ओढ. पण मी देऊं शकेन तें जीवन तुला चालणार नाहीं. तुझ्या दुनियेतलाच जोडीदार तूं निवडला पाहिजेस. तूं नाजूक फूल आहेस. तुझा प्रत्येक शब्द झेलून धरणारा, तुला आरामांत ठेवणारा नवरा तुला पाहिजे. I hope you find him soon." मञ्जुघोषेची पाठ थोपटून उपेन्द्र निघून गेला.

' लॅटीन क्वार्टर ' मधल्या त्या परिचित घराशीं टॅक्सी थांबतांच उपेन्द्राच्या हृदयाची धड्धड् अधिकच वाढली. गेलं वर्षभर आँद्रेचा व त्याचा पत्रव्यवहार नव्हता, तो आज येणार असल्याची आँद्रेला कल्पना नव्हती. कदाचित् आँद्रे ही जागा सोडून निघून गेली असली तर ? दुसऱ्याशीं लग्न करून नाहीं तर ठरवून बसली असली तर ?---उपेन्द्राच्या मनांत शंकांचं वादळ सुरू झालं तें त्यानं नेटानं दूर केलं. मेरीकडे प्रेमानं पहात बोलणाऱ्या यीट्सची आठवण त्याला धीर देत होती--

" प्रेम असं दुरून दुरून करतां येत नाहीं, प्रेयसीला जिंकायला बराच खटाटोप करावा लागतो ! "

आणि वाटेल तो खटाटोप करण्याचा उपेन्द्रानं आतां निश्चय केला होता. मञ्जुघोषेला दुखवल्याबद्दल त्याला वाईट वाटलं होतं, स्वतःच्या रुकाराची खात्री होण्यापूर्वींच मञ्जुघोषेला विवाहाची कबुली दिल्याबद्दल पश्चात्तापहि झाला होता. पण अस्वस्थतेंतूनहि उपेन्द्राला जाणीव होत होती कीं झालं तेंच बरं झालं होतं; घसरणारं पाऊल वेळींच सावरलं गेलं होतं- पायांत रुतलेला कांटा काढला म्हणजे वेदना थोडीशी वाढते पण बरंहि वाटतं तसं उपेन्द्राचं झालं होतं.

आणि याच जाणीवेच्या पोटीं दुसरीहि एक जाणीव निर्माण झाली होती.

—आँद्रेवरच्या प्रेमाची. सुरुवातीला नाइलाजानं, जवळजवळ मनाविरुद्ध उपेन्द्राला स्वतःशीं कबूल करावं लागलं होतं कीं आँद्रेच्या सहवासांत त्याला ती जी परिपूर्ति मिळाली होती ती आजवर इतरत्र कुठेंहि त्याच्या वांट्याला आली नव्हती. आँद्रेचे आणि त्याचे हृदयबंध एकमेकांत इतके गच्च मिसळले होते कीं आँद्रेचा निरोप घेतल्यानं त्याच्या जीवनांत एक भलीमोठी पोकळी निर्माण झाली होती. मञ्जुघोषेंत काय किंवा दुसऱ्या एकाद्या स्त्रीमध्यें काय तो टापटिपीनं संसार करणारी गृहिणी शोधीत नव्हता तर ही

पोकळी भरून काढूं शकणारी मुलगी शोधीत होता. आणि ही पोकळी भरून काढणं ऑंद्रेखेरीज दुसऱ्या कुणालाच शक्य नव्हतं !

ही जाणीव पचवायला उपेन्द्राला बरेच दिवस लागले; ऑंद्रे-शिवाय आपलं अडतं आहे हें तो स्वतःपाशीं देखील कबूल करायला तयार नव्हता. पण अखेरीस त्याचा अहंभाव पराभूत झाला. जाणीवेच्या अंकुरानं त्याला न जुमानतां प्रखर भावनेचं स्वरूप धारण केलं. उपेन्द्राला नुसतं ' ऑंद्रे, ऑंद्रे ' असं झालं.

आणखी एक आठवडा लोटला, मग मात्र उपेन्द्राच्यानं रहावेना. त्यानं नोकरीचा राजिनामा दिला. गाशा गुंडाळला आणि पॅरीसला जाणारं विमान पकडलं. ऑंद्रेच्या दाराशी पोंचेपर्यंत उपेन्द्राचं अस्सल प्रेमयाचकांत रूपान्तर झालं होतं.

टॅक्सी ड्रायव्हरच्या अंगावर एक नोट फेकून सुटे पैसे घेण्याइतकीहि उसंत न घेतां उपेन्द्र हातांतल्या दोन अवजड सूटकेसेस् संभाळीत एका पावलांत दोन दोन तीन तीन पायऱ्या ओलांडीत ऑंद्रेच्या फ्लॅटशीं पोंचला. स्वतः ऑंद्रेनंच दार उघडलं. ऑफिसमधून ती नुकतीच परतली असावी. ऑफिसमध्यें जातांना घालायचा काळा सूट अद्यापि तिच्या अंगावर होता. पायाशीं तीन वर्षांची जेनी घुटमळत होती.

उपेन्द्र क्षणभर थबकला; ऑंद्रेला त्यानं डोळ्यांत सांठवून घेतलं. तिचा चेहरा बराच म्लान दिसत होता. ती थोडी बारीक झाली आहे असंहि त्याला वाटलं. दारांत उभी रहून ती त्याच्याकडे पहात नव्हती: दूर कुठें तरी शून्यांत पहात होती.

" ऑंद्रे मी आलों आहे ! " उपेन्द्रानं घोषणा केली.

" कायमचा—ऑंद्रे मी कायमचा आलों आहे !"

ऑंद्रे बोलत नव्हती. उपेन्द्रानं निरखून पाहिलं. तिच्या निळ्या डोळ्यांत आंसवं सांठत होती. मानी, रुबाबदार ऑंद्रेला अश्रूं ढाळतांना पहाण्याचा उपेन्द्राचा पहिलाच प्रसंग ! ऑंद्रेनं त्याचं सहास्य स्वागत केलं असतं तरी उपेन्द्राला धीर आला नसता एवढा

या हताश, असहाय्य ऑंद्रेला पाहून आला. हातांतल्या सूटकेसेस् खालीं टाकून उपेन्द्रानं ऑंद्रेला जवळ घेतलं

" वेडे रडूं नकोस. माझं तुझ्यावर इतकं प्रेम आहे कीं तूं म्हणालीस तरी मी आतां तुला सोडून जाणं शक्य नाहीं. " तो म्हणाला.

स्वयंपाकघरांत आद्रियान्च्या फॉक्ला झोंबत छोटी जेनी सांगत होती—

" आई, आई लवकर बाहेर चल. एक माणूस मावशीला उचलून आंत आणतो आहे आणि मावशी मधूनच रडते आहे, मधूनच हंसते आहे आणि त्याला रागावते पण आहे. "

● ● ●

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ८५९८७ नों. दि ..............
वि. ...कों...वा..: क्र. ..............

IRBK-0108197